U.G.C. Pattern प्रमाणे महाराष्ट्रातील
सर्व विद्यापीठांच्या बी. ए. प्रथम वर्षासाठी (सेमिस्टर पद्धतीनुसार)

---

# सूक्ष्म अर्थशास्त्र
# (Micro Economics)


: लेखक :

**प्रा. डॉ. राजेश्री अप्पाराव जाधव**
(M.A.,B.Ed., M.Phil., Ph.D)
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर,
जि. लातूर

**प्रा. डॉ. प्रमोद बालाजीराव बेरळीकर**
(M.A.,Set., Ph.D.)
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद



**श्रद्धा पब्लिकेशन, सोलापूर**

सूक्ष्म अर्थशास्त्र
(Micro Economics)

* लेखक *
प्रा. डॉ. राजेश्री अप्पाराव जाधव
प्रा. डॉ. प्रमोद बालाजीराव बेरळीकर

* प्रथमावृत्ती – २०१८

* प्रकाशक – श्रद्धा पब्लिकेशन, सोलापूर

पृष्ठे : 312

मुखपृष्ठ :

अक्षरजुळवणी : भारत शेंडगे, लातूर मो. नं. ९७६५७३३८१७

मुद्रक :

प्रति : १०००

© लेखकाधीन

मूल्य ३०० ₹ (अक्षरी तीनशे रुपये)

आमच्या पंखाना भरारी
देणाऱ्या आई वडिलांच्या
चरणी अर्पण....!

# मनोगत

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद तसेच सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, अंतर्गत बी.ए. प्रथम वर्षासाठी 'सूक्ष्म अर्थशास्त्र' हा ग्रंथ लिहिण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे. हे आमचे चौथे पुस्तक प्रकाशित करताना आम्हास मनस्वी आनंद होत आहे.

सदर ग्रंथासाठी आमच्या तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव ॲड. मिलींद पाटील, कोषाध्यक्ष अण्णा डांगे, डॉ. अभय शहापुरकर, श्री. कमलाकर पाटील प्राचार्य डॉ. अनार साळुंके, मॅडम तसेच महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर प्राचार्य डॉ. जी. डी. बगडे सर, प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एम. शिंदे मॅडम, डॉ. भामरे मॅडम, माझे गुरुवर्य डॉ. एन. एन. मुंढे, प्रा. डॉ. डी. एस. तिकटे, प्रा. डॉ. पी. ई. विभूते, प्रा. डॉ. टी. एल. बारबोले, डॉ. डी. बी. मोरे याचेही आम्ही आभारी आहोत.

ग्रंथ लिखाणासाठी ग्रंथपाल डॉ. सुळसुळे मॅडम, श्री. सचिन महाजन, सिद्दीकी सर, धुळगुंडे सर, गौरी कुलकर्णी, श्री. मलकुनाईक माझे मित्र श्री. प्रवीण काशीद यानी वेळोवेळी मदत केली, याबद्दल त्यांचेही आम्ही आभार मानतो. त्याचबरोबर आमच्या कुंटुंबियानी केलेले सहकार्य महत्त्वाचे आहे.
हे पुस्तक अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना, वाचकांना, प्राध्यापकांना आणि विद्यार्थ्यांना निश्चितच उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा.

श्रद्धा पब्लिकेशच्या संचालिका सौ. स्वाती स्वामी तसेच प्रा. प्रशांत स्वामी यांचे ही आम्ही आभार मानतो. कारण त्यांनी कमीतकमी वेळात पुस्तकाचे प्रकाशन केले तसेच अक्षर जुळवणी श्री. भारत शेंडगे यांनी केल्याबद्दल त्यांचे ही आभार!

धन्यवाद!

**प्रा. डॉ. राजेश्री आप्पाराव जाधव**

**प्रा. डॉ. प्रमोद बालाजीराव बेरळीकर**

# अनुक्रमणिका


| प्रकरण | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|
| पहिले | अर्थशास्त्राची व्याख्या, स्वरूप, व्याप्ती | 11–40 |
| दुसरे | उपभोक्त्यांच्या वर्तणुकीचे सिद्धांत | 41–53 |
| तिसरे | तटस्थता वक्र विश्लेषण किंवा समवृत्ती वक्र तंत्र दृष्टिकोन | 54–80 |
| चौथे | मागणीचा सिद्धांत किंवा नियम, पुरवठा नियम व मागणीची लवचिकता | 81–115 |
| पाचवे | बाजार संतुलनाचे विश्लेषण | 116–122 |
| सहावे | उत्पादनाचे सिद्धांत | 123–148 |
| सातवे | उत्पादन खर्च | 149–164 |
| आठवे | बाजारपेठाचे स्वरूप व प्रकार | 165–200 |
| नववे | वितरण किंवा विभाजन | 201–237 |
| | वस्तुनिष्ठ किंवा बहुपर्यायी प्रश्न | 238–310 |
| | संदर्भसूची | 311–312 |

# अनुक्रमणिका

**प्रकरण पहिले : अर्थशास्त्राची व्याख्या, स्वरूप, व्यक्ती**

अॅडम स्मिथ, डॉ. मार्शल, रॉबीन्स यांनी केलेली अर्थशास्त्राची व्याख्या, अर्थशास्त्राचे स्वरूप, अर्थशास्त्राची व्याप्ती, आर्थिक प्रश्न, मागणी, पुरवठा, संतुलन, सूक्ष्म अर्थशास्त्र, गुण, मर्यादा.

कल्याणकारी अर्थशास्त्र, व्याख्या, प्रा. पिगुचे कल्याणकारी अर्थशास्त्र, नवीन कल्याणकारी अर्थशास्त्र, पॅरेटोचे युक्ततम, सामाजिक कल्याण फल, मुल्यविधान किंवा मुल्यनिर्णय भरपाई तत्व किंवा भरपाई कसोटी.

**प्रकरण दुसरे : उपभोक्त्याच्या वर्तणुकीचे सिद्धांत**

उपयोगिता विश्लेषणाचा संख्यात्मक दृष्टिकोन, उपयोगिता, मार्शल प्रणित उपयोगिता विश्लेषणाची गृहितके, घटत्या सिमांत उपयोगितेचा सिद्धांत, सम सिमांत उपयोगितेचा नियम, डॉ. मार्शल ह्याच्या उपयोगिता विश्लेषणाद्वारे मागणी नियमाची सिद्धता, डॉ. मार्शल याच्या उपयोगिता विश्लेषणातील दोष.

**प्रकरण तिसरे : तटस्थता वक्र विश्लेषण किंवा समवृत्ती वक्र तंत्र दृष्टिकोन**

उपयोगिता विश्लेषणाचा क्रमवाचक दृष्टिकोन, समवृत्ती वक्र विश्लेषणाची गृहितके, समवृत्ती वक्राचा नकाशा, घटता सीमांत पर्यायता दर, समवृत्ती वक्राची गुणधर्म किंवा वैशिष्टे, किंमत रेषा, किंमत रेषेच्या उतारातील बदल, उपभोक्त्याचे संतुलन, उत्पन्न परिणाम, पर्यायता परिणाम, किंमत परिणाम, समवृत्ती वक्राची श्रेष्ठता, समवृत्ती वक्र विश्लेषणातील दोष.

**प्रकरण चौथे : मागणीचा सिद्धांत किंवा नियम, पुरवठा नियम व मागणीची लवचिकता**

मागणीचा सिद्धांत किंवा नियम, मागणीचा विस्तार व संकोच, मागणीची वुद्धी व मागणीचा ऱ्हास, वस्तुच्या मागणीचे प्रकार, मागणीची लवचिकता, लवचिकतेचे प्रकार, मागणीची किंमत लवचिकता व मोजण्याच्या पद्धती मागणीची उत्पन्न लवचिकता, मागणीची प्रतिस्थापन लवचिकता, मागणीची तिरकस लवचिकता, मागणीची लवचिकता ठरविणारे घटक, मागणीच्या

लवचिकतेचे महत्त्व, मागणी फलन, पुरवठा, पुरवठ्याचा नियम,पुरवठा फलन.

**प्रकरण पाचवे : बाजार संतुलनाचे विश्लेषन**

प्रास्ताविक, संतुलनाचे प्रकार, स्थायी, अस्थायी व उदासीन संतुलन, स्थितीशील संतुलन आणि गतीशील संतुलन, आंशिक संतुलन सामान्य संतुलन.

**प्रकरण सहावे : उत्पादनाचे सिद्धांत**

प्रस्तावना, व्याख्या, उत्पादन फलन, उत्पादन फलनाचे प्रकार,
अल्पकालीन उत्पादन फलन किंवा बदलत्या प्रमाणाचा नियम
उत्पादन प्रमाण फलाचा नियम, परिमाण प्रत्यय नियम किंवा दीर्घकालीन उत्पादन फलन
अंतर्गत बचती, बाह्य बचती, अंतर्गत अबचती, बाह्य अबचती
समउत्पादन वक्र विश्लेषण व त्याची वैशिष्ट्ये

**प्रकरण सातवे : उत्पादन खर्च**

प्रस्तावना, उत्पादन खर्चाचे प्रकार, पैशातील उत्पादन खर्च किंवा मौद्रिक उत्पादन खर्च, वास्तव उत्पादन खर्च, वैकल्पीक उत्पादन खर्च, काळानुसार उत्पादन खर्चाचे विश्लेषण, स्थिर खर्च, सरासरी स्थिर खर्च, बदलता खर्च, सरासरी बदलता खर्च, अल्पकालीन सिमांत खर्च, दीर्घकालीन सरासरी वक्र, इंग्रजी 'U' अक्षराचा असण्याची कारणे, दीर्घकालीन सिमांत खर्च, दीर्घकालीन सरासरी खर्च व दिर्घकालीन सिमांत खर्च वक्र यातील संबंध

**प्रकरण आठवे : बाजारपेठाचे स्वरूप व प्रकार**

प्रस्तावना, पूर्ण स्पर्धा वैशिष्टे, अल्पकाळात व दिर्घकाळात किंमत निश्चिती, मक्तेदारी, वैशिष्टे, प्रकार, अल्पकाळात व दीर्घकाळात किंमत निश्चिती, मक्तेदारीतील मुल्यभेद, मक्तेदारीमुक्त स्पर्धा, वैशिष्टे अल्पकाळात व दीर्घकाळात किंमत निश्चिती, विक्री खर्च, अल्पाधिकार व द्वयाधिकाराची बाजारपेठ.

**प्रकरण नववे : वितरण**

वितरणाचा सिमांत उत्पादकता सिद्धांत, खंड व खंडाचे सिद्धांत, मजुरी व मजुरीचे सिद्धांत, व्याज व व्याजाचे सिद्धांत, नफा व नफा विषयक सिद्धांत.

# 1

# अर्थशास्त्राची व्याख्या, स्वरूप, व्याप्ती

## Defination, Nature and Scope of Economics

**प्रास्ताविक :**

ॲडम स्मिथ (Adam Smith) हा अर्थशास्त्राचा जनक मानला जातो. तो अभिमतपंथीय विचारसरणीचा संस्थापक आहे. स्मिथचा जन्म 5 जुन 1723 मध्ये झाला. त्याने आपले पहिले पुस्तक 1759 मध्ये Theory of Moral Sentiments प्रसिद्ध केले. 1776 मध्ये त्याने An Enquiry into the Nature and cause of wealth of Nation's (राष्ट्राची संपत्ती) हा ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथात ॲडमस्मिथ ने संपत्तीवर आधारित अर्थशास्त्राची व्याख्या केली.

**ॲडम स्मिथची व्याख्या :**

ॲडम स्मिथच्या मते, ''अर्थशास्त्र म्हणजे संपत्तीचे शास्त्र होय.'' ॲडमस्मिथच्या मते अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा उद्देश संपत्ती कशी निर्माण करावी तिथे वाटप (वितरण) हा असावा.

ॲडम स्मिथच्या पूर्वी संपत्तीचे महत्त्व व्यापारवाद्यानी व निसर्गवाद्यांनी स्पष्ट केले. व्यापारवाद्याच्या मते प्रत्येक देशाने जास्तीत जास्त निर्यात करावी व संपत्ती (मौल्यवान धातू) व्यापारातून प्राप्त करावा. निसर्गवाद्याच्या मते संपत्तीचे उगमस्थान निसर्गाची देणगी व त्यात विशेषत: भूमीपासून मिळणारे उत्पन्न हे आहे. स्मिथने व्यापारवादयापेक्षा व निसर्गवाद्यापेक्षा वेगळी भूमिका मांडली.

**संपत्तीमध्ये कशी वाढ करता येईल :**

ॲडम स्मिथच्या मते राष्ट्राची संपत्ती ही श्रमविभागणी व विशेषीकरण यावर अंवलबून असते. श्रमविभागणीतून कामगाराची कार्यक्षमता वाढते व विशेषीकरणातून उत्पादक शक्तीचा पुरेपूर उपयोग होतो. श्रमविभागणी व विशेषीकरणातून संपत्तीत वाढ घडवून आणता येते.

**मुक्त आर्थिक धोरणाचा पुरस्कार :**

ॲडम स्मिथ ने Laissez faire Poilcy चा मुक्त आर्थिक धोरणाचा पुरस्कार केला. सरकारचा अर्थव्यवस्थेत कमीत कमी हस्तक्षेप असावा. केवळ सरकारने आवश्यक कार्ये पार पाडावीत. स्मिथच्या मते अर्थव्यवस्थेत निसर्गशक्ती कार्यरत असते.

थोडक्यात ॲडम स्मिथने अर्थशास्त्राला शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून दिले. त्यानी उपभोग, उत्पादन, विनिमय पैसा, कर, आंतरराष्ट्रीय व्यापार या संदर्भात लिखान केले. ॲडम स्मिथ प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या संपत्ती मिळविण्याऱ्या आणि ती खर्च करणाऱ्या पद्धतीवर भर देतो. ॲडम स्मिथच्या मते अर्थशास्त्राने संपत्ती कशी जमवावी व ती कशी खर्च करावी हे शिकविते. म्हणून ॲडम स्मिथच्या मते अर्थशास्त्र कला आहे ते विज्ञान नाही. ॲडम स्मिथच्या विचाराचा प्रभाव पुढे येणाऱ्या विचारवंतावर पडला पुढे एक त्याचा वर्ग त्याच्या मताला मानणारा निर्माण झाला. म्हणून ॲडम स्मिथला 'आधुनिक अर्थशास्त्राचा जनक' म्हणतात. ॲडम स्मिथच्या व्याख्येत काही त्रुटी देखिल आहेत. त्या पुढीलप्रमाणे आहेत.

**ॲडम स्मिथच्या व्याख्येतील दोष किंवा त्रुटी :**

1) **संकुचित व सदोष :** टिकाकाराच्या मते ॲडम स्मिथची व्याख्या संकुचित व सदोष आहे. ॲडम स्मिथची व्याख्या मानवी गरजाचा विचार करत नाही. मानवी गरजाला काहीच स्थान नसेल तर संपत्ती कोणाची स्मिथने संपत्तीला साध्य मानले आहे. रस्कीनसारखे विचारवंत स्मिथच्या व्याख्येला कुबेराची पुजा करणारे शास्त्र आहे अशी टिका करतात.

2) **उत्पादनाला महत्त्व उपभोगाला गौन स्थान :** स्मिथच्या व्याख्येत संपत्तीच्या उत्पादनाला महत्त्व दिलेले आहे. पण संपत्तीच्या उपभोगाकडे पुर्नतः दुर्लक्ष केलेले आहे. म्हणजे ही व्याख्या केवळ उत्पादनाला महत्त्व देते उपभोगाकडे पुर्नतः दुर्लक्ष करते.

3) **आर्थिक समस्येचा विचार नाही :** टिकाकाराच्या मते स्मिथची व्याख्या सर्वसाधारण मानणाऱ्या आर्थिक समस्येचा विचार करत नाही. गरजा, साधनाची दुर्मिळता आणि साधनाचे पर्यायी उपयोग या बाबीकडे ॲडम स्मिथची व्याख्या पुर्नतः दुर्लक्ष करते.



4) **आर्थिक मानव हे मानवाचे पित्र स्पष्ट करते :** ॲडम स्मिथची व्याख्या अर्थशास्त्राच्या अभ्यासात मानवाला आर्थिक मानव ह्या दृष्टीने पाहते. पण ह्याशिवाय मानवाकडे कला, प्रेम राष्ट्रभक्ती इत्यादी दृष्टिकोनातून मानवाकडे पाहत नाही.

5) **अर्थशास्त्राचा अभ्यास विषय मर्यादित केला आहे :** ॲडम स्मिथची व्याख्या अर्थशास्त्राचा अभ्यासाचा विषय मर्यादित करते.

थोडक्यात वरील प्रकारच्या त्रुटी ॲडम स्मिथच्या व्याख्येत आहेत. त्यानी केवळ संपत्तीला अर्थशास्त्रात महत्त्व दिले आहे.

**डॉ. मार्शल यांची अर्थशास्त्राची व्याख्या :**

डॉ. मार्शल हे एक नवअभिमतपंथीय अर्थशास्त्रज्ञ त्याने अर्थशास्त्राचा संबंध संपत्तीपेक्षा मानवाच्या भौतिक कल्याणाशी जोडलेला आहे. डॉ. मार्शल यानी आपल्या Principles of Economics (अर्थशास्त्राची मुलतत्वे) 1890 मध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथात अर्थशास्त्राची व्याख्या केलेली आहे.

**व्याख्या :**

**डॉ. मार्शल यांच्या मते :** ''अर्थशास्त्र हे मानवी कल्याणाचा अभ्यास करणारे शास्त्र असून मानवी कल्याणासाठी भौतिक साधनांची प्राप्ती व त्यांचा उपयोग ह्यातून जे मानवाचे वैयक्तिक व सामाजिक कल्याण घडून येते त्याचा अभ्यास अर्थशास्त्रातून केला जातो.''

**मार्शल प्रणीत व्याख्येची वैशिष्टे :**

1) **मार्शलची व्याख्या मनुष्याच्या कल्याणाचा अभ्यास करते :** डॉ. मार्शल याची व्याख्या मनुष्याच्या कल्याणाचा अभ्यास करते संपत्ती हे गरज भागविण्याचे साधन आहे. डॉ. मार्शलच्या मते अर्थशास्त्र एका बाजुने संपत्तीचा अभ्यास करते तर दुसऱ्या बाजुने मनुष्याच्या वागणुकीचा अभ्यास करते.

मानवी कल्याण साध्य करण्यासाठी ज्या कुठल्या भौतिक वस्तु असतात. ह्या बाबीचा अभ्यास करते. कल्याण म्हणजे समाधान होय. काही भौतिक वस्तुचा उपभोग घेतला की समाधान मिळते. कल्याण घडुन येते. पण काही भौतिक वस्तु अशा ही असतात की, त्या घेतल्या की उपयोगिता मिळत नाही असे नाही मिळते पण कल्याण होत नाही. उदा. दुध आणि दारू या दोन

भौतिक वस्तु आहेत. दुध पिले तर कल्याण होते. दारू दिली तर कल्याण होत नाही.

2) **मार्शलचे अर्थशास्त्र संपत्तीचा अभ्यास करणे :** डॉ. मार्शल याचे अर्थशास्त्र संपत्तीचा ही अभ्यास करते व तसेच पैशाचा ही अभ्यास करते. कारण पैशा किंवा संपत्तीचा साह्याने मानवी कल्याण साध्य करता येते. म्हणून मार्शलच्या अर्थशास्त्रात पैशाचा ही अभ्यास केला आहे. संपत्तीचा ही अभ्यास केला आहे. ॲडम स्मिथ संपत्तीला साध्य मानतो. मार्शल संपत्तीला साधन म्हणतात.

3) **मार्शलच्या मते अर्थशास्त्र सामाजिक शास्त्र आहे :** मार्शलचे अर्थशास्त्र हे व्यक्तीच्या गरजा, उपभोग, कल्याण याचा अभ्यास करते. तसेच हे अर्थशास्त्र सार्वजनिक किंमतपातळी, बेकारी, व्यापार यांचाही अभ्यास करते. मार्शलचे अर्थशास्त्र समाजाच्या सर्वच आर्थिक प्रश्नाचा अभ्यास करते.

4) **मार्शलचे अर्थशास्त्र मनुष्याच्या वागणुकीचा अभ्यास करणारे शास्त्र आहे :** मार्शलचे अर्थशास्त्र हे मनुष्याने समाजात कसे वागले पाहिजे याचाही अभ्यास करते. त्यामुळे हे शास्त्र काल्पनिक नसून वास्तविक आहे.

5) **मार्शलची व्याख्या केवळ भौतिक वस्तुच्या साह्याने प्राप्त होणाऱ्या कल्याणाचा अभ्यास करते :** डॉ. मार्शल यानी केवळ भौतिक वस्तुच्या साह्याने प्राप्त होणाऱ्या कल्याणाचा अभ्यास करते. वस्तुचे दोन प्रकार पडतात. 1) भौतिक वस्तु 2) अभौतिक वस्तु ज्या वस्तु डोळ्यानी दिसतात त्याना भौतिक वस्तु म्हणतात. मार्शलचे अर्थशास्त्र अशा वस्तुच्या साह्याने प्राप्त होणाऱ्या कल्याणाचा अभ्यास करते. मार्शलच्या मते काही भौतिक वस्तु अशा असतात. ही त्याचा उपयोग घेतल्यानंतर मानवाचे कल्याण होत नाही, अशा वस्तुच्या उपभोगाचा ही व्याख्या अभ्यास करत नाही.

6) **मार्शलची व्याख्या अभौतिक वस्तुच्या साह्याने प्राप्त होणाऱ्या कल्याणाचा अभ्यास करत नाही :** डॉ. मार्शलची व्याख्या अभौतिक वस्तुमुळे प्राप्त होणाऱ्या कल्याणाचा अभ्यास करत नाही. अभौतिक वस्तु म्हणजे ज्या वस्तु/सेवा उघड्या डोळ्यांनी दिसत नाहीत. उदा.सेवा, प्रेम वगैरे मार्शलच्या मते अशा अभौतिक साधनांपासून मिळणाऱ्या कल्याणाचा अभ्यास अर्थशास्त्राने करू नये.



**७) मार्शलची व्याख्या भौतिक साधनाची प्राप्ती व उपयोग या संदर्भात अभ्यास करते :** मनुष्याचे कल्याण साध्य होण्यासाठी भौतिक साधनाची प्राप्ती व त्याचा उपयोग याचा अभ्यास करते. कल्याणप्राप्तीसाठी केलेले प्रयत्न वैयक्तिक व सामाजिक असु शकतात.

थोडक्यात डॉ. मार्शलच्या मते अर्थशास्त्र मानवी कल्याणाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. त्यासाठी भौतिक साधनाची प्राप्ती व त्याचा उपयोग या संदर्भात अभ्यास करते. डॉ. मार्शल यांनी अर्थशास्त्राची व्याख्या मनुष्याला केंद्रबिंदु मानून केली. मानवी कल्याणाबरोबर संपत्तीचाही अभ्यास केला आहे.

**डॉ. मार्शलच्या व्याख्येचे टिकात्मक परीक्षण :**

1) **अर्थशास्त्राचा अभ्यास विषय मर्यादित केला आहे :** मार्शल यांनी केवळ मानवी कल्याणासाठी भौतिक साधनावर भर दिला आहे. अभौतिक साधनाचा विचार केला नाही. तसेच मार्शलचे अर्थशास्त्र केवळ मानवी कल्याणाचा अभ्यास करते. तसेच कल्याणाची संकल्पना व्यक्तीपरत्वे, कालपरत्वे समाजपरत्वे, स्थलपरत्वे बदलते. त्यामुळे मार्शलने अर्थशास्त्राचा अभ्यासविषय मर्यादित केला आहे, अशी टिका केली जाते.

2) **वर्गीकरणात्मक व्याख्या :** मार्शलने मानवाचे आर्थिक, धार्मिक, राजकीय, सामाजिक, नैतिक असे वर्गीकरण करून मार्शलच्या मते मानवी जीवनाच्या आर्थिक बाजुचा अभ्यास अर्थशास्त्राने केला पाहिजे. थोडक्यात मार्शलची व्याख्या वर्गीकरणात्मक आहे अशी टिका केली जाते.

**३) कल्याण संकल्पनेचा योग्य अर्थ नाही :** कल्याण म्हणजे काय ते मोजता येत नाही. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या देशात कल्याणाचा वेगवेगळा अर्थ लावला जातो. मार्शलची व्याख्या कल्याणाचा स्पष्ट अर्थ सांगत नाही.

4) **कल्याणाचा संबंध केवळ भौतिक वस्तुशी :** मार्शलच्या मते केवळ भौतिक वस्तुच्या साहयाने कल्याण साध्य होते. अभौतिक वस्तुच्या साह्याने कल्याण साध्य होत नाही असे मार्शल म्हणतात. टिकाकाराच्या मते अभौतिक वस्तुपासून ही कल्याण साध्य होत असते.

5) **आर्थिक समस्येला प्राधान्य नाही :** मार्शलची व्याख्या केवळ मानवी कल्याणाचा अभ्यास करते ती आर्थिक प्रश्नाचा अभ्यास करत नाही. मार्शलची

व्याख्या अनंत गरजा, मर्यादित साधने व साधनाचे पर्यायी उपयोग त्यातून निर्माण होणारे प्रश्न याचा अभ्यास करत नाही. म्हणजे या व्याख्येत आर्थिक समस्येला प्राधान्य दिले नाही.

6) **केवळ आर्थिक व्यवहाराचा अभ्यास :** मार्शलच्या व्याख्येत मानवी जीवनाच्या केवळ आर्थिक व्यवहाराचा अभ्यास केलेला आहे. इतर आर्थिक व्यवहाराचा अभ्यास केलेला नाही.

मार्शलच्या व्याख्येवर टिकाकारानी टिका केल्या तरी मार्शलने अर्थशास्त्रात मानवी कल्याणाचा अभ्यास करून अर्थशास्त्र विषयाच्या अभ्यासाची व्याप्ती वाढवलेली आहे.

**रॉबीन्सची अर्थशास्त्राची व्याख्या :**

डॉ. मार्शल यांनी अर्थशास्त्राचा संबंध मानवी कल्याणाशी जोडला व त्यानी कल्याणवाढीसाठी काही उपाय सांगितले. पुढे मार्शलनंतर पिगु, कॅनन सारखे अर्थशास्त्रज्ञ पुढे आले व अर्थशास्त्रात कल्याणकारी अर्थशास्त्राची एक शाखा तयार झाली. रॉबीन्सच्या मते अर्थशास्त्राने चांगले काय वाईट काय याचा विचार करू नये. चांगले काय वाईट काय नितीशास्त्राचा विषय आहे. अर्थशास्त्राने तर चांगले काय व वाईट काय याचा अभ्यास केला तर अर्थशास्त्राचे शास्त्रीय स्वरूप नष्ट होईल अशी भिती रॉबीन्सने व्यक्त केली व अर्थशास्त्राची व्याख्या केली.

**व्याख्या :**

प्रा. रॉबीन्सच्या मते अर्थशास्त्र हे आर्थिक प्रश्नाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. आर्थिक प्रश्न का निर्माण होतात व त्याची सोडवणूक कशी करावी हा अर्थशास्त्राचा अभ्यास विषय असला पाहिजे. रॉबीन्स यानी अर्थशास्त्राची दुर्मिळतेवर आधारित व्याख्या केली प्रा. रॉबीन्सने 1931 मध्ये (The Nature and Significance of Economics Science) अर्थशास्त्राचे स्वरूप व व्याप्ती या ग्रंथात अर्थशास्त्राची व्याख्या केली. त्याची व्याख्या पुढीलप्रमाणे.

''अमर्यादित गरजा व मर्यादित साधने व साधनाचे पर्यायी उपयोग याचा मेळ घालण्याच्या दृष्टीने केल्या जाणाऱ्या प्रयत्नाचा अभ्यास म्हणजे अर्थशास्त्र होय.'' (Economics Studies human behariour as a Relationship between ends and scare means which have alternative uses.)



**व्याख्येचे स्पष्टीकरण :**

**1) अमर्यादित गरजा (Unlimited wants)** :

रॉबीन्सच्या मते गरजा ह्या कधीच संपत नाहीत. त्या अमर्याद असतात. गरज म्हणजे आवश्यकता का निर्माण होते एकाद्या वस्तुचा उपभोग व्यक्तीला घ्यावा लागतो. मानवाच्या गरजा अमर्यादित आहेत. त्या कधीच संपत नाहीत. एक गरज भागविली की दुसरी गरज निर्माण होते. एखादी गरज पुन्हा पुन्हा निर्माण होते. गरजाची मालीका वाढतच जाते, पण प्रत्येक व्यक्ती जास्तीत जास्त गरजा भागविण्याचा प्रयत्न करतो म्हणुन अर्थशास्त्रज्ञ रॉबीन्सच्या मते अर्थशास्त्राने देखिल अशा अमर्याद गरजाची पुर्तता कशी करता येईल याचाच अभ्यास केला पाहिजे.

**2) साधने मर्यादित (Limited Means) :**

मनुष्याच्या गरजा जरी का अमर्याद असल्या तरी ती भागविण्याची साधने मर्यादित आहेत. साधने म्हणजे गरज भागविण्यासाठी ज्या कुठल्या बाबी वापरल्या जातात त्याना साधने म्हणतात. साधने मर्यादित किंवा साधनाची दुर्मिळता ती मागणीच्या तुलनेत कमी आहेत अपुरी आहेत. उदा. पैसा हे एक गरज भागविण्याचे साधन आहे. पैसा दुर्मिळ आहे.

साधनाच्या दुर्मिळतेमुळे व्यक्ती आपल्या संपुर्ण गरजा कधीच भागवू शकत नाही. तर अशा वेळी व्यक्ती केवळ एकच कार्ये करू शकतो ते म्हणजे गरजाची क्रमवारी निश्चित करणे व गरजाची क्रमवारी निश्चित झाली की जास्त महत्त्वपूर्ण गरज अगोदर पूर्ण करणे कमी महत्त्वाची गरज नंतर भागविणे.

रॉबीन्सच्या मते अर्थशास्त्राचा अभ्यास विषय हा आहे की अमर्यादित गरजा मर्यादित साधनाच्या साह्याने कशा पुर्ण करायाच्या हा महत्त्वपूर्ण प्रश्न आहे. त्यालाच आर्थिक प्रश्न असे म्हणतात. रॉबीन्सच्या मते अशा आर्थिक प्रश्नाची सोडवणूक म्हणजेच अर्थशास्त्राचा अभ्यास होय. थोडक्यात अर्थशास्त्रज्ञ रॉबीन्सच्या मते साधनाची दुर्मिळता आर्थिक प्रश्न निर्माण करत असते.

**3) साधनाचे पर्यायी उपयोग (alternative uses of means) :**

साधनाची दुर्मिळता आहेच पण ही साधने अनेक ठिकाणी/पर्यायी

उपयोगी वापरली जातात. त्यातुनच आर्थिक प्रश्न सोडविणे अवघड काम होवून बसते. साधनाचा पर्यायी उपयोग म्हणजे साधन एका ठिकाणाऐवजी अनेक ठिकाणी उपयोगी ठरते. पैसा व वेळ ही दोन्ही महत्त्वपूर्ण साधने आहेत. एकाद्या व्यक्तीच्या गरजा पुस्तक घेणे, खुर्ची घेणे, शालेय फीस भरणे ह्या आहेत. समजा त्या व्यक्तीजवळ 100 रुपये आहेत व या पैशाच्या साह्याने तो केवळ एकच गरज पूर्ण करू शकतो. कारण तीनही गरजाच्या पुर्ततेसाठी पैसा हे एकच साधन आहे. यालाच साधनाचे पर्यायी किंवा अनेक ठिकाणी उपयोग असे म्हणतात.

**4) आर्थिक प्रश्नांची निर्मिती :**

अगोदरच गरजा ह्या अमर्याद आहेत. गरजा भागविली जाणारी साधने मात्र मर्यादित आहेत. व साधनाचे पर्यायी उपयोग आहेत. त्यातुन मनुष्याला गरज कोणती भागवू हा प्रश्न निर्माण होतो आणि हा प्रश्न म्हणजे आर्थिक प्रश्न होय. रॉबीन्सच्या मते अशा आर्थिक प्रश्नाच्या अभ्यास अर्थशास्त्राने करावा.

रॉबीन्सने अर्थशास्त्राची दुमिळतेवर भर देणारी व्याख्या केली आहे. पण रॉबीन्सच्या व्याख्येवर पुढीलप्रमाणे टिका केल्या जातात.

**टिका/दोष :**

**1) उपभोक्ते गरजाचा भेदभाव करतीलच असे नाही :** उपभोक्त्याच्या गरजा अमर्याद असल्या तरी रॉबीन्सच्या मते उपभोक्ता गरजाना क्रम देतो. पण टिकाकाराच्या मते उपभोक्त्याजवळ उत्पन्न आले की गरजा जशा निर्माण होतील तशा भागवितो व्यक्ती कोणती गरज कमी महत्त्वाची व कोणती गरज जास्त महत्त्वाची अशा फरक करत नाही.

**2) चांगले काय व वाईट काय याचा अर्थशास्त्राने विचार करावा :** टिकाकार प्रो. केर्नकॉस ह्याच्या मते प्रा. रॉबिन्सने अर्थशास्त्राच्या सामाजिक स्वरूपाकडे दुर्लक्ष केले आहे. एकादी व्यक्ती एकादी कृती करते त्यावेळी त्याचा समाजावर काय परिणाम होतो याचा अभ्यास अर्थशास्त्राने केला पाहिजे.

**3) वास्तवतेकडे दुर्लक्ष :** टिकाकराच्या मते ही व्याख्या वास्तवतेकडे दुर्लक्ष करते. कल्याण ही संकल्पना संदिग्ध असली तरी ते साध्य करणे हाच



अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहे. म्हणून अर्थशास्त्राने मनुष्याच्या कल्याणाचा अभ्यास केला पाहिजे.

**4) साधनात वाढ होवू शकते :** टिकाकाराच्या मते रॉबीन्स साधन वाढीचा विचार करत नाही. फक्त रॉबीन्सची व्याख्या मर्यादित साधनाचा सुयोग्य वापर कसा करावा ह्यावर भर देते. पण जर का साधनात वाढ झाली तर आर्थिक प्रश्न सोडविण्यास मदत होईल याकडे ही व्याख्या दुर्लक्ष करते.

**5) संकुचित व्याख्या :** प्रो. बोल्डिंगच्या मते ही व्याख्या संकुचित आहे. अर्थशास्त्राने केवळ साधनाच्या दुर्मिळतेचा विचार करून चालणार नाही. त्याचबरोबर मानवाचे कल्याण कसे साध्य होईल याचाही विचार केला पाहिजे.

**6) संदिग्ध व्याख्या :** टिकाकाराच्या मते रॉबीन्सच्या व्याख्येत संदिग्धता आढळुन येते. त्याने आपल्या व्याख्येत साध्ये (ends) व साधने (means) याचा वापर केला आहे. या शब्दातील निश्चित अंतर कुठेही स्पष्ट होत नाही. त्यामुळे व्याख्येत संदिग्धता आढळुन येते.

**7) विकसनशील देशाला उपयुक्त नाही :** टिकाकाराच्या मते रॉबीन्सची व्याख्या भारतासारख्या विकसनशील देशाला लागु पडत नाही. भारतासारख्या देशात बेकाराची संख्या (मनुष्यबळ) खुप आहे; पण प्रा. रॉबीन्सच्या व्याख्येत साधनाच्या अमर्यादित पणाला स्थान नाही.

अशा प्रकारच्या टिका होत असल्या तरी ही व्याख्या व्यवहारी शास्त्रशुद्ध व श्रेष्ठ आहे. त्यामुळे या व्याख्येला सर्वसामान्यता मिळालेली आहे.

**अर्थशास्त्राचे स्वरूप (Nature of Economics) :**

अर्थशास्त्राचे स्वरूप समजावून घेण्यापूर्वी शास्त्र म्हणजे काय ते पाहु ज्ञानाची सुंसगत व व्यवस्थित रितीची मांडणी शास्त्रात केलेली असते. ज्ञानाच्या विशिष्ट शाखेमध्ये करण्यात आलेल्या विशेष क्रमबद्ध व नियमबद्ध अभ्यासाला शास्त्र म्हणता येईल. शास्त्राचा अभ्यास करत असताना निरीक्षण, वर्गीकरण, पृथ:करण, निष्कर्ष या बाबीचा समावेश होतो.

शास्त्राचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. 1) नैसर्गिकशास्त्र, 2) सामाजिकशास्त्रे

सामाजिक शास्त्रे सजीव अशा मानवाचा अभ्यास करतात अर्थशास्त्र मानवी जीवनाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. ते सामाजिक शास्त्र आहे.

मानवी जीवनात साधनांच्या दुर्मिळतेतुन अर्थव्यवस्थेत विविध आर्थिक प्रश्न निर्माण होतात आणि हे प्रश्न सोडविणे हा अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहे. अर्थशास्त्र हे शास्त्र आहे हे खालील मुद्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

1) अर्थशास्त्रात आर्थिक घटना घडण्याची कारणे व त्याचे संभाव्य परिणाम या संदर्भात विवेचन केले जाते.
2) इतर शास्त्राप्रमाणे हे शास्त्र काही नियमावर आधारित आहे.
3) आर्थिक नियमाचे मोजमाप करण्याचे साधन पैसा हे आहे.
4) काही आर्थिक नियम पडताळुन पाहता येतात.
5) हे शास्त्र भविष्यात घडणाऱ्या घटनाची भविष्यवानी सांगते त्यासाठी गणितांचा उपयोग केला जातो.

वरील मुद्याच्या आधारे अर्थशास्त्राला निश्चित स्वरूप आहे असे स्पष्ट होते. पण काही विचारवंताच्या मते ते शास्त्र नाही त्या संदर्भात पुढीलमुद्दे मांडलेली आहेत.

1) अर्थशास्त्राचे नियम विशिष्ट परिस्थितीत लागु पडतात.
2) अर्थशास्त्रीय नियमात विचारवंतात एक वाक्यता नसते त्यामुळे हे शास्त्राचे स्वरूप कमकुवत बनते.
3) हे शास्त्र मानवी मनाचा अभ्यास करते. मानवी मन केव्हा बदलेल हे निश्चित सांगता येत नाही.

अर्थशास्त्राचे नियम शंभर टक्के खरे नसल्यामुळे ते एक सामाजिक शास्त्र मानले जाते. अर्थशास्त्राचे नियम विशिष्ट परिस्थितीत का होईना खरे ठरतात. म्हणून या विषयाला एक शास्त्र म्हणून मान्यता मिळालेली आहे.

अर्थशास्त्राचा अभ्यास विषय मनुष्य हा आहे. मानवी जीवनाचा अभ्यास अर्थशास्त्र करते. मनुष्य आपल्या गरजा भागविण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न करतो. या प्रयत्नाचा अभ्यास अर्थशास्त्रात केला जातो म्हणून या शास्त्राला (Human Science) असे म्हणतात.

समाजाचा एक घटक मनुष्य आहे. मनुष्याच्या आर्थिक व्यवहाराचा अभ्यास अर्थशास्त्रात केला जातो. थोडक्यात समाजात राहणाऱ्या मनुष्याचा हे शास्त्र अभ्यास करत असल्यामुळे या विषयाचा समावेश सामाजिक शास्त्रात होतो.



**अर्थशास्त्राची व्याप्ती (Scope of Economics) :**

कोणत्याही विषयाची व्याप्ती म्हणजे त्या विषयात समाविष्ट होणाऱ्या घटकाचा अभ्यास होय. अर्थशास्त्राची व्याप्ती म्हणजे अर्थशास्त्र या विषयात ज्या कुठल्या घटकाचा अभ्यास केला जातो. त्याचा समावेश होतो. अर्थशास्त्र हे आदर्शवादी असावे का वास्तववादी शास्त्र असावे या संदर्भात विचारवंतात एकवाक्यता आढळुन येत नाही. प्रा. पिगुच्या मते अर्थशास्त्र हे वास्तविक शास्त्र आहे ते आदर्शनिष्ठ ठरू शकत नाही. अर्थशास्त्रात मानवी जीवनाच्या आर्थिक बाजुचा अभ्यास केला जातो. मानवी जीवन विस्तृत आणि व्यापक आहे त्यामुळे अर्थशास्त्राचा अभ्यास विषय विस्तृत व व्यापक आहे. त्यामुळे या विषयाची व्याप्ती सुद्धा व्यापक व विस्तृत बनत आहे.

**1) अर्थशास्त्राचा इतर सामाजिक शास्त्राशी असलेला संबंध :** अर्थशास्त्र हे मानवी जीवनाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. मानवी जीवनाचा सर्वच सामाजिक शास्त्रातुन अभ्यास केला जातो. मानवी जीवनाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक या विविध बाजू आहेत. त्यातील केवळ आर्थिक बाबीविषयी अर्थशास्त्र अभ्यास करते. आर्थिक बाबीविषयी अभ्यास करताना सामाजिक, राजकीय, धार्मिक बाबींचा आधार घ्यावा लागतो. म्हणजे अर्थशास्त्राचा अभ्यास करताना समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, नीतीशास्त्र, याचा आधार घ्यावा लागतो. उदा. बेरोजगांरीच्या आर्थिक कारणाचा अर्थशास्त्र अभ्यास करेल तर सामाजिक, कारणाचा अभ्यास समाजशास्त्रातुन केला जाईल. थोडक्यात अर्थशास्त्र व इतर सामाजिकशास्त्रे याचा जवळचा संबंध आहे.

**2) उपभोग उत्पादन व वितरण :** अर्थशास्त्रात व्यक्ती घेत असलेल्या उपभोगाचा अभ्यास केला जातो. उपभोग वस्तुचे उत्पादन कसे किती, केव्हा, कुठे, कधी करावयाचे व वितरण कसे व किती याचा अभ्यास अर्थशास्त्रात केला जातो.

**3) सार्वजनिक आयव्यय :** सार्वजनिक आयव्यय म्हणजे सरकारला प्राप्त होणारे एकूण उत्पन्न व सरकारला करावा लागलेला एकूण खर्च या संदर्भात कर, कर्ज, दंड, नफा, शुल्क अंदाजपत्रक इत्यादी घटकाचा अर्थशास्त्रातून अभ्यास केला जातो.

**4) कल्याणकारी अर्थशास्त्र :** अगदी अलीकडे अर्थशास्त्रात एक स्वतंत्र अभ्यास शाखा म्हणून कल्याणकारी अर्थशास्त्राचा अभ्यास केला जातो. कल्याण म्हणते काय ते कसे वाढविता येईल. कल्याणकारी सिद्धांत त्याची मांडणी या सर्वाचा अभ्यास कल्याणकारी अर्थशास्त्रात केला जातो व कल्याणकारी अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची अभ्यास शाखा मानली जाते.

**5) व्याप्ती संदर्भात इतर घटक :** विकासाचे अर्थशास्त्र, आंतरराष्ट्रीय व्यापार, बँका व वित्तसंस्था, औद्योगिक अर्थशास्त्र, लोकसंख्या, पर्यावरण, कृषी वाहतुक व दळणवळण शिक्षण, शेती, सेवाक्षेत्र या सर्व बाबीचा अभ्यास अर्थशास्त्रात केला जातो.

थोडक्यात अर्थशास्त्र हे मानवी जीवनाच्या आर्थिक बाजुचा अभ्यास करते. मानवी जीवन दिवसेंदिवस व्यापक व विस्तृत बनत चालले आहे. त्यामुळे या विषयाची व्याप्ती सुद्धा विस्तृत होत आहे त्यातच या विषयाचे महत्त्व आहे.

**आर्थिक प्रश्न (Economical Problems) :**

अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आर्थिक प्रश्नांचा अभ्यास हा आहे. प्रो. रॉबीन्स याची व्याख्या देखिल आर्थिक प्रश्न निर्मितीला अनुसरून आहे. आर्थिक प्रश्न का निर्माण होतात व त्याची सोडवणुक करणे या संदर्भात अर्थशास्त्र अभ्यास करते. आर्थिक प्रश्न म्हणते व्यक्ती आपल्या अनेक गरजापैकी त्याला कोणती गरज भागवू हा प्रश्न पडतो. त्याला आर्थिक प्रश्न म्हणतात. व्यक्तीच्या गरजा अमर्याद असतात. त्या सातत्याने वाढतात काही नवीन गरजाची निर्मिती देखिल होत असते त्या गरजात वाढ होते. एकदा भागविलेली गरज पुन्हा-पुन्हा निर्माण होते. साधने कमी आहेत. ती दुर्मिळ आहेत म्हणजे ती मागणीच्या तुलनेत कमी आहेत. अशा दुर्मिळ साधनाच्या साह्याने व्यक्तीला गरजा भागविणे कठीण होवून बसते.

आर्थिक प्रश्नाची तीव्रता उग्र स्वरूप धारण करते. त्याचे कारण म्हणजे एकतर अनंत गरजा व मर्यादित साधने व साधनाचे पर्यायी उपयोग देखील घेता येतात. साधनाचे पर्यायी उपयोग म्हणजे एका ठिकाणाऐवजी एकादे साधन अनेक ठिकाणी वापरता येते. त्यामुळे अगोदर मर्यादित असलेली साधने अनेक ठिकाणी वापरता येतात.



थोडक्यात अमर्याद गरजा व गरजाची पूर्तता करणारी साधने मात्र मर्यादित व साधनाचे पर्यायी अनेक ठिकाणी उपयोग या तीन प्रमुख कारणामुळे आर्थिक प्रश्नाची निर्मिती होत असते बहुसंख्य अर्थशास्त्राच्या मते दुर्मिळता हे कारण आर्थिक प्रश्न निर्माण होण्यामागे आहे.

व्यक्तीच्या गरजा अमर्याद असतात. साधने मात्र मर्यादित असतात व साधने पर्यायी उपयोगाची त्यातून आर्थिक प्रश्नांची निर्मिती होत असते हा प्रश्न कशा सोडविता येईल.

1) गरजा अमर्याद असल्या तरी गरजा सारख्याच्या महत्त्वाचा नसतात.
2) गरजाची क्रमवारी निश्चित करता येते.
3) महत्त्वाच्या गरजा अगोदर पूर्ण करता येतात.

वरीलप्रमाणे आर्थिक प्रश्नांची समस्या कमी करता येते. थोडक्यात अपुऱ्या साधनातून अमर्याद गरजा भागविणे शक्य नसले तरी आर्थिक प्रश्न सोडविता येतो.

**मागणी (Demand) :**

मागणी ही अर्थशास्त्रातील महत्त्वाची संकल्पना मानली जाते. व्यवहारात इच्छा व मागणी त्यात फरक केला जात नाही. पण नुसती इच्छा म्हणजे मागणी नाही. इच्छेचे मागणीत रूपांतर होण्यासाठी खालील बाबीची पुर्तता होणे आवश्यक आहे.

1) वस्तु खरेदी करण्याची इच्छा
2) इच्छेला खरेदीशक्ती (पैसा) पाठबळ
3) पैसा खर्च करण्याची तयारी

वरील तिनही गोष्टीची जर का एकाच वेळी पुर्तता झाली तरच इच्छेचे मागणीत रूपांतर होते. म्हणून नुसती इच्छा म्हणजे मागणी नाही. अर्थशास्त्रात मागणीचा अर्थ व्यापक आहे.

**बेनहॅम यांच्या मते :**

''एखाद्या विशिष्ट वेळी विशिष्ट किंमतीला खरेदी केली जाणारी वस्तुंची नगसंख्या म्हणते त्या वस्तुंची त्या विशिष्ट किंमतीला असलेली मागणी होय.''

वस्तुला मागणी उपभोक्ते करत असतात. उपभोक्ते वस्तुला मागणी

करतात त्याचे कारण असे की वस्तुत उपयोगिता असते. वस्तुत उपयोगिता आहे. म्हणजे मानवी गरज वस्तुचा उपभोग घेतला की पुर्ण होत असते. वस्तुला असणारी मागणी ही वस्तुमध्ये असलेल्या उपयोगितेवर अंवलबुन असते. मागणी ही संकल्पना अभ्यासत असताना स्थळ, काळ, वेळ, व्यक्ती सापेक्ष बदलत असते. उदा. एकाद्या दारू न पिणाऱ्या व्यक्तीला दारूत उपयोगिता प्राप्त होत नाही. म्हणून तो व्यक्ती दारूची मागणी करणार नाही. याचबरोबर बोनव्हिटा पिणारा व्यक्ती चहाची मागणी करणार नाही. रेनकोटची मागणी उन्हाळ्यात केली जाणार नाही.

एकादा उपभोक्ता एकाद्या वस्तुला मागणी करत असताना वस्तुपासून मिळणारी उपयोगिता व वस्तुसाठी द्यावी लागणारी किंमत याचा विचार करतो. याचा अभ्यास करून मार्शलने घटत्या सीमात उपयोगितेचा सिद्धांत मांडला.

मागणीचे वैयक्तिक मागणी व बाजार मागणी असे दोन प्रकार पडतात.

**वैयक्तिक मागणी (Individual Demand) :**

एका विशिष्ट किंमतीला एका विशीष्ट वेळेला एकदा ग्राहक जेव्हा एकाद्या वस्तुला मागणी करतो तेव्हा त्या मागणीला वैयक्तिक मागणी संबोधले जाते. याचबरोबर वैयक्तिक मागणी पत्रक म्हणजे व्यक्ती वेगवेगळ्या किंमतीला एखाद्या वस्तुचे किती नग खरेदी करतो या संदर्भात जे पत्रक किंवा तालिका तयार केली जाते तेव्हा ती वैयक्तिक मागणी पत्रक असते. वैयक्तिक मागणीवर मागणी करणाऱ्या व्यक्तीचे उत्पन्न, त्याची इच्छा वस्तुची किंमत, चालीरीती, आवड-निवड हे घटक परिणाम करतात.

अनेक व्यक्तीच्या वैयक्तिक मागणी वक्राची बेरीज म्हणजे बाजार मागणी होय. एका विशिष्ट किंमतीला एका विशिष्ट वेळेला बाजारपेठेतील सर्व व्यक्तीच्या वैयक्तिक मागणीची बेरीज म्हणजे बाजार मागणी होय. याचबरोबर विशिष्ट वेळेला, वेगवेगळ्या किंमतीला बाजारपेठेतील सर्व ग्राहकाच्या संभाव्य मागणीची बेरीज केल्यास बाजार मागणी पत्रक तयार होतो.

वैयक्तिक मागणी कोष्टात जे बदल होतील ते बदल बाजार मागणी कोष्टकात होतात. बाजार मागणी वक्रावर बाजारातील वस्तु खरेदी करणाऱ्या उपभोक्त्याचे उत्पन्न, आवडी-निवडी वस्तुची किंमत, सामाजिक चालीरिती हे घटक परिणाम करत असतात.



**पुरवठा (Supply) :**

मागणी प्रमाणेच अर्थशास्त्रातील पुरवठा ही महत्त्वाची संकल्पना आहे. पुरवठा व साठा यात फरक आहे. साठा म्हणजे उत्पादक एका विशिष्ट काळात जेवढे वस्तुचे नग उत्पादन करतो.हा वस्तुचा त्या काळात तो साठा असतो. साठा म्हणजे पुरवठा नाही तर पुरवठा म्हणजे उत्पादक बाजारपेठेत विशिष्ट वेळी विशिष्ट किंमतीला जेवढे वस्तुचे नग विकण्यास तयार असतो. त्याला त्या वस्तुचा पुरवठा म्हणतात.

प्रत्येक उत्पादकाचा उद्देश जास्तीत जास्त नफा प्राप्त करणे हा असतो. म्हणून उत्पादक जेव्हा वस्तुला जास्त किंमत प्राप्त होईल तेव्हा तो जास्तीत जास्त पुरवठा वस्तुचा करण्यास तयार होतो. याउलट जेव्हा केव्हा वस्तुची किंमत कमी होईल तेव्हा तो वस्तुचा कमीत कमी पुरवठा करतो.

उपभोक्ता कमीत कमी किंमत वस्तुची असताना जास्तीत जास्त वस्तु खरेदी करतो. उत्पादक देखिल जास्तीत जास्त किंमत असताना जास्तीत जास्त वस्तु विक्री साठी आणतो उपभोक्त्याचा उद्देश जास्तीत जास्त समाधान कमीत कमी पैशात मिळवितो हा असतो. तर उत्पादक कमी-कमी खर्चात जास्तीत जास्त वस्तु उत्पादन करून जास्तीत जास्त किंमतीला विक्री करणे हा उद्देश असतो. दोहोचा उद्देश कमीत कमी खर्च (त्याग) करून जास्तीत जास्त समाधान मिळविणे हा असतो.

वस्तुचा पुरवठा अनेक घटकावर अंवलबून असतो. वस्तूची किंमत वाढली की वस्तुचा पुरवठा वाढतो. म्हणते वस्तुची किंमत हा घटक पुरवठ्यावर परिणाम करतो. उत्पादन घटकाच्या किंमती वाढल्या तर वस्तु उत्पादनाचा खर्च वाढून संयोजकाची नफ्याची प्राप्ती घटते व वस्तुविक्रीवर परिणाम होतो. उत्पादकाचा उद्देश बाजारपेठेवर ख्याती मिळविणे हा असेल तर त्याचा पुरवठ्यावर प्रभाव पडतो त्याचबरोबर उत्पादकाचा उद्देश वस्तुची विक्री वाढविणे हा असेल तरीही त्याचा उत्पादकाच्या वस्तुच्या पुरवठ्यावर परिणाम पडत असतो.

**वैयक्तिक पुरवठा (Individual Supply) :**

एका विशिष्ट वेळी विशिष्ट किंमतीला विक्रेता जेव्हा बाजारपेठेत जेवढे वस्तुचे नग विकण्यास तयार असतो. त्याला वैयक्तिक पुरवठा म्हणतात. वस्तुच्या निरनिराळ्या किंमती असताना विशिष्ट वेळी एखाद्या वस्तुची किती

नगसंख्या विक्रेता पुरवठा करेल हे दाखविणारी तालिका म्हणते वैयक्तिक पुरवठा पत्रक होय.

**बाजारपुरवठा (Market Supply) :**

वैयक्तिक पुरवठा वक्रापासून बाजाराचा पुरवठा काढता येतो. बाजारात एका विशिष्ट वेळी विशिष्ट किंमतीला जेवढे नग आपली वस्तु विकण्यासाठी आणतात. ह्या सर्वाची बेरीज म्हणजे बाजाराचा पुरवठा होय. याच बरोबर वस्तुच्या निरनिराळ्या किंमती असताना विशिष्ट वेळी एखाद्या वस्तुचे किती नगसंख्येचा पुरवठा बाजारातील एकूण विक्रेते करत आहेत. हे दाखविणारी तालिका म्हणजे बाजारपुरवठा पत्रक होय.

**संतुलन (Eaulibriun) :**

**प्रास्ताविक :**

अर्थशास्त्रातील संतुलन ही महत्त्वाची संकल्पना आहे. संतुलन म्हणजे हालचालीचा अभाव होय. अर्थशास्त्रात अनेक आर्थिक सिद्धांताचे विवेचन संतुलनाच्या साह्याने केले जाते. म्हणून अर्थशास्त्राला संतुलन विश्लेषणाचे शास्त्र म्हणतात.

**जॉर्ज स्टीगलर :**

‘संतुलन म्हणजे अशी अवस्था की ज्यात परस्पर विरुद्ध कार्य करणाऱ्या शक्ती किंवा प्रवृत्ती अशा प्रकारे निष्प्रभ करीत असतात की ज्या घटकावर या प्रवृत्ती कार्य करीत असतील त्या घटकांच्या अवस्थेत कोणताच बदल होत नाही.

**प्रो. मेहता यांच्या मते :**

अर्थशास्त्रातील संतुलन हे हालचालीच्या दरातील बदलाचा अभाव दर्शविते, तर भौतिकशास्त्रात ते खुद्द हालचालीची अनुपस्थिती दाखवित.

संतुलनाचे स्थिर संतुलन व अस्थिर संतुलन व उदासीन संतुलन असे तीन प्रकार पडतात. स्थिर संतुलन म्हणजे दोन घटकात घडुन आलेले संतुलन स्थिर राहते ते नष्ट पावत नाही. तर अस्थिर संतुलन म्हणजे दोन घटकात घडुन आलेले संतुलन स्थिर राहत नाही. उदासीन संतुलन म्हणजे दोन घटकात संतुलन घडून येते व अस्थिर होवून नवीन ठिकाणी संतुलन घडून येते व त्या ठिकाणी स्थिर होते.



अर्थशास्त्रात विविध आर्थिक सिद्धांतात संतुलन संकल्पना महत्त्वाची आहे. उपभोक्त्याचे संतुलन म्हणजे उपभोक्ता वस्तुसाठी दिलेली किंमत व त्याला त्या वस्तुपासून महत्तम समाधान देणारी स्थिती होय. उद्योगसंस्थेचे संतुलन तेव्हाच घडून येते की जेव्हा कमीत कमी खर्चात तिला जास्तीत जास्त बाजारपेठेत वस्तुची मागणी व वस्तुचा त्यातून निश्चित झालेली किंमत संतुलन अवस्थेतील असते. त्याला बाजार संतुलन असे म्हणतात. संतुलीत किंमत मागणी व पुरवठा याच्या संघर्ष शक्तीतून निश्चित होते. बाजारसंतुलन ही संकल्पना खालील आकृतीद्वारे स्पष्ट केली गेलेली आहे.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर वस्तुची मागणी व वस्तुचा पुरवठा मोजला आहे. तर OY अक्षावर वस्तुची किंमत मोजलेली आहे. DD हा मागणी वक्र, तर SS हा पुरवठा वक्र काढलेले आहेत. E बिंदुच्या ठिकाणी या दोन्ही घटकात संतुलन घडुन येते. व OP ही किंमत निश्चित होते. E बिंदुच्या व्यतिरिक्त किंवा OP किंमतीच्या व्यतीरिक्त इतर कुठेही संतुलन घडून येत नाही. कारण त्यावेळी मागणी व पुरवठा हे दोन घटक एक दुसऱ्या बरोबर नसतात. थोडक्यात बाजारसंतुलन एका विशिष्ट किंमतीद्वारे मागणी व पुरवठ्याद्वारे घडून येते. हे वरील आकृतीद्वारे स्पष्ट केले आहे.

**आर्थिक विवेचनाचे दृष्टिकोन (Approaches of Economics) :**

अर्थशास्त्र हे एक सामाजिकशास्त्र आहे. हे शास्त्र आर्थिक प्रश्नाचे विवेचन करते. आर्थिक विवेचनाचे दोन दृष्टिकोन आहेत.

सूक्ष्म अर्थशास्त्र (Micro Economics)

स्थुल अर्थशास्त्र (Macro Economics)

सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थुल अर्थशास्त्र हा शब्दप्रयोग हा शब्द सर्वप्रथम प्रा. रेगनर फ्रिच यांनी 1933 मध्ये वापरला. ॲडमस्मिथने राष्ट्राची संपत्ती या ग्रंथात सूक्ष्म अर्थशास्त्र शब्द वापरला. डेव्हिड रिकार्डो, जे.बी.से. प्रा.जे. एस.मिल, प्रा. मार्शल, प्रा. पिगू, श्रीमती जोन रॉबिन्सन इत्यादींनी सूक्ष्म अर्थशास्त्र हा शब्द जास्त प्रमाणात वापरला.

**सूक्ष्म अर्थशास्त्र (Micro Economics) :**

Micro म्हणजे सूक्ष्म होय. हे अर्थशास्त्र लहानतल्या लहान घटकाचा अभ्यास करते. प्रा. के. ई. बोल्डिंग यांनी सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याख्या पुढील प्रमाणे केलेली आहे. प्रो. के.इ. बोल्डिंग – ''सूक्ष्म अर्थशास्त्र हे विशिष्ट उद्योगसंस्थेचा विशिष्ट उपभोक्त्याचा, विशिष्ट वेतनदराचा, विशिष्ट किंमतीचा अभ्यास करते.''

**प्रा. लर्नर –** ''सूक्ष्म अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेकडे सूक्ष्मदर्शक यंत्रातून (Microscope) पाहते. अर्थव्यवस्थेतील विविध पेशी (म्हणजे आर्थिक संस्था) नीट कार्य करतात का याचे निरीक्षण सूक्ष्म अर्थशास्त्र करीत असते.

**वैशिष्टे :**

1) सूक्ष्म अर्थशास्त्र हे एककाचा अभ्यास करताना एखाद्या गटाचा अभ्यास करताना इतरांचा विचार केला जात नाही.

2) हे अर्थशास्त्र एककाचा अभ्यास करताना त्याचा सर्वागीन अभ्यास करते.

3) या अभ्यासामुळे वैयक्तिक आर्थिक प्रश्न सहज समजतात. कारण यात एखाद्या गटाचा, एककाचा अभ्यास केला जातो.

4) सूक्ष्म अर्थशास्त्रामुळे व्यक्तिगत आर्थिक प्रश्न समजतात. त्यामुळे ते प्रश्न सोडविण्यास मदत होते.



5) सूक्ष्म अर्थशास्त्रात कोणत्याही एककाचा गटाचा अभ्यास करताना, त्या गटाची एककाची व्याख्या संकुचित होत असते.

6) सूक्ष्म अर्थशास्त्रात ज्या एककाचा गटाचा अभ्यास केला जातो. त्या एककाच्या महत्तमतेच्या संबंधात अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्र करीत असते.

**सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व किंवा गुण किंवा उपयोग :**

या अभ्यास विषयाचे पुढील गुण आहेत.

**1) व्यक्तिगत आर्थिक प्रश्न समजण्यास उपयुक्त :** प्रत्येक व्यक्तीसमोर कोणता ना कोणता आर्थिक प्रश्न असतो. सूक्ष्म अर्थशास्त्र वैयक्तिक आर्थिक प्रश्नाचा अभ्यास करते. त्यामुळे व्यक्तीचे आर्थिक प्रश्न समजतात. त्यामुळे हे प्रश्न सोडविणे देखील सोपे बनते.

**2) सरकारला आर्थिक धोरण ठरविताना उपयुक्त :** हे अर्थशास्त्र वैयक्तिक घटकांचा अभ्यास करते. उद्योगसंस्था आंतरराष्ट्रीय व्यापार, अंतर्गत व्यापार, इत्यादीमुळे कोणत्या क्षेत्राचा विकास झाला आहे. व कोणते क्षेत्र मागास आहे. समजते व सरकारला मागास क्षेत्रासाठी आर्थिक धोरण ठरविताना हे अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.

**3) आर्थिक कल्याण समजण्यास उपयुक्त :** हे अर्थशास्त्र वैयक्तिक उत्पन्नाचा अभ्यास करते. त्यावरून कल्याण समजते. मिळणाऱ्या उत्पन्नावरून गरजा पूर्ण झाल्या तर कल्याण झाले. नाही पूर्ण झाल्या तर कल्याण पूर्ण झाले नाही. थोडक्यात आर्थिक कल्याणाची संकल्पना सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाच्या येते.

**4) उद्योगधंदा व उद्योगसंस्था याना उपयुक्त :** एका उद्योग संस्थेचा किंवा एका उद्योगाचा अभ्यास केला जातो. उद्योगसंस्थेचे उत्पादन व खर्च समजतात. व तो कमी करण्यासाठी काय करता येईल. याचे ज्ञान या अर्थशास्त्राच्या अभ्यासावरून समजते.

**5) इतर फायदे :** या अर्थशास्त्राच्या अभ्यासावरून लोकांचे जास्तीत जास्त समाधान कसे साधता येईल. वस्तुच्या किंमतनिश्चितीत, सार्वजनिक आयव्यय, आंतरराष्ट्रीय व्यापार इत्यादी क्षेत्रात हे अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.

**सूक्ष्म अर्थशास्त्राच्या मर्यादा (Limitations) :**

सूक्ष्म अर्थशास्त्राच्या मर्यादा किंवा दोष पुढीलप्रमाणे आहेत.

**1) संपूर्ण अर्थव्यवस्थेची कल्पना येत नाही :** सूक्ष्म अर्थशास्त्र वैयक्तिक घटकांचा अभ्यास केला जातो. एकाच आर्थिक एककाचा एकट्यानेच विचार केला जातो. त्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेची कल्पना येत नाही.

**2) संपूर्ण अर्थशास्त्राचे निर्णय सर्वसामान्य होणे कठीण असते :** सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक घटकाचा अभ्यास केला जातो. त्यामुळे अभ्यासातून निघालेले निष्कर्ष सर्वांना लागू केले जावू शकत नाही.

**3) गृहीतके चुकीची गृहीत धरली जातात :** सूक्ष्म अर्थशास्त्रात सिद्धांत मांडत असताना गृहीतके गृहीत धरली जातात. उदा. पूर्ण स्पर्धा, पूर्ण रोजगार, इत्यादी पण अर्थव्यवस्थेत पूर्णस्पर्धा पूर्ण रोजगार नसतो. त्यामुळे अशा गृहीतकावर मांडलेले सिद्धांत व त्यातून निघणारे निष्कर्ष चुकीचे असू शकतात.

**4) एकूण घटकाचा अभ्यास नाही :** सूक्ष्म अर्थशास्त्रात राष्ट्रीय उत्पन्न, एकूण उपभोग, एकूण बचत, एकूण उत्पादन अशा घटकाचा अभ्यास केला जात नाही.

थोडक्यात सूक्ष्म अर्थशास्त्र ही अर्थशास्त्र विषयाची महत्त्वपूर्ण शाखा आहे. या विषयाच्या अभ्यासाला काही मर्यादा आहेत पण या विषयाच्या अभ्यासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**कल्याणकारी अर्थशास्त्र (Welfare Economics) :**

अर्थशास्त्राच्या अभ्यास विषयाची एक अभ्यासशाखा म्हणजे कल्याणकारी अर्थशास्त्र होय. अर्थशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे. अभ्यासाचा विषय मानव हा आहे. डॉ. मार्शल यांनी अर्थशास्त्राची व्याख्या मानवी कल्याणावर आधारित केली आहे. त्याच्या मते अर्थशास्त्र हे मानवी कल्याणाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. कल्याणकारी अर्थशास्त्राचा मुख्य हेतू समाज कल्याण हा आहे.

**कल्याणकारी अर्थशास्त्राच्या व्याख्या :**

कल्याणकारी अर्थशास्त्राच्या विविध कल्याणकारी अर्थशास्त्रज्ञानी पुढीलप्रमाणे व्याख्या केल्या आहेत.

**1) प्रा. पिगुच्या मते :** आर्थिक कल्याण हा सामान्य कल्याणाचा असा भाग आहे की त्याला मुद्रेच्या मापदंडाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मोजता येते.



**2) मेलविन रिडरच्या मते :** ''कल्याणकारी अर्थशास्त्र आर्थिक विज्ञानाची अशी शाखा आहे की जी व्यवहाराच्या औचित्याला मापदंडाना स्थापन करून त्याचा आर्थिक धोरणाशी उपयोग करते.

**3) प्रो. सायटोस्कीच्या मते :** ''कल्याणकारी अर्थशास्त्र हे अर्थशास्त्राच्या सिद्धांताच्या असा भाग होय की, जो प्रामुख्याने धोरण ठरविण्याशी संबंधित असतो.''

**4) प्रा. बॉबरच्या मते :** ''महत्तम सामाजिक समाधान या मापदंडाच्या आधारावर अर्थव्यवस्थेच्या कार्यक्षमता विश्लेषण म्हणजे कल्याणकारी अर्थशास्त्र होय.''

**5) प्रा. सय्यद फकरूल हसन :** ''कल्याणकारी अर्थशास्त्र ही आर्थिक विश्लेषणाची अशी शाखा आहे की, जी कल्याणाचे निकष तयार करते. हे निकष महत्तम कल्याण साध्य करतात आणि त्या अनुषंगाने आर्थिक धोरण स्वीकारले जाते.

थोडक्यात कल्याणकारी अर्थशास्त्रात समाजाचे जास्तीत जास्त आर्थिक कल्याण हे मुख्य उद्दिष्ट असून ते आर्थिक धोरणाद्वारे जोपासता येते.

**कल्याणकारी अर्थशास्त्र विषयाच्या शाखा :**

कल्याणकारी अर्थशास्त्राचा शाखा विस्तार पुढीलप्रमाणे आहे.

1) कल्याणकारी अर्थशास्त्राच्या पहिल्या शाखेत सरकारी धोरणाचा मुक्त अर्थव्यवस्थेशी संबंध जोडला आहे.

2) कल्याणकारी अर्थशास्त्राच्या दुसऱ्या शाखेत निहस्तक्षेपी धोरण (सरकारी हस्तक्षेपाशिवाय) महत्तम समाधान कसे साध्य होवू शकेल.

**कल्याणकारी अर्थशास्त्राचे उद्देश :**

कल्याणकारी अर्थशास्त्राच्या अभ्यास करण्याचे पुढील उद्देश आहेत.

1) श्रीमंत या शब्दाचा अर्थ स्पष्ट करते.

2) आर्थिक युक्ततम याची व्याख्या करणे तो साध्य करण्यासाठी धोरण ठरविणे.

3) आर्थिक दृष्टिकोनातून कल्याणकारी अर्थशास्त्रात शास्त्रीय दृष्टिकोन तयार करणे.

**प्रा. पिगू याचे कल्याणकारी अर्थशास्त्र :**

प्रा. ए.सी. पिगू यांनी Economics of welfare हा ग्रंथ लिहिला. पिगु हा एक नवअभिमतपंथीय अर्थशास्त्रात होय. त्यांचा कालखंड (1877-1959) असा आहे. प्रा. पिगु यांनी कल्याणाचे दोन प्रकारात वर्गीकरण केलेले आहे. 1) आर्थिक कल्याण 2) सामान्य कल्याण त्याच्या मते सामान्य कल्याणाचा एक भाग आर्थिक कल्याण होय. तसेच आर्थिक कल्याण केवळ आर्थिक घटकामुळे घडून येते. आर्थिक कल्याण सामान्य कल्याणाचा असा भाग आहे की, ज्यास पैशाच्या मापदंडाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मोजता येते. प्रा. पिगु यांनी आपल्या Economics of welfare या ग्रंथात फक्त आर्थिक कल्याणाचा अभ्यास केला आहे. अर्थशास्त्रातून आर्थिक कल्याणाचा अभ्यास केला पाहिजे. प्रा. पिगु यांचे कल्याणकारी अर्थशास्त्र खालील गृहीतावर आधारित आहे.

**प्रो. पिगु याच्या कल्याणकारी अर्थशास्त्राची गृहितके :**

प्रो. पिगु यांनी कल्याणकारी अर्थशास्त्राची मांडणी करत असताना पुढील बाबी गृहित धरल्या आहेत.

1) प्रत्येक उपभोक्ता महत्तम उपयोगिता प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो.
2) समाजातील वेगवेगळ्या व्यक्तींना वस्तूंच्या समान संख्येपासून मिळणारे समाधान समान असते.
3) उपयोगिता संख्यात्मक किंवा गणनात्मक रीतीने मोजता येते.
4) उपयोगितेची अंतवैयक्तिक तुलना करणे शक्य आहे.
5) पैशापासून मिळणारी सीमांत उपयोगिता घटत जाते.

वरील गृहीतकाला अनुसरून प्रो. पिगू याच्यामते महत्तम सामाजिक कल्याण साध्य होण्यासाठी पुढील अटीची पूर्तता झाली पाहिजे.

**1) राष्ट्रीय उत्पन्न महत्तम असावे :** प्रा. पिगू यांच्यामते राष्ट्रीय उत्पन्न महत्तम झाल्यास सामाजिक कल्याण जास्तीत जास्त होते. राष्ट्रीय उत्पन्न महत्तम करण्यासाठी उत्पादनाची साधने कमी उत्पादक उपयोगाकडून जास्त उत्पादक उपयोगाकडे वळाली पाहिजेत.

**2) राष्ट्रीय उत्पन्नाचे परिपूर्ण समान वाटप :** प्रा. पिगू यांच्या मते सामाजिक कल्याणात वाढ होण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाचे परिपूर्ण समान वाटप झाले



पाहिजे. उत्पन्नाचे हस्तांतरण हे श्रीमंतांकडून गरिबांकडे करावे. त्यामुळे सामाजिक कल्याणात वाढ होईल.

**प्रो. पिगू यांच्या कल्याणकारी अर्थशास्त्रावरील टिका :**

प्रो. पिगू यांच्या कल्याणकारी अर्थशास्त्रावर पुढीलप्रमाणे टिका केल्या जातात.

**1) आर्थिक व अनार्थिक कल्याण वेगळे करणे शक्य नाही :** प्रो. पिगु यांनी कल्याणाचे वर्गीकरण आर्थिक व अनार्थिक असे केलेले आहे. टिकाकाराच्या मते कल्याणाचे आर्थिक व अनार्थिक असे वर्गीकरण करणे चुकीचे आहे.

**2) कल्याणाचे मोजमान पैशात करता येत नाही :** प्रो. पिगु यांनी कल्याणाचे मोजमाप पैशात केलेले आहे. टिकाकाराच्या मते पैशाचे मुल्य हे स्थिर नसते त्यात बदल होतो अशा अस्थिर घटकाच्या साह्याने कल्याणाचे मोजमाप योग्य रितीने करता येत नाही.

**3) उपयोगितेचे (कल्याणाचे) गणनात्मक पद्धतीने मापन केलेले आहे :** प्रो. पिगु यांनी आपल्या विवेचनात उपयोगितेचे (कल्याणाचे) मापन गणनात्मक पद्धतीने केलेले आहे. टिकाकाराच्या मते उपयोगिता मनोनिष्ठ संकल्पना आहे. तिचे आकड्यात मोजमाप करता येत नाही.

**4) सर्व व्यक्तीची समाधान प्राप्त करण्याची क्षमता समान असत नाही :** प्रो. पिगु याच्या मते सर्व व्यक्तीची समाधान प्राप्त करण्याची क्षमता समान असते म्हणजे अ व्यक्तीला एकाद्या वस्तुच्या उपभोगापासून जेवढे समाधान मिळते. तेवढेच समाधान ब व्यक्तीलासुद्धा प्राप्त करू शकतो. टिकाकाराच्यामते सर्व व्यक्तीची समाधान प्राप्र करण्याची क्षमता भिन्नभिन्न असते.

**नवीन कल्याणकारी अर्थशास्त्र**

**(The Concepts of New welfare Economics) :**

नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञानी कल्याणकारी अर्थशास्त्राचे विश्लेषण करत असताना अनेक बाबी गृहीत धरल्या आहेत. प्रत्येक उपभोक्त्याचा महत्तम समाधान प्राप्त करण्याचा उद्देश असतो. उपयोगितेचे (कल्याणाचे) संख्यात्मक पद्धतीने मापन करता येते. उपयोगितेचे व्यक्ती-व्यक्ती अंतर्गत तुलना करणे शक्य आहे. पैशाच्या बाबतीत घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम लागू होतो.

नवीन कल्याणकारी अर्थशास्त्रात उपयोगितेचे क्रमवाचक पद्धतीने मापन केलेले आहे. उपयोगितेचे गणनात्मक मापना ऐवजी उपयोगितेचे क्रमवाचक पद्धतीने मापन केलेले आहे. तसेच उपयोगितेची व्यक्ती व्यक्ती अंतर्गत तुलना करता येत नाही. नवीन कल्याणकारी अर्थशास्त्राच्या मांडणीत पॅरेटो, हिक्स, काल्डोर व सायस्टोस्की यानी मांडलेल्या संकल्पना महत्वाच्या आहे. त्या संकल्पना पुढीलप्रमाणे आहेत.

**पॅरेटोचे युक्ततम (Paretian Optimum) :**

प्रो. पॅरेटो हे इटालीयन अर्थशास्त्रज्ञ असून त्याचा कालखंड (1848-1923) हा आहे ते लॅसेने स्कुल ऑफ एकानॉमिक्सचे संस्थात्मक आहेत. पॅरेटो यानी नवीन कल्याणकारी अर्थशास्त्राची मांडणी केलेली आहे. पॅरेटोचे युक्ततम हे पॅरेटोचा ऐक्यभाव नियम, पॅरेटोचा कल्याणाचा मापदंड या नावाने प्रसिद्ध आहे. पॅरेटोच्या मते - ''इतरांच्या कल्याणात कसलाही बदल न होता एखाद्याच्या कल्याणात जेव्हा वाढ होते तेव्हा त्याला सामाजिक कल्याण असे म्हणतात.'' तर महत्तम कल्याणाची पातळी अशी असते. जिच्यात कोणत्याही प्रकारचे परिवर्तन करणे अशक्य आहे, कारण की सर्व व्यक्तींचे समाधान स्थिर असते. त्यास सोडून एक तर सर्वाचे समाधान वाढते किंवा कमी होते.'' पॅरेटोचे इष्टतम खालील गृहितकावर आधारित आहे.

**गृहितके :**

1) प्रत्येक उपभोक्ता स्वतंत्र आहे.
2) महत्तम समाधान प्राप्त करणे हा उपभोक्त्याचा उद्देश आहे.
3) ही संकल्पना समवृत्तीवक्र संकल्पनेवर आधारित आहे.
4) उपयोगितेचे क्रमवाचक पद्धतीने मोजमाप केलेले आहे.
5) पॅरेटो लोकाच्या आवडी-निवडी स्थिर गृहीत धरतो.
6) अर्थव्यवस्थेत पूर्ण स्पर्धेची बाजारपेठ आहे.
7) तांत्रिक ज्ञानात बदल होत नाहीत.

वरील गृहितकाला अनुसरून पॅरेटोच्या मते एका व्यक्तीच्या कल्याणात वाढ (घट) केली असता दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या कल्याणाच्या पातळीत बदल होत नसेल तर एकुण सामाजिक कल्याणाची पातळीत वाढ होते. हे विश्लेषण खालील आकृतीच्याद्वारे स्पष्ट केलेले आहे.






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर A चे कल्याण (उपयोगिता) तर OY अक्षावर B चे कल्याण (उपयोगिता) मोजली आहे. BA हा उपयोगिता शक्य वक्र असून तो उपयोगितेच्या विविध शक्यता दर्शवितो. आकृतीत P बिंदूपासून QR व S मध्ये झालेला बदल कल्याणात प्रगती दाखवितो. P पासून Q पर्यंतचा प्रवास A चे कल्याण स्थिर व B चे कल्याण वाढते असे दर्शवितो. R बिंदुपाशी दोघाच्या कल्याणात वाढ होते तर S बिंदुपाशी B चे कल्याण कायम राहते व A चे कल्याण वाढते. पण जर QRS च्या बाहेरचा बदल पॅरेटोच्या कसोटीच्या अनुसरून नाही. कारण T बिंदुपाशी A चे कल्याण कमी होवून B चे कल्याण वाढते तर V बिंदुपाशी A चे कल्याण वाढते B चे कल्याण कमी होते. एकाच्या कल्याणात घट करून दुसऱ्याच्या कल्याणात वाढ करावी हा बदल पॅरेटोच्या ऐक्यभाव नियमाला अनुसरून नाही.

**टीका (दोष) :**

पॅरेटोच्या इष्टतमावर पुढीलप्रमाणे टीका केल्या जातात.

**1) ही संकल्पना मुल्यनिर्णयावर आधारित आहे :**

पॅरेटॉच्या मते एकाच्या कल्याणात कसलाही बदल न करता दुसऱ्याच्या कल्याणात वाढ होत असेल तर ने चांगले आहे. टीकाकाराच्या मते ही संकल्पना नैतिकनिर्णय (मुल्यनिर्णयावर) आधारित आहे. मुल्यनिर्णय ठरविणे हे अवघड आहे.

**2) उपयोगितेची अंतवैयक्तिक तुलना करता येत नाही असे गृहित धरले आहे :**

पॅरेटो यांनी आपल्या विश्लेषणात प्रत्येक उपभोक्ता स्वतंत्र गृहित धरला असून उपयोगितेची व्यक्ती व्यक्ती अंतर्गत तुलना शक्य नाही असे गृहित धरले आहे. टिकाकाराच्या मते उपयोगिता सापेक्ष स्वरूपाची असुन सापेक्ष उत्पन्नाचा (शेजाऱ्याचे उत्पन्न) त्याचा परिणाम उपयोगितेवर किंवा कल्याणावर होतो असे गृहित धरले आहे.

**3) चुकीची गृहितके :**

पॅरेटो यानी सामाजिक मुक्ततम ही संकल्पना स्पष्ट करत असताना उपयोगितेचे क्रमवाचक पद्धतीने मापन पुर्ण स्पर्धा, उत्पादन घटकाची गतिशिलता, तांत्रिक ज्ञानात बदल होत नाही अशी गृहितके वापरली आहेत.

**४) कल्याणातील स्पष्ट बदलांचाच अभ्यास केला जातो :**

पॅरेटोच्या विश्लेषणात केवळ कल्याणातील स्पष्ट बदल अभ्यासले जातात. पण काही सामाजिक बदलामुळे कमी व्यक्तीना नुकसान पण जास्त व्यक्तींना फायदा होतो. त्याचे स्पष्टीकरण या नियमात केलेले नाही.

**सामाजिक कल्याण फल (The Social Welfare function) :**

नवीन कल्याणकारी अर्थशास्त्रातील एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे सामाजिक कल्याण फल ही होय. ही संकल्पना बर्गसन ॲरो आणि चेनरी यांनी मांडली. पुढे तिचा विकास अर्थशास्त्रज्ञ सॅम्मुलसन यांनी केला. ही संकल्पना मुल्यनिर्णयावर आधारित आहे.

**प्रो. बर्गसनच्या मते :**

सामाजिक कल्याण फलन हे प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाचे फलन एक असते किंवा समुदायातील प्रत्येक व्यक्तीद्वारा उपभोग घेतलेल्या वस्तुंच्या आणि सेवांच्या परिमाणांचे फलन असते.



सामाजिक कल्याण म्हणजे समाजातील भिन्न व्यक्तीच्या उपयोगितेची बेरीज होय. या संकल्पनेनुसार कोणत्याही उपयोगितेत घट न करता समाजातील इतर व्यक्तींच्या उपयोगितेत वाढ होत असेल तर तेव्हा सामाजिक कल्याणात वाढ होते.

**गृहितिके :**

1) ही संकल्पना मुल्यनिर्णयावर आधारित आहे.
2) उपयोगितेचे कमवाचक पद्धतीने मोजमाप केलेले आहे.
3) उपयोगितेची व्यक्ती व्यक्ती अंतर्गत तुलना करता येणे शक्य आहे.
4) सामाजिक कल्याण हे व्यक्तीचा कल्याणावर अंवलबुन आहे तर व्यक्तीचे कल्याण समाजातील संपत्तीच्या वितरणावर अवलंबून असते.
5) ही संकल्पना समवृत्ती वक संकल्पनेवर आधारित आहे.

हे विश्लेषण खालील आकृतीद्वारे स्पष्ट केलेले आहे.




वरील आकृतीत OX अक्षावर A ची उपयोगिता तर OY अक्षावर B उपभोक्त्याची उपयोगिता मोजलेली आहे. आकृतीत BA हा कल्याणाच्या संदर्भात उपयोगिता शक्यता वक्र काढला आहे. K बिंदुच्या ठिकाणी समवृत्तीवक्र उपयोगिता शक्यता वक्राला स्पर्श करतो तेव्हा सामाजिक कल्याण जास्त

असते तर S व T बिंदुच्या ठिकाणी सामाजिक कल्याण कमी असते. तर $W_2$ समवृत्तीवक्रावरील M बिंदु उपयोगिता शक्यता वक्राला स्पर्श करत नाही.

**मुल्यविधान किंवा मूल्यनिर्णय (Value of Judgement) :**

कल्याणकारी अर्थशास्त्रातील ही एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे मुल्यविधान किंवा मुल्यनिर्णय होय. गरजांची पूर्तता हा अर्थशास्त्राचा आणि गरजांची पूर्तता करीत असताना माणसाने कसे वागावे हा नीतीशास्त्राचा अभ्यास विषय आहे. साहजिकच अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र यांचा निकटचा संबंध असायला हवा. मानवी कल्याण करणे हे अर्थशास्त्राचे ध्येय आहे. थोडक्यात कोणतेही शास्त्र नैतिक मुल्यापासून दूर राहू शकत नाही. अर्थशास्त्र देखिल नैतिक मुल्यापासुन दुर राहू शकत नाही. म्हणजेच अर्थशास्त्राला निती मुल्याचे अधिष्ठान आहे असे म्हणता येईल.

**व्याख्या :** मुल्यविधान याचा अर्थ असा की, नितीशास्त्रातील मानवी प्रक्रियाना प्रभावित करणारे योग्यता सुचक विधान होय. कल्याणकारी अर्थशास्त्रातील निर्णय घेताना मुल्यनिर्णयाचा आधार घेतला जातो.

मुल्यनिर्णयासंदर्भात पुढील अर्थशास्त्रज्ञांनी मते महत्त्वाची आहेत.

**डॉ. मार्शल :** नैतिक निर्णय अर्थशास्त्राने स्वत:च ठरवावेत आणि त्याच्या आधारावर आर्थिक निती ठरवुन त्यानुसार व्यवहार करावेत.

**प्रा. पिगु :** व्यक्तीच्या समाधानाची तुलना गणनात्मक रितीने आणि निरनिराळ्या आर्थिक बदलामुळे सामाजिक कल्याणातील वाढ सर्व व्यक्तींना प्राप्त होणाऱ्या प्राप्त होणाऱ्या उपयोगितेची तुलना करून ठरवावी.

**पॅरेटो :** समाजातील काही व्यक्तीच्या कल्याणात सुधारणा होत असताना इतर व्यक्तीच्या कल्याणात घट होता कामा नये.

**बर्गसन :** नैतिक निर्णयाच्या आधारे अर्थशास्त्राज्ञानी समाजकल्याण महत्तम होण्यासाठी आर्थिक नितीचे निर्धारण केले पाहिजे.

**मुल्यविधानासंदर्भात अनुकूल मते :** अर्थशास्त्राद्वारे नैतिक निर्णय तयार करण्याबाबत पहिला विचार नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञ डॉ. मार्शल आणि प्रो. पिगु यानी मांडला. या अर्थशास्त्राच्या मते मुल्यनिर्णयाच्या आधारावर अर्थशास्त्रज्ञाने आर्थिक धोरण ठरवावे व त्यानुसार आर्थिक व्यवहार करावेत.



मुल्यनिर्णय हे व्यक्तींच्या दृष्टिकोनात बदल घडवून त्यांच्या वर्तणुकीवर परिणाम करतात. नैतिक निर्णय आर्थिक सुधारणांची शिफारस करतात. उदा. देशातील दारिद्र्य, बेरोजगारी कमी झाले पाहिजे. थोडक्यात काही अर्थशास्त्रज्ञ अर्थशास्त्रात मुल्यविधानाचा समावेश झाला पाहिजे असे मत मांडतात.

**मुल्यविधानासंदर्भात तटस्थत मते :**

रॉबिन्स सारखे अर्थशास्त्रज्ञ मुल्यविधानाचा अर्थशास्त्रात समावेश करू नये या मताचे समर्थन करतात. अर्थशास्त्रात मुल्यविधानाचा समावेश झाला तर अर्थशास्त्राचे शास्त्रीय स्वरूप नष्ट होईल. अर्थशास्त्राने मुल्यनिर्णयाच्या आधारावर अशक्य अशी अंतवैयक्तिक तुलना सुद्धा करू नये. नवीन कल्याणकारी अर्थशास्त्रज्ञ पॅरेटो, प्रो. हिक्स व कॉल्डोर, सायटोवोस्की यांनी उपयोगितेचे क्रमवाचक पद्धतीने मापन करून मुल्यनिर्णयाला अर्थशास्त्रापासून दुर ठेवण्याचा प्रयत्न केला पण त्याचा प्रयत्न यशस्वी होऊ शकला नाही.

थोडक्यात मुल्यनिर्णयाशिवाय कल्याणकारी अर्थशास्त्र कार्य करू शकत नाही. आर्थिक धोरण ठरविणे. अर्थशास्त्राचा शास्त्रीय व तर्कसंगत अभ्यास करणे. उत्पन्न व संपत्तीचे न्यायवितरण, समतोल विकास घडवून आणणे इत्यादी सर्वच निर्णय घेताना मुल्यविधानाचा वापर केला जातो.

**भरपाई तत्व किंवा भरपाई कसोटी**

(Compensation Principal or the compensation Criteria)

पॅरेटो या अर्थशास्त्रज्ञाने मांडलेल्या इष्टतमात सुधारणा म्हणजे क्षतिपूर्ती तत्त्व होय. हे तत्त्व प्रो. हिक्स, प्रो. काल्डोर व सायटोवस्की यांनी मांडलेले आहे. भरपाई तत्त्वाला आधुनिक कल्याणकारी अर्थशास्त्र असेही म्हणतात. ह्या तत्वानुसार अर्थव्यवस्थेत बदल केल्यास काही व्यक्तींना लाभ होतो तर काही व्यक्तींचे नुकसान होते. झालेले नुकसान होणाऱ्या लाभाने भरून निघाले तरच अर्थव्यवस्थेत केलेले परिवर्तन लाभाचे असते. थोडक्यात कल्याणात होणाऱ्या वाढीपेक्षा कल्याणात होणारी घट कमी असावी.

उदा. अर्थव्यवस्थेत G व E हे दोन व्यक्ती आहेत. अर्थव्यवस्थेत काही धोरणामुळे बदल केला. त्यामुळे G चे उत्पन्न कमी झाले व E व्यक्तीचे उत्पन्न वाढले तर भरपाई तत्त्वानुसार E चे उत्पन्न इतके वाढले पाहिजे की G चे

झालेले नुकसान भरपाईची रक्कम भरून E चे उत्पन्न जास्तीचे शिल्लक राहावे.

**गृहीतके :**

भरपाई तत्त्व खालील गृहीतावर आधारित आहे.

1) प्रत्येक उपभोक्ता स्वतंत्र आहे म्हणजे एका व्यक्तीच्या समाधानाचा दुसऱ्या व्यक्तीच्या समाधानाशी संबंध नाही.
2) उपभोक्त्याच्या आवडी-निवडी विश्लेषण काळासाठी स्थिर आहेत.
3) उपयोगितेची अंतवैयक्तिक तुलना करता येत नाही.
4) पैशाचे सामाजिक मुल्यस्थिर गृहीत धरले आहे.
5) उपयोगितेचे क्रमवाचक पद्धतीने मापन केलेले आहे.
6) अर्थव्यवस्थेत पूर्ण स्पर्धा आहे.
7) क्षतीपूर्ती प्रत्यक्ष शोधन केले जात नाही.

**कल्याणाचा मापदंड किंवा निकष (Criterian of welfere) :**

प्रो. हिक्स आणि प्रो. काल्डोर यांच्या मते तर एखाद्या सामाजिक बदलामुळे किंवा अंमलबजावणीमुळे काही उपभोक्त्याचा फायदा तर काही उपभोक्त्याचे नुकसान होत असेल तर अशा वेळी लाभ झालेले नुकसानदाराना भरपाई देऊनही जर लाभाधिक्य शिल्लक राहात असेल तर त्याचा अशा अर्थ आहे की सामाजिक कल्याणात वाढ झाली अशा होतो.

**टिका किंवा दोष :**

भरपाई तत्त्वावर पुढील प्रमाणे टिका केल्या जातात.

1) ही संकल्पना मुल्यनिर्णयावर आधारित आहे.
2) उपभोक्त्याच्या आवडी-निवडीस्थिर गृहीत धरल्या आहेत.
3) अर्थव्यवस्थेत पूर्ण स्पर्धा अस्तित्वात असते असे गृहीत धरले आहे.
4) कल्याणावर होणाऱ्या बाह्य प्रभावांचा विचार झाला नाही.
5) वितरणाचा कल्याणावर काय परिणाम होतो हे लक्षात घेतले नाही.

■ ■ ■



# 2

# उपभोक्त्यांच्या वर्तणुकीचा सिद्धांत

## (Theory of consumer's Behaviour)

**प्रास्ताविक (Intrduction) :**

उपभोक्त्यांच्या वर्तणुकीच्या सिद्धांताचा अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्र या विषयाच्या अभ्यासाची सुरुवात आहे. उपयोगिता मापनासंदर्भात दोन प्रकारचे दृष्टिकोन आहेत. त्यातील एक म्हणजे गणनात्मक किंवा संख्यात्मक दृष्टिकोन आणि दुसरा दृष्टिकोन म्हणजे क्रमवाचक दृष्टिकोन होय.

**उपयोगिता विश्लेषणाचा संख्यात्मक दृष्टिकोन**

**(Cardinal Utility Analysis) :**

सूक्ष्म अर्थशास्त्रात उपयोगितेचे जे सिद्धांत उपयोगिता अंकात मोजता येते त्या गृहितावर आधारित मांडलेले आहेत. त्यांच्या विश्लेषणास संख्यात्मक किंवा गणनात्मक दृष्टिकोन असे म्हणतात या विश्लेषणास मूल्यदर्शी उपयोगिता विश्लेषण असे सुद्धा म्हणतात. डॉ. मार्शल यांनी त्याच्या अर्थशास्त्राची मुलतत्त्वे (Principles fo Economics) 1890 मध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथात सीमांत उपयोगिता विवेचन पद्धतीची स्वीस्तर मांडणी केलेली आहे. या विवेचनानुसार एखाद्या उपभोक्त्याने एखाद्या वस्तुचा उपभोग घेतला तर उपयोगिता आकड्यात मोजता येते.

**उपयोगिता (Utility) :**

उपयोगिता ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. मानवी गरज पूर्ण करण्याच्या वस्तूतील शक्तीला उपयोगिता असे म्हणतात. उपयोगितेचे सामान्यपणे व्यक्तीनुसार, स्थळानुसार वेळेनुसार, काळानुसार इत्यादी प्रकार पडतात. उपयोगितेत प्रामुख्याने पुढील विविध संकल्पना समाविष्ट होतात.

**अ) सीमान्त उपयोगिता :** उपभोगातील शेवटच्या नगापासुन मिळणारी उपयोगिता किंवा उपभोगातील शेवटच्या नगाने एकूण उपयोगितेत टाकलेली भर म्हणते सीमान्त उपयोगिता होय.

**ब) सरासरी उपयोगिता :** एकूण उपभोगलेल्या उपयोगितेल्या उपभोग घेतलेल्या एकूण नगसंख्येने भाग दिला की सरासरी उपयोगिता होय.

**क) एकूण उपयोगिता :** उपभोक्ता एखाद्या वस्तूचे जे नग उपभोगतो त्या सर्व नगापासून मिळालेली उपयोगिता म्हणजे एकूण उपयोगिता होय. किंवा सीमान्त उपयोगितेची बेरीज म्हणजे एकूण उपयोगिता होय.

**एकूण उपयोगिता आणि सीमांत उपयोगिता यातील परस्परसंबंध :**

एकूण उपयोगिता आणि सीमांत उपयोगिता यातील परस्परसंबंध पुढील प्रमाणे स्पष्ट केला आहे.

1) जेव्हा सीमांत उपयोगिता वाढते किंवा ती जोपर्यंत धनात्मक असते तोपर्यंत एकूण उपयोगिता सुद्धा वाढते.
2) जेव्हा सीमांत उपयोगिता शून्य असते. तेव्हा एकूण उपयोगिता सर्वात जास्त असते.
3) जेव्हा सीमांत उपयोगिता ऋणात्मक होवू लागते तेव्हा एकूण उपयोगिता घटु लागते.

**उपयोगिता विश्लेषणाची गृहितके :**

डॉ. मार्शल यांचे उपयोगिता विश्लेषण पुढील गृहीतकावर आधारित आहे.

**1) उपयोगिता आकड्यात मोजता येते :** डॉ. मार्शल याच्या उपयोगिता विश्लेषणातील एक गृहीतक असे आहे की उपयोगिता आकड्यात मोजता येते. उदा. एका व्यक्तीने एखाद्या वस्तुचा उपभोग घेतला तर त्याला मिळणारी उपयोगिता अंकात सांगता येते. अ व्यक्तीने केळीचा उपभोगला तर त्याला 05 मात्र उपयोगिता मिळाली.

**2) प्रत्येक वस्तूपासून मिळणारी उपयोगिता स्वतंत्र असते :** डॉ. मार्शल याच्या मते प्रत्येक वस्तूपासून मिळणारी उपयोगिता स्वतंत्र असते. एकाद्या वस्तुचा उपभोग घेताना इतर वस्तु असो अथवा नसो त्याचा काहीच परिणाम मुळ वस्तुच्या उपयोगितेवर होत नाही.



**3) पैशा पासून मिळणारी सीमांत उपयोगिता स्थिर असते :** डॉ. मार्शल यांनी आपल्या उपयोगिता विश्लेषणात पैशापासून मिळणारी सीमांत उपयोगिता स्थिर गृहीत धरली आहे. या गृहीतकाचा अर्थ असा आहे की एकाद्या व्यक्तीकडे पैशाच्या साठ्यात कितीही वाढ झाली. तर त्या व्यक्तीला पैशापासून मिळणारी सीमांत उपयोगिता कमी होत नाही.

**4) आंतरदृष्टीविषयक विश्लेषण :** डॉ. मार्शल यानी आंतरदृष्टीविषयक विश्लेषणाचा वापर केला आहे. या गृहीतकाचा अर्थ असा आहे. निरीक्षण करणारा व्यक्ती स्वानुभवावरून दुसऱ्याच्या मनातील काही अंदाज बांधतो. निरीक्षण करणारा आपली जी मानसिक स्थिती आहे ती समोरच्या व्यक्तीची गृहीत धरतो.

**5) घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम गृहीत धरला आहे :** डॉ. मार्शल यांनी आपल्या उपयोगिता विश्लेषणात घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम गृहीत धरला आहे. या गृहीतकाचा अर्थ असा आहे की एखाद्या वस्तुच्या साठ्यात वाढ झाली तर त्या व्यक्तीला वस्तुच्या साठ्यात होणाऱ्या वाढीबरोबर मिळणारी सीमांत उपयोगिता उत्तरोत्तर कमी कमी होत जाते.

वरील गृहितकांला अनुसरून डॉ. मार्शल यांनी उपयोगिता विश्लेषणाची मांडणी पुढीलप्रमाणे केलेली आहे.

**घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत**

**(Law of Diminishing Marginal Utility) :**

डॉ. मार्शल यांनी उपयोगिता विश्लेषणात दोन सिद्धांताची मांडणी केलेली आहे. एक म्हणजे घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत आणि दुसरे म्हणजे समसीमांत उपयोगितेचा सिद्धांत होय. घटत्या सीमांत उपयोगिता सिद्धांताची ओळख फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ **हरमैन हैनरिक गॉसेन** यानी करून दिलेली होती. म्हणून या सिद्धांताला गॉसेनचा पहिला नियम असे देखील म्हणतात. घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम कार्यान्वित होण्याच कारणे पुढील दोन आहेत.

1) मनुष्याच्या गरजा अमर्याद आहेत. तरी त्या पूर्ण करता येतात.
2) वस्तु एकमेकांना पूर्ण पर्यायी नसतात म्हणजे प्रत्यक्षात वस्तु ह्या एकमेकांना अपूर्ण पर्यायी असतात.

**घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताचा नियम :**

''इतर परिस्थिती कायम असता एखाद्या व्यक्तीजवळ असलेल्या वस्तुचा साठा वाढत गेल्यास वस्तुच्या साठ्यात उत्तरोत्तर होणाऱ्या वाढीबरोबर त्या व्यक्तीस वस्तुच्या उपभोगापासून मिळणारी अतिरिक्त उपयोगिता कमी होत जाते.''

"Other things remaining constant the additional benefit which a person derives form a given in crease of his stock of a thing diminishes with every increase in the stock that he already has"

हे विश्लेषण खालील उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण केलेले आहे.

**तक्ता क्रमांक 2.1**

| वस्तुचे नग | एकूण उपयोगिता | सीमांत उपयोगिता |
|---|---|---|
| 1 | 15 | 15 |
| 2 | 20 | 05 |
| 3 | 22 | 02 |
| 4 | 22 | 0 |
| 5 | 17 | -5 |
| 6 | 14 | -8 |
| 7 | 12 | -10 |

वरील तक्ता क्रमांक 2.1 द्वारे हे स्पष्ट होते की उपभोक्त्याने 1 नग उपभोगला तर त्याला 15 मात्रा उपयोगिता मिळते. यावेळी सीमांत उपयोगिता 15 मात्र आहे व एकूण उपयोगिता देखील 15 मात्रा आहे. जर उपभोक्त्याचे दुसरा नग उपभोगला तर सीमांत उपयोगिता 5 मात्र मिळते. यावेळी एकूण उपयोगिता 20 मात्र एवढी आहे. जर उपभोक्त्याने तिसरा नग उपभोगला तर सीमांत उपयोगिता 2 मात्रा प्राप्त होते. त्यावेळी एकुण उपयोगिता 22 मात्रा एवढी आहे. जर याही पुढे जाऊन उपभोक्त्याने चौथा नग उपभोगला तर उपभोक्त्याला शून्य मात्रा सीमांत उपयोगिता प्राप्त होते यावेळी एकूण उपयोगिता 22 मात्रा एवढी आहे. याही पुढे जावून उपभोक्त्याने पाचवा नग उपभोगला तर सीमांत उपयोगिता ऋण किवा उणे पाच मात्र होते. यावेळी एकूण उपयोगितेत घट होवून ती सतरा मात्रा एवढी होते. जर उपभोक्त्याने सहावा नग



उपभोगला तर सीमांत उपयोगिता ऋण किंवा उणे आठ मात्रा होते. त्यावेळी एकूण उपयोगिता कमी होवून ती चौदा मात्रा एवढी होते. याही पुढे जावून उपभोक्त्याने सातवा नग उपभोक्त्याचा प्रयत्न केला तर सीमांत उपयोगिता ऋण किंवा (उणे) दहा मात्र होते व एकूण उपयोगिता बारा मात्रा एवढी होते.




**वस्तूचे नग**

सोबतच्या आकृतीत OX अक्षावर वस्तुचे नग तर OY अक्षावर उपयोगिता (धन उपयोगिता) तर $OY^1$ अक्षावर उपयोगिता (ऋण उपयोगिता) मोजलेली आहे. आकृतीत TU हा Total utility curve एकूण उपयोगिता वक्र तर MU हा Marginal utility curve दाखवलेला आहे. आकृतीत OM एवढे नग उपभोगात असेपर्यंत TU ह्या वक्रावर B बिंदुच्या ठिकाणी एकूण उपयोगिता सर्वात जास्त आहे. तर यावेळी MU ह्या वक्रावर M बिंदुच्या ठिकाणी सीमांत उपयोगिता शून्य होते त्यावेळी उपभोक्त्याचे पूर्ण

समाधान प्राप्त होते. M बिंदुपासून MU वक्राचा पुढील भाग ऋणात्मक उपयोगिता दर्शवितो. त्यावेळी TU हा वक्र OX अक्षाकडे वळताना दिसुन येतो त्यावेळी एकूण उपयोगितेत घट होते.

हा सिद्धांत गृहीतकावर आधारित आहे. घटत्या सीमांत उपयोगिता सिद्धांताची गृहीतके ते पुढील प्रमाणे आहेत.

**1) उपभोग वस्तुचे प्रमाण योग्य असावे :** घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत अनुभवाला येण्यासाठी उपभोग वस्तूचे प्रमाण योग्य असावे. नगाचा आकार प्रमाणशील असावा. उदा. एखाद्या भाकरीचे शंभर तुकडे केले व उपभोक्त्याला उपभोग्यासाठी एक एक तुकडा दिला तर उपयोगिता वाढत राहील हा नियम अनुभवाला येणार नाही.

**2) दोन वस्तुच्या उपभोगातील अंतर :** जर दोन वस्तुच्या दोन नगसंख्येत बरेच अंतर असेल तर सीमांत उपयोगिता कमी होणार नाही. उदा. एक केळी सकाळी, दुसरी दुपारी तिसरी सायंकाळी खाली तर सीमांत उपयोगिता कमी होणार नाही.

**3) उपभोग वस्तुची किंमत स्थिर असावी :** वस्तुच्या किंमतीत वाढ झाल्यास अथवा घट झाल्यास सीमांत उपयोगितेत फरक पडेल सुरूवातीचे नग महाग व नंतरचे नग स्वस्त असेल तर नंतरच्या नगाची उपयोगिता जास्त असेल.

**4) उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर असावे :** उपभोक्त्याच्या उत्पन्नात वाढ किंवा घट झाली तर उपभोक्त्याचा समोरच्या वस्तुकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो त्यामुळे हा सिद्धांत अनुभवाला येण्यासाठी उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर असावे.

**5) पर्यायी पुरक वस्तुच्या किंमती स्थिर असाव्यात :** घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत अनुभवाला येण्यासाठी पर्यायी वस्तुच्या किंमती स्थिर असाव्यात अन्यथा उपभोक्ता त्या वस्तुकडे आकर्षित होईल.

**6) उपभाक्त्याच्या सवयी, आवडी–निवडी स्थिर असाव्यात :** घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत अनुभवाला येण्यासाठी उपभोक्त्याच्या सवयी, चालीरीती, फॅशन यात बदल होता कामा नये. अन्यथा हा सिद्धांत अनुभवाला येणार नाही.



**7) उपभोक्त्याची मानसिक स्थिती स्थिर असावी :** विश्लेषण काळात उपभोक्त्याचे मानसिक संतुलन टिकून रहावे त्याचे मानसिक स्वास्थ बिघडले तर हा नियम अनुभवाला येणार नाही.

वरील विविध गृहीतकावर घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत आधारित आहे.

**अपवाद :**

**1) पैशा :**

पैसा ही बाब घटत्या सिमांत उपयोगितेच्या सिद्धांताला अपवाद सांगितली जातो. एकाद्या व्यक्तीकडे असणाऱ्या पैशाच्या साठ्यात कितीही वाढ झाली तर त्या पैशाच्या साठ्यात होणाऱ्या वाढीबरोबर त्या व्यक्तीला पैशापासून मिळणारी सीमांत उपयोगिता कमी होते पण पैशापासून मिळणारी सीमांत उपयोगिता शून्य होत नाही. पैशापासून प्राप्त होणारी सीमांत उपयोगिता शून्य होणे म्हणजे पैशा नको म्हणणे होय. पण पैशा नको असे कुन्हीही म्हणणार नाही. पैशा हा घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताला अपवाद सांगितला जातो.

**2) दारू किंवा मादक वस्तु :**

दारू, नशेला वस्तु, अंमलीपदार्थ हे घटत्या सिमांत उपयोगितेच्या सिद्धांताला अपवाद सांगितले जातात. पण दारू पिल्यानंतर उपभोक्त्याच्या मानसिक स्थितीत बदल होतो. त्यामुळे दारू पिणाऱ्या व्यक्तीला नंतरच्या नगापासून कमी किंवा जास्त उपयोगिता मिळाली हे समजतच नाही. म्हणून दारू किंवा मादक वस्तूचा अपवाद हा संयुक्तिक वाटत नाही.

**3) दुर्मिळ वस्तु संगीत काव्य :**

दुर्मिळ वस्तु संगीत काव्य हे घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताला अपवाद समजला जातो; पण दुर्मिळ वस्तु गुणात्मकदृष्ट्या भिन्न असतात व एकच गीत एकच संगीत किती वेळा ऐकणार ह्याला मर्यादा आहेतच. हा ही अपवाद संयुक्तिक वाटत नाही.

**घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताचे महत्त्व :**

घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत अर्थव्यवस्थेत पुढील विविध क्षेत्रात महत्त्वपूर्ण मार्गदर्शक ठरतो.

**1) कर लावताना :** अर्थव्यवस्थेत सरकार विविध कर लावते हे कर लावताना ज्याना पैशाची सीमांत उपयोगिता खुप कमी आहे. (श्रीमंत उपभोक्ताच्या वर्ग) त्यावर जादा कर आकारणी करण्यासाठी व पैशाची सीमांत उपयोगिता खुप जास्त आहे. (गरीब उपभोक्त्याचा वर्ग) त्यावर कमी कर आकारणी करण्यासाठी हा सिद्धांत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करतो.

**2) ऋणात्मक उताराचा मागणीवक्र का आहे ह्याचे स्पष्टीकरण मिळते :** मागणी वक्राचा उतार ऋणात्मक का असतो तो वरून खाली का येतो. (OY अक्षाकडून OX अक्षाकडे वळणारा) तर त्याचे कारण असे की वस्तुच्या नगात वाढ झाली असता सीमांत उपयोगिता कमी होत जाते त्यामुळे कमी किंमतीलाच उपभोक्ता जास्त नग खरेदी करतो.

**3) उत्पादनाच्या क्षेत्रात :** उत्पादनाच्या क्षेत्रात हा सिद्धांत मार्गदर्शन ठरतो. वस्तुचा पुरवठा व वस्तुची उपयोगिता व वस्तुची किंमत यातील संबंध स्पष्ट करताना वस्तुचा पुरवठा वाढला तर वस्तुची उपयोगिता कमी व उपयोगिता कमी म्हणून मागणी कमी तर याउलट वस्तूचा पुरवठा कमी तर वस्तुची उपयोगिता जास्त म्हणून किंमत जास्त व विक्रेत्यांना नफा जास्त म्हणून उत्पादनाचा क्षेत्रात हा सिद्धांत मार्गदर्शक ठरतो.

**4) सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताचे स्पष्टीकरण देतो :** घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत समसीमांत उपयोगितेच्या सिद्धांताचे स्पष्टीकरण देतो कारण समसीमांत उपयोगितेच्या सिद्धांताप्रमाणे उपभोक्त्याने आपली खरेदी अशा पद्धतीने करावी की प्रत्येक उपभोगापासून मिळणारी सीमांत उपयोगिता सारखी राहील.

थोडक्यात वरील विविध दृष्टीने घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत महत्त्वाचा आहे.

**सम सीमांत उपयोगितेचा नियम (Low of Eaual Marginal Utility) :**

समसीमांत उपयोगिता सिद्धांताची पूर्व ओळख हरमैन, हैनरिक गॉसेन ह्या फ्रेंच अर्थशास्त्राने करून दिलेली होती. म्हणून या सिद्धांताला गॉसेनचा दुसरा नियम असे म्हणतात. प्रत्येक उपभोक्त्याचा उद्देश जास्तीत जास्त समाधान प्राप्त करणे हा असतो. अशा अवस्थेत उपभोक्ता मर्यादित उत्पन्नात हे कसे साध्य करतो हे या नियमात स्पष्ट केलेले आहे.



डॉ. मार्शल यानी मांडलेला समसीमांत उपयोगितेचा नियम ही संकल्पना उपभोक्त्याचे संतुलन याही अर्थाने वापरली जाते. या नियमाला समसीमांत प्रतिफलाचा नियम (Law of Equimarginal Retorns) तसेच प्रतिस्थापन नियम (Law of Substitotion) महत्तम समाधानाचा नियम (Law of maximum satisfaction) तट स्थतेचा नियम (Law of indifference) अशा विविध नावाने ओळखला जातो. हा नियम मार्शलच्या शब्दात पुढीलप्रमाणे-

**डॉ. मार्शलच्या मते :** ''जर एखाद्या व्यक्तीजवळ अशी एखादी वस्तू आहे की, जिचा उपयोग ती व्यक्ती निरनिराळ्या प्रकारे करू शकते तर अशा स्थितीत ती व्यक्ती त्या वस्तूची निरनिराळ्या उपयोगात अशी वाटणी करील की, त्यावस्तुची सीमांत उपयोगिता सर्व उपयोगांमध्ये समान राहील.''

(If a person has a thing which he can put to several uses, he will distribute it among those uses in such a way that it way that ithas the same marginal utility)

**स्टीगलर :** ''उपभोक्त्याने आपली खरेदी अशाप्रकारे करावी की ज्यामुळे त्याने खरेदी केलेल्या सर्व वस्तूपासून मिळणारी सीमांत उपयोगिता सारखी असेल. हा नियम खालील उदाहरणाद्वारे स्पष्ट केलेला आहे.

**उदाहरण :** समजा उपभोक्त्याचे उत्पन्न 10 रू आहे. तो X, Y, Z या वस्तुची खरेदी करतो. या वस्तुच्या किंमती अनुक्रमे 1, 2, 3 रूपये अशा आहेत. अशा परिस्थितीत संतुलन अवस्थेत उपभोक्ता X वस्तुचे 3 नग Y वस्तुचे 2 नग, Z वस्तुचा 1 नग खरेदी करत असेल तर उपभोक्त्याचा खर्च पुढीलप्रमाणे असेल.

$x$ ची किंमत $x$ वस्तुची नगसंख्या = $x$ वस्तुवर होणारा एकूण खर्च
$y$ ची किंमत $y$ वस्तुची नगसंख्या = $y$ वस्तुवर होणारा एकूण खर्च
$z$ ची किंमत $z$ वस्तुची नगसंख्या = $z$ वस्तुवर होणारा एकूण खर्च

| | **किंमत** | **नगसंख्या** | **खर्च** |
|---|---|---|---|
| $x$ वस्तुवर होणारा खर्च | 1 X | 3 | = 3 |
| $y$ वस्तुवर होणारा खर्च | 2 X | 2 | = 4 |
| $z$ वस्तुवर होणारा खर्च | 3 X | 1 | = 3 |
| | | **एकूण खर्च** | 10 |

समजा उपभाक्त्याला $x$ वस्तुपासून 3, y वस्तुपासून 6 व z वस्तुपासून 9 मात्रा उपयोगिता मिळते तर समसीमांत उपयोगिताप्रमाणे सर्व उपयोगात सारखी उपयोगिता प्राप्त होते. काय हे पुढील सुत्राद्वारे पडताळता येते.

$$\frac{mux}{P_X} = \frac{muy}{P_Y} = \frac{muz}{P_Z} \ldots\ldots\ldots\ldots \frac{mun}{P_n}$$

$= \frac{3}{1} = \frac{6}{2} = \frac{9}{3} = 3 = 3 = 3$ सर्व वस्तूपासून मिळणारी सीमांत उपयोगिता सारखा आहे.

**समसीमांत उपयोगिता सिद्धांताचे महत्त्व :**

1) या सिद्धांताप्रमाणे उपभोक्त्याला किंमती एवढीच वस्तूपासून सीमांत उपयोगिता प्राप्त होते.

2) सर्व उपयोगातून सारखी सीमांत उपयोगिता प्राप्त होते म्हणून समसीमांत उपयोगिता असे म्हणतात.

3) समसीमांत उपयोगितेच्या सिद्धांताप्रमाणे खरेदी केल्यास उपभोक्त्याला महत्तम समाधान प्राप्त होते.

4) एकाद्या वस्तूची किंमत वाढली (व सीमांत उपयोगिता स्थिर असता) संतुलन अवस्था साध्य होत नाही. किंमत वाढलेल्या वस्तुचे कमी नग खरेदी केले जातात.

5) या सिद्धांताला पर्यायतेचा सिद्धांत असेही म्हणतात. कारण महत्तम समाधान प्राप्त करण्यासाठी उपभोक्ता कमी उपयोगिता मिळवून देणाऱ्या वस्तूऐवजी अधिक उपयोगिता मिळवून देणाऱ्या वस्तूची खरेदी करतो.

6) उपभोक्त्याने आपल्या उत्पन्नाचे विभाजन योग्य केलेले असते. त्यामुळेच उपभोक्त्याला महत्तम समाधान मिळते. म्हणून या सिद्धांताला 'महत्तम समाधानाचा सिद्धांत' असे म्हणतात.

**समसीमांत उपयोगितेच्या सिद्धांताची गृहीतके :**

समसिमांत उपयोगितेचा सिद्धांत खालील बाबी गृहीत धरतो.

1) उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर गृहीत धरले असून म्हणजे उपभोक्त्याच्या उत्पन्नात वाढ अथवा घट होत नाही.



2) महत्तम समाधान किंवा जास्तीत जास्त समाधान प्राप्त करणे हा उपभोक्त्याचा उद्देश आहे.

3) उपभोक्ता विवेकशील आहे असे गृहीत धरले आहे.

4) उपयोगिता पैशात मोजता येते.

5) वस्तुच्या किंमती माहित असतात.

**डॉ. मार्शल ह्याच्या उपयोगिता विश्लेषणाद्वारे मागणी नियमाची सिद्धता :**

डॉ. मार्शल यांनी आपल्या उपयोगिता विश्लेषणात दोन सिद्धांत प्रामुख्याने मांडलेले आहेत. त्यातील एक म्हणजे घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत व दुसरा म्हणजे सम सीमांत उपयोगितेचा सिद्धांत होय. डॉ. मार्शल यानी मांडलेल्या उपयोगिता विश्लेषणाच्या आधारे मागणी नियमाची सिद्धता केलेली आहे. मागणी नियमाआधारे इतर परिस्थिती स्थिर असताना वस्तुची किंमत वाढली की त्या वस्तुला असलेली मागणी कमी होते. याउलट त्या वस्तूची किंमत कमी झाली. की त्या वस्तूला असलेली मागणी वाढते. या मागणीच्या नियमाची सिद्धता डॉ. मार्शल यानी पुढीलप्रमाणे केलेली आहे.

**उपभोक्ता संतुलन अवस्थेत असताना वस्तुची किंमत वाढली तर :**

उपभोक्ता संतुलन अवस्थेत असताना व उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर व मर्यादीत असताना जर वस्तुच्या किंमतीत वाढ झाली तर उपभोक्ता मागणी नियमाप्रमाणे किंमत वाढल्यामुळे वस्तूचे कमी नग खरेदी करतो. घटत्या सिमांत उपयोगितेच्या सिद्धांताप्रमाणे उपभोक्त्याने वस्तुचे नग कमी खरेदी केले तर वस्तुची सिमांत उपयोगिता वाढेल. हे विश्लेषण खालील उदाहरणाद्वारे स्पष्ट केलेले आहे.

**उदाहरणार्थ :** समजा X,Y व Z यातीन वस्तुच्या किंमती अनुक्रमे 1 रू. 2 रू व 3 रू अशा आहेत व व त्या वस्तूपासून उपभोक्त्याला अनुक्रमे सिमांत उपयोगिता 3 मात्रा, 6 मात्रा 9 मात्रा अशी आहे. व उपभोक्ता अनुक्रमे X वस्तुचे 3 नग, Y वस्तुचे 2 नग व Z वस्तुचा 1 नग खरेदी करतो. समजा उपभोक्त्याचा संतुलन अवस्थेत बदल झाला Y वस्तुची किंमत 2 रू वरून 4 रू. झाली तर उपभोक्त्याला खर्च 3+8+3=14 रू. होईल. पण उपभोक्त्याचे उत्पन्न 10 रू आहे. अशा स्थितीत उपभोक्ता संतुलन अवस्थेत असताना उपभोक्ता Y वस्तुची किंमत वाढल्यामुळे 2 ऐवजी 1 नग खरेदी करेल. घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताप्रमाणे उपयोगिता 6 मात्रापासून 12 मात्रापर्यंत

वाढेल. Y वस्तुची किंमत वाढल्यामुळे उपभोक्त्याची संतुलन अवस्था पुढीलप्रमाणे असेल.

| | किंमत | नगसंख्या | खर्च |
|---|---|---|---|
| $x$ वस्तुवर होणारा खर्च | 1 | 3 | 3 |
| $y$ वस्तुवर होणारा खर्च | 4 | 1 | 4 |
| $z$ वस्तुवर होणारा खर्च | 3 | 1 | 3 |
| | | एकूण खर्च | 10 |

समजा उपभोक्त्याला X वस्तूपासून 3, Y वस्तुपासून 12, व Z वस्तुपासून 9 मात्रा उपयोगिता मिळते. तर सम सीमांत उपयोगिताप्रमाणे सर्व उपयोगिता सारखी उपयोगिता प्राप्त होते काय हे पुढील उदाहरणाद्वारे स्पष्ट केलेले आहे.

$$\frac{mux}{P_X} = \frac{muy}{P_Y} = \frac{muz}{P_Z} \ldots\ldots\ldots\ldots\ldots \frac{mun}{P_n}$$

$$= \frac{3 \text{ मात्रा}}{1 \text{ रु.}} = \frac{12 \text{ मात्रा}}{4 \text{ रु.}} = \frac{9 \text{ मात्रा}}{3 \text{ रु.}} = 3 = 3 = 3$$ सर्व वस्तुपासून मिळणारी सीमांत उपयोगिता सारखी आहे. अशाप्रकारे उपयोगिता विश्लेषणाची सिद्धता केलेली आहे.

**डॉ. मार्शल याच्या उपयोगिता विश्लेषणातील दोष :**

डॉ. मार्शल यांनी मांडलेल्या उपयोगिता विश्लेषणात काही दोष आहेत. किंवा या विश्लेषणावर काही टिका केल्या जातात. मार्शल याच्या उपयोगिता विश्लेषणाच्या आधारे उत्पन्न परिणाम, पर्यायता परिणाम, किंमत परिणाम स्पष्ट करता येत नाही. पुरक व अविभाज्य वस्तु संदर्भात मार्शलचा समसीमांत उपयोगिता नियम नाही. समसीमांत उपयोगिता सिद्धांत गिफेनच्या विरोधाभासाचे ही स्पष्टीकरण करत नाही. असे असले तरी प्रो. डाल्टन याचा महत्तम सामाजिक तुलनाचे तत्त्व समसीमांत उपयोगिता नियमावर आधारित आहे. तसेच या उपयोगिता विश्लेषणाच्या आधारे मागणीवक्र देखील काढता येतो. या विश्लेषणाच्या मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत.

**1) उपयोगितेचे संख्यात्मक पद्धतीने मापन केलेले आहे :** डॉ. मार्शल यानी उपयोगितेचे संख्यात्मक पद्धतीने मापन केलेले आहे. पण उपयोगिता ही एक मनोनिष्ठ संकल्पना आहे. पण उपयोगिता ही मनोनिष्ठ किंवा मानसिक



संकल्पना आहे. तिचे आकड्यात मोजमाप करता येत नाही. हा उपयोगिता विश्लेषणाचा दोष आहे.

**2) पैशाच्या साह्याने उपयोगितेचे मापन केलेले आहे :** डॉ. मार्शल यांनी पैशाच्या साह्याने उपयोगितेचे मापन केलेले असून पैशा हे उपयोगिता मोजण्याचे आदर्श एकक होवू शकत नाही. कारण पैशाचे मूल्य वारवांर बदलते. अशा अस्थिर मुल्य असणाऱ्या साधनाने उपयोगिता मोजणे अवघड आहे.

**3) पैशा पासून मिळणारी सीमांत उपयोगिता स्थिर गृहीत धरली आहे :** पैशापासून मिळणारी सीमांत उपयोगिता स्थिर नसते. व्यक्ती जवळ असणाऱ्या पैशाच्या साठ्यात जशजशी वाढ होत जाईल तशतशी पैशापासून मिळणारी सीमांत उपयोगिता कमी-कमी होत जाते. थोडक्यात पैशापासून मिळणारी सीमांत स्थिर नसते.

**4) उपभोक्ता विवेकशील असतो असे गृहीत धरले आहे :** डॉ.मार्शल यांनी उपभोक्ता विवेकशील म्हणजे विचारपूर्वक खर्च करणारा असतो. सारासार विचार करणारा असतो असे गृहीत धरले आहे. पण उपभोक्ता भावनेला सुद्धा महत्त्व देतो.

**5) गिफेन वस्तु किंवा हलक्या दर्जाच्या वस्तुचे स्पष्टीकरण नाही :** गिकेन वस्तु किंवा हलक्या दर्जाच्या वस्तुच्या किंमती कमी झाल्या की मागणी का वाढत नाही किंवा अशा वस्तुच्या संदर्भात उत्पन्न परिणाम ऋणात्मक उताराचा का असतो याचे स्पष्टीकरण मार्शलचे उपयोगिता विश्लेषण करत नाही.

**6) विविध परिणाम विचारात घेतले नाही :** या विश्लेषणात उत्पन्नपरिणाम, पर्यायता परिणाम व किंमत परिणाम यामुळे मागणीवर काय परिणाम होतो याचे विश्लेषण केलेले नाही.

**7) अविभाज्य व पूरक वस्तूचे स्पष्टीकरण नाही :** डॉ. मार्शल याच्या विश्लेषणात पूरक वस्तूचे व बोल्डिंग याच्या मते अविभाज्य वस्तुसाठी समसीमांत उपयोगिता नियम लागू नाही.

वरील विविध प्रकारचे दोष या विश्लेषणात असले तरी उपयोगिता विश्लेषणाची सर्वप्रथम मांडणी करणारे श्रेय डॉ. मार्शल याना जाते. पुढे अनेक उपयोगिता सिद्धांताची मांडणी व त्यातून मागणीनियमाची सिद्धता करण्याचा अनेक अर्थशास्त्रज्ञानी प्रयत्न केलेला आहे. यातच या सिद्धांताचे महत्त्व आहे.

■ ■ ■

# 3

# तटस्थता वक्र विश्लेषण किंवा समवृत्ती वक्र तंत्र दृष्टिकोन
## (Indifference Curve Approach)

**प्रास्ताविक (Intrduction) :**

डॉ. मार्शल यांच्या उपयोगिता विश्लेषणात अनेक उणिवा आहेत किंवा दोष आहेत. ते दोष कर करण्यासाठी अर्थशास्त्रात तटस्थता वक्र किंवा समवृत्ती वक्राची संकल्पना मांडली गेलेली आहे. सुरुवातीला ही संकल्पना एजवर्थ (1881), त्यानंतर पॅरेटो, प्रो. स्लस्टकी यांनी ही संकल्पना मांडली. या संकल्पनेची विस्तृत मांडणी 1939 मध्ये Valve and capital (मुल्य आणि भांडवल) हिक्स यानी या ग्रंथात मांडली. हे विश्लेषण खालील गृहीतकावर आधारित आहे.

**उपयोगिता विश्लेषणाचा क्रमवाचक दृष्टिकोन :**

उपयोगिता विश्लेषणाचा क्रमवाचक दृष्टिकोन म्हणजे प्रत्येक वस्तु, वस्तुंच्या समुहापासून मिळणारे समाधान किंवा उपयोगिता माहित नसते. पण भिन्न वस्तु भिन्न वस्तुसमूह व स्थितीची तुलना करून एक स्थिती दुसरीपेक्षा अधिक चांगली किंवा दुसरीएवढीच चांगली आहे. हे सांगता येते. वस्तु किंवा वस्तु समुहाची निवड करण्यासाठी केवळ तुलना करणे आवश्यक आहे.

**समवृत्ती वक्र विश्लेषणाची गृहितके :**

**1) उपभोक्ता दोन वस्तुचा उपभोग घेतो :**

डॉ. मार्शल यांनी उपयोगिता विश्लेषण एक मितीय पद्धतीने (उपभोक्ता एकाच वस्तुचा उपयोग घेतो.) केलेले आहे. समवृत्ती वक्र तंत्र विश्लेषणात हिक्स आणि ॲलन यांनी उपभोक्ता दोन वस्तुचा उपभोग घेतो आहे. असे गृहीत धरलेले आहे.



**2) विश्लेषण काळात उपभोक्त्याच्या आवडी-निवडी स्थिर गृहीत धरलेल्या आहेत. :**

हिक्स आणि ॲलन यांनी विश्लेषण काळात उपभोक्त्याच्या आवडी-निवडी स्थिर गृहीत धरलेल्या आहेत. आवडी-निवडी स्थिर नसतील तर समवृत्ती वक्र तंत्र विश्लेषणाची मांडणी करणे किलष्ट होईल.

**3) घटता सीमांत पर्यायता दर :**

समवृत्ती वक्राची संकल्पना घटत्या सीमांत पर्यायता दरावर आधारित आहे. X वस्तुच्या एका नगाचा त्याग केला तर Y वस्तुचे किती नग प्राप्त होतील तो दर होय. उपभोगातील एका वस्तुच्या नगात सतत वाढ केली असता दुसऱ्या उपभोग्य वस्तुच्या नगात होणाऱ्या घटीचा दर सातत्याने घटतो तेव्हा त्यास घटता सीमान्त पर्यायता दर म्हणतात हा दर घटता असतो कारण की वस्तुच्या नगात होणाऱ्या वाढीबरोबर त्या वस्तूपासून मिळणारी सीमान्त उपयोगिता घटती असते अशा घटत्या उपयोगितेसाठी दुसऱ्या वस्तुच्या रूपाने उपभोक्ता घटता त्याग करावयास तयार असतो. या संकल्पनेवर समवृत्ती वक्राची संकल्पना आधारित आहे.

**4) पंसती श्रेणी :**

समवृत्ती वक्राची संकल्पना पंसती श्रेणीच्या गृहीतकावर आधारित आहे. पंसती श्रेणीनुसार वस्तूंचे निरनिराळे समूह तयार केलेले असतात. या सर्व समुहापासून उपभोक्त्याला सारखेच समाधान प्राप्त होते. यातील एक समुह उपभोक्ता निवडतो पण सर्व समुहाकडे उपभोक्त्याचा पाहण्याचा दृष्टिकोन सारखाच असतो.

**5) उपयोगितेचे क्रमवाचक पद्धतीने मापन :**

उपयोगितेचे क्रमवाचक पद्धतीने मापन केलेले आहे म्हणजे उपयोगिता आकड्यात मोजता येत नाही तर भिन्न वस्तु भिन्न वस्तुसमूह व स्थितीची तुलना करून एक स्थिती दुसरीपेक्षा अधिक चांगली की दुसरी एवढीच चांगली आहे हे सांगता येते. वस्तु किंवा वस्तु समुहाची निवड करण्यासाठी केवळ तुलना करणे आवश्यक आहे.

**६) उपभोक्ता विवेकशील असतो :**

समवृत्ती वक्र तंत्र संकल्पनेत उपभोक्त्याची वर्तणूक ही विवेकशील

आहे असे गृहित धरले आहे. विवेकशील उपभोक्ता सारासार विचार करतो. तो वस्तुची किंमत व सीमांत उपयोगिता याची तुलना करतो त्याची वर्तणूक बुद्धिनिष्ठ व तर्कसंगत असते.

**7) उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर असते :**

समवृत्ती वक्राच्या संकल्पनेत उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर असते. त्यात बदल होत नाही असे गृहीत धरलेले आहे.

**8) दुर्बल क्रमवारिता व सुसंगता :** समवृत्ती वकाची संकल्पना दुर्बल क्रमवारिता व सुसंगता या गृहीतकावर आधारित आहे.

वरील विविध गृहीतकावर ही संकल्पना आधारित आहे.

**समवृत्ती वक्राचे उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण :**

समवृत्ती वक्र संकल्पनेत उपभोक्ता दोन वस्तूंचा उपभोग घेतो आहे असे गृहीत धरलेले आहे. दोन विभिन्न वस्तुचे गट उपलब्ध (तयार केलेले) असतात. सर्व गटाना सारखीच पसंती असते. उपभोक्ता आपल्या मर्यादित उत्पन्नात एक समुह खरेदी केलेला असतो; पण सर्व संयोगाकडे उपभोक्ता समान दृष्टीने पाहतो म्हणून त्याला समवृत्ती वक्र असे म्हणतात. किंवा सर्व समुहाकडे उपभोक्ता तटस्थत दृष्टीने पाहतो म्हणून याला तटस्थता वक्र असे म्हणतात. किंवा या संयोगात फरक करू शकत नाही म्हणून याला (Indiffernce) असे म्हणतात. हे विश्लेषण खालील तालीकेद्वारे स्पष्ट केलेले आहे.

**तक्ता क्रमांक 2.2**

**समवृत्ती वक्रांचे उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण**

| **समुह** | X **वस्तुचे नग** | Y **वस्तुचे नग** |
|---|---|---|
| A | 3 | 20 |
| B | 4 | 15 |
| C | 5 | 11 |
| D | 6 | 08 |

वरील तक्ता क्रमांक 2.2 द्वारे समवृत्ती वक्राचे उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण केलेले आहे. A या समुहापाशी उपभोक्ता X वस्तुचे 3 नग तर Y वस्तुचे 20 नग, तर B या संयोगापाशी उपभोक्ता X वस्तुचे 4 नग, तर Y वस्तुचे 15 नग, Va C या संयोगाशी उपभोक्ता X वस्तुचे 5 नग, तर Y वस्तुचे 11 नग, तर



D या संयोगाशी X वस्तुचे 6 नग, तर Y वस्तुचे 08 नग खरेदी करतो. X वस्तुच्या नगसंख्येत वाढ होताना Y वस्तुच्या नगसंख्येत घट होते. A, B, C, D या समुहापासून उपभोक्त्याला समान समाधान प्राप्त होते. हे विश्लेषण खालील आकृतीद्वारे स्पष्ट केलेले आहे.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू दर्शविलेली आहे. A या समुहापाशी X वस्तूचे 03 नग तर Y वस्तूचे 20 नग, B या समुहापाशी X वस्तुचे 04 नग तर Y वस्तुचे 15 नग तर C या समुहापाशी X वस्तूचे 05 नगर तर Y वस्तूचे 11 नग व D या समुहापाशी X वस्तूचे 06 नग तर Y वस्तुचे 08 नग असे A, B, C, D समुह आहेत. या सर्व समुहापासून उपभोक्त्याला समान समाधान प्राप्त होते. किंवा या सर्व समुहाकडे उपभोक्ता तटस्थत दृष्टीने पाहतो.

**समवृत्ती वक्राचा नकाशा :**

समवृत्ती वक्राची संकल्पनेची मांडणी करत असताना उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर आहे असे गृहीत धरलेले आहे. पण उपभोक्त्याच्या उत्पन्नात वाढ

झाली की उपभोक्ता दोन्ही वस्तूचे पूर्वीपेक्षा जास्त नग खरेदी करतो. हे जेव्हा समवृत्ती वक्राच्या आधारे दाखविलेले असते. तेव्हा समवृत्ती वक्र मुळ समवृत्ती वक्राच्या उजव्या बाजुला सरकतो. म्हणजे डाव्या बाजुला असणाऱ्या समवृत्ती वक्राच्या आकृतीपेक्षा उजव्या बाजुला असणारी समवृत्ती वक्राची आकृती जास्त समाधान दर्शविते 'O' या मुळआरंभापासून दुर दुर जाणारे समवृत्तीवक्र जास्तीचे समाधान दर्शवितात. हे विश्लेषण खालील आकृतीद्वारे स्पष्ट केलेले आहे.




सोबतच्या आकृतीत $IC_1$, $IC_2$, $IC_3$ व $IC_4$ हे विविध तटस्थता वक्र दर्शविलेले आहेत. जसजसे समवृत्तीवक्र मुळाआरंभापासून दुर-दुर जातात तशी-तशी उपभोक्त्याच्या समाधानाच्या पातळीवर वाढ होते.

**घटता सीमांत पर्यायता दर (Marginal Rate of Substitution) :**

उपभोगातील एका वस्तुच्या नगात वाढ होताना दुसऱ्या वस्तुच्या नगात होणाऱ्या घटीच्या प्रमाणास सीमांत पर्यायता दर म्हणतात. समवृत्ती वक्राची संकल्पना ही घटत्या सीमांत पर्यायता दराच्या संकल्पनेवर आधारित आहे.



घटत्या सीमांत पर्यायता दराच्या संकल्पनेआधारे मागणी नियमाचे स्पष्टीकरण करता येते. प्रो. मेअर्सच्या मते X वस्तुच्या एका नगाचा त्याग केल्यानंतर Y वस्तूचे किती नग प्राप्त होतील त्याला घटत्या सीमांत पर्यायता दर म्हणतात.

$$\text{घटता सीमांत प्रतिस्थापन दर} = \frac{\text{Y वस्तूच्या नगसंख्येतील बदल}}{\text{X वस्तूच्या नगसंख्येतील बदल}}$$

$$MRS_{xy} = -\frac{\Delta y}{\Delta x}$$

सीमांत प्रतिस्थापन दर नेहमी ऋणात्मक स्वरूपाचा असतो. हे विश्लेषण खालील तालीकेद्वारे स्पष्ट केलेले आहे.

**तक्ता क्रमांक 2.3**

**घटता सीमांत पर्यायता दर**

| **संयोग** | **X वस्तू** | **Y वस्तू** | **X वस्तूचा Y वस्तूसाठी सीमांत पर्यायता दर** |
|---|---|---|---|
| 1 | 1 | 16 | - |
| 2 | 2 | 11 | 5:1 |
| 3 | 3 | 7 | 4:1 |
| 4 | 4 | 4 | 3:1 |
| 5 | 5 | 2 | 2:1 |

वरील तक्ता क्रमांक 2.3 आधारे घटता सीमांत पर्यायता दर दर्शविलेला आहे. समजा उपभोक्ता सुरुवातीला आपल्या मर्यादित उत्पन्नात सुरुवातीला X वस्तूचे 1 नग व Y वस्तुचे 16 नगर खरेदी करतो. समजा उपभोक्त्यने X च्या नगसंख्येत वाढ करून Y च्या नगसंख्येत घट करण्याचे ठरविले X वस्तूचा एक नग प्राप्त करण्यासाठी Y वस्तूच्या पाच नगाचा त्याग करावा लागतो. समजा उपभोक्त्याने आणखी X च्या एका नगाच्या उपभोगात वाढ केली तर Y च्या 4 नगात घट केली जाते. उपभोक्त्याने आणखी X च्या एका नगात वाढ केली तर उपभोक्ता Y च्या तीन नगाचा त्याग करतो. समजा उपभोक्त्याने X च्या 1 नगात अजुन वाढ केली तर उपभोक्ता Y चे दोन नगाचा त्याग करतो.

वरील तालीकेवरून असे स्पष्ट होते की,

1) X वस्तूच्या नगाच्या जादा प्राप्तीसाठी उपभोक्ता Y चे कमीत कमी नग देण्यास तयार होतो.
2) X वस्तूचे जादा नग Y च्या प्राप्तीसाठी द्यावे लागत आहेत.
3) X वस्तूसाठी Y वस्तूचा सीमांत प्रतिस्थापन दर घटता असतो.

हे विश्लेषण खालील आकृतीद्वारे स्पष्ट केलेले आहे.




**सीमांत पर्यायता दर**

| | | |
|---|---|---|
| A बिंदू | B बिंदू | C बिंदू |
| A = MK / KA | B=AT / TB | C=LB / LC |

वरील आकृतीवरून हे स्पष्ट होते की सीमांत पर्यायता दर घटता आहे.

**सीमांत प्रतिस्थापन दर हा समान होण्याची कारणे :**

1) विशिष्ट वस्तूसाठी असलेली इच्छा तृप्तीक्षम होते.
2) वस्तू एकमेकांना अपूर्ण पर्यायी असतात.
3) एकाद्या वस्तूच्या नगसंख्येत वाढ केल्यास त्या वस्तूच्या पासून प्राप्त होणारी उपयोगिता घटत जाते.



**समवृत्ती वक्राची गुणधर्म किंवा वैशिष्ट्ये**

**(Properties of Indifference Curve) :**

समवृत्ती वक्राचे गुणधर्म किंवा वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

**1) समवृत्ती वक्र ऋणात्मक उताराचे असतात.**

**(Indifference Curves are negatively Sloping) :**

समवृत्ती वक्राचा एक गुणधर्म असा समवृत्ती वक्र ऋणात्मक उताराचे असतात किंवा समवृत्ती वक्र नेहमी डावीकडून उजवीकडे उतरत जाणारा असतो. त्याचे कारण उपभोक्ता दोन वस्तू खरेदी करतो व उपभोगत्याचे उत्पन्न मर्यादित गृहीत धरलेले आहे. त्यामुळे उपभोगत्याला एका वस्तूच्या नगरसंख्येत वाढ करत असताना दुसऱ्या वस्तूच्या नगसंख्येत घट करावी लागते. समवृत्ती वक्राचा गुणधर्म खालील प्रमाणे सिद्ध केला आहे.

**अ) समवृत्ती वक्र OX अक्षाला समांतर असेल तर :** जर समवृत्ती OX अक्षाला समांतर असेल तर समवृत्ती वक्राची आकृती खालीलप्रमाणे असेल.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू दर्शविलेली आहे. आकृतीत दाखवलेला IC हा समवृत्तीवक्र OX अक्षाला समांतर असा आहे. उपभोग्ता आपल्या मर्यादित उत्पन्नात Y वस्तूचे OL एवढे

व OM एवढे X वस्तूचे नग खरेदी करतो. हे आकृतीत E बिंदूच्या ठिकाणी दर्शविलेले आहे. समजा $E_1$ बिंदूच्या ठिकाणी उपभोग्ता Y वस्तूचे OL एवढे नग स्थिर ठेवून X वस्तूचे M पासून $M_1$ पर्यंत नग वाढवितो. पण मर्यादित उत्पन्नात एका वस्तूच्या नगसंख्येत वाढ करताना दुसऱ्या वस्तूच्या नगसंख्येत घट करावी लागते. त्यामुळे समवृत्ती वक्र OX अक्षाला समांतर असत नाहीत.

**ब) समवृत्ती वक्र OY अक्षाला समांतर असेल तर :** जर समवृत्ती वक्र OY अक्षाला समांतर असेल तर समवृत्ती वक्राची आकृती खालील प्रमाणे असेल.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू जर OY अक्षावर Y वस्तू दर्शविलेली आहे. आकृतीत दाखवलेला IC हा समवृत्तीवक्र OX अक्षाला समांतर असा आहे. उपभोग्ता आपल्या मर्यादित उत्पन्नात Y वस्तूचे OL व X वस्तुचे OM एवढे नग खरेदी करतो. हे आकृतीत E बिंदूच्या ठिकाणी दर्शविलेले आहे. समजा $E_1$ बिंदूच्या ठिकाणी Y वस्तूचे $OL_1$ इतके नग वाढवले तर X वस्तूच्या नगसंख्येत M नग स्थिर आहेत. पण मर्यादित उत्पन्नात एका वस्तूच्या नगरसंख्येत वाढ करताना दुसऱ्या वस्तूच्या नगसंख्येत



घट करावी लागते. पण असे होत नाही त्यामुळे समवृत्ती वक्र OY अक्षाला समांतर नसतात.

**क) समवृत्ती वक्र OY या मुळआरंभाला $45^O$ कोन करणारा असेल तर :**

जर समवृत्ती वक्र OX या मुळ आरंभाला $45^O$ कोन करणारा असेल तर समवृत्ती वक्राची आकृती खालील प्रमाणे असेल.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तूचे नग तर OY अक्षावर Y वस्तूचे नग दर्शविलेले आहेत. आकृतीत IC हा समवृत्तीवक्र 'O' या मुळाआरंभाला $45^0$ कोन करणारा समवृत्तीवक्र काढलेला आहे. उपभोक्ता मर्यादित उत्पन्नात E बिंदुच्या ठिकाणी X वस्तूचे OM व Y वस्तूचे ON एवढे नग खरेदी करतो. तर IC या समवृत्तीवक्रावर $E_1$ बिंदुच्या ठिकाणी उपभोग्ता X वस्तूच्या नगसंख्येत सुद्धा M पासून $M_1$ पर्यंत वाढ करतो व Y वस्तूच्या नगसंख्येत सुद्धा N पासून $N_1$ पर्यंत वाढ होते. पण मर्यादित उत्पन्नात एका वस्तूच्या नगसंख्येत वाढ होताना दुसऱ्या वस्तूच्या नगसंख्येत घट झाली पाहिजे पण असे होताना दिसून येत नाही. म्हणून समवृत्ती वक्र 'O' या मुळाआरंभाला $45^0$ अंशाचे कोन करणारे नसतात.

म्हणून समवृत्ती वक्र नेहमी डावीकडून उजवीकडे उतरत जाणारा असतो हे विश्लेषण खालील आकृतीद्वारे स्पष्ट केलेले आहे.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू दर्शविलेली आहे. आकृतीत IC हा समवृत्ती वक्र ऋणात्मक उताराचा आहे. A बिंदूच्या ठिकाणी उपभोक्ता X वस्तूचे OM व Y वस्तूचे ON नग खरेदी करतो. तर B बिंदूच्या ठिकाणी X वस्तूचे M पासून $M_1$ पर्यंत नग वाढविले जातात. यावेळी उपभोक्ता X वस्तूच्या नगसंख्येत N पासून $N_1$ पर्यंत घट केली जाते. उपभोक्ता आपल्या मर्यादित उत्पन्नात एका वस्तूच्या नगसंख्येत वाढ करताना दुसऱ्या वस्तूच्या नगसंख्येत घट करतो.

**2) समवृत्ती वक्र 'O' या मुळाआरंभाची बर्हिगोल उताराचे असतात :** समवृत्ती वक्राचा एक गुणधर्म म्हणजे समवृत्ती वक्र 'O' या मुळाआरंभाशी बर्हिगोल उताराचे असतात समवृत्ती वक्राची संकल्पना ही घटत्या सीमांत पर्यायिता दराच्या संकल्पनेवर आधारित आहे. जर समवृत्ती वक्र 'O' या



मुळाआरंभाला अंर्तगोल स्वरूपाचा असेल तर सीमांत पर्यायता दर हा वाढता असतो. तसेच समवृत्ती वक्र जर सरळ रेषाकार स्वरूपाचा असेल तर सीमांत पर्यायता दर स्थिर असतो. हे विश्लेषण खालील आकृतीद्वारे स्पष्ट केलेले आहे.




सोबतच्या आकृतीमध्ये A मध्ये समवृत्तीवक्र IC असून यावेळी सीमांत पर्यायता दर घटता आहे. आकृती B मध्ये सीमात पर्यायता वाढता असून समवृत्ती वक्र 'O' या मुळाआरंभाला अंर्तगोल आहे. आकृती C मध्ये समवृत्ती वक्र सरळ रेषाकार असून सीमांत पर्यायता दर स्थिर आहे. म्हणून समवृत्ती वक्र आकृती A मध्ये दाखविल्याप्रमाणे बर्हिगोल उताराचे असतात.

**3) 'O' या मुळआरंभापासून दूर जाणारे समवृत्ती वक्र जास्त समाधान दर्शवितो :** समवृत्ती वक्राचा एक गुणधर्म म्हणजे 'O' या मुळआरंभापासून दूर जाणारे समवृत्ती वक्र जास्तीचे समाधान दर्शवितात. समवृत्ती वक्राच्या नकाशावरील उजवीकडील समवृत्तीवक्र डावीकडच्या समवृत्तीपेक्षा जास्त समाधान दर्शवितो. हे विश्लेषण खालील आकृतीच्या साह्याने स्पष्ट केलेले आहे.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू तर दर्शविलेली आहे. IC समवृत्तीवक्रावर E बिंदूच्या ठिकाणी X वस्तूचे OM व Y वस्तूचे ON नग खरेदी करतो. तर $E_1$ बिंदूच्या ठिकाणी उपभोक्ता X वस्तूचे M पासून $M_1$ पर्यंत व Y वस्तूचे N पासून $N_1$ जास्त नग खरेदी करतो. E बिंदूपेक्षा $E_1$ बिंदूच्या ठिकाणी मिळणारे समाधान जास्त आहे. IC या समवृत्तीवक्रापेक्षा $IC_1$ या समवृत्तीवक्रावर समाधान जास्त आहे.

**4) दोन समवृत्ती वक्र एकमेकाना छेदत नाहीत :** समवृत्ती वक्र परस्परांना छेदत नाहीत. समवृत्ती वक्राची संकल्पना सुसंगता या गृहीतकावर आधारित आहे. दोन समवृत्ती वक्र परस्परांना छेदल्यास किंवा स्पर्श केल्यास समवृत्ती वक्र संकल्पनेला बाधा येते. हे विश्लेषण खालील आकृतीद्वारे स्पष्ट केलेले आहे.






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू दर्शविलेली आहे. आकृतीत IC व $IC_1$ हे समवृत्ती वक्र E बिंदूच्या ठिकाणी परस्पराना E बिंदुच्या ठिकाणी छेदतात. उपभोक्ता X व Y वस्तूचे सारखेच नग खरेदी करतो समवृत्ती वक्राच्या गुणधर्माप्रमाणे IC या वक्रापेक्षा $IC_1$ या समवृत्ती वक्रावर जास्त समाधान मिळते. पण सारखेच नग खरेदी करून वस्तुस्थिती अशी आहे की सारखेच समाधान प्राप्त होते. एक वक्र जास्तीचे समाधान दर्शवितो तर एक समवृत्ती वक्र कमी समाधान दर्शवितो पण हे समवृत्ती वक्राच्या गुणधर्माला अनुसरून नाही म्हणून दोन समवृत्ती वक्र एकमेकांना छेदत नाहीत.

**5) समवृत्ती वक्र OX व OY अक्षांना स्पर्श करीत नाही :** समवृत्ती वक्र संकल्पनेत उपभोक्ता दोन वस्तूचा उपभोग घेतो हे गृहीत धरलेले आहे. तर समवृत्ती वक्र OX व OY अक्षांना स्पर्श करीत असेल तर समवृत्ती वक्र ज्या अक्षाला स्पर्श करतो. त्या अक्षावर जी वस्तू दर्शविलेली असते. त्या वस्तूचे उपभोग्ता सर्व नग खरेदी करतो. व दुसऱ्या वस्तूचे शून्य नग खरेदी करतो म्हणून समवृत्ती वक्र OX व OY अक्षांना स्पर्श करीत नाही.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू दर्शविण्यात आलेली आहे. आकृतीत A बिंदूच्या ठिकाणी IC हा समवृत्ती

वक्र OY अक्षाला स्पर्श करतो यावेळी उपभोक्ता X वस्तूचे शून्य व Y वस्तूचे OA नग खरेदी करतो. B बिंदूच्या ठिकाणी $IC_1$ हा समवृत्ती वक्र OX अक्षाला स्पर्श करतो. यावेळी उपभोक्ता X वस्तूचे OB व Y वस्तूचे शून्य नग खरेदी करतो. त्यामुळे समवृत्ती वक्र कोणत्याही अक्षाला स्पर्श करत नाही.

**6) दोन समवृत्ती वक्रात अनेक समवृत्ती वक्र असू शकतात :** दोन समवृत्ती वक्रात खालील प्रमाणे अनेक समवृत्ती वक्र दाखविलेले आहेत.




आकृती क्र. 57

सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू दर्शविलेली आहे. आकृतीत $IC_1$, $IC_2$, $IC_3$, $IC_4$, $IC_5$ हे विविध समवृत्ती वक्र दर्शविलेले आहेत.

**7) तटस्थता वक्र एकमेकांना समांतर असतात असे नाही :** समवृत्ती वक्राचा एक गुणधर्म म्हणजे तटस्थता वक्र एकमेकांना समांतर असतातच असे नाही कारण ही संकल्पना पसंती श्रेणीच्या गृहीतकावर आधारित आहे. पंसती श्रेणीनुसार दोन समवृत्ती वक्रांवरील वस्तूंच्या संयोगात समान अंतर नसल्याने समवृत्ती वक्र एकमेकांना समांतर असतातच असे नाही. समवृत्ती वक्राचा हा गुणधर्म खालील आकृतीच्या साह्याने स्पष्ट केलेला आहे.






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू दर्शविण्यात आलेली आहे. आकृतीत $IC_1$, $IC_2$ व $IC_3$ हे समवृत्ती वक्र परस्परांना समांतर नाहीत. थोडक्यात समवृत्ती वक्र परस्परांना समांतर असतात असे नाही.

अशा प्रकारे समवृत्ती वक्राचे निरनिराळे गुणधर्म स्पष्ट केलेले आहेत.

**किंमतरेषा (Price Line) :**

उपभोग्ता आपल्या मर्यादित उत्पन्नात X व Y या दोन वस्तूचे जास्तीत जास्त किती नग खरेदी करू शकतो हे दर्शविणारी रेषा किंमतरेषा असते. किंमतरेषेला उत्पन्नरेषा, अंदाजपत्रक रेषा असे म्हणतात.



सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू दर्शविण्यात आलेली आहे. AB ही किंमत रेषा काढलेली आहे. उपभोक्ता आपल्या मर्यादित उत्पन्नात X वस्तूचे जास्तीत जास्त OB व Y वस्तूचे जास्तीत जास्त OA एवढे नग खरेदी करतो.

**किंमत रेषेच्या उतारातील बदल :**

किंमत रेषेच्या उतारात प्रामुख्याने दोन कारणास्तव बदल घडून येतो.

**A) उपभोग्त्याच्या उत्पन्नात होणारे बदल :** उपभोग्त्याच्या उत्पन्नात होणारे बदल किंमतरेषेच्या उतारात बदल घडून आणतात. उपभोग्त्याच्या उत्पन्नात वाढ झाल्यास किंमतरेषा मुळ किंमतरेषेच्या उजव्या किंवा वरच्या बाजुला सरकते. उपभोग्त्याच्या उत्पन्नात घट झाल्यास किंमतरेषा मुळ किंमतरेषेच्या डाव्या किंवा खालच्या बाजुला सरकते हे विश्लेषण खालील आकृतीच्या साह्याने स्पष्ट केलेले आहे.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू दर्शविण्यात आलेली आहे. आकृतीत उपभोग्त्याचे मुळ उत्पन्न गृहीत धरून AB ही किंमत रेषा काढलेली आहे. समजा X व Y वस्तूच्या किंमती स्थिर राहून उपभोगत्याच्या मौद्रिक उत्पन्नात वाढ झाली तर नवीन किंमतरेषा मुळ किंमत रेषेच्या वरच्या बाजूला सरकते ती $A_1 B_1$ अशी तयार होते. यावेळी उत्पन्नात



झालेल्या वाढीमुळे उपभोगता X वस्तूचे $OB_1$ एवढे जास्त नग खरेदी करतो म्हणजे B ते $B_1$ एवढी नगसंख्येत वाढ होते. तर उपभोग्ता Y वस्तूचे $OA_1$ एवढे नग खरेदी करतो. म्हणजे A ते $A_1$ एवढी नगसंख्येत वाढ होते.

समजा X व Y वस्तूच्या किंमती स्थिर राहुन AB ही मुळ किंमत रेषा असताना उपभोगत्याच्या मौद्रिक उत्पन्नात घट झाली तर नवीन किंमतरेषा $A_2B_2$ अशी तयार होते. यावेळी उत्पन्नात झालेल्या घटीमुळे उपभोगता X वस्तूचे $OB_2$ एवढे नग खरेदी करतो. म्हणजे B ते $B_2$ एवढी नगसंख्येत घट होते तर उपभोगता Y वस्तूचे $OA_2$ एवढे नग खरेदी करतो. म्हणजे A ते $A_2$ एवढे कमी नग खरेदी करतो.

**B) किंमत रेषेच्या उतारात होणारे बदल :** किंमत रेषेच्या उतारात होणारे बदल सुद्धा दोन प्रकारचे असतात.

**1) उपभोगत्याचे उत्पन्न व X वस्तूची किंमत स्थिर राहुन :** जर उपभोगत्याचे उत्पन्न व A वस्तूची किंमत स्थिर राहिली तर किंमत रेषेच्या उतारात खालीलप्रमाणे बदल होतात.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू दर्शविण्यात आलेली आहे. AB ही मुळ किंमतरेषा असताना व उपभोगत्याचे

मौदिक उत्पन्न स्थिर असताना जर X वस्तूची किंमत कमी झाली तर किंमतरेषेच्या उतारात बदल होवून ती $AB_1$ अशी तयार होते. यावेळी उपभोग्ता X वस्तूच्या किंमतीत झालेल्या घटीमुळे B ते $B_1$ एवढे जास्त नग खरेदी करू शकतो.

AB ही मुळ किंमतरेषा असताना व उपभोगत्याचे मौद्रिक उत्पन्न स्थिर असताना जर X वस्तूची किंमत वाढली तर किंमतरेषेच्या उतारात बदल होवून ती $AB_2$ ही अशी तयार होते. यावेळी उपभोक्ता X वस्तूच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे B ते $B_2$ एवढे कमी नग खरेदी करतो.

वरीलप्रमाणे किंमत रेषेच्या उतारात बदल होतात.

**उपभोक्त्याचे संतुलन (Consumer Equilibriun) :**

समवृत्ती वक्र व किंमतरेषा या दोन्ही साधनाचा उपयोग करून उपभोक्त्याचे संतुलन ही संकल्पना स्पष्ट केली जाते. उपभोक्त्याचे उत्पन्न व उपभोक्ता उपभोग घेत असलेल्या दोन्ही वस्तूच्या किंमती स्थिर असताना उपभोक्ता असा संयोग निवडतो की त्याला जास्तीत जास्त समाधान प्राप्त होते ती स्थिती उपभोक्ता संतुलन अवस्थेची असते. हे विश्लेषण खालील गृहीतकाच्या आधारे स्पष्ट केलेले आहे.

**गृहीतके :**

1) उपभोक्त्याचे उत्पन्न मर्यादित व स्थिर असते.
2) उपभोक्ता आपले सर्व उत्पन्न X व Y वस्तूच्या उपभोगावर खर्च करतो.
3) महत्तम समाधान प्राप्त करणे हा उपभोक्त्याचा उद्देश असतो.
4) वस्तुचे नग समान व विभाजनशील असतात.
5) उपभोक्त्याच्या आवडी-निवडी स्थिर असतात.
6) उपभोक्ता विवेकशील असतात.
7) उपभोक्ता उपभोग घेत असलेल्या वस्तूच्या किंमती विश्लेषणकाळासाठी स्थिर असतात.
8) अर्थव्यवस्थेत पूर्ण स्पर्धेची बाजारपेठ अस्तित्वात आहे.
9) उपभोक्त्याची पसंती श्रेणी असते आणि त्यानुसार तो वस्तूची निवड करतो. विवेचन काळात पसंती श्रेणी स्थिर असते.



**संतुलनासाठी आवश्यक अटी :**

1) किंमतरेषा ही समवृत्ती वक्राला स्पर्श करणारी असावी.
2) समवृत्ती वक्र संतुलन बिंदुच्या ठिकाणी उगम बिंदुला बर्हिगोल असावा.
3) समवृत्ती वक्र व किंमतरेषेचा उतार सारखा असावा.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू दर्शविण्यात आलेली आहे. उपभोगत्याने आपले सर्व उत्पन्न Y वस्तूच्या खरेदीसाठी खर्च केले तर OK एवढे नग तो Y वस्तूचे खरेदी करू शकतो व तसेच उपभोगत्याने आपले सर्व उत्पन्न X वस्तूच्या खरेदी साठी खर्च केले तर तो X वस्तूचे जास्तीत जास्त $OK_1$ एवढे नग खरेदी करू शकतो.

महत्तम उपयोगिता सिद्धांताप्रमाणे उपभोक्ता पंसती श्रेणीनुसार E संयोग निवडतो. E व्यतिरिक्त इतर संयोग तो पसंत करत नाही. कारण इतर संयोग उपभोक्त्याला कमी समाधान देतात. संतुलनाच्या वेळी समवृत्ती वक्र हा किंमतरेषेला स्पर्श करतो. त्यावेळी समवृत्ती वक्र 'O' या मुळाआरंभाला बर्हिगोल असतो. उपभोक्तावर X वस्तूचे OM वस्तूचे Y वस्तूचे ON नग खरेदी करतो व महत्तम समाधान प्राप्त करतो.

**उपभोगत्याच्या संतुलनाचे मुख्य वैशिष्ट्ये :**

हे संतुलन ज्या विशिष्ट संयोगाच्या ठिकाणी निर्माण होत असते. त्या विशिष्ट ठिकाणी दोन वस्तूचा सीमांत प्रतिस्थापनाचा दर हा त्या वस्तूच्या किंमतीच्या गुणोत्तराबरोबर असतो.

सीमांत प्रतिस्थापन दर = $\frac{\Delta Y}{\Delta X}$

$\Delta Y$ =Y वस्तूच्या नगरसंख्येतील बदल

$\Delta X$ =X वस्तूच्या नगरसंख्येतील बदल

**उत्पन्न परिणाम (Income effects) :**

उपभोक्त्याचे संतुलन ही संकल्पना स्पष्ट करत असताना आपण उपभोक्त्याचे उत्पन्न व वस्तुच्या किंमती स्थिर गृहीत धरल्या आहेत. पण जर का उपभोक्त्याच्या उत्पन्नात व वस्तुच्या किंमतीत बदल झाला तर त्याचे उपभोक्त्याच्या संतुलनावर काय परिणाम होतात ह्याचे स्पष्टीकरण उत्पन्न परिणाम व पर्यायता परिणामाच्या आधारे केले जाते.

**व्याख्या :**

उपभोक्ता उपभोग घेत असलेल्या दोन्ही वस्तुच्या किंमती स्थिर राहुन उपभोक्त्याच्या उत्पन्नात झालेल्या बदलामुळे त्याच्या उपभोगात जे बदल घडून येतात. त्याला उत्पन्न परिणाम असे म्हणतात.

**गृहीतके :** उत्पन्न परिणाम खालील गृहीतकावर आधारित आहे.

1) उपभोक्त्याच्या आवडी-निवडी स्थिर आहेत.
2) दोन्ही वस्तुच्या किंमती स्थिर आहेत.
3) महत्तम समाधान प्राप्त करणे हा उपभोक्त्याचा उद्देश असतो.
4) उपभोक्त्याच्या पैशातील उत्पन्नात बदल झाला आहे.

ही गृहीतके गृहीत धरून जेव्हा उपभोक्त्याचे उत्पन्न बदलते त्याचा उपभोक्त्याच्या उपभोगावर काम परिणाम होतो त्याचे विश्लेषण खालील प्रमाणे स्पष्ट केलेले आहे.






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर OY वस्तू दर्शविण्यात आलेली आहे. आकृतीत P बिंदूच्या ठिकाणी किंमतरेषा व समवृत्तीवक्र एकमेकांना स्पर्श करतात यावेळी उपभोक्त्याचे संतुलन घडून येते.

समजा उपभोक्त्याच्या उत्पन्नात वाढ झाली तर किंमतरेषा मुळ किंमतरेषेच्या वरच्या बाजुला सरकते. उजव्या बाजुला ती $A_2B_2$ अशी तयार होते. यावेळी $IC_3$ हा समवृत्ती वक्र $P_2$ बिंदुच्या ठिकाणी किंमत रेषा व समवृत्ती वक्र एकमेकांना स्पर्श करतात यावेळी उपभोक्त्याचे संतुलन घडून येते. $IC_2$ या समवृत्ती वक्रापेक्षा $IC_3$ या समवृत्ती वक्रावर मिळणारे समाधान जास्त आहे.

यावेळी उपभोक्ता उत्पन्नात झालेल्या वाढीमुळे X वस्तूचे M ते $M_1$ जादा नग व Y वस्तूचे N ते $N_1$ एवढे जादा नग खरेदी करतो.

समजा मुळ किंमतरेषा AB व P बिंदूच्या ठिकाणी उपभोक्त्याचे संतुलन असताना जर का उपभोक्त्याच्या उत्पन्नात घट झाली तर नवीन किंमतरेषा मुळ किंमतरेषेच्या डाव्या (खालच्या) बाजुला सरकते यावेळी ती $A_1B_1$ अशी तयार होते या किंमतरेषेला $IC_1$ हा समवृत्ती वक्र $P_1$ बिंदुच्या ठिकाणी स्पर्श

करतो व उपभोक्त्याचे संतुलन घडून येते यावेळी $IC_2$ समवृत्ती वक्रापेक्षा $IC_1$ या समवृत्ती वक्रावर मिळणारे समाधान कमी आहे. यावेळी उपभोक्ता X वस्तूचे M पासून $M_2$ पर्यंत व Y वस्तूचे N पासून $N_2$ पर्यंत कमी नग खरेदी करतो. अशा रितीने $P_1PP_2$ या बिंदूना जोडणारी एकादी रेषा काढली तर ती ICC हा उत्पन्न उपभोग वक्र तयार होतो की जो डावीकडून उजवीकडे वर जाणारा आहे. जो वक्र उपभोक्त्याच्या उत्पन्नात झालेल्या बदलामुळे उपभोगावर काय परिणाम होतो त्याचे स्पष्टीकरण करतो.

**पर्यायता परिणाम (Substitution Effect) :**

उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर राहून जर का वस्तूच्या किंमतीत झालेल्या बदलामुळे उपभोक्त्याच्या संतुलन अवस्थेवर जो परिणाम घडून येतो त्याला पर्यायता परिणाम म्हणतात. किंमतीतील बदलामुळे उपभोक्ता एकाच समवृत्ती वक्रावर राहतो त्याच्या समाधानाच्या पातळीत काहीच फरक पडला नाही. पर्यायता परिणाम खालील गृहीतकावर आधारित आहे.

1) महत्तम समाधान मिळणे हा उपभोगत्याचा उद्देश असतो.
2) X वस्तूच्या किंमतीत घट होते.
3) Y वस्तूच्या किंमतीत वाढ होते.
4) उपभोक्त्याचे उत्पन्न कायम राहते.

हे विश्लेषण खालील आकृतीच्या साह्याने स्पष्ट केलेले आहे.






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू दर्शविलेली आहे. आकृतीत AB किंमतरेषेला IC समवृत्तीवक्र P बिंदूच्या ठिकाणी स्पर्श करतो व संतुलन घडून येते.

समजा उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर राहुन X वस्तूची किंमत घटली व Y वस्तूची किंमत वाढली तर नवीन किंमतरेषा $A_1B_1$ अशी तयार होते. त्यावेळी IC हा समवृत्तीवक्र या किंमतरेषेला $P_1$ बिंदूच्या ठिकाणी स्पर्श करतो यावेळी X वस्तुची किंमत कमी झाल्यामुळे M पासून $M_1$ पर्यंत जादा नग खरेदी करतो तर Y वस्तूची किंमत वाढल्यामुळे तो Y वस्तूचे N ते $N_1$ कमी नग खरेदी करतो. उपभोक्त्याच्या समाधानात काहीच फरक पडत नाही. P ते $P_1$ हा प्रवास उपभोक्त्याचा पर्यायता परिणाम दर्शवितो.

**किंमत परिणाम (Price effect) :**

जर वस्तूच्या किंमतीत बदल झाला तर उपभोक्त्याच्या संतुलन अवस्थेत काय बदल घडून येतात. त्याचे विश्लेषण किंमत परिणामाद्वारे स्पष्ट केले जाते. उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर असताना वस्तूच्या किंमतीत झालेल्या बदलामुळे उपभोक्त्याच्या संतुलन अवस्थेत काय परिणाम घडून येतो याचे विश्लेषण किंमत परिणामा आधारे केले जाते. किमत परिणाम हा दोन प्रकारचा असतो. 1) वस्तूच्या किंमतीत होणारी वाढ 2) वस्तूच्या किंमतीत होणारी घट जर वस्तूच्या किंमतीत वाढ झाली तर उपभोक्त्याची त्या वस्तूची मागणी कमी होते. याउलट वस्तूच्या किंमतीत घट झाली असता त्या वस्तूची मागणी वाढते. किंमत परिणाम खालील गृहीतकावर आधारित आहे.

**गृहितके :**

1) वस्तूच्या किंमतीत बदल झाला आहे.
2) उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर आहे. वास्तविक उत्पन्नात बदल होतो.
3) उपभोग्य वस्तू ही हलक्या प्रकारची नाही.
4) उपभोक्त्याला जास्तीत जास्त समाधान मिळवावयाचे आहे. हे विश्लेषण खालील आकृतीच्या साह्याने स्पष्ट केलेले आहे.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर X वस्तू तर OY अक्षावर Y वस्तू दर्शविलेली आहे. आकृतीत मूळ उत्पन्न गृहीत धरून AB ही किंमतरेषा काढलेली आहे. या किंमतरेषेला समवृत्तीवक्र P बिंदूच्या ठिकाणी स्पर्श करतो. उपभोक्ता X वस्तूचे OM नग खरेदी खरेदी करतो. समजा उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर असताना व Y वस्तूची किंमत स्थिर असताना X वस्तूची किंमत कमी झाली तर नवीन किंमत रेषा $AB_2$ अशी तयार होते. या किंमतरेषेला समवृत्ती वक्र $P_2$ बिंदूच्या ठिकाणी स्पर्श करतो. यावेळी उपभोक्ता Y वस्तूचे N पासून $N_2$ पर्यंत कमी नग खरेदी करतो. व X वस्तूचे M पासून $M_2$ पर्यंत नग वाढवितो.

समजा P हा संतुलन बिंदु असताना उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर असताना X वस्तूची किंमत वाढली तर नवीन किंमत रेषा $AB_1$ तयार होते. यावेळी उपभोक्ता X वस्तूचे M पासून $M_2$ पर्यंत कमी नग खरेदी करतो तर Y वस्तूचे N पासून $N_2$ पर्यंत जास्त नग खरेदी करतो.

आकृतीतील $P_1PP_2$ या बिंदुना जोडणारी रेषा काढली तर किंमत उपभोग वक्र तयार होतो. की जो किंमत परिणाम दर्शवितो. की जो किंमतीतील झालेला बदल उपभोगात बदल दर्शवितो.



**समवृत्ती वक्राची श्रेष्ठता :**

समवृत्ती वक्राची श्रेष्ठता पुढील प्रकारे विशद करता येईल.

**1) एका वस्तूच्या उपयोगितेवर दुसऱ्या वस्तूचा प्रभाव लक्षात घेतला आहे :** डॉ. मार्शल यानी आपल्या उपयोगिता विश्लेषणात केवळ एका वस्तुचे विश्लेषण केलेले आहे. समवृत्तीवक्र विश्लेषणात एका वस्तूच्या उपयोगितेवर दुसऱ्या वस्तुचा काय परिणाम होतो हे लक्षात घेतलेले आहे.

**2) उत्पन्न परिणाम व पर्यायता परिणाम याचा विचार केला आहे :** समवृत्ती वक्र संकल्पनेत उत्पन्नात बदल झाल्यास व पर्यायी वस्तूच्या किंमतीत होणारे बदल उपभोक्त्याच्या संतुलनार काय परिणाम करतात याचा विचार केला आहे. डॉ. मार्शल याच्या विश्लेषणात उत्पन्न परिणाम व पर्यायता परिणाम विचारात घेतलेले नाहीत.

**3) पैशापासून प्राप्त होणारी सीमांत उपयोगिता स्थिर गृहीत धरलेली नाही :** उत्पन्नात बदल झाल्यास उपभोगात काय बदल होतो हे गृहीत धरलेले आहे. त्यामुळे पैशापासून प्राप्त होणारी उपयोगिता स्थिर गृहीत धरलेली नाही.

**4) पुरक व पर्यायी वस्तूचे विश्लेषण केलेले आहे :** प्रो. हिक्स यानी आपल्या उपयोगिता विश्लेषणात पुरक वस्तु व पर्यायी वस्तुचे विश्लेषण केलेले आहे. मार्शलने केवळ एका वस्तु संदर्भात विश्लेषण केलेले आहे. त्यामुळे हे विश्लेषण श्रेष्ठ आहे.

**5) किंमतीतील बदलाचा कल्याणावर काय परिणाम होतो हे विचारात घेतलेले आहे :** किंमतीत वाढ झाली तर उपभोक्त्याचे कल्याण किती घटेल. याउलट किंमतीत घट झाली तर उपभोक्त्याचे कल्याण किती वाढेल याचा विचार या विश्लेषणात केला आहे.

**6) उपभोक्त्याच्या संतोषधिक्य मोजमाप केलेले आहे :** एकादी वस्तू हातची जावू नये म्हणून उपभोक्ता जी जास्तीत जास्त किंमत देतो तो देत असलेली किंमत व देण्यास तयार असलेली किंमत यातील फरकाला उपभोक्त्याचे संतोषधिक्य असे म्हणतात. समवृत्ती वक्राच्या साह्याने उपभोक्त्याचे संतोषधिक्य मोजता येते.

थोडक्यात समवृत्ती वक्राचे वरील विविध दृष्टीने श्रेष्ठत्व आहे तसेच ही संकल्पना परदेशी व्यापारास सुद्धा उपयुक्त आहे.

**टिका :** समवृत्ती वक्र विश्लेषनावर पुढीलप्रमाणे विविध टिका केल्या जातात.

**1) नवीन असे काही नाही :** टिकाकाराच्या मते समवृत्ती वक्र विश्लेषणात नवीन असे काही नाही डॉ. मार्शल यांनी आपल्या उपयोगिता विश्लेषणात ऱ्हासमान सीमांत उपयोगिता हा शब्द वापरला आहे. त्याऐवजी हिक्स यांनी घटत्या सीमांत पर्यायता दर हा शब्द वापरला आहे.

**2) केवळ दोन वस्तूचा अभ्यास :** समवृत्ती वक्र संकल्पनेत केवळ दोन वस्तूचा अभ्यास केला आहे.

**3) अवास्तव गृहीतकावर आधारित :** समवृत्ती वक्र संकल्पनेत उपभोक्ता विवेकशील आहे. पूर्ण स्पर्धा विभाजनीय वस्तू अशी गृहीतके गृहीत धरलेली आहेत.

**4) क्लिस्ट विवेचन :** या विश्लेषणात दोन वस्तूचा अभ्यास करावयाचा असेल तर द्विमिती तंत्र वापरावे लागेल तीन वस्तूचा अभ्यास करायचा असेल तर त्रिमिती वापरावी लागेल. थोडक्यात हे विश्लेषण क्लिष्ट गुंतागुंतीचे आहे.

**5) दुर्बळ क्रमवारिता या गृहितकावर आधारित आहे :** समवृत्ती वक्राची संकल्पना दुर्बल क्रमवारिता या गृहितकावर आधारित आहे. दुर्बळ क्रमवारिता म्हणजे उपभोक्त्याला काही समुहापासून सारखीच उपयोगिता (समाधान) मिळते त्यात फरक करता येत नाही. अशा सर्व समुहाकडे उपभोक्ता सारख्याच दृष्टीने पाहतो.

**6) विवेकशिलता या गृहीतकावर आधारित :** समवृत्ती वक्र संकल्पनेत विवेकशीलता या गृहितकावर आधारित आहे. एक विवेकशील उपभोक्ता प्रत्येक वस्तू खरेदी करताना सारासार विचार करून वस्तू खरेदी करतो. टिकाकाराच्या मते उपभोक्ता बऱ्याच वस्तूची खरेदी भावनेच्या आहारी जावून करतो थोडक्यात हे विश्लेषण विवेकशीलता या गृहीतकावर आधारित आहे अशी टिका केली जाते.

**7) हे विश्लेषण आंतरदृष्टीविषयक तत्वाचा वापर करते :** हे विश्लेषण आंतरदृष्टी विषयक म्हणजे उपभोक्त्याच्या मनातील व्यवहारावर आधारलेले आहे. या तत्वाचा वापर करून निष्कर्ष काढणे चुकीचे आहे.

या विवेचनात वरील विविध दोष असले तरीही नवीन उपयोगिता विश्लेषणाना चालना देण्याच्या दृष्टीने हे विश्लेषण अंत्यत उपयुक्त आहे.

■ ■ ■



# 4

# मागणीचा सिद्धांत किंवा नियम, पुरवठा नियम व मागणीची लवचिकता

## Law of Demand, Law of Supply Elasticity of demand

**प्रास्ताविक (Introduction) :**

अर्थशास्त्रात मागणी व पुरवठा या महत्वाच्या संकल्पना आहेत. अर्थशास्त्रात नुसती इच्छा म्हणजे मागणी नाही. तर इच्छेचे मागणीत रूपांतर होण्यासाठी व्यक्तीकडून तीन बाबीचा पूर्तता झाली पाहिजे एक तर व्यक्तीला वस्तु खरेदी करण्याची इच्छा असली पाहिजे. खरेदी शक्ती किंवा क्रयशक्ती (पैसा) व्यक्तीकडे असायला हवा व मुख्य म्हणजे पैसा खर्च करण्याची तयारी असली पाहिजे. या तीन्ही बाबी मागणी निर्माण होण्यासाठी आवश्यक आहेत.

**प्रो. बेनहॅम याच्या मते :**

''विशिष्ट वेळी विशिष्ट किंमतीला खरेदी केल्या जाणाऱ्या वस्तूंची नगसंख्या म्हणजे मागणी होय.''

**मागणी आणि किंमत यातील संबंध :**

प्रत्येक उपभोक्त्याचा उद्देश जास्तीत जास्त समाधान प्राप्त करणे हा असतो. मागणी आणि किंमत यात व्यस्त संबंध असतो. हा संबंध एक प्रकारचा फलनात्मक (Functional) स्वरूपाचा असतो. किंमतीच्या विरुद्ध दिशेने मागणीत बदल होतो. याचा अर्थ किंमत जास्त मागणी कमी याउलट किंमत कमी मागणी जास्त थोडक्यात मागणी व किंमत यातील संबंध व्यस्त असतो. मागणी नियमात किंवा मागणीच्या सिद्धांतात वस्तुची किंमत आणि मागणी यातील संबंध दर्शविला जातो.

**मागणीचा नियम किंवा सिद्धांत (Law of Demand) :**

डॉ. मार्शल या अर्थशास्त्रज्ञाने मागणी नियमाची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे.

**डॉ. मार्शल याच्या मते :**

''इतर परिस्थिती स्थिर असताना वस्तूच्या किंमतीत वाढ झाल्यास त्या वस्तूची मागणी घटते आणि वस्तूची किंमत कमी झाल्यास त्या वस्तूची मागणी वाढते.

(The amount demanded increases with a fall in the price diminishes with a rise in Price assuming other factor's constant.)

इतर परिस्थिती स्थिर असल्यास, वस्तूची किंमत आणि त्या वस्तूची मागणी यांच्यात परस्परविरोधी संबंध असतो.

There is a inverse relationship between the price of the commodity and quantity demanded.

मागणी नियम खालील तालीकेच्या साह्याने स्पष्ट केला आहे.

**तक्ता क्रमांक 4.1**

**वस्तूची मागणी व वस्तूची किंमत याच्यातील परस्पर संबंध**

| **वस्तूची किंमत (रूपये)** | **वस्तूची मागणी (नगसंख्येत)** |
|---|---|
| 1 | 20 |
| 2 | 18 |
| 3 | 16 |
| 4 | 13 |
| 5 | 11 |
| 6 | 09 |

वरील तक्ता क्रमांक 4.1 द्वारे वस्तूची मागणी व वस्तूची किंमत याच्यातील परस्पर संबंध दर्शविलेला आहे. वस्तूची किंमत 1 रूपया असताना मागणी 20 नगाची आहे. तर वस्तूची किंमत 2 रूपये असताना मागणी 18 नगाची आहे. तर वस्तुची किंमत 3 रूपये असताना मागणी 16 नगाची आहे.



जर वस्तूची किमत 4 रुपये झाली तर मागणी 13 नगावर येते. जर वस्तूची किंमत 5 रुपये झाली तर मागणी 11 नगावर येते. जर वस्तूची किंमत 6 रुपये झाली तर मागणी 12 नगावर येते. थोडक्यात किंमतीच्या विरुद्ध दिशेने मागणीत बदल होतो. हे विश्लेषण खालील आकृतीच्या साह्याने स्पष्ट केलेले आहे.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर वस्तूची मागणी (नगसंख्येत) तर वस्तुची किंमत (रुपयात) दर्शविलेली आहे. आकृतीत DD हा (Demand curve) मागणी वक्र काढलेला आहे. DD हा वक्र डावीकडून उजवीकडे ऋणात्मक उताराचा आहे. घटत्या वस्तूच्या किंमतीबरोबर मागणीत वाढ होते मागणी नियम खालील गृहीतकावर आधारित आहे.

**मागणी नियमाची गृहितके :**

**1) लोकसंख्या स्थिर असावी :** मागणी नियम अनुभवाला येण्यासाठी लोकसंख्या स्थिर असावी लोकसंख्या वाढली की वाढत्या लोकसंख्येबरोबर मागणीत वाढ होते.

**2) लोकाचे उत्पन्न स्थिर असावे :** वाढत्या वस्तुच्या किंमतीबरोबर लोकाच्या उत्पन्नात वाढ झाल्यास वस्तुला मागणी वाढते. याउलट घटत्या वस्तूच्या किंमतीबरोबर लोकाचे उत्पन्न कमी होत असल्यास मागणीत घट होते.

**3) भविष्यकालीन किंमतीचा अंदाज :** भविष्यात वस्तुच्या किंमती वाढणार असा अंदाज असेल तर मागणीत वाढ होवू लागते. याउलट भविष्यात वस्तु या किंमती कमी होणार असा अंदाज असेल तर मागणीत घट होऊ लागते.

**4) पर्यायी व पुरक वस्तुच्या किंमती :** मागणीचा सिद्धांत अनुभवाला येण्यासाठी पर्यायी व पुरक वस्तुच्या किंमती स्थिर असल्या पाहिजेत.

**5) चलन वाढ :** मागणीचा सिद्धांत अनुभवाला येण्यासाठी चलनवाढ होता कामा नये. चलनवाढ झाल्यास अर्थव्यवस्थेत पैशाच्या पुरवण्यात वाढ होवून मागणीत वाढ होण्याची शक्यता असते याउलट चलन घट झाल्यास अर्थव्यवस्थेत पैशाच्या पुरवण्यात घट होवून मागणीत घट होण्याची शक्यता असते.

**6) लोकांच्या आवडी निवडी स्थिर असल्या पाहिजेत :** मागणीचा सिद्धांत अनुभवाला येण्यासाठी लोकांच्या आवडी-निवडी प्रथा, परपंरा, चालीरीती यात बदल होता कामा नये. यात बदल झाल्यास सिद्धांत अनुभवाला येणार नाही.

**7) इतर वस्तूंच्या किंमती :** मागणीचा सिद्धांत अनुभवाला येण्यासाठी इतर वस्तूंच्या किंमती स्थिर असल्या पाहिजेत.

**8) हवामान :** हवामानात बदल होता कामा नये. जर हवामानात बदल झाला तर मागणीचा नियम किंवा सिद्धांत अनुभवाला येणार नाही.

वरील विविध गृहीतकावर मागणीचा नियम आधारित आहे.

**मागणीच्या नियमास अपवाद :**

मागणीच्या नियमास पुढील विविध प्रकारचे अपवाद आहेत.

**1) गिफेनचा विरोधाभास (Giffins Paradox) :** सर रॉबर्ट गिफेन हा ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ होय. या अर्थशास्त्रज्ञाच्या मते मागणी नियम गिफेन वस्तु किंवा हलक्या दर्जाच्या वस्तु संदर्भात लागु होत नाही. गिफेनच्या मते हलक्या दर्जाच्या वस्तुच्या किंमती कमी झाल्यास मागणी वाढण्या ऐवजी कमी होते. उदा. मिलो ज्वारी जी किंमत कमी झाल्यामुळे मागणी वाढण्याऐवजी कमी होते. याउलट मिलो ज्वारीची किंमत वाढल्यास मागणी वाढ होते.



**2) प्रतिष्ठेच्या वस्तू :** बेनहॅम या अर्थशास्त्रज्ञाच्यामते प्रतिष्ठेच्या वस्तूची किंमत वाढली तर मागणीत वाढ होते लोक आपली प्रतिष्ठा जपण्यासाठी अशा वस्तूची मागणी वाढवितात. उदा. हिरे, मोटारकार इत्यादी.

**3) भविष्यकालीन किंमतीचा अंदाज :** भविष्यकालीन किंमतीचा अंदाज मागणीच्या नियमाला अपवाद सांगितला जातो. भविष्यकाळात किंमत वाढणार असा अंदाज असेल तर आजच वस्तूची मागणी वाढते. याउलट भविष्यकाळात किंमत घटणार असा अंदाज असेल तर आजच वस्तूची मागणी कमी होते. थोडक्यात भविष्यकालीन किंमतीचा अंदाज मागणीच्या सिद्धांताला अपवाद सांगितला जातो.

**4) आवश्यक वस्तू :** मागणीच्या सिद्धांताला आवश्यक वस्तू अपवाद सांगितल्या जातात. आवश्यक वस्तुला असलेली मागणी अलवचिक असते. अशा वस्तू उपभोगात आवश्यक असतात. किंवा अशा वस्तूचे उपभोगातील प्रमाण कायम ठेवावे लागते. अशा वस्तूच्या किंमतीत होणारे बदल मागणीत बदल घडवून आणत नाहीत.

**5) मंदी :** मंदी ही मागणीच्या सिद्धांताला अपवाद समजली जाते. मंदीच्या काळात वस्तुच्या किंमती कमी होवून सुद्धा मागणीत वाढ होत नाही. भविष्यकाळात वस्तुच्या किंमती अजुन कमी होतील असा ग्राहकाचा अंदाज असतो त्यामुळे मागणीत वाढ होत नाही.

**6) सवयीच्या वस्तू :** सवयीच्या वस्तु मागणीच्या सिद्धांताला अपवाद सांगितल्या जातात. सवयीच्या वस्तुच्या किंमतीत कितीही वाढली तरी मागणीत घट होत नाही.

**व्यक्तीगत मागणी व बाजार मागणी :**

मागणीचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात एक व्यक्तीगत मागणी व बाजार मागणी होय. व्यक्तीगत किंवा वैयक्तिक मागणी म्हणजे विशिष्ट वेळी विशिष्ट किंमतपातळीला एखाद्या व्यक्तीची एखाद्या वस्तुला असलेली मागणी म्हणजे व्यक्तीगत मागणी होय. तर विशिष्ट वेळी विशिष्ट किंमतपातळीला बाजारातील सर्व व्यक्तीच्या मागणीची बेरीज म्हणजे बाजार मागणी होय. थोडक्यात व्यक्तीगत मागणीची बेरीज म्हणजे बाजारमागणी होय. खालील तालीकेत बाजारमागणीचे विश्लेषण केलेले आहे.

तक्ता क्रमांक 4.2

बाजार मागणी

| किंमत | अ वस्तुची मागणी (नगसंख्येत) | ब वस्तुची मागणी (नगसंख्येत) | बाजार मागणी (नगसंख्येत) |
|---|---|---|---|
| 5 रु | 1 | 2 | 03 |
| 4 रु | 2 | 4 | 06 |
| 03 रु | 3 | 6 | 09 |
| 02 रु | 4 | 8 | 12 |
| 01 रु | 5 | 10 | 15 |

सोबतच्या तक्ता क्रमांक 4.2 द्वारे बाजार मागणीचे स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे. व्यक्तीगत मागणीची बेरीज म्हणजे मागणी होय. वस्तुंची मागणी किंमत 5 रु असताना अ उपभोक्त्याची मागणी 1 नगाची आहे. तर ब उपभोक्त्याची मागणी 2 नगाची आहे. एकूण बाजार मागणी 03 नगाची आहे.

वस्तूंची किंमत 4 रु असताना अ उपभोक्त्याची मागणी 2 नगाची आहे, तर ब उपभोक्त्याची मागणी 04 नगाची आहे. एकूण बाजार मागणी 06 नगाची आहे.

वस्तूंची किंमत 3 रु. असताना अ उपभोक्त्याची मागणी 3 नगाची आहे. तर ब उपभोक्त्याची मागणी 06 नगाची आहे. एकूण बाजारमागणी 06 नगाची आहे.

वस्तूची किंमत 2 रु असताना अ उपभोक्त्याची मागणी 4 नगाची आहे. तर ब उपभोक्त्याची मागणी 08 नगाची आहे एकूण बाजार मागणी 12 नगाची आहे.

वस्तूची किंमत 01 असताना अ उपभोक्त्याची मागणी 05 नगाची आहे तर ब उपभोक्त्याची मागणी 10 नगाची आहे. एकूण बाजार मागणी 15 नगाची आहे.

**मागणीचा विस्तार व मागणीचा संकोच :**

मागणीचा विस्तार म्हणजे वस्तूच्या किंमतीत घट झाली तर मागणीचा विस्तार घडून येतो. यावेळी इतर परिस्थिती स्थिर असते. खालील आकृतीत मागणीचा विस्तार दर्शविला आहे.






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर वस्तूची मागणी तर OY अक्षावर वस्तूची किंमत दर्शविण्यात आलेली आहे. आकृतीत DD हा मागणी वक्र दर्शविलेला आहे. OP वस्तूची किंमत असताना मागणी OM एवढी आहे. जर P पासून $P_1$ पर्यंत वस्तूची किंमत कमी झाली तर मागणी M पासून $M_1$ पर्यंत वाढते. आकृतीतील A ते B हा भाग मागणी वक्राचा विस्तार दर्शवितो.

**मागणीचा संकोच :**

मागणीचा संकोच म्हणजे वस्तुच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे वस्तूला असणारी मागणी कमी होते. त्याला मागणीचा संकोच असे म्हणतात.



सोबतच्या आकृतीत OX अक्षावर वस्तुची मागणी तर OY अक्षावर वस्तूची किंमत दर्शविण्यात आलेली आहे. DD हा मागणीवक्र काढलेला आहे. आकृतीत OP एवढी वस्तूची किंमत असताना मागणी OM एवढी आहे. जर वस्तूची किंमत P पासून $P_1$ पर्यंत वाढली तर मागणी M पासून $M_1$ पर्यंत कमी होते. आकृतीतील A ते B हा भाग मागणीचा संकोच दर्शवितो वस्तूची किंमत वाढल्यामुळे वस्तूची मागणी कमी होते.

**मागणीची वुद्धी व मागणीचा ऱ्हास :**

मागणीची किंमत कायम राहुन इतर परिस्थितीत झालेला बदल मागणीत वाढ घडवून आणतो. त्याला मागणीची वृद्धी म्हणतात.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर वस्तूची मागणी तर OY अक्षावर वस्तूची किंमत दर्शविण्यात आलेली आहे. आकृतीत PE हा मागणीवक्र OX अक्षाला समांतर स्वरूपाचा काढलेला आहे. वस्तूची किंमत OP असताना मागणी OM एवढी आहे. समजा OP एवढी वस्तूची किंमत असताना जर इतर परिस्थिती बदल झाल्यामुळे उदा. उपभोक्त्याचे उत्पन्न वाढले तर मागणी M पासून $M_1$ पर्यत वाढते. यावेळी नवीन मागणी वक्र $D_1D_1$ अशा तयार होतो. आकृतीतील N ते $N_1$ हा भाग मागणीतील वृद्धी दर्शवितो.

**मागणीचा ऱ्हास :**

किंमत कायम राहुन इतर परिस्थितीत झालेला बदल मागणीत घट घडवून आणतो. त्याला मागणीचा ऱ्हास म्हणतात.






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर वस्तूची मागणी तर OY अक्षावर वस्तूची किंमत दर्शविण्यात आलेली आहे. आकृतीत PE हा मागणीवक्र OX अक्षाला समांतर स्वरूपाचा काढलेला आहे. वस्तूची किंमत OP असताना मागणी OM नगाची आहे. जर वस्तूची किंमत कायम राहून इतर परिस्थितीत बदल झाला आहे. तर $D_1D_1$ हा नवीन मागणी वक्र तयार होतो. यावेळी वस्तुची किंमत कायम राहुन मागणी M पासून $M_1$ पर्यत कमी होते आकृतीतील $N_1$ ते N हा भाग मागणीतील ऱ्हास दर्शवितो.

**वस्तूच्या मागणीचे प्रकार :**

वस्तूच्या मागणीचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

1) **किंमत मागणी :** वस्तूच्या किंमतीत बदल झाल्यामुळे वस्तूच्या मागणीत बदल होतो त्याला किंमत मागणी म्हणतात.

सूत्र स्वरूपात

$D = f(P)$

D = Demand (मागणी)

F = Function (अंवलबून असणे)

P = Price (किंमत)

2) **उत्पन्न मागणी :** उपभोक्त्याच्या उत्पन्नात झालेल्या बदलामुळे वस्तूला असलेली मागणी बदलते त्याला उत्पन्न मागणी असे म्हणतात.

सूत्र स्वरूपात

$D = f(Y)$

D = Demand (मागणी)

F = Function (अंवलबून असणे)

Y = Income (उत्पन्न)

उत्पन्न मागणीचे विविध प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

**A) उच्च दर्जाच्या वस्तू :**

उपभोक्त्याचो उत्पन्न वाढले की ज्या वस्तूंना मागणी वाढते त्याला उच्च दर्जाच्या वस्तू असे म्हणतात.




मागणी X वस्तू

सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उच्च दर्जाच्या वस्तूची मागणी तर OY अक्षावर उपभोक्त्याचे उत्पन्न दर्शविलेली आहे. उपभोक्त्याचे उत्पन्न OY असताना उच्च दर्जाच्या वस्तूची मागणी OM एवढी आहे. जर उपभोक्त्याचे उत्पन्न Y पासून $Y_1$ पर्यंत वाढले तर उच्च दर्जाच्या वस्तूची मागणी N पासून $N_1$ पर्यंत वाढते.

**B) कनिष्ठ प्रतीच्या वस्तू :**

उपभोक्त्याचे उत्पन्न वाढले की अशा वस्तूच्या मागणीत घट होते अशा वस्तूना हलक्या दर्जाच्या वस्तू किंवा कनिष्ठ प्रतीच्या वस्तु (गिफेन वस्तु) असे म्हणतात. अशा वस्तूचा मागणी वक्र आकृतीत दाखविल्या प्रमाणे असतो.






कनिष्ठ वस्तूची मागणी

सोबतच्या आकृतीत OX अक्षावर कनिष्ठ प्रतीच्या वस्तूची मागणी तर OY अक्षावर उपभोक्त्याचे उत्पन्न दर्शविलेले आहे. उपभोक्त्याचे उत्पन्न OY असताना मागणी $ON_1$ आहे. जर व्यक्तीचे उत्पन्न Y पासून $Y_1$ पर्यंत वाढले तर मागणी N पासून $N_1$ पर्यंत कमी होते.

**3) तिरकस मागणी (Cross Demand) :**

वस्तू एकमेकांशी पुरक किंवा पर्यायी असतात. तेव्हा त्याची मागणी एकमेकावर अंवलबून असते.

**1) पर्यायी वस्तू :** एका वस्तूच्या किंमतीत होणारे बदल दुसऱ्या वस्तूच्या मागणीत बदल घडवून आणतात. जर B वस्तूच्या किमतीत बदल झाला तर A वस्तूच्या मागणीत बदल होतो.




A वस्तूची मागणी

सोबतच्या आकृतीत DD हा मागणी वक्र काढलेला आहे. B वस्तूची किंमत वाढली की A वस्तूची मागणी वाढते.

**2) पुरक वस्तू :** दोन वस्तू परस्पराना पुरक असतील तर मागणी वक्र खालील प्रमाणे असतो.




वरील आकृतीत B वस्तूची किंमत कमी होवू लागली की A वस्तूची मागणी वाढू लागते.

**3) स्वतंत्र वस्तू** : जर दोन वस्तू स्वतंत्र असतील तर एका वस्तूच्या किंमतीत बदल झाल्यामुळे दुसऱ्या वस्तूच्या मागणीत काहीच बदल होत नाही त्याला स्वतंत्र वस्तू म्हणतात.






सोबतच्या आकृतीत DD हा मागणी वक्र OY अक्षाला समांतर आहे. B वस्तूच्या किंमतीत बदल झाला तरी A वस्तूच्या मागणीत बदल होत नाही. OM एवढी मागणी स्थिर आहे.

**मागणीची लवचिकता (Elasticity of Demand) :**

मागणी नियमात वस्तूची किंमत व वस्तूची मागणी यात व्यस्त संबंध दर्शवितो. वस्तूच्या किंमतीत झालेल्या बदलामुळे वस्तूच्या मागणीत बदल होतो. पण किती प्रमाणात वस्तूच्या किंमतीत वाढ झाल्यास किती प्रमाणात मागणी कमी होते व किती प्रमाणात वस्तूच्या किंमतीत घट झाल्यास किती प्रमाणात मागणीत वाढ होते हे अभ्यासण्यासाठी मागणीच्या लवचिकतेचा अभ्यास करावा लागतो. थोडक्यात किंमतीतील बदलाला मागणी किती प्रमाणात प्रतिसाद देते त्याचा विचार मागणीच्या किंमत लवचिकतेत केला जातो. मागणीच्या किंमत लवचिकतेच्या विविध विचारवंतानी पुढील प्रमाणे व्याख्या केल्या आहेत.

**मागणीच्या किंमत लवचिकतेच्या व्याख्या :**

**1) डॉ. मार्शल याची व्याख्या :**

''किंमतीत घट झाल्यामुळे मागणीत होणारी कमी किंवा जास्त वाढ आणि किंमतीत झालेल्या वाढीमुळे मागणीत होणारी कमी किंवा जास्त घट म्हणजेच मागणीची लवचिकता होय.''

**2) स्टोनिअर आणि हेग :**

''वस्तूच्या किंमतीत बदल झाल्यास मागणी किती प्रमाणात संवेदनशील आहे हे दाखविण्यासाठी अर्थशास्त्रज्ञांनी संगितलेला एक तांत्रिक शब्द होय.''

**3) प्रो. लिप्से :**

''मागणीतील शेकडा बदलाचे किंमतीतील शेकडा बदलाशी असलेले प्रमाण म्हणजेच मागणीची लवचिकता होय.'' मागणीच्या लवचिकतेचे पुढीलप्रकार पडतात.

**मागणीच्या लवचिकतेचे प्रकार :**

1) मागणीची किंमत लवचिकता (Price Elasticity of Demand)
2) मागणीची उत्पन्न लवचिकता (Income Elasticity of Demand)

3) मागणीची प्रतिस्थापन लवचिकता
(Sobstitution Elasticity of Demand)
4) मागणीची तिरकस लवचिकता (Cross Elasticity of Demand)
याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केलेले आहे.

**1) मागणीची किंमत लवचिकता (Price elasticity of Demand) :**

मागणीच्या लवचिकतेचे जे विविध प्रकार आहेत. त्यातील एक प्रकार म्हणजे मागणीची किंमत लवचिकता होय. वस्तुच्या किंमतीत झालेल्या बदलामुळे वस्तूच्या मागणीत बदल होतो. त्याचे विश्लेषण मागणीच्या किंमत लवचिकतेत केले जाते. मागणीच्या किंमत लवचिकतेची मांडणी प्रा. मार्शल यानी केली मागणीच्या किंमत लवचिकतेच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**डॉ. मार्शल याच्या मते :**

''वस्तुच्या किंमतीत झालेल्या विशिष्ट घटीमुळे मागणी परिमाणात किती जास्त किंवा कमी वाढ होईल तसेच वस्तूच्या किंमतीत झालेल्या विशिष्ट वाढीमुळे मागणी परिमाणात किती जास्त किंवा कमी घट होईल यावरून मागणीची लवचिकता जास्त किंवा कमी असते

**प्रो. मेअर्स यांच्या मते :**

''मागणीची लवचिकता ही उपभोक्त्याद्वारे खरेदी केल्या जाणाऱ्या वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या बदलामुळे दिलेल्या मागणीवक्रावर खरेदी मात्रेत होणारा संबंधित बदल मोजण्याचे एक माप आहे.''

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{\text{मागणीच्या परिमाणातील सापेक्ष बदल}}{\text{वस्तूच्या किंमतीतील सापेक्ष बदल}}$$

$$\text{Price Elasticity} = \frac{\text{relative change in quantity}}{\text{relative change in price}}$$

**किंमत लवचिकतेचे प्रकार :**

मागणीच्या किंमत लवचिकतेचे पुढील विविध प्रकार पडतात.
1) पूर्ण लवचिक मागणी (Perfectly Elestic Demand)



2) संपूर्ण अलवचिक मागणी (Perfectly in Elestic Demand)
3) एकक लवचिक मागणी (Unit Elastic Demand)
4) एककापेक्षा जास्त लवचिक मागणी (Elastic Demand)
5) एककापेक्षा कमी लवचिक मागणी (Less Elastic Demand)

**1) पूर्ण लवचिक मागणी (Perfectly Elestic Demand) :**

वस्तूच्या किंमतीत थोडा जरी बदल झाला तरी वस्तूच्या मागणीत होणाऱ्या बदलाचे प्रमाण जेव्हा अगणिक असते तेव्हा ती संपूर्ण लवचिक मागणी असते अशा वेळी मागणी वक्र OX अक्षाला समांतर स्वरूपाचा असतो.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर मागणी तर OY अक्षावर वस्तूची किंमत दर्शविण्यात आलेली आहे. आकृतीत DD हा मागणी वक्र OX अक्षाला समांतर आहे. अशा वेळी वस्तूची किंमत थोडी जरी वाढली तरी मागणी शून्य नगावर येते.

**2) संपूर्ण अलवचिक मागणी (Perfectiy in Elestic Demand) :**

भिन्न भिन्न किंमतपातळीला वस्तूची मागणी जेव्हा स्थिर राहते तेव्हा त्याला संपूर्ण अलवचिक मागणी असे म्हणतात. वस्तूच्या किंमतीत कितीही वाढ झाली किंवा वस्तूच्या किंमतीत कितीही घट झाली तरी मागणी स्थिर असते तेव्हा त्याला संपूर्ण अलवचिक मागणी असे म्हणतात. अशा वेळी मागणीवक्र OY अक्षाला समांतर स्वरूपाचा असतो.




सोबतच्या आकृतीत वस्तूची किंमत OP असताना मागणी OM एवढी आहे. जर वस्तूच्या किंमतीत P पासून $P_2$ पर्यंत वाढ झाली तर मागणी OM एवढी स्थिर असते. तसेच वस्तूची किंमत OP असताना मागणी P पासून $P_1$ पर्यंत कमी झाली तर मागणी OM एवढी स्थिर असते थोडक्यात किंमतीत बदलाला मागणी कसलाच प्रतिसाद देत नाही अशा वेळी मागणी संपूर्ण अलवचिक असते.

**3) एकक लवचिक (Unit Elastic Demand e=1) :**

वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या बदलाचे प्रमाण आणि त्यामुळे वस्तूच्या मागणीत होणाऱ्या बदलाचे प्रमाण जेव्हा सारखे असते तेव्हा ती एकक लवकचिता असते. अशा लवचिकतेचे उत्तर नेहमी एक येते.

उदा. वस्तूच्या किंमतीत 20% नी वाढ झाली. तर वस्तूला असलेली मागणी सुद्धा 20% नी कमी होते. सूत्र स्वरूपात मागणीची लवचिकता पुढीलप्रमाणे

$$\text{मागणीची लवचिकता} = \frac{\text{मागणीतील बदलाचे प्रमाण}}{\text{वस्तूच्या किंमतीतील बदलाचे प्रमाण}}$$



$$\text{मागणीची लवचिकता} = \frac{20\%}{20\%} = 1$$

मागणीच्या लवचिकतेचे उत्तर एक आल्यामुळे मागणीची लवचिकता एकक आहे. हे विश्लेषण खालील आकृतीच्या साह्याने स्पष्ट केलेले आहे.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर वस्तूची मागणी तर OY अक्षावर वस्तूची किंमत दर्शविण्यात आलेली आहे. आकृतीत DD हा मागणी वक्र असून वस्तूची किंमत $OP_1$ असताना मागणी $OM_1$ एवढी आहे जर $P_1$ पासून P पर्यंत वस्तूची किंमत वाढली तर मागणी $M_1$ पासून M पर्यंत कमी होते. P ते $P_1$ व M ते $M_1$ हे अंतर सारखेच असल्यामुळे मागणीची लवचिकता एकक आहे.

**4) मागणीची लवचिकता एककापेक्षा जास्त (e>I)**
**(Elastic greter than One) :**

वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या बदलाच्या प्रमाणापेक्षा मागणीत होणाऱ्या बदलाचे प्रमाण जेव्हा जास्त असते तेव्हा मागणीची लवचिकता एककापेक्षा जास्त आहे असे म्हणतात.

उदा. वस्तूच्या किंमतीत 10% घट झाल्यामुळे वस्तूच्या मागणीत 20% नी वाढ होते. अशा वेळी मागणीची लवचिकता एककापेक्षा जास्त आहे असे म्हणतात.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर वस्तूची मागणी तर OY अक्षावर वस्तूची किंमत दर्शविण्यात आलेली आहे. DD हा मागणी वक्र काढलेला आहे. वस्तूची किंमत OP असताना वस्तूला असलेली मागणी OM इतकी आहे. जर P पासून $P_1$ पर्यंत किंमत कमी झाली तर मागणी M पासून $M_1$ पर्यंत वाढते. P ते $P_1$ या अंतरापेक्षा M ते $M_1$ हे अंतर जास्त असल्यामुळे मागणीची लवचिकता एककापेक्षा जास्त आहे.

**5) मागणीची लवचिकता एककापेक्षा कमी (e<l)**

**(Elastic Less than One) :**

वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या बदलाच्या प्रमाणापेक्षा मागणीत होणाऱ्या बदलाचे प्रमाण तेव्हा कमी असते. तेव्हा त्याला मागणीची लवचिकता एककापेक्षा कमी आहे असे म्हणतात.

उदा. वस्तूच्या किंमतीत 10% घट झाल्यामुळे वस्तूच्या मागणीत 5% नी वाढ होते. अशा वेळी मागणीची लवकचिकता एककापेक्षा कमी आहे असे म्हणतात.






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर वस्तूची मागणी तर OY अक्षावर वस्तूची किंमत दर्शविण्यात आलेली आहे. DD हा मागणी वक्र काढलेला आहे. वस्तूची किंमत OP असताना मागणी OM इतकी आहे. जर P पासून $P_1$ पर्यंत वस्तूची किंमत कमी झाली तर मागणी M पासून $M_1$ पर्यंत वाढते. P ते $P_1$ या अंतरापेक्षा M ते $M_1$ हे अंतर कमी असल्यामुळे मागणीची लवेचिकता एककापेक्षा कमी आहे.

अशा प्रकारे मागणीच्या किंमत लवचिकतेचे विविध प्रकार आहेत.

**किंमत लवचिकतेच्या मापनाच्या पद्धती :**

मागणीच्या किंमत लवचिकतेचे मापन करण्याच्या काही प्रमुख पद्धती पुढील प्रमाणे आहेत.

**1) एकूण खर्च पद्धती (Total Qutlay method) :**

एकूण खर्च पद्धत ही डॉ. मार्शलच्या नावाशी संबंधित आहे. या पद्धतीनुसार वस्तूवर होणाऱ्या खर्चात जो बदल होतो. त्यावरून मागणीची लवचिकता मोजता येते.

**1) एकक लवचिकत मागणी (e=1)**

वस्तूच्या किंमतीत बदल झाल्यावर मागणीत अशा प्रकारचा बदल होतो की त्या वस्तुवर होणारा एकूण खर्च स्थिर राहतो. अशा वेळी मागणीची लवचिकता एकक असते.

| **वस्तुची किंमत** | **वस्तूचे खरेदी नग** | **खरेदीवर होणारा एकूण खर्च** | **मागणीची लवचिकता** |
|---|---|---|---|
| 2 रु | 12 नग | 24 रुपये | e=1 |
| 3 रु | 8 नग | 24 रुपये | |
| 4 रु | 6 नग | 24 रुपये | |

सोबतच्या तालीकेत वस्तुची किंमत 2 रुपये असताना उपभोक्ता 12 नग खरेदी करतो. यावेळी वस्तूवर होणारा एकूण खर्च 24 रुपये एवढा स्थिर आहे. समजा वस्तूची किंमत 2 रूपये वरून 3 रुपये झाली तर उपभोक्ता फक्त 8 नग खरेदी करतो यावेळी वस्तुवर होणारा एकूण खर्च 24 रुपये एवढा स्थिर आहे. समजा वस्तूची किंमत 4 रुपये झाली तर उपभोक्ता वस्तूचे 6 नग खरेदी करतो यावेळी वस्तुवर होणारा एकूण खर्च 24 रुपये इतका स्थिर आहे. थोडक्यात वाढत्या वस्तूच्या किंमती बरोबर एकूण खर्च स्थिर आहे यावेळी मागणीची लवचिकता एकक आहे.

**2) एककापेक्षा जास्त लवचिकता (e>1) :** वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या बदलाच्या विरुद्ध दिशेने एकूण खर्चात बदल होत असेल तर मागणीची लवचिकता एककापेक्षा जास्त असते.

| **वस्तुची किंमत** | **वस्तूचे खरेदी नग** | **खरेदीवर होणारा एकूण खर्च** | **मागणीची लवचिकता** |
|---|---|---|---|
| 1 | 30 | 30 | e>1 |
| 2 | 10 | 20 | |
| 4 | 04 | 16 | |

सोबतच्या तालीकेत वस्तूची किंमत 1 रुपये असताना वस्तूचे उपभोक्ता 30 नग खरेदी करतो. यावेळी खरेदी वर होणारा एकूण खर्च 30 रुपये इतका



आहे. समजा वस्तूची किंमत 2 रुपये झाली तर उपभोक्ता वस्तूचे 10 नग खरेदी करतो. यावेळी खरेदीवर होणारा एकूण खर्च 20 रुपये इतका आहे. समजा वस्तूची किंमत 4 रुपये झाली तर उपभोक्ता 04 नग खरेदी करतो. यावेळी खरेदीवर होणारा खर्च 16 रुपये इतका कमी होतो.

**3) एककापेक्षा कमी लवचिकता** (e<1) **:** वस्तूच्या किंमतीतील बदलाच्या समदिशेने एकूण खर्चात बदल होत असेल तर मागणीची लवचिकता एककापेक्षा कमी असते.

| **वस्तुची किंमत** | **वस्तूचे खरेदी नग** | **खरेदीवर होणारा एकूण खर्च** | **मागणीची लवचिकता** |
|---|---|---|---|
| 1 रु | 100 | 100 | e<1 |
| 2 रु | 60 | 120 | |
| 50 पैसे | 150 | 75 | |

सोबतच्या तालीकेत वाढत्या वस्तूच्या किंमतीबरोबर एकूण खर्च वाढतो आहे तर घटत्या वस्तूच्या किंमतीबरोबर एकूण खर्च कमी होतो आहे. हे विश्लेषण खालील आकृतीच्या साह्याने स्पष्ट केलेले आहे.



वस्तूची मागणी OX अक्षावर तर वस्तूची किंमत OY अक्षावर दर्शविण्यात आलेली आहे. DD हा मागणी वक्र दर्शविलेला आहे. आकृतीतील DA हा भाग मागणीची लवचिकता (e>1) एककापेक्षा जास्त आहे हे दर्शवितो. आकृतीतील AB हा भाग मागणीची लवचिकता एकक दर्शवितो. तर आकृतीतील BD हा भाग मागणीची लवचिकता एककापेक्षा कमी आहे हे दर्शवितो.

**2) शेकडेवारी पद्धत किंवा गुणोत्तर पद्धत (Percentage Method) :**

वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या शेकडा बदलामुळे मागणीत होणाऱ्या शेकडा बदलाशी असलेले प्रमाण म्हणजे शेकडेवारी पद्धत होय किंवा या पद्धतीला गुणोत्तर पद्धत असे म्हणतात ही पद्धत प्रा. प्लक्स यानी शोधून काढली या पद्धतीत मागणीची लवचिकता मोजण्यासाठी पुढील सुत्राचा वापर केला जातो.

$$\text{मागणीची लवचिकता} = \frac{\text{मागणीतील शेकडा बदल}}{\text{वस्तूच्या किंमतीतील शेकडा बदल}}$$

**1) एकक लवचिकता :** किंमतीतील शेकडा बदल व मागणीतील शेकडा बदल समान असेल तर मागणीची लवचिकता एकक राहील समजा अ ही वस्तू आहे. अ वस्तूची किंमत 10% नी वाढल्यामुळे अ ची मागणी 10% नी कमी होत असेल तर मागणीची लवचिकता एकक आहे.

**2) एककापेक्षा जास्त लवचिक मागणी :** किंमतीतील शेकडा बदलाच्या प्रमाणापेक्षा मागणीतील बदलाचे शेकडा प्रमाण जास्त असेल तर त्याला एककापेक्षा जास्त लवचिक मागणी असे म्हणतात. समजा किंमतीतील बदल शेकडा 10% आहे व त्यामुळे मागणीतील शेकडा बदल 20% आहे. तर अशावेळी लवचिकतेचे उत्तर 2 येते म्हणून लवचिकता एककापेक्षा जास्त आहे.

**3) एककापेक्षा कमी लवचिक मागणी :** किंमतीतील शेकडा बदलापेक्षा मागणीतील शेकडा बदल कमी असेल तर मागणीची लवचिकता एककापेक्षा कमी असेल. समजा किंमतीतील बदल शेकडा 10 असून मागणीतील बदल शेकडा 5 असल्यास लवचिकता एककापेक्षा कमी आहे असे म्हणता येईल.



**4) कमाल लवचिकता (Arch elasticity Method) :**

मागणीची लवचिकता मोजण्याची एक पद्धत म्हणजे कमाल लवचिकता होय. प्रा. बॉमल या अर्थशास्त्रज्ञाने सर्वप्रथम ही पद्धत वापरली. ह्या पद्धतीत लवचिकता मोजण्यासाठी पुढील सूत्र वापरले जाते.

$$\text{मागणीची लवचिकता} = \frac{\dfrac{\text{मागणीतील बदल}}{\text{मुळ मागणी + नवीन मागणी}}}{\dfrac{\text{किंमतीतील बदल}}{\text{मुळ किंमत + नवीन किंमत}}}$$

समजा वस्तूची मूळ किंमत 8 रुपये प्रतिनग असताना 100 नगाची मागणी असते. किंमतीत घट होवून ती 6 रुपये झाल्यावर मागणी 110 नगाची झाली मागणी लवचिकता पुढीलप्रमाणे असेल.

$$Q_P = \frac{100-110}{100+110} \div \frac{8-6}{8+6}$$

$$Q_P = \frac{10}{210} \div \frac{2}{14}$$

$$Q_P = \frac{10}{210} \times \frac{14}{2}$$

$$Q_P = \frac{140}{420}$$

$$Q_P = \frac{14}{42}$$

$$Q_P = 1/3$$

लवचिकता 1 पेक्षा कमी आहे.

**4) सीमांत प्राप्ती पद्धती (Marginal Revenue Method) :**

एक जादा नग विकल्यामुळे एकूण प्राप्तीत जी भर पडते तिला सीमांत प्राप्ती असे म्हणतात.

अ) किंमतीत बदल झाल्यामुळे सीमांत प्राप्ती शून्य होत असेल तर मागणीची लवचिकता एकक समजावी.

ब) जर सीमांत प्राप्ती शून्यापेक्षा जास्त असेल तर म्हणते धनात्मक असेल तर लवचिकता एकक्रापेक्षा जास्त असते.

क) जर सीमांत प्राप्ती शून्यापेक्षा कमी असेल तर ऋणात्मक होत असेल तर लवचिकता कमी असते.

| विक्री नगसंख्येत | किंमत | एकूण प्राप्ती (रुपये) | सीमांत प्राप्ती | मागणीची लवचिकता |
|---|---|---|---|---|
| अ) 8 नग<br>10 नग | 20<br>16 | 160<br>160 | 160-160<br>= 0 | e = 1 |
| ब) 8 नग<br>10 नग | 20<br>17 | 160<br>170 | 170-160<br>= 10 | e > 1 |
| क) 8 नग<br>10 नग | 20<br>15 | 160<br>150 | 160-160<br>=-10(उणे दहा) | e < 1 |

वरील तालीकेत सीमांत प्राप्ती शून्य असताना लवचिकता एकक आहे. सीमांत प्राप्ती 10 रुपये असताना मागणीची लवकिचता एककापेक्षा जास्त आहे सीमांत प्राप्ती (-10) रुपये असताना मागणीची लवचिकता एककापेक्षा कमी आहे.

**5) भूमितीय पद्धत किंवा बिंदू रेषा मापन पद्धत :**

भूमितीय पद्धत किंवा बिंदूमापन पद्धत ही डॉ. मार्शल यांनी वापरली जर ‘ mlUr dH$gai abmAgZ B आणि A अक्षाला छेदीत असेल किंवा स्पर्श करीत असेल तर या वक्रावरील कोणत्याही बिंदूच्या लवेचिकतेचे मापन पुढील सूत्राने करता येतो.






$$\text{मागणीची लवचिकता} = \frac{\text{विचारलेल्या बिंदूपासून मागणी वक्राच्या खालच्या टोकापर्यंतचे अंतर}}{\text{विचारलेल्या बिंदूपासून मागणी वक्राच्या वरच्या टोकापर्यंतचे अंतर}}$$

1) C बिंदूची लवचिकता $= \frac{CB}{CA}$

CB हे अंतर CA या अंतर एक सारखे असल्यामुळे मागणीची लवचिकता एकक आहे.

2) D बिंदूची लवचिकता $= \frac{DB}{DA}$

AD या अंतरापेक्षा DB हे अंतर जास्त असल्यामुळे मागणीची लवचिकता एककापेक्षा जास्त आहे.

3) e बिंदूची लवचिकता $\frac{eB}{eA}$

eB या अंतरापेक्षा eA हे अंतर जास्त असल्यामुळे मागणीची लवचिकता एककापेक्षा कमी आहे.

वरीलप्रमाणे भूमितीय पद्धत किंवा बिंदू मापन रेषा पद्धती आधारे मागणीच्या लवचिकतेचे मोजमाप केले जाते.

**2) उत्पन्न लवचिकता (Income Elasticities of Demand) :**

वस्तूची किंमत स्थिर असताना व्यक्तीच्या उत्पन्नात बदल झाला की वस्तूच्या मागणीत बदल होतो. या बदलाचा अभ्यास मागणीच्या उत्पन्न लवचिकेत केला जातो. या लवचिकतेत मागणीची उत्पन्न लवचिकता मोजण्यासाठी पुढील सुत्राचा वापर केला जातो.

$$\text{मागणीची उचल लवचिकता} = \frac{\text{मागणीतील शेकडा बदालाचेप्रमाण}}{\text{उत्पन्नातील शेकडा बदलाचे प्रमाण}}$$

$$ep = \frac{\Delta D}{\Delta I}$$

**1) शून्य उत्पन्न लवचिकता :** उत्पन्नात वाढ किंवा घट होवून ही मागणी पूर्ववत स्थिर राहत असेल तर तिला शून्य उत्पन्न लवचिकता असे म्हणतात. उदा. मीठ

**2) ऋणात्मक उत्पन्न लवचिकता :** उत्पन्नात वाढ होऊन ही वस्तुच्या मागणीत मोठ्या प्रमाणात घट होत असेल तर तिला ऋणात्मक उत्पन्न लवचिकता असे म्हणतात. उदा. हलक्या किंवा गिफेन वस्तू.

**3) एककापेक्षा जास्त उत्पन्न लवचिकता :** उत्पन्नातील अल्प बदलामुळे मागणीत जास्त बदल होत असेल तर तिला एककापेक्षा जास्त उत्पन्न लवचिकता म्हणतात.

**4) एकक उत्पन्न लवचिकता :** उत्पन्नात जेवढा बदल होतो. तेवढाच बदल मागणीत होत असेल तर त्याला एकक उत्पन्न लवचिकता म्हणतात.

**5) एककापेक्षा कमी उत्पन्न लवचिकता :** उत्पन्नातील बदलाच्या तुलनेत मागणीत होणारा बदल कमी असेल तर तिला एकाकापेक्षा कमी उत्पन्न लवचिकता म्हणतात.

**3) मागणीची तिरकस किंवा अन्योन्य लवचिकता**
**(Cross elasticities) :**

एका वस्तुच्या किंमतीतील बदलाला दुसऱ्या वस्तूच्या मागणीतील बदलाचा जो प्रतिसाद मिळतो त्याला मागणीची तिरकस लवचिकता असे म्हणतात.

$$\text{मागणीची तिरकस लवचिकता} = \frac{\text{X वस्तूच्या मागणतील बदलाचे शेकडा प्रमाण}}{\text{Y वस्तूच्या किंमतीतील बदलाचे शेकडा प्रमाण}}$$

**तिरकस लवचिकतेचे प्रकार :**

**1) स्वतंत्र वस्तू :** जर दोन वस्तू भिन्न प्रकारच्या गरजा भागवित असतील तर त्याना स्वतंत्र वस्तु म्हणतात. उदा. टि.व्ही आणि कापड कापडाच्या किंमती वाढण्याचा किंवा घटण्याचा टी.व्ही. च्या मागणीवर काहीही परिणाम होत नसतो. म्हणून वरील सूत्राप्रमाणे अशा स्वतंत्र वस्तूबाबत तिरकस लवचिकता शून्य असते.



**2) पर्यायी वस्तू :** एका ऐवजी दुसरी वस्तू वापरून जर एकच गरज भागविता येत असेल तर अशा वस्तूना पर्यायी वस्तू म्हणतात. उदा. चहा व कॉफी चहाची किंमत वाढली तर कॉफीला मागणी वाढते. म्हणूनच परस्पर पर्यायी वस्तूच्या बाबतीत मागणीची तिरकस लवचिकता धनात्मक असते. अशा वस्तूच्या मागणीचा वक्र सुद्धा धनात्मक आकाराचा असतो.

**3) पुरक वस्तु :** जर दोन किंवा अधिक वस्तूचा संयुक्तपणे वापर करून एकच गरज भागविता येत असेल तर अशा वस्तूना फरक वस्तू म्हणतात. उदा. पेट्रोल व स्कुटर या वस्तू परस्पराला पुरक आहेत. पेट्रोलची किंमत वाढल्यास स्कुटरच्या किंमती कायम राहुन स्कुटरची मागणी घटते. अशा वस्तू संदर्भात मागणीची उत्पन्न लवचिकता शून्या पेक्षा कमी आढळते.

**4) प्रतिस्थापन लवचिकता :** ही लवचिकता केवळ पर्यायी वस्तू संदर्भात वापरली जाते. एका वस्तूऐवजी दुसऱ्या वस्तूचे प्रतिस्थापन किती प्रमाणावर करता येते हे दर्शविते. जर दोन वस्तू परस्परांना पुर्ण पर्यायी असतील तर प्रतिस्थापन लवचिकता अंनत असते. दोन वस्तू पर्यायी म्हणून वापरता येत नसतील तर लवचिकता शून्य असते. जर दोन वस्तू परस्परांना पूर्ण पर्यायी नसून काही प्रमाणात पर्यायी असतील तर प्रतिस्थापन लवचिकता शून्य किंवा अंनतच्या दरम्यान असते.

**मागणीची लवचिकता ठरविणारे घटक :**

मागणीची लवचिकता खालील विविध घटकावर अंवलबून असते.

**1) वस्तूचे वर्गीकरण :** वस्तूच्या वर्गीकरणावर मागणीच्या लवचिकतेचे स्वरूप अंवलबून असते. जीवनावश्यक वस्तूची मागणी अलवचिक तर चैनिच्या वस्तूची मागणी कमी लवचिक असते.

**2) पर्यायी वस्तूची उपलब्धता :** वस्तूला पर्याय उपलब्ध असेल तर मागणी अलवचिक मात्र वस्तूला पर्याय नसेल तर मागणी अलवचिक असते.

**3) टिकाऊ व नांशवत वस्तू :** टिकाऊ वस्तूला मागणी लवचिक तर नांशवत वस्तूला मागणी अलवचिक असते.

**4) सवयीच्या वस्तू :** सवयीच्या वस्तूला मागणी कमी लवचिक असते.

**5) विविध उपयोगी वस्तू :** वस्तूचे अनेक उपयोग असतील तर मागणी जास्त लवचिक असते.

**6) विविध उपयोगी वस्तू :** वस्तूचे अनेक उपयोग असतील तर मागणी जास्त लवचिक असते.

**7) पुरक वस्तू :** पुरक वस्तूला असलेली मागणी कमी लवचिक असते

**8) वस्तूचा वापर पुढे ढकलण्याची शक्यता :** ज्या वस्तूचा उपभोग पुढे करता येत नाही अशा वस्तूला मागणीची लवचिकता कमी असते.

**9) प्रतिष्ठेच्या वस्तू :** समाजात प्रतिष्ठा वाढविणाऱ्या वस्तूची मागणी कमी लवचिक असते.

**10) किंमतपातळी :** महाग वस्तूची मागणी जास्त लवचिक तर कमी किंमतपातळी असणाऱ्या वस्तूंची मागणी कमी लवचिक असते.

**11) उत्पन्नपातळी :** जास्त उत्पन्नपातळी असणाऱ्या श्रीमंतांसाठी वस्तूची मागणी कमी लवचिक तर कमी उत्पन्न पातळी असणाऱ्या गरीबासाठी ती जास्त लवचिक आढळते.

**12) कालावधी :** दीर्घकाळामध्ये वस्तूची मागणी अधिक लवचिक तर अल्पकाळात ती कमी लवचिक आढळते.

**13) खर्चाचे उत्पन्नाशी प्रमाण :** वस्तूवर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण जास्त असेल तर मागणी जास्त लवचिक याउलट खर्चाचे उत्पन्नाशी असलेले प्रमाण जर फारच कमी असेल तर मागणी कमी लवचिक असते.

**14) भविष्यकाळातील किंमती :** लोक भविष्यकाळात किंमती कमी होतील अशी अपेक्षा असतील तर अशा वस्तूंना मागणी कमी लवचिक राहील.

**15) सरकारी नियमने :** सरकारची नियमने ज्या वस्तूवर असतात अशा वस्तूची मागणी कमी लवचिक असते.

**16) राहणीमानाचा दर्जा :** उच्च राहणीमानाचा दर्जा असणाऱ्या समाजाची मागणी कमी लवचिक तर निम्न राहणीमानाचा दर्जा असणाऱ्या मागणी जास्त लवचिक आढळते.

वरील विविध घटकावर मागणीची लवचिकता अंवलंबून असते.



**मागणीच्या लवचिकतेचे महत्त्व :**

मागणीच्या लवचिकतेचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे.

**1) मक्तेदाराला उपयोगी :** मक्तेदार अलवचिक मागणी असणाऱ्या वस्तूची किंमत जास्त ठेवून जास्त नफा प्राप्त करतो. याउलट लवचिक मागणी असणाऱ्या वस्तूची किंमत जास्त वाढविता येत नाही. थोडक्यात किंमत निर्धारणात मक्तेदाराला मागणीची लवचिकता उपयोगी ठरते.

**2) कर आकारणीसाठी :** अलवचिक मागणी असणाऱ्या वस्तूवर अधिक कर लावून अधिक महसुली उत्पन्न प्राप्त करता येते याउलट कमी लवचिक मागणीवर जास्त कर आकारणी करता येत नाही.

**3) उत्पादन घटकाचे मोबदले देताना :** मागणीची लवचिकता उत्पादन घटकाचे मोबदले देताना उपयोगी ठरते मजुराची मागणी अलवचिक असेल तर कामगार संघटना वाढीव वेतनाची मागणी पूर्ण करून घेवू शकतात. याउलट मजुराची मागणी लवचिक असेल तर कामगार संघटना वेतन वाढवून घेण्यात अयशस्वी होतात.

**4) आंतरराष्ट्रीय व्यापारात उपयोगी :** मागणीची लवचिकता आंतरराष्ट्रीय व्यापारात उपयोगी ठरते उदा. अलवचिक मागणी असणाऱ्यावर अधिक प्रशुल्क आकारणी करता येते.

**5) आर्थिक धोरण ठरविताना उपयोगी :** आर्थिक धोरण ठरविताना मागणीची लवचिकता उपयोगी ठरते. सरकार या संकल्पनेचा वापर करून तेजीमंदीच्या प्रकोपावर नियंत्रण ठेवू शकेल.

वरील विविध उपयोग मागणीच्या लवचिकतेचे आहेत.

**मागणी फलन :**

काही आर्थिक घटक स्वतंत्र तर काही आर्थिक घटक हे विसबित असतात. जे आर्थिक घटक इतर आर्थिक घटकावर अंवलबून असतात त्याना विसंबित तर जे आर्थिक घटक इतर आर्थिक घटकात बदल करू शकतात त्याना स्वतंत्र घटक असे म्हणतात.

मागणी हे किंमतीचे मुलन आहे. यात मागणी हा आर्थिक घटक विसंबित असून तो किंमतीवर अंवलबून आहे.तर किंमत हा आर्थिक घटक

मागणी या आर्थिक घटकात बदल घडवून आणतो म्हणून हा आर्थिक घटक स्वतंत्र आहे. हे फलन पुढील प्रमाणे मांडता येईल.

$$D = f(P)$$

D = Demand

f = function

p = Price

मागणी ही किंमतीवर अंवलबून आहे.

किंमत व मागणी यात संबंध दर्शविणारी दोन प्रकारची मागणी निष्पती असते.

**1) रेषीय मागणी निष्पत्ती :** मागणी वक्राचा उतार संपूर्ण वक्राच्या लांबीमध्ये जर पूर्णत: स्थिर राहत असेल तर ती रेषीय मागणी निष्पत्ती असते. हा वक्र खालील प्रमाणे असतो.




वरील आकृतीत काढलेला मागणी वक्र रेषीय मागणी वक्र आहे.

**2) अरेषीय मागणी निष्पत्ती :** मागणी निष्पत्ती अरेषीय असल्याच्या स्थितीत मागणी वक्राचा उतारा संपूर्ण मागणी वक्राच्या बाबतीत बदलत जातो.

हा वक्र खालील आकृतीत दर्शविल्या प्रमाणे असतो.






सोबतच्या आकृतीत काढलेला मागणीवक्र अरेषीय मागणी वक्र आहे.

**पुरवठा (Supply) :**

पुरवठा ही एक अर्थशास्त्रातील एक महत्त्वाची संकल्पना आहे. वस्तूची किंमत निश्चित करताना ज्याप्रमाणे मागणी नियम महत्त्वाचा त्याप्रमाणे पुरवठा नियम ही महत्त्वाचा असतो. पुरवठा म्हणजे विशिष्ट किंमतीला विक्रेत्याने विक्रीस काढलेले वस्तूचे नग होय. पुरवठ्याच्या व्याख्या पुढीलप्रमाणे.

**1) प्रा. मेयर्स :** ''पुरवठा म्हणजे एका विशिष्ट वेळी अगर विशिष्ट कालखंडात निरनिराळ्या किंमतीना एका विशिष्ट वस्तूचे किती परिमाण पुरविले जातील याबाबतचा तक्ता होय.''

**2) प्रो. लिप्से :** ''पुरवठा म्हणजे उत्पादक विशिष्ट वस्तूंचे किती नग विक्रीसाठी आणण्यास समर्थ आणि तयार आहे.''

थोडक्यात पुरवठा म्हणजे वस्तूची विशिष्ट किंमत असताना त्या वस्तूची पुरविली जाणारी नगसंख्या होय.

**पुरवठा व साठा :**

वस्तुचा साठा व प्रवाह यात फरक आहे. साठा म्हणजे वस्तूचे विक्रीयोग्य परिणाम होय. तर पुरवठा म्हणजे उत्पादक किंवा विक्रेता विशिष्ट वेळी विशिष्ट किंमत पातळीला एकाद्या वस्तूचे जेवढे नग विकण्यास तयार असतो तेव्हा त्याला त्या वस्तूचा पुरवठा म्हणतात.

**राखीव किंमत :**

राखीव किंमत ही पुरवठ्याच्या सिद्धांताचा पाया आहे. राखीव किंमत म्हणजे प्रत्येक उत्पादक किंवा विक्रेता आपल्या वस्तूची मनात एक किंमत निश्चित करतो या किंमतीपेक्षा कमी किंमतीला तो आपली वस्तू विकत नाही. या किमान किंमतीस राखीव किंमत म्हणतात. वस्तूच्या राखीव किंमतीवर वस्तूचा टिकाऊपणा, साठविण्याचा खर्च, रोख रकमेची गरज, अपेक्षित विक्री खर्च, किंमत व मागणी वाढण्याची शक्यता, बाजारातील परिस्थिती, तात्पुरती टंचाई, विक्रेत्याची इच्छा नवा पुरवठा बाजारात येण्याची शक्यता इत्यादी घटक प्रभाव टाकतात.

**पुरवठ्याचा नियम (Law of Supply) :**

प्रत्येक विक्रेत्याचा उद्देश जास्तीत जास्त नफा प्राप्त करणे असतो. म्हणून प्रत्येक विक्रेता जास्त किंमतीला वस्तूचा जास्त पुरवठा करतो. याउलट कमी किंमतीला वस्तूचा कमी पुरवठा करतो याउलट कमी किंमतीला वस्तूचा कमी पुरवठा करतो. थोडक्यात वस्तूची किंमत व वस्तूचा पुरवठा यात धन संबंध असतो.

''इतर परिस्थिती स्थिर असता, एखाद्या वस्तूची किंमत वाढली असता त्या वस्तूचा पुरवठा वाढतो आणि किंमत कमी झाली असता तिचा पुरवठा कमी होतो.''

Other things remaining the same, as the Price of a commodity rises its supply is extended, as the Price falls its supply is contracted.

हे विश्लेषण खालील तक्त्याआधारे स्पष्ट केलेले आहे.

**गुळाचा पुरवठा**

| किंमत (रुपयात) | पुरवठा (नगरसंख्येत) किलो |
|---|---|
| 10 | 5 |
| 20 | 10 |
| 30 | 15 |
| 40 | 20 |
| 50 | 25 |



वरील तालीकेत गुळाची किंमत 10 रुपये असताना पुरवठा 5 किलो तर 20 रुपये किंमत झाली तर पुरवठा 10 किलो व किंमत 30 रुपये झाली पुरवठा 15 किलो व किंमत 40 रुपये झाली तर पुरवठा 20 किलो व किंमत 50 रुपये झाली तर पुरवठा 25 किलो ने वाढतो. थोडक्यात वाढत्या वस्तूचा किंमतीबरोबर वस्तूचा पुरवठा वाढतो.




**वस्तूचा पुरवठा**

सोबतच्या आकृतीत OX अक्षावर वस्तूचा पुरवठा तर OY अक्षावर वस्तूची किंमत दर्शविलेली आहे. SS हा वस्तूचा पुरवठा वक्र काढलेला आहे की ज्याचा उतार धनात्मक स्वरूपात आहे उजवीकडून डावीकडे उताराचा आहे. पुरवठ्याचा सिद्धांत खालील गृहीतकावर आधारित आहे.

**गृहितके :**

1) उपभोक्त्याच्या आवडी-निवडी व सवयी यामध्ये बदल होवू नये.
2) उपभोक्त्याच्या उत्पन्नात बदल होवू नये.
3) उत्पादन तंत्रात बदल होवू नये.

4) वस्तू उत्पादनाचा खर्च स्थिर आहे असे गृहीत धरलेले आहे.

5) ज्या वस्तूच्या संदर्भात पुरवठ्याचा नियम अभ्यासावयाचा आहे. त्या वस्तु संदर्भात पर्यायी वस्तुची किंमत स्थिर आहे असे गृहीत धरले आहे.

6) हवामानात बदल होता कामा नये.

7) उत्पादनासाठी आवश्यक घटकांचा पुरवठा नियमित असला पाहिजे.

8) सरकारचे अंदाजपत्रकीय धोरण (करविषयक धोरण) स्थिर असावे.

9) वस्तू उत्पादनासाठी आवश्यक असलेले उत्पादन घटक म्हणजे भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजक यांच्या किंमतीत बदल झाले नसले पाहिजेत.

वरील गृहितकावर वस्तुचा पुरवठा अंवलंबून असतो.

**पुरवठा नियमांचे अपवाद :** पुरवठा नियमाला पुढील अपवाद आहेत.

**1) नाशवंत वस्तु :** नाशवंत वस्तुचा साठा व पुरवठा यात फरक नसतो. नाशवंत वस्तूचा साठा करून ठेवता येत नाही किंमत कमी झाली तरी त्या विकाव्या लागतात. म्हणून नाशवंत वस्तू पुरवठ्याच्या सिद्धांताला अपवाद समजल्या जातात.

**2) भविष्यकालीन किंमतीचा अंदाज :** भविष्यकालीन किंमतीचा अंदाज पुरवठ्याच्या सिद्धांताला अपवाद समजला जातो. भविष्यात वस्तूची किंमत वाढण्याची अपेक्षा असल्यास विक्रेता किंमत वाढताना वस्तूचा पुरवठा वाढवीत नाही कारण किंमत वाढीमुळे भविष्यात नफा वाढु शकतो. याउलट भविष्यात किंमत कमी होण्याची अपेक्षा असते तेव्हा पुरवठा वाढतो. कारण भविष्यात नुकसान होण्याची शक्यता असते.

**3) विक्रेत्याला पैशाची गरज :** विक्रेत्याला पैशाची गरज असेल. तर तेव्हा कमी किंमतीलाही वस्तुंचा पुरवठा वाढतो. याचबरोबर उत्पादन जेव्हा एखादा उद्योग बंद करण्याचे निश्चित करतो तेव्हा किंमतीचा विचार करत नाही.

वरील विविध प्रकारच्या बाबी पुरवठा सिद्धांताला अपवाद समजल्या जातात.

**पुरवठा फलन (Supply function) :**

पुरवठा फलन ही एक अर्थशास्त्रातील महत्त्वाची संकल्पना आहे.



मागणी प्रमाणेच वस्तुचा पुरवठा हा वस्तूच्या किंमतीवर अंलवबून असतो. यात पुरवठा हा विसंवित घटक असून किंमत हा स्वतंत्र घटक आहे. किंमत या स्वतंत्र घटकात बदल झाल्यामुळे पुरवठा या विसंबित घटकाता बदल होतो. पुरवठ्याच्या नियमामध्ये इतर घटक स्थिर मानून किंमतीतील बदलामुळे पुरवठ्यात होणारा बदल स्पष्ट करून दोहोत समसंबंध असतो हा वक्र खालील आकृतीत दाखविल्याप्रमाणे असतो.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर वस्तूचा पुरवठा (नगसंख्येत) तर OY अक्षावर वस्तूची किंमत SS हा पुरवठा वक्र काढलेला आहे. SS हा पुरवठा वक्र काढलेला असून तो हा वक्र मागणी वक्राच्या अगदी विरुद्ध आहे. पुरवठा वक्र डावीकडून उजवीकडे वर चढत जाताना दिसतो. वरील आकृतीत पुरवठा वक्र हा सरळ रेषा (डावीकडून उजवीकडे ऊर्ध्वगामी) असून संपूर्ण वक्राच्या लांबीमध्ये वक्राचा उतार स्थिर राहतो. त्यावरून हे रेषीय पुरवठा निष्पत्तीचे विश्लेषण आहे.

■ ■ ■

# 5

# बाजार संतुलनाचे विश्लेषण

**प्रास्ताविक (Introduction) :**

अर्थशास्त्राला संतुलन विश्लेषणाचे शास्त्र म्हणतात. अर्थशास्त्रात अनेक संतुलनाचा अभ्यास केला जातो.

उदा. मागणी पुरवठ्याचे संतुलन, उत्पादकाचे संतुलन व उपभोक्त्याचे संतुलन. इंग्रजीमधील Eauilibrim मधील Eaual आणि Libra म्हणजे Balance अर्थात Eaual balance म्हणजे संतुलन या पद्धतीने ही संज्ञा तयार केलेली आहे.

**जॉर्ज स्टीगलरच्या मते :**

संतुलन म्हणजे अशी अवस्था की, ज्यात परस्पर विरुद्ध करणाऱ्या शक्ती अशाप्रकारे निष्प्रभ करीत असतात की, ज्या घटकावर या प्रवृत्ती कार्य करीत असतील त्या घटकांच्या अवस्थेत कोणत्याही बदल होत नाही.

**डॉ. मार्शल :** 'संतुलन म्हणजे निरनिराळ्या शक्तीचे साधे संतुलन आहे, ज्याचा समसंबंध लवचिक दोऱ्याने साधलेल्या दगडाव्या किंवा एकमेकांशी आधार घेतलेल्या चेंडूच्या, यांत्रिक संतुलनाशी आहे.

**प्रो. मेहता याच्या मते :** ''अर्थशास्त्रातील संतुलन हे हालचालीच्या बदलाचा अभाव दर्शविते, तर भौतिक शास्त्रात ते खुद्द हालचालीचीच अनुपस्थिती दर्शविते.

अर्थशास्त्रात अनेक संतुलनाचा अभ्यास केला जातो जसे मागणी पुरवठा संतुलन विशिष्ट किंमतपातळीला मागणी व पुरवठा एक दुसऱ्या बरोबर असताना मागणी पुरवठ्याचे संतुलन (बाजार संतुलन) निर्माण होते. तसेच विशिष्ट किंमतपातळीला उपभोक्त्याला खरेदी केलेल्या वस्तू पासून महत्तम समाधान प्राप्त होणारी स्थिती म्हणजे उपभोक्त्याचे संतुलन होय.



थोडक्यात अर्थशास्त्रात अनेक संतुलने अभ्यासली जातात म्हणून अर्थशास्त्राला संतुलन विश्लेषणाचे शास्त्र म्हणतात.

**संतुलनाचे प्रकार :**

निरनिराळ्या आधारावर संतुलनाचे प्रकार पडतात. ते पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) स्थायी, अस्थायी, उदासीन संतुलन :**

संतुलनाचे स्थायी अस्थायी व उदासीन हे तीन प्रकार पडतात.

**प्रो. ए.सी.पीगू याच्या मते :** जड नांगराने नांगरलेल्या जहाजास स्थायी संतुलन, एका टोकावर उभे केलेल्या अंड्यास अस्थायी संतुलन आणि आडवे ठेवलेल्या अंड्यास उदासीन संतुलन मानलेले आहे.

**प्रो. जोसेफ शुंपीटर** यांनी वाडग्यात (Bowl) ठेवलेला चेंडू हे स्थायी संतुलनाचे वाडगा, उपडा करून त्यावर ठेवलेला चेंडू हे अस्थायी संतुलनाचे आणि जमिनीवर ठेवलेला चेंडू हे उदासीन संतुलनाचे उदाहरण दिलेले आहे.

**1) स्थायी संतुलन :** एखादा, आर्थिक एकक संतुलनात असताना त्या संतुलनात व्यत्यय आणला असूनही जर त्या एककात मुळ संतुलनात परत येण्याची प्रवृत्ती असेल तर त्या संतुलनास स्थायी संतुलन म्हणतात.






सोबतच्या आकृतीत स्थायी संतुलन दर्शविलेले आहे. A आकृतीमध्ये A हा चेंडू विचलीत केला तरी तो मुळस्थितीत येईल आकृती B मध्ये OX अक्षावर मागणी पुरवठा तर OY अक्षावर किंमत दर्शविण्यात आलेली आहे DD हा मागणी तर SS हा पुरवठा वक्र असून E बिंदूच्या ठिकाणी P किंमत पातळीला ते एक दुसऱ्याबरोबर आहेत. कोणत्याही कारणाने यात व्यत्यय आला तर परत E बिंदुपाशी येवून हे संतुलन स्थिरावते.

**2) अस्थायी संतुलन :**

जेव्हा एखाद्या संतुलनात असलेल्या आर्थिक एककात व्यत्यय आणला असता त्याची मूळ संतुलनापासून दुरदूर जाण्याची प्रवृत्ती असते आणि मूळ संतूलनाकडे परत येण्याची मूळीच प्रवृत्ती नसते अशा संतुलनास अस्थायी संतुलन म्हणतात.







आकृती A मधील B हा चेंडू थोडा जरी विपलीत झाला तरी तो मूळस्थितीपासून सतत दूरदुर जाईल. तर आकृती B मधील E बिंदूच्या ठिकाणी निर्माण झालेले संतुलन आर्थिक कारणामुळे व्यत्यय आला तर मूळ संतूलनाकडे परत येण्याची प्रवृत्ती नसेल.

**3) उदासीन किंवा तटस्थत संतुलन :**

जेव्हा संतुलनात असलेल्या एककात व्यत्यय आला असताना तो एकक नवीन संतुलनाच्या ठिकाणी जातो व तेथेच स्थिर राहतो. तेव्हा असलेल्या संतुलनास उदासीन संतुलन म्हणतात.






आकृती क्र. 106

A आकृतीतील $NN_1$ व B आकृतीतील E ते $E_1$ संतुलन उदासीन संतुलन दर्शविते.

**ब) स्थितीशील संतुलन आणि गतिशील संतुलन :**

आर्थिक घटकात होणारे बदल दोन प्रकारे अभ्यासले जातात. यावरून संतुलनाचे दोन प्रकार पडतात.

**1) स्थितीशील संतुलन किंवा स्थैतिक संतुलन :**

इतर परिस्थिती आहे तशीच आहे किंवा स्थिर आहे असे गृहीत धरून जे अर्थशास्त्रीय सिद्धांत मांडले जातात त्याचा समावेश स्थितील अर्थव्यवस्थेत होतो. स्थैतिक संतुलन स्थिती ही ज्या घटनेचा परिणाम असेल त्या आर्थिक घटनेत (आकडेवारीत) बदलांचे अस्तित्व नसते अशा गृहितावर आधारित असते. थोडक्यात स्थैतिक अर्थव्यवस्थेत वस्तुची किंमत, उपभोक्त्याचे उत्पन्न आवडी-निवडी, मागणी पुरवठा लोकसंख्या इत्यादी बाबी स्थिर गृहीत धरल्या जातात.

**प्रा. बोल्डिंगच्या मते :** स्थितीशील संतुलनाशी तांत्रिक साम्यता दर्शविणारे उदाहरण म्हणजे एका विशिष्ट वेगाने सरकणारा चेंडू किंवा विशिष्ट गतीने धावणारी रेल्वे होय.

स्थैतिक अर्थव्यवस्थेत वर्षानुवर्षे तीच अवस्था आढळते त्यात बदल जाणवत नाहीत.

**2) प्रवैगिक संतुलन किंवा गतिशील संतुलन :**

इतर परिस्थिती बदल होतो. होणारे बदल लक्षात घेऊन जे अर्थशास्त्रीय सिद्धांत मांडले जातात त्याचा समावेश प्रवैगिक संतुलन किंवा गतिशील संतुलनामध्ये होतो. प्रो.जे. के. मेहता याच्या मते जेव्हा निश्चित काळानंतर संतुलन स्थितीत बिघाड होतो तेव्हा ते गतिशील संतुलन असते. परिस्थिती बदलल्यानंतर नव्या स्थितीत पुन्हा संतुलन निर्माण होते. तर प्रो. बोल्डिंगच्या मते, ''गतिशील अर्थव्यवस्थेत भांडवल, लोकसंख्येतील वाढीचा दर तसेच उत्पादन व उपभोग यातील वाढीचा दर तसेच उत्पादन व उपभोग यातील वाढीचा दर यात समानता असते.''

थोडक्यात प्रवैगिक संतुलनात अर्थव्यवस्था एका संतुलन अवस्थेपासून दुसऱ्या संतुलन अवस्थेकडे वाटचाल करते व अर्थव्यवस्था मूळ संतुलनाकडे कधीच येत नाही यालाच प्रवैगिक किंवा गतिशील संतुलन म्हणतात.

**क) आंशिक संतुलन आणि सामान्य संतुलन :**

**1) आंशिक संतुलन :**

आंशिक संतुलन संपूर्ण अर्थव्यवस्थेऐवजी अर्थव्यवस्थेतील विशिष्ट क्षेत्राच्या अगर घटकाच्या संतुलनाचा अभ्यास करते. आंशिक संतुलन हे एका व्यक्तीशी, एका उद्योगाशी एखाद्या उपभोक्त्याशी संबंधित आहे. या संतुलनाला सूक्ष्म किंवा अंशलक्ष्मी संतुलन असे म्हणतात.

प्रो. स्टिगलरच्या मते आंशिक संतुलन असे असते की, ते काही मर्यादित आकडेवारीवर आधारित असते याचे उदाहरण म्हणजे कोणत्याही एखाद्या वस्तुची किंमत आहे. जसे विवेचन काळात इतर वस्तूच्या किंमतीत बदल होत नाही असे गृहीत धरले जाते.

ही विश्लेषण पद्धती साधी व सोपी आहे. संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या संतुलनाच्या अभ्यास करण्याअगोदर आंशिक संतुलनाचा अभ्यास करावा लागतो. या संतुलनात इतर परिस्थिती स्थिर आहे असे गृहीत धरून विश्लेषण केले जाते.



**2) सामान्य संतुलन :**

आंशिक विश्लेषणाला पर्यायी म्हणून सामान्य संतुलनाचा विचार केला जातो. लिओन वांलरा व पॅरेटो यानी या संतुलन पद्धतीच्या वापरला सुरुवात केली. या संकल्पनेला परिशुद्ध करण्याचे कार्ये प्रो. रेगनर फ्रिच, टिंबरजेन हिक्स, सॅम्मुलसन, ओहलीन, गुन्नार मिरडाल इत्यादी अर्थशास्त्रज्ञानी केले. संपूर्ण अर्थव्यवस्थेचे एकत्रितरित्या एकाच वेळी विश्लेषण करण्याचे साधन या रूपात सामान्य विश्लेषणाची व्याख्या करता येईल. प्रो. लेफ्टवीचच्या मते, संपूर्ण अर्थव्यवस्था अशा वेळी सामान्य संतुलनाच्या स्थितीत असते की, जेव्हा अर्थव्यवस्थेतील सर्व एकक एकाचवेळी आपआपले आंशिक संतुलन प्राप्त करीत असतात. सामान्य संतुलनाची रचना सर्व आर्थिक एकक तसेच अर्थव्यवस्थेच्या सर्व अंगाच्या परस्परावरील अवलंबित्वावर भर देत असते. या पद्धतीचा वापर वालरा यांनी वस्तूची मागणी व पुरवठा याचे सामान्य संतुलन आणि मुल्यनिश्चिती क्रिया स्पष्ट केली आहे यात किंमतीवर परिणाम करणाऱ्या अनेक घटकाचे परस्परावलंबित्व स्पष्ट केले आहे. या पद्धतीमुळे अर्थव्यवस्थेचे वापरामुळे अशक्य प्राय अशी विवेचने या पद्धतीने शक्य करून दाखविली आहेत.

**संतुलनाचे महत्त्व :**

संतुलनाचे महत्त्व पुढील प्रमाणे विशद करता येईल.

**1) वैयक्तिक घटकाच्या दृष्टीने महत्त्व :** संतुलनाच्या माध्यमातून वैयक्तिक घटकाचे विश्लेषण केले जाते. उदा. उपभोक्ता, उत्पादक, उद्योगसंस्था इत्यादी हे घटक संतुलन साधण्याचा कशा प्रयत्न करतात व त्यात काय अडथळे येतात याचा अभ्यास संतुलनाच्या माध्यमातून करता येईल.

2) **आर्थिक घटकाची वर्तणुक अभ्यासता येते :** संतुलनाच्या माध्यमातून आर्थिक घटकाची वर्तणुक अभ्यासता येते. उदा. गतिशील संतुलनाच्या माध्यमातून आर्थिक घटकाचा अभ्यास करून काही भाकीते करता येतात.

**3) आर्थिक कल्याणाचा अभ्यास करताना उपयोगी :** संतुलनाच्या माध्यमातून महत्तम कल्याण साध्य करण्यासाठी साधन सामग्रीचा वितरण कसे असावे याबाबत मार्गदर्शन मिळते.

4) **किंमतीतील बदलाचे विश्लेषण :** वस्तुच्या किंमतीत होणाऱ्या बदलाचे विश्लेषण करता येते व त्याची कारणे शोधून काढता येतात.

5) **स्थिती अर्थशास्त्राला उपयोगी :** स्थिती अर्थशास्त्रात विविध सिद्धांत मांडत असताना इतर परिस्थिती स्थिर आहे असे गृहीत धरून अर्थशास्त्रीय सिद्धांत मांडले जातात. व विशिष्ट घटकातील संतुलनाचा अभ्यास केला जातो. स्थिर संतुलनाच्या अभ्यासातून स्थिती अर्थशास्त्राचे अधिक कोणत्या प्रकारे विश्लेषण करता येते.

6) **बाजारातील घटकासंदर्भात अनुमान :** संतुलनाच्या अभ्यासातून बाजारातील विविध घटकासंदर्भात अनुमान काढता येते. उदा. सरकारने विक्री करात बदल केला तर वस्तूच्या किंमतीवर काय परिणाम होतो याचे विश्लेषण संतुलनाच्या अभ्यासातून करता येते.

7) **सरकारच्या दृष्टीने महत्त्व :** सरकारला कर आकारणी व आर्थिक धोरणाची आखणी करताना संतुलन ही संकल्पना उपयोगी पडते.

8) **व्यावहारिक समस्याची सोडवणूक :** व्यावहारिक समस्याची सोडवणूक करण्यासाठी संतुलन ही संकल्पना उपयोगी ठरते.

वरील विविध दृष्टीने संतुलनाचे महत्त्व विशद करता येईल.

■ ■ ■



# 6

# उत्पादनाचे सिद्धांत

## (Theory of Production)

**प्रास्ताविक (Introduction) :**

सूक्ष्म अर्थशास्त्रात उपभोग, उत्पादन, बाजारपेठ व वितरण अशा टप्पातुन अभ्यास केला जातो. सूक्ष्म अर्थशास्त्रात उपभोगानंतर उत्पादनाचा अभ्यास केला जातो. उत्पादनाचे प्रामुख्याने भूमी, श्रम, भांडवल संयोजक हे चार घटक आहेत. या चार घटकाला अर्थशास्त्रात आदाने (input) हा शब्द वापरला जातो. या घटकाचा वापर करून वस्तु व सेवाचा वापर करून जे वस्तु व सेवाचे उत्पादन होते त्याला प्रधाने (output) असा शब्द वापरला जातो. आदान व प्रधान याच्यातील परस्पर संबंधाला उत्पादन फलन असे म्हणतात.

उपभोगासाठी उत्पादनाची आवश्यकता असते तेव्हा उत्पादन म्हणजे काय? हे पहाणे आवश्यक आहे. 'उत्पादन' या संदर्भात विविध अर्थशास्त्रज्ञाने वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आहेत. त्या व्याख्या त्याच्या शब्दात पुढीलप्रमाणे दिल्या आहेत.

**उत्पादनाच्या व्याख्या :**

1) **ॲडम स्थिमची व्याख्या :** ॲडम स्मिथ यांच्या मते, ''भौतिक वस्तुची निर्मिती म्हणजे उत्पादन होय.''

**दोष :** 1) टिकाकाराच्या मते मनुष्य कोणत्याही वस्तुची निर्मिती करू शकत नाही तसेच तो नष्ट करू शकत नाही.

2) ॲडम स्थिमची व्याख्या वस्तुच्या निर्मितीचा विचार मांडते पण वितरणाचा अभ्यास ही व्याख्या करत नाही.

2) **डॉ. मार्शलची व्याख्या :** डॉ. मार्शलच्या मते वस्तुमध्ये उपयोगितेची निर्मिती म्हणजे उत्पादन होय.''

**दोष :** डॉ. मार्शल यानी वस्तुच्या उपयोगितेचा विचार केला आहे. उपयोगितेबरोबर वितरणाचा अभ्यास किंवा विचार आवश्यक आहे.

3) **प्रो. मेयर्स :** प्रो. मेयर्स च्या मते वस्तु व सेवांच्या विनिमयार्थ केलेली कोणतीही क्रिया म्हणजे उत्पादन होय.

**उत्पादन फलन (Production Function) :**

उत्पादनाचे प्रामुख्याने भूमी, श्रम, भांडवल व संयोजक हे चार घटक आहेत. या चार घटकाना अनुक्रमे खंड, वेतन, व्याज व नफा हे मोबदले दिले जातात. या घटकाचा वापर करून अर्थव्यवस्थेत वस्तु व सेवाचे उत्पादन होते. अर्थशास्त्रात उत्पादन घटकाना आदाने (input) हा शब्द वापरला जातो तर या आदानाचा वापर करून जे उत्पादन होते त्याला प्रधाने हा शब्द वापरला जातो.

अर्थशास्त्रात आदान आणि प्रधान याच्यातील परस्पर संबंधाला उत्पादन फलन असे म्हणतात हा संबंध सुत्र स्वरूपात पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

P = F (a, b, c, d)

P = Production (उत्पादन)

F = Function (अवलंबुन असणे)

a, b, c, d = Production facor (उत्पादनाचे घटक)

**उत्पादन फलनाचे प्रकार (Types of Production fanction) :**

उत्पादन फलनाचे काळानुसार प्रामुख्याने दोन प्रकार पडतात 1) अल्पकालीन उत्पादन फलन 2) दीर्घकालीन उत्पादन फलन या दोन्ही फलनासंदर्भात विस्तृत विवेचन पुढीलप्रमाणे केलेले आहे.

**अल्पकालीन उत्पादन फलन/बदलत्या प्रमाणाचा नियम**

**(Law of variable Proportion) :**

अर्थशास्त्रात काळाचे प्रामुख्याने अल्पकाळ व दीर्घकाळ असे वर्गीकरण केले जाते. असे वर्गीकरण करण्याचे कारण म्हणजे उत्पादन घटक स्थिर व बदलते असे असतात. अल्पकाळात उत्पादन प्रक्रियेत संयोजकाला उत्पादनाच्या स्थिर घटकात बदल करता येत नाही. केवळ बदलत्या घटकाच्या नगसंख्येत वाढ अगर घट करून उत्पादनात वाढ अगर घट करता येते. दीर्घकाळात मात्र उत्पादनाच्या स्थिर व बदलत्या घटकात बदल करता येतो म्हणून दीर्घकाळात



कोणतेही घटक स्थिर नसतात. सर्व घटक बदलते असतात. अल्पकाळात उत्पादन प्रक्रियेत बदलत्या प्रमाणाचा नियम कार्यान्वित होतो. अल्पकाळात उत्पादनाचे स्थिर घटक स्थिर ठेवून बदलत्या घटकाच्या मात्रा सारख्या प्रमाणात वाढवत नेल्या तर त्याचा उत्पादनावर काय परिणाम होतो त्याचे विश्लेषण अल्पकालीन उत्पादन फलनाद्वारे किंवा बदलत्या प्रमाणाच्या नियमाआधारे केले जाते. बदलत्या प्रमाणाच्या नियमाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे केल्या आहेत.

**बदलत्या प्रमाणाच्या नियमाच्या व्याख्या :**

1) **स्टीगलर** : ''उत्पादनाचे काही घटक स्थिर ठेवून केवळ एका घटकांच्या प्रमाणात सारख्याच प्रमाणात वाढ करीत गेल्यास एका विशिष्ट मर्यादेपर्यंत उत्पादनात होणाऱ्या वाढीचे प्रमाण घटत जाते. म्हणते सीमांत उत्पादन घटते.''

2) **मेयर्सच्या मते** : 'जर एक किंवा अनेक उत्पादन घटक स्थिर ठेवून एक किंवा अनेक घटकांच्या प्रमाणात वाढ केली तर नेहमीच एकूण उत्पादन बदलत्या घटकाच्या प्रमाणात बदलणार नाही.''

3) **प्रा. सॅम्युलसन** : ''स्थिर साधनाच्या तुलनेत काही साधनांच्या संख्येत वाढ केल्याने उत्पादनात वाढ होते. परंतु एका मर्यादेनंतर साधनांच्या समान वाढीतुन प्राप्त होणारे अतिरिक्त उत्पादन हळुहळू कमी होते.''

4) **प्रा. बेनहॅम :** ''उत्पादन घटकाच्या संयोगातील कोणत्याही एका उत्पादन घटकाचे प्रमाण वाढविले तर एका विशिष्ट बिंदुनंतर हा घटकाचे सुरूवातीला सिमांत उत्पादन आणि नंतर सरासरी उत्पादन घटत जाते.''

5) **बेन :** ''उत्पादनाच्या तंत्रात कोणताच बदल झाला नसताना असा एक बिंदु आढळतो की, हा बिंदुनंतर स्थिर घटकांच्या जोडीला असलेल्या बदलत्या घटकांच्या संख्येत वाढ केली तर बदलत्या घटकांच्या प्रत्येक वाढीबरोबर उत्पादन घटत जाते.''

6) **प्रा. पिंपरकर :** ''इतर परिस्थिती कायम असताना, एका घटकाची राशी स्थिर ठेवून दुसऱ्या घटकांची राशी क्रमशः सतत वाढत गेली. किंवा त्या घटकांचे घटक संयोगातील प्रमाण वाढले तर त्यामुळे वस्तुच्या उत्पादन राशीत होणारी वाढ एका मर्यादेनंतर उत्तरोत्तर कमी कमी होत जाते.''

या नियमात पुढील तीन अवस्था अनुभवाला येतात.

**1) पहिली अवस्था (वाढते उत्पादन फल किंवा घटत्या खर्चाची अवस्था):**

बदलत्या प्रमाणाच्या नियमाची पहिली अवस्था म्हणते वाढते उत्पादन फल किंवा घटत्या खर्चाची अवस्था होय. या अवस्थेत उत्पादनप्रक्रियेत उत्पादनाचे स्थिर घटक स्थिर ठेवून बदलत्या घटकाचे नग ज्या प्रमाणात वाढविले त्या प्रमाणांपेक्षा उत्पादनात जास्त वाढ होते.

उदा. उत्पादनप्रक्रियेत उत्पादनाचे घटक दुप्पट वाढविले तर उत्पादन दुप्पटीपेक्षा जास्त वाढते. या अवस्थेत सीमांत उत्पादन सरासरी उत्पादन व एकूण उत्पादनात वाढ होते.

**2) दुसरी अवस्था (स्थिर फलाची अवस्था किंवा स्थिर खर्चाचा सिद्धात) :**

बदलत्या प्रमाणात नियमाची दुसरी अवस्था म्हणते स्थिर फलाची अवस्था किंवा या अवस्थेला स्थिर खर्चाचा सिद्धांत असेही म्हणतात. या अवस्थेत उत्पादन प्रक्रियेत उत्पादनाचे स्थिर घटक स्थिर ठेवून बदलत्या घटकाचे नग ज्या प्रमाणात वाढविले तेवढीच वाढ उत्पादनात होते. या अवस्थेत सरासरी उत्पादन स्थिर राहते. सिमांत उत्पादन अवस्थेच्या शेवटी शुन्य होते त्यामुळे एकूण उत्पादनात घटत्या दराने वाढ होते. एक विवेकशील उत्पादक सिमांत उत्पादन शून्य होईपर्यंत उत्पादनाचे नग वापरता आणतो.

**2) तिसरी अवस्था (घटत्या फलाची अवस्था किंवा वाढत्या खर्चाचा सिद्धांत) :**

बदलत्या प्रमाणाच्या नियमाची तिसरी अवस्था घटत्या फलाची अवस्था होय अवस्थेला वाढत्या खर्चाचा सिद्धांत असेही म्हणतात. या अवस्थेत सरासरी एकूण उत्पादन घटू लागते. सिमांत उत्पादन ऋण होऊ लागते. त्यामुळे एकूण उत्पादन व सरासरी उत्पादन स्थिर राहते. सिमांत उत्पादन अवस्थेच्या शेवटी शुन्य होते. त्यामुळे एकूण उत्पादनात घटत्या दराने वाढ होते. एक विवेकशील उत्पादक सीमांत उत्पादन शून्य होईपर्यंत उत्पादनाचे नग वापरता आणतो.

**3) तिसरी अवस्था (घटत्या फलाची अवस्था किंवा वाढत्या खर्चाचा सिद्धांत) :**

बदलत्या प्रमाणाच्या नियमाची तिसरी अवस्था घटत्या फलाची अवस्था होय अवस्थेला वाढत्या खर्चाचा सिद्धांत असेही म्हणतात. या अवस्थेत



सरासरी उत्पादन, एकूण उत्पादन घटू लागते. सिमांत उत्पादन ऋण होऊ लागते. त्यामुळे उत्पादन व सरासरी उत्पादन घटते.

हा नियम पुढील गृहीतकावर आधारित आहे.

**गृहीतके :**

1) उत्पादनाचे दोन घटक गृहीत धरले आहेत.

2) उत्पादनाचा एक घटक स्थिर तर दुसरा घटक बदलता गृहीत धरला आहे.

   उदा. भूमी हा घटक स्थिर तर श्रम हा घटक बदलता गृहीत धरला आहे.

3) बदलत्या घटकाचे नग उत्पादन प्रक्रियेत सारख्या प्रमाणात वाढविले जातात.

   उदा. श्रमिकांच्या नगसंख्येत 1, 2, 3, 4 अशी वाढ केली जाते.

4) उत्पादनाचे मोजमाप नगसंख्येत करता येते.

5) उत्पादन तंत्र स्थिर आहे.

6) अर्थव्यवस्थेत पूर्ण स्पर्धा अस्तित्वात आहे.

7) उत्पादनाचे सर्व घटक एकजिनशी आहेत.

**एकुण उत्पादन :**

उत्पादनाचे स्थिर व बदलते घटक वापरून जे एकूण उत्पादन होते त्याला एकूण उत्पादन म्हणतात.

**सरासरी उत्पादन :**

एकूण उत्पादनाच्या नगसंख्येला बदलत्या घटकांच्या नगसंख्येने भाग दिला असता सरासरी उत्पादन प्राप्त होते.

$$\text{सरासरी उत्पादन} = \frac{\text{एकूण उत्पादनाची नगसंख्या}}{\text{बदलत्या घटकाची नगसंख्या}}$$

**सिमांत उत्पादन :**

सिमांत उत्पादन म्हणजे बदलत्या घटकाच्या एका नगसंख्येत केलेल्या वाढीमुळे एकूण उत्पादनात जी भर पडते त्या भरीला सिमांत उत्पादन असे म्हणतात.

**तक्ता क्र. 6.1**

**बदलत्या प्रमाणात तालीकेद्वारे स्पष्टीकरण**

| अ. क्र. | स्थिर घटक | बदलते घटक | एकूण उत्पादन | सरासरी उत्पादन | सिमांत उत्पादन | अवस्था |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4 | 1 | 10 | 10 | 10 | वाढते |
| 2 | 4 | 2 | 22 | 11 | 12 | |
| 3 | 4 | 3 | 36 | 12 | 14 | स्थिर |
| 4 | 4 | 4 | 48 | 12 | 12 | |
| 5 | 4 | 5 | 55 | 11 | 7 | घटते |
| 6 | 4 | 6 | 60 | 10 | 5 | |
| 7 | 4 | 7 | 63 | 9 | 3 | |
| 8 | 4 | 8 | 63 | 7.8 | 0 | |
| 9 | 4 | 9 | 54 | 6 | -9 | |

वरील तालीकेत पहिल्या अवस्थेत सरासरी, सिमांत एकूण उत्पादन वाढते. दुसऱ्या अवस्थेत सरासरी उत्पादन स्थिर आहेत. सिमांत उत्पादन घटू लागते. तिसऱ्या अवस्थेत सिमांत उत्पादन शून्य होऊन त्यानंतर त्यात ऋण होते. त्यामुळे सरासरी उत्पादन घटु लागते. एकूण उत्पादनात घटत्या दराने वाढ होते.

**आकृतीद्वारे स्पष्टीकरण**




**श्रमिकाची संख्या (बदलता उत्पादन घटक)**



सोबतच्या आकृतीत OX अक्षावर श्रम हा उत्पादनाचा बदलता घटक तर OY अक्षावर एकूण सरासरी व सिमांत उत्पादन वक्र दाखविलेला आहे. आकृतीत MP हा सिमांत उत्पादन AP हा सरासरी उत्पादन तर TP हा एकूण उत्पादन दाखवणारा वक्र आहे.

आकृतीत OL एवढ्या श्रमाच्या मात्रा (नग) वापरात असे पर्यंत नियमाची पहिली अवस्था अनुभवाला येते. या अवस्थेत T बिंदू पाशी सिमांत उत्पादन सर्वात जास्त आहे. R बिंदुपाशी सरासरी व सिमांत उत्पादन सारखे आहे. या ठिकाणी उत्पादन घटकाचा युक्त (पर्याप्त) संयोग निर्माण होतो. या ठिकाणी स्थिर व बदलत्या घटकाचे नग याचा वापर युक्ततम होतो दुसऱ्या अवस्थेत सरासरी उत्पादन स्थिर राहते, तर सिमांत उत्पादन $L_1$ बिंदु पाशी शून्य होते त्यानंतर त्यात घट होते. ही अवस्था $OL_1$ एवढ्या श्रमाच्या मात्रा वापरात असेपर्यंत असते त्यानंतर तिसऱ्या अवस्थेला सुरूवात होते. या अवस्थेत सिमांत उत्पादन ऋण (उणे होते) सरासरी उत्पादन घटू लागते.

**बदलत्या प्रमाणाचा नियम अनुभवास येण्याची कारणे :**

**1) उत्पादन घटकांची अविभाज्यता :** उत्पादनाच्या स्थिर घटकांची संख्या सुरूवातीला जास्त असते. त्यामुळे श्रम या घटकात त्याचा पूर्णपणे उपयोग करून घेण्याची क्षमता नसते. स्थिर घटक अविभाज्य असतात. स्थिर घटकात जसजसी वाढ होवू लागते. तसा या घटकांचा एका विशिष्ट मर्यादेपर्यंत उपयोग होवू लागतो.

**2) उत्पादन घटकांचा पुरवठा लवचिक नसतो :** सर्व उत्पादन घटकांचा पुरवठा लवचिक नसणे म्हणजे पाहिजे त्या प्रमाणात सर्व उत्पादन घटक उपलब्ध न होणे होय. त्यामुळे उत्पादन वाढीस मर्यादा येतात. म्हणून हा घटक बदलत्या प्रमाणाचा नियम प्रत्ययास येण्यास कारणीभूत ठरतो.

**3) उत्पादन घटकात संपूर्ण पर्यायता नसते :** उत्पादन होण्याकरिता चार उत्पादन घटकांचे एकत्रिकरण करावे लागते. जेव्हा उत्पादनाच्या चार घटकांपैकी एकादा उत्पादन घटक कमी प्रमाणात उपलब्ध होत असेल तर त्या घटकाऐवजी दुसरा घटक घेवून उत्पादनात कमी असलेल्या घटकांची जागा भरून काढता येत नाही. काही विशिष्ट परिस्थितीतच ठराविक अवस्थेपर्यंतच एका घटकाऐवजी

दुसरा उत्पादनाचा घटक घेवून उत्पादनात वाढ करता येते. पूर्णपणे एका घटकांला दुसरा घटक पर्याय नसतो. उदा. भांडवलाऐवजी श्रमिक घटक पर्यायी नसतो.

**4) अंतर्गत व बाह्य बचती मिळण्यासाठी फायदे :** उत्पादन प्रक्रियेत सुधारणा होते. त्याच कारण उद्योसंस्थेला अंतर्गत व बाह्य स्वरूपाच्या बचती मिळतात. अंतर्गत व बाह्य स्वरूपाचे फायदे मिळाल्यामुळे उद्योगसंस्थेच्या एकूण उत्पादनात वाढ होते. अशारितीने अंतर्गत व बाह्य बचतीमुळे बदलत्या प्रमाणाचा नियम अनुभवास येतो.

**बदलत्या प्रमाणाच्या नियमाचे महत्त्व :**

1) ह्या नियमाद्वारे निरनिराळे घटक कोणत्या प्रमाणात वापरावे ह्याची कल्पना येते.
2) विकसित व अविकसित अर्थव्यवस्थांना उत्पादनाचे तंत्र निश्चित करताना हा नियम उपयुक्त ठरतो.
3) उत्पादनातील अडथळे दूर करून उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीने हा नियम मार्गदर्शक ठरतो.
4) ह्या नियमाद्वारे घटकांच्या पर्यायतेची कल्पना येवू शकते.
5) ह्या नियमामुळे उत्पादनाचे घटक परस्परांना किती प्रमाणात पर्यायी होवू शकतात. हे स्पष्ट होते.
6) उत्पादनासाठी कोणते उत्पादन तंत्र निवडावे याचे ज्ञान विकसित व अविकसित देशांना होत असते.

**उत्पादन प्रमाण फलाच नियम/परिणाम प्रत्यय नियम**

**(Law of Returns to scale) :**

दिर्घकाळात उत्पादन प्रक्रियेत उत्पादन प्रमाण फलाचा नियम कार्यरत असतो. त्यालाच परिणाम प्रत्यय नियम असेही म्हणतात. दीर्घकाळात सर्वच उत्पादनाचे घटक बदलते असतात. उत्पादनाचे कोणतेही घटक स्थिर नसतात सर्वच घटक बदलते असतात. दीर्घकाळात स्थिर समजल्या जाणाऱ्या उत्पादन घटकात संयोजकाला अपेक्षेप्रमाणे वाढ अगर घट करता येते. दीर्घकाळात वस्तुला मागणी वाढली तर संयोजक सर्वच उत्पादन घटकात वाढ करून



उत्पादनात वाढ करू शकतो तसेच मागणी कमी झाली तर उत्पादन घटकात घट करून उत्पादनात घट करू शकतो.

दीर्घकाळात उत्पादन प्रक्रियेत उत्पादनाचे सर्वच्या सर्व घटक जर सारख्या प्रमाणात (त्याच्यातील परस्पर प्रमाण कायम ठेऊन) वाढवित नेले तर त्याचा उत्पादनावर काय परिणाम पडतो. त्याचे विश्लेषण उत्पादन प्रमाण फलाच्या नियमाद्वारे केले जाते. उत्पादनप्रमाण फलाच्या नियमात तीन अवस्था अनुभवाला येतात. नियमाच्या पहिल्या अवस्थत वाढत्या उत्पादन फलाची अवस्था दुसऱ्या अवस्थेत स्थिर फलाची तर तिसऱ्या अवस्थेत घटत्या फलाची अवस्था अनुभवाला येते.

**सिद्धात :**

दीर्घकाळात उत्पादनाच्या प्रक्रियेत उत्पादनाचे सर्वच घटक त्याच्यातील आप-आपसातील प्रमाण कायम ठेऊन (सारख्या प्रमाणात) वाढवित नेल्यास जो उत्पादन संबंध आढळतो. त्यालाच उत्पादन प्रमाण फल असे म्हणतात.

उदा. उत्पादनाचे सर्वच घटक दुप्पट वाढविले तर उत्पादन दुप्पट वाढते. उत्पादनाचे सर्वच घटक तिप्पट वाढविले तर उत्पादन तिप्पट वाढते. हा नियम पुढील गृहीतकावर आधारित आहे.

**गृहितके :**

1. हा सिद्धांत दीर्घकाळात लागू पडतो.
2. उत्पादनाचे सर्वच घटक बदलता येतात.
3. सर्वच उत्पादन घटकात सारख्या प्रमाणात वाढ केली जाते.
4. उत्पादन घटकाचे आपआपसातील प्रमाण कायम ठेवले जाते.
5. अर्थव्यवस्थेत पूर्ण स्पर्धा आहे.
6. उत्पादनाचे सर्व घटक एकजिनसी आहेत.
7. अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार असतो.

या नियमात पुढील तीन अवस्था अनुभवाला येतात.

**नियमाच्या अवस्था :**

**1) पहिली अवस्था (वाढते उत्पादन फल) :**

उत्पादन प्रमाण फलाच्या नियमाची पहिली अवस्था वाढत्या उत्पादन

फलाची होय. या अवस्थेत उत्पादन प्रक्रियेत सर्वच्या सर्व घटक त्याचे आपआपसातील प्रमाण कायम ठेवून वाढविले तर ज्या प्रमाणात उत्पादनाचे घटक वाढविले त्यापेक्षा उत्पादनात जास्त वाढ होते. उदा. उत्पादन घटक दुप्पट केले तर उत्पादनात दुप्पटीपेक्षा जास्त वाढ होते. सरासरी सिमांत एकूण उत्पादनात वाढ होते. या अवस्थेला घटत्या खर्चाचा सिद्धांत असेही म्हणतात.

**2) स्थिर फलाची अवस्था (दुसरी अवस्था) :**

उत्पादन प्रमाण फलाच्या नियमाची दुसरी अवस्था स्थिर फलाची होय. या अवस्थेत ज्या प्रमाणात उत्पादन घटक वाढविले तेवढी वाढ उत्पादनात होते जसे उत्पादन घटक दुप्पट केले तर उत्पादन दुप्पट होते. सरासरी उत्पादन स्थिर राहते. सिमांत उत्पादन घटू लागते त्यामुळे एकूण उत्पादनात घटत्या दराने वाढ होते. या अवस्थेला स्थिर खर्चाचा नियम असेही म्हणतात.

**3) घटत्या फलाची अवस्था (तिसरी अवस्था) :**

उत्पादन प्रमाण फलाच्या नियमाची तिसरी अवस्था घटत्या उत्पादन फलाची अवस्था होय. या अवस्थेत ज्या प्रमाणात उत्पादन घटक वाढविले त्यापेक्षा कमी वाढ उत्पादनात होते. या अवस्थेत सिमांत उत्पादन ऋण (उणे) होते म्हणून सरासरी उत्पादन व एकूण उत्पादन घटते या अवस्थेला वाढत्या खर्चाचा नियम म्हणतात.

हे विवेचन खालील आकृतीत दाखवले आहे.






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उत्पादनाच्या अवस्था तर OY अक्षावर सिमांत उत्पादन मोजले आहे. आकृतीतील सिमांत उत्पादन वक्राचा AB भाग वाढते BC भाग स्थिर व CD भाग घटले फल दाखवितो.

**अंतर्गत बचती :**

उद्योगसंस्था (पेढी) व उद्योग याच्या विस्तार घडून आल्यामुळे जे फायदे मिळतात त्याचे विश्लेषण अंतर्गत बचती (फायदे) व बाह्य बचतीद्वारे केले जाते. उद्योगसंस्था म्हणजे एकाद्या वस्तुचे उत्पादन करणारा एकादा कारखाना किंवा एखादी संस्था कापडाचे उत्पादन किंवा निर्मिती करणारा एखादा कारखाना हे उद्योगसंस्थेचे उदाहरण सांगता येईल. अशा अनेक उद्योगसंस्था मिळून उद्योग निर्माण होतो. अंतर्गत बचती केवळ उद्योगसंस्थेच्या विस्तारामुळे प्राप्त होतात व प्राप्त होणाऱ्या बचती त्या उद्योगसंस्थेपुरत्या मर्यादित असतात. तर बाह्य बचती ह्या उद्योगाच्या विस्तारामुळे प्राप्त होतात व त्या उद्योगात समाविष्ट असणाऱ्या सर्व संस्थाना प्राप्त होतात अंतर्गत बचतीत पुढील बचती प्राप्त होतात.

**1) तांत्रिक बचती :**

उद्योगसंस्था वाढत्या विस्ताराबरोबर तांत्रिक बचती प्राप्त होतात. त्यामुळे उद्योगसंस्थेला फायदे प्राप्त होतात. उद्योगसंस्था वाढत्या विस्ताराबरोबर जुन्या तंत्रज्ञाना ऐवजी नवीन तंत्रज्ञान वापरते. त्यामुळे वेळेची बचत होते. श्रमाची बचत होते. दर्जेदार वस्तुचे उत्पादन होते. वस्तु उत्पादनाचा सरासरी खर्च घटते.

**2) व्यवस्थापकीय बचत :**

अंतर्गत बचतीचा दुसरा प्रकार म्हणजे व्यवस्थापकीय बचत होय. एका विशिष्ट मर्यादेनंतर उद्योगसंस्थेचा विस्तार घडून आल्यामुळे उद्यागसंस्थेला व्यवस्थापकीय बचती प्राप्त होतात. उद्योगसंस्था उत्पादनातील वेगवेगळ्या विभागावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र स्वरूपाचा व्यवस्थापकीय वर्ग नियुक्त करणे. उदा. जाहिरात विभाग, विक्री विभाग, अंकेक्षण विभाग, कच्चामाल खरेदी विभाग, यंत्रसामग्री दुरुस्ती विभाग इत्यादी.

**3) विशेषीकरण व श्रमविभागणी :**

उद्योगसंस्थेच्या वाढत्या विस्ताराबरोबर विशेषीकरण व श्रमविभागणीचे फायदे प्राप्त होतात. उद्योगसंस्था उपउत्पादन करू शकते. उत्पादनात विशेषीकरण प्राप्त करते. उदा. साखर कारखान्यात साखरेच्या उत्पादनासोबत, मळीपासून अल्कोहल चिपाडापासून कागद तयार केला जातो. तसेच वाढत्या विस्ताराबरोबर श्रमविभागणीचा वापर करता येतो. त्यामुळे वेळेची बचत होते. वस्तु उत्पादनात वाढ होते. वस्तुचा दर्जा सुधारतो.

**4) वित्तीय बचती :**

उद्योगसंस्थेच्या वाढत्या विस्तारासोबत संस्थेला वित्तीय बचती प्राप्त होतात. वाढत्या विस्तारातुन उद्योगसंस्था नावारूपास येते. त्यातुन लवकर कर्जपुरवठा होतो. भांडवल टंचाईला सामोरे जावे लागत नाही.

**बाह्य बचती :**

उद्योगाचे आकारमान वाढल्यामुळे उद्योगात समाविष्ट असणाऱ्या सर्व उद्योगसंस्थाना काही फायदे प्राप्त होतात. त्याला बाह्य बचती म्हणतात. अंतर्गत बचती उद्योग संस्थेपुरत्या मर्यादित असतात तर बाह्य बचती ह्या उद्योगात असणाऱ्या सर्व उद्योगसंस्थाना प्राप्त होतात.

**डॉ. मार्शल यांच्या मते,** ''बाह्य बचती ह्या उद्योग संस्थेच्या कार्यक्षमतेची संबंधित असतात किंवा त्या कोणत्याही एका पेढीला प्राप्त होत नाहीत किंवा कमी कार्यक्षम पेढीला कमी बचती व जास्त कार्यक्षम पेढीला जास्त बचती अशा बचती देखील प्राप्त होत नाहीत. सर्व उद्योगसंस्थाना सारख्याच प्रमाणात बचती प्राप्त होतात.'' बाह्यबचती पुढील प्रमाणे असतात.

**1) स्थानिय करणाचे फायदे :**

एका विशिष्ट ठिकाणी जेव्हा विशिष्ट उद्योग स्थायिक होतात त्याला उद्योगाचे केंद्रिकरण म्हणतात. ज्या भागात उद्योगाचे केंद्रिकरण घडून येते त्या भागात वाहतुक व दळणवळण सेवा, सुविधा प्राप्त होतात. त्या भागात कुशल श्रमिकांची उपलब्धता होते. त्यामुळे उद्योगसंस्थेचा उत्पादक खर्च कमी होतो.



**2) श्रमविभागणी आणि विशेषीकरणाचे फायदे :**

उद्योगाचा आकार वाढल्यामुळे उद्योगात समाविष्ट असणाऱ्या उद्योगसंस्थाना श्रमविभागणी व विशेषीकरणाचे फायदे मिळतात. श्रमविभागणीतून वेळेची बचत होते श्रमाची बचत होते. विशेषीकरणामुळे उत्पादनात नवनिकीकरण घडून येते. त्यातुन नवीन वस्तु बाजारात येतात. त्यातुन बाजारपेठेत उद्योगसंस्थेची विक्री वाढते व उद्योग संस्थेला प्राप्त होणारा नफा वाढतो.

**3) बँका व वित्त संस्थाची स्थापना :**

ज्या भागात उद्योग धंद्याचे केंद्रिकरण घडून येते त्या भागात बँका व वित्तसंस्थाच्या शाखा निर्माण होतात. त्यामुळे उद्योगसंस्थांना कर्जपुरवठा वेळेवर प्राप्त होतो. उद्योगसंस्थेला भांडवलटंचाईला सामोरे जावे लागत नाही. त्यामुळे उत्पादन वाढीला चालना मिळते.

**4) वाहतुक व दळणवळणाच्या सेवा सुविधेत वाढ :**

ज्या ठिकाणी उद्योगाचे केंद्रिकरण घडून येते. तेथे वाहतुक व दळणवळणाच्या सेवा सुविधेत वाढ होते. त्यामुळे उद्योगसंस्थेला उत्पादित झालेली वस्तु बाजारपेठेत लवकर वितरीत करता येते. त्यामुळे उद्योगसंस्था उत्पादनात वाढ करू शकते. आपले वाढलेले उत्पादन बाजारात विकुन नफा प्राप्त करते.

**5) प्रशिक्षण केंद्रात वाढ :**

उद्योगाचा आकार वाढत असताना त्या भागात प्रशिक्षण केंद्राच्या संख्येत वाढ होते. उद्योगाला कुशल व अकुशल अशा श्रमपुरवठा आवश्यक असतो. प्रशिक्षण केंद्राच्या स्थापनेमुळे प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा पुरवठा उद्योगसंस्थाना वेळेवर प्राप्त होतो. यामुळे उद्योग संस्थांना उत्पादनाचा वेग वाढून प्राप्त होणारा नफा वाढतो.

**6) संशोधनाला चालना :**

ज्या भागात उद्योग संस्थेचे केंद्रिकरण घडून आलेले आहे. त्या भागात खाजगी उद्योग संस्था संशोधन संस्था, प्रयोगशाळा सुरू शकतात. यामुळे उत्पादनात असलेल्या नवीन प्रक्रियांचा शोध लावला जातो. या शोधाचा फायदा परिसरातील सर्वच उत्पादन संस्थाना होतो. याचा फायदा म्हणून

उत्पादन संस्थाची उत्पादन क्षमता वाढते व उत्पादन संस्थाचा खर्च घटतो व प्राप्त होणारा नफा वाढतो.

**उत्पादनातील अमितव्ययता (Diseconomies of Production) :**

उद्योगसंस्थेचा व्याप वाढत असताना उद्योगाचा व्याप वाढत असताना जसे उद्योगसंस्थेला व उद्योगाला काही फायदे प्राप्त होतात तसे काही तोटे (नुकसान) सुद्धा सहन करावे लागते उद्योगसंस्थेचा व्याप वाढल्यामुळे उद्योगसंस्थेला जे तोटे सहन करावे लागतात. त्याला उत्पादनातील आंतरिक अमितव्ययता (अबचती) असे म्हणतात व संपूर्ण उद्योगाला जे तोटे करावे लागतात त्याला बाह्य बचती असे म्हणतात.

**अंतर्गत अबचती (Internal Diseconomies) :**

उद्योगसंस्थेचा आकार वाढल्यामुळे त्या अबचती किंवा तोटे सहन करावे लागतात त्याला अंतर्गत अबचती असे म्हणतात. त्यात पुढील बाबी समाविष्ट होतात.

**1) कार्य विलंब वाढता :**

उद्योगसंस्थेचा व्याप वाढल्यास कार्य विलंब होतो. उद्योगसंस्थेत जे निरनिराळे विभाग आहेत. त्याच्या कार्यात परस्पराशी सुसुत्रीकरण रहात नाही. निरनिराळी कार्ये योग्य वेळेत पूर्ण होत नाहीत. उत्पादन प्रक्रिया मंदावते. दफ्तर दिरगांई वाढते. कार्य विलंब वाढतो.

**2) कामगार फलहात वाढ :**

उद्योग संस्थेचा व्याप वाढत असताना संस्थेत कामगारानी संस्था वाढते. त्यामुळे कामगाराचा आणि व्यवस्थापकांचा संबंध दुरावतो औद्योगिक अशांतता निर्माण होते औद्योगिक कलह निर्माण होतो त्याचा उत्पादनावर विपरित परिणाम होतो.

**3) कमी कुशल अयोग्य अधिकाऱ्यांची नियुक्ती :**

उद्योगसंस्थेचा व्याप वाढत असताना कमी कुशल व अयोग्य अधिकाऱ्यांची नियुक्ती केले जाते. याचा उत्पादनावर प्रतिकुल परिणाम होतो.

**4) अवजड यंत्र सामुग्रीचा वापर मर्यादेबाहेर :**

उत्पादन प्रक्रियेत वापरली जाणारी अवजड यंत्र साम्रगीचा वापर एका विशिष्ट मर्यादेपर्यंत करता येतो एका विशिष्ट मर्यादेनंतर उत्पादन प्रक्रियेत अवजड



यंत्रसामुग्रीचा वापर वाढतो. त्यामुळे यंत्रे नादुरुस्त होतात. बिघडतात त्यातुन उत्पादन प्रक्रियेत खंड पडतो. अशा विविध अमितव्ययता निर्माण होतात.

**बाह्य अबचती (External Diseconomies) :**

उद्योगाचा व्याप वाढल्यामुळे उद्योगात असणाऱ्या सर्व उद्योग संस्थाना जे तोटे सहन करावे लागतात त्या उत्पादनातील बाह्य अबचती असे म्हणतात. या बाह्य अबचती पुढीलप्रमाणे आहेत.

**1) वाहतुक व दळणवळण यंत्रणेवर ताण पडतो :**

उद्योगाचा आकार वाढल्यानंतर उद्योगसंस्थाची संख्या वाढते त्यामुळे वाहतुक व्यवस्थेवर ताण पडतो उद्योगसंस्थाना वेळेवर कच्चामाल प्राप्त होत नाही. उत्पादीत झालेला माल बाजारात पोहचविला जातो.

**2) मजुरांचा पुरवठा कमी पडतो :**

एका विशिष्ट ठिकाणी उद्योगधंद्याचे केंद्रिकरण घडुन आल्यामुळे मजुरांचा पुरवठा कमी होतो. मजुर टंचाईमुळे उत्पादन वाढीचा वेग कमी होतो.

**3) जमिनीचा तुटवडा व किमत वाढ :**

ज्या भागात उद्योगाचे केंद्रिकरण होते. तेथे उत्पादन संस्थाची गर्दी वाढते, त्यामुळे उत्पादनात अडचणी निर्माण होतात. उत्पादन प्रक्रिया मंदावते.

**4) बँकीग व्यवस्थेवर ताण :**

उत्पादनसंस्थेचा संस्थेत वाढ झाल्यामुळे असलेल्या बँकावर ताण पडतो त्यामुळे वेळेवर कर्ज मिळत नाही, उत्पादनात अडथळे येतात व उत्पादन प्रक्रिया मंदावते.

**सम उत्पादन वक्र विश्लेषण (ISO Product Curve Analysis) :**

उपभोगाच्या क्षेत्रात ज्याप्रमाणे समवृत्ती वक्र विश्लेषनाचा वापर केला जातो. त्याचप्रमाणे उत्पादन फलनाचे विश्लेषण करण्यासाठी सम उत्पादन वक्राचा उपयोग केला जातो. प्रो. कोहेन याच्या मते, ''समउत्पत्ती राशी वक्र हा असा वक्र असतो. की ज्यावर मिळू शकणारा उत्पादनाचा महत्तम दर स्थिर असतो. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत उत्पादनाची मात्रा कायम कल्पिली असतात. उत्पादनाची मात्रा निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या उत्पादन घटकांच्या वेगवेगळ्या संयोगांना आकृतीवर दाखविणाऱ्या बिंदुना सम उत्पादन वक्र असे म्हणतात.

हे विश्लेषण खालील आक्रतीत दाखविले आहे.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर श्रमिक तर OY अक्षावर भांडवल दाखविले आहे. आकृतीत Iso Product curve हा सम उत्पादन वक्र आहे कि जो x वस्तुच्या 100 नगाचे उत्पादन दाखवितो. A बिंदुच्या ठिकाणी भांडवलाचे $OC_1$ व श्रमाचे $OL_1$ नग वापरून $X$ वस्तुच्या 100 नगाचे उत्पादन केले आहे. तर B बिंदु पाशी $C_1$ पासुन $C_2$ पर्यंत भांडवलाचे नग कमी व $L_1$ पासुन $L_2$ पर्यंत श्रमाचे नग वाढवून $X$ च्या 100 नगाचे उत्पादन केले आहे, तर C बिंदुपाशी भांडवलाचे $C_2$ ते $C_3$ भांडवलाचे नग कमी करून श्रमाचे $L_2$ पासून $L_3$ पर्यंत नग वाढवुन $X$ च्या 100 नगाचे उत्पादन केले आहे. D बिंदुपाशी भांडवलाचे $C_3$ ते $C_4$ नग कमी करून श्रमाचे $L_3$ ते $L_4$ नग श्रमाचे वाढवून X च्या 100 नगाचे उत्पादन केले आहे.

उत्पादकाने A,B,C,D यापैकी कोणताही एक संयोग निवडला व उत्पादन केले तर X च्या 100 नगाचे उत्पादन होते. सारखेच उत्पादन प्राप्त होत असल्यामुळे त्याला सम उत्पादन वक्र म्हणतात.



**गृहितके :**

सम उत्पादन वक्राची संकल्पना खालील गृहितकावर आधारित आहे.

1. श्रम व भांडवल हे दोन उत्पादन घटक आहेत.
2. अर्थव्यवस्थेत पूर्ण स्पर्धा आहे.
3. उत्पादनाचे सर्व घटक एकजिनसी आहेत.
4. तांत्रिक परिस्थितीमध्ये कुठलाही बदल होत नाही.

**सम उत्पादन वक्र वैशिष्टे :**

**1) सम उत्पादन वक्र हे ऋणात्मक उताराचे असतात.**

सम उत्पादन वक्राचे एक वैशिष्टे म्हणजे सम उत्पादन वक्र हे ऋणात्मक उताराचे असतात. त्याचे कारण म्हणजे एका उत्पादन घटकात वाढ केली तर दुसऱ्या घटकात घट होते. शिवाय तांत्रिक सिमांत पर्यायता दर घटता असतो. सम उत्पादन वक्राच्या या गुणधर्माची सिद्धता पुढीलप्रमाणे केलेली आहे.

**A) सम उत्पादन वक्र O या मुळाआरंभाला $45^O$ कोण करणारा असेल तर –** सम उत्पादन वक्र O या मुळ आरंभाला $45^O$ कोण करणारा असेल तर समउत्पादन वक्र हे दाखवितो की दोन्ही उत्पादन घटकात वाढ करून सम उत्पादन वक्र सारखेच नग उत्पादन दाखवितो.




सोबतच्या आकृतीत दोन्ही उत्पादन घटकात वाढ होऊन सम उत्पादन वक्र हे दाखवितो की $X$ ज्या 100 नगाचे उत्पादन होते वास्तविक वाढत्या उत्पादन घटकाबरोबर उत्पादनात वाढ होत नाही म्हणून असे समउत्पादन वक्र नसतात.

**B) सम उत्पादन वक्र *OX* अक्षाला समांतर असतील तर**




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर श्रम आणि OY अक्षावर भांडवल दाखविले आहे. A बिंदुपाशी OC एवढे भांडवल $OL_1$ एवढे श्रम वापरून X च्या 100 नगाचे उत्पादन केले जाते. B बिंदुपाशी OC एवढे भांडवल $OL_2$ एवढे श्रम वापरून X च्या 100 नगाचे उत्पादन केले जाते. $L_1$ पासुन $L_2$ पर्यंत श्रमात वाढ करून सुद्धा उत्पादनात वाढ होत नाही. म्हणून OX अक्षाला संमातर सम उत्पादन वक्र नसतात.

**C) सम उत्पादन वक्र OY अक्षाला समांतर असतील तर**






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर श्रम आणि OY अक्षावर भांडवल दाखविले आहे. B बिंदुपाशी OC एवढे भांडवल OL एवढे श्रम वापरून X च्या 100 नगाचे उत्पादन केले जाते A बिंदुपाशी OC1 एवढे भांडवल व OL श्रम वापरून X च्या नगाचे उत्पादन केले जाते वास्तविक C पासून $C_1$ पर्यंत भांडवलाच्या नग संख्येत वाढ झाली तर उत्पादन वाढत नाही. म्हणून OY अक्षाला समातर सम उत्पादन वक्र नसतात.

**d) समउत्पादन वक्र ऋणात्मक उताराचे असतात :**




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर श्रम तर OY अक्षावर भांडवले दाखवले आहे. ISO Product Curve x च्या 100 नगाचे उत्पादन दाखवितो. उत्पादक जशजशी भांडवलाच्या नग संख्येत घट करतो तसतशी श्रमाच्या नगसंख्येत वाढ करतो. प्रत्येक बिंदु *x* च्या 100 नगाचे उत्पादन दाखवितात.

2) **समउत्पादन वक्र कोणत्याही अक्षाला स्पर्श करत नाहीत :**

समउत्पादन वक्राचा एक गुणधर्म म्हणजे ते कोणत्याही अक्षाला स्पर्श करत नाहीत. असे झाले तर समउत्पादन वक्र ज्या अक्षाला स्पर्श करतो त्या

वक्रावर जो उत्पादनाचा घटक मोजला आहे. त्या उत्पादन घटकाचे संपूर्ण नग वापरले जातात. दुसऱ्या घटकाचे नग शुन्य वापरले जातात पण उत्पादन घटकात 100% पर्यायता नसते म्हणून समउत्पादन वक्र कोणत्याही अक्षाला स्पर्श करत नाहीत.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर श्रम तर OY अक्षावर भांडवल दाखवले आहे. ISO हा समउत्पादन वक्र A बिंदुच्या ठिकाणी OY अक्षाला स्पर्श करतो त्यावेळी OA एवढे भांडवलाचे नग वापरले जातात श्रमाचे शुन्य नग वापरले जातात. तर $ISO_2$ हा समउत्पादन वक्र B बिंदुच्या ठिकाणी OX अक्षाला स्पर्श करतो. यावेळी OB एवढे नग वापरले जातात. भांडवलाचे शुन्य नग वापरले जातात. पण हे शक्य नाही म्हणून समउत्पादन वक्र कोणत्याही अक्षाला स्पर्श करत नाहीत.

**3) 'O' या मुळाआरंभापासुन दुर जाणारे समउत्पादन वक्र जास्तीचे समाधान दाखवितात.**

समउत्पादन वक्र जसा जसा 'O' या मुळाआरंभापासुन दुर-दुर जाईल. तशी तशी उत्पादनात वाढ होते. उत्पादक जेव्हा दोन्ही उत्पादक घटकाच्या



नगसंख्येत वाढ करून उत्पादन करतो तेव्हा ही वाढ मुळ समउत्पादन वक्राच्या वरच्या समउत्पादन वक्र दाखविली जाते.




आकृतीत OX अक्षावर श्रम तर OY अक्षावर भांडवल मोजले आहे. $ISO_1$ हा समउत्पादन वक्र X च्या 100 नगाचे उत्पादन दाखवितो समजा श्रम व भांडवलाच्या मात्रेत वाढ करून उत्पादकाने उत्पादनात वाढ करण्याचे ठरविले तर नवीन समउत्पादन वक्र $ISO_2$ हा मुळ समउत्पादन वक्राच्या वरच्या बाजूला तयार होतो की जो $X$ च्या 200 नगाचे उत्पादन दाखवितो.

**4) सम उत्पादन वक्र परस्परांना छेदत नाहीत :**

सम उत्पादन वक्र परस्परांना छेदत नाहीत जर दोन समउत्पादन वक्र परस्परांना छेदले तर समउत्पादन वक्राचा जो गुणधर्म आहे समउत्पादन वक्र 'O' या मुळाआरंभापासून दुरदुर जातात या गुणधर्माला बाधा येते म्हणून समउत्पादन वक्र परस्पराना छेदत नाहीत हा गुणधर्म पुढील आकृतीत दाखविलेला आहे.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर श्रम तर OY अक्षावर भांडवल दाखविले आहे. आकृतीत $ISO_1$ हा X च्या नगाचे उत्पादन दाखविणारा समउत्पादन वक्र काढला आहे. तर $ISO_2$ हा X च्या 200 नगाचे उत्पादन दाखविणारा समउत्पादन वक्र काढला आहे. पण A बिंदुच्या ठिकाणी हे दोन समउत्पादन वक्र परस्पराना छेदतात त्यावेळी एक समउत्पादन वक्र 100 नगाचे तर दुसरा 200 नगाचे उत्पादन दाखवितो पण सारख्याच श्रम व भांडवलाच्या मात्रा किंवा नग वापरून उत्पादनाचे वेगवेगळे नग उत्पादित होणे शक्य नाही.

**5) सम उत्पादन वक्र बर्हिगोल उताराचे असतात :**

समउत्पादन वक्र बर्हिगोल उताराचे असतात त्याचे कारण उत्पादक एका उत्पादन घटकात वाढ करून दुसऱ्या उत्पादन घटकात वाढ करतो शिवाय ही संकल्पना घटता सिमांत तांत्रिक प्रतिस्थापन दर यावर आधारित आहे. त्यामुळे समउत्पादन वक्र बर्हिगोल उताराचे असतात.

**6) दोन समउत्पादन वक्रात अनेक समउत्पादन वक्र असतात :**

सम उत्पादन वक्राचा आणखी एक गुणधर्म असा की दोन समउत्पादन वक्रात अनेक समउत्पादन वक्र असतात.






वरील आकृतीत $ISO_1$ हा समउत्पादन वक्र X च्या 100 नगाचे उत्पादन दाखवितो तर $ISO_2$ हा समउत्पादन वक्र X च्या 200 नगाचे दाखवितो. या दोन समउत्पादन वक्रात $ISO_3$ हा समउत्पादन 300 *x* च्या नगाचे उत्पादन दाखवितो.

वरीलप्रमाणे समउत्पादन वक्राचे गुणधर्म स्पष्ट केलेले आहेत.

**समखर्च रेषा (ISO Cost Curve) :**

उत्पादक आपल्या मर्यादित उत्पन्नात दोन उत्पादन घटकाचे जास्तीत जास्त किती नग खरेदी करू शकतो हे दाखविणारी रेषा म्हणजे समखर्च रेषा होय.




सोबतच्या आकृतीत AB ही समखर्च रेषा काढली आहे. उत्पादकाने सर्व उत्पन्न भांडवल खरेदीसाठी केले तर तो OA एवढे भांडवल खरेदी करू शकतो व सर्व उत्पन्न श्रम खरेदीसाठी केले तर OB एवढे श्रम खरेदी करतो.

**समखर्च रेषेच्या उतारातील बदल :**

उत्पादकाच्या उत्पन्नात वाढ झाली तर सम खर्च रेषा मुळ रेषेच्या वरच्या बाजुला सरकते. याउलट उत्पादकाच्या उत्पन्नात घट झाली तर समखर्च रेषा मुळ रेषेच्या खालच्या बाजुला सरकते.




उत्पादकाच्या उत्पन्नात वाढ झाली तर समखर्च रेषा $A_2B_2$ अशी तयार होते. याउलट घट झाली तर $A_1B_1$ अशी तयार होते.

**विस्तारपथ (Expansion Path)** :

समव्यय रेषा व समउत्पादन वक्र याच्या स्पर्श बिंदुना जोडणारी एकादी रेषा काढली तर पर्याप्त विस्तारपथ म्हणतात. मर्यादित खर्चात उत्पादक महत्तम नफा मिळविण्याचा उत्पादक/विक्रेते प्रयत्न करतात. हे पर्याप्त विस्तार पत्राद्वारे दाखविले जाते.






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर श्रम तर OY अक्षावर भांडवल दर्शविलेले आहे. OK हा पर्याप्त विस्तार पथा आहे. $A_1B_1$ या समव्यय रेषेला $ISO_1$ हा समउत्पादन वक्र A बिंदुच्या ठिकाणी स्पर्श करतो व उत्पादक महत्तम करतो. समजा उत्पादकाच्या उत्पन्नात वाढ झाली तर नवीन समव्यय रेषा AB तयार होते ती $ISO_2$ या वक्राला B बिंदुच्या ठिकाणी स्पर्श करतो व उत्पादक महत्तम उत्पादन करतो. समजा उत्पादकाच्या उत्पन्नात अजून वाढ झाली तर नवीन समव्यय रेषा $A_2B_2$ अशी तयार होते. या समव्यय रेषेला $ISO_3$ हा समउत्पादन वक्र C बिंदुच्या ठिकाणी स्पर्श करतो व यावेळी उत्पादक महत्तम उत्पादन करतो. आकृतीतील ABC या बिंदुना जोडणारी एकादी रेषा काढली तर OK पर्याप्त विस्तारपथ तयार होतो.

**उद्योग संस्थेचे संतुलन व उत्पादन घटकाचा पर्याप्त संयोग :**

उत्पादक मर्यादित उत्पन्नात श्रम व भांडवल ह्या उत्पादन घटकाचा असा संयोग निवडतो की निवडलेल्या संयोगापासून कमीत कमी खर्चात महत्तम उत्पादन करतो. त्या बिंदुच्या ठिकाणी उद्योग संस्थेचे उत्पादन करतो. त्या बिंदुच्या ठिकाणी उद्योग संस्थेचे संतुलन व उत्पादन घटकाचा पर्याप्त संयोग निर्माण होतो.

**गृहितके :**

1) उत्पादकाचा उद्देश महत्तम नफा प्राप्त करणे हा असतो.

2) उत्पादन प्रक्रियेत उत्पादनाचे दोन घटक वापरले जातात.

3) उत्पादक विवेकशील असतो.

4) अर्थव्यवस्थेत पूर्ण स्पर्धा असते.

5) उत्पादकाकडे समउत्पादन वक्र व समव्यय रेषेचा नकाशा असतो.

**अटी :**

1) समउत्पादन वक्र व समखर्च रेषेला स्पर्श करणारा असावा.

2) समखर्च रेषा व समउत्पादन वक्राचे उतार सारखेच असतात.

3) संतुलन बिंदुच्या ठिकाणी समउत्पादन वक्र 'O' या मुळाआरंभाला बर्हिगोल असावा.




वरील आकृतीत OX अक्षावर श्रम तर OY अक्षावर भांडवल दर्शविलेले आहे. AB ही समव्यय रेषा काढली आहे. E बिंदुच्या ठिकाणी $ISO_2$ हा समउत्पादन वक्र समव्यय रेषेला स्पर्श करतो यावेळी उत्पादक महत्तम उत्पन्नात जास्तीत जास्त उत्पादन करतो या बिंदुच्या ठिकाणी उत्पादन घटकाचा युक्त संयोग निर्माण होतो व उद्योग संस्थेचे संतुलन घडुन येते.

P बिंदु उत्पादकाच्या उत्पन्नाबाहेरचा आहे. यावेळी समव्यय रेषेला समउत्पादन वक्र स्पर्श करत नाही. K व T बिंदुच्या ठिकाणी कोपरा संतुलन निर्माण होते. K बिंदुच्या ठिकाणी भांडवलाच्या जास्त व श्रमाच्या कमी मात्रा वापरल्या जातात. T बिंदुच्या ठिकाणी श्रमाच्या जास्त व भांडवलाच्या कमी मात्रा वापरल्या जातात. यामुळे या दोन्ही बिंदुच्या ठिकाणी उद्योग संस्थेचे संतुलन घडुन येत नाही व उत्पादन घटकाचा पर्याप्त संयोग निर्माण होत नाही.

■ ■ ■



# 7

# उत्पादन खर्च
## (Production Cost)

**प्रस्तावना (Intruduction) :**

प्रत्येक उत्पादकाचा उद्देश जास्तीत जास्त नफा प्राप्त करणे हा असतो. उत्पादक/विक्रेते नफा मिळावा म्हणुन उत्पादन करतात. उत्पादकाला प्राप्त होणारा नफा वस्तु उत्पादनासाठी करावा लागणारा उत्पादन खर्च व प्राप्त होणारे उत्पन्न यावर अवंलबून असतो. म्हणून उत्पादन खर्चाचा अभ्यास आवश्यक आहे. सर्वसाधारपणे उत्पादक जेव्हा एखाद्या वस्तुची निर्मिती करतो. तेव्हा त्यास भूमी श्रम, भांडवल, कच्चा माल वाहतुक इत्यादी घटकासाठी खर्च करावा लागतो. किंवा उत्पादक घटकांच्या उत्पादनामधील सहभागासाठी जी किंमत मोजावी लागते त्यालाच उत्पादन खर्च म्हणतात.

सर्वसाधारपणे पैशातील उत्पादन खर्च व वास्तविक उत्पादन खर्च असे उत्पादन खर्चाचे वर्गीकरण करता येईल. उत्पादन घटकाच्या मोबदल्यात जो खर्च होतो पैशातील खर्च होय. भूमी, श्रम, भांडवल, संयोजक हे चार उत्पादनाचे घटक आहेत. या चार घटकाना अनुक्रमे खंड, वेतन, व्याज नफा हे मोबदले दिले जातात हा उत्पादनासाठी केला गेलेला पैशातील खर्च होय. या प्रत्यक्ष खर्चासोबत उत्पादकाला वास्तविक खर्च करावा लागतो. डॉ. मार्शल ज्या मते वास्तविक उत्पादन खर्च म्हणजे वस्तु उत्पादनासाठी समाजाकडुन त्रास, त्याग, कष्ट सोसुन उत्पादन होते.

उत्पादन खर्चाचे प्रत्यक्ष उत्पादन खर्च व अप्रत्यक्ष उत्पादन खर्च असेही प्रकार पडतात. उत्पादन घटकाच्या मोबदल्यावर जो खर्च केला जातो तो प्रत्यक्ष खर्च होय. या खर्चाबरोबरच वाहतुक व दळणवळण व्यवस्थेवरील खर्च इंधन, विक्री, जाहिरात, सरकारचे कर हा ही खर्च करावा लागतो. या

खर्चाचा समावेश अप्रत्यक्ष खर्चात होतो. थोडक्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्चाची बेरीज म्हणजे एकुण उत्पादन खर्च होय.

**उत्पादन खर्चाचे प्रकार :**

**1) पैशातील उत्पादन खर्च किंवा मौद्रिक उत्पादन खर्च (Money Cost of Production) :**

उत्पादन खर्चाचा एक प्रकार म्हणजे पैशातील उत्पादन खर्च किंवा मौद्रिक उत्पादन खर्च होय. या खर्चात उत्पादनासाठी आलेला प्रत्यक्ष खर्च व अप्रत्यक्ष खर्च समाविष्ट असतो. हा खर्च उत्पादकाला रोख पैशाच्या स्वरुपात करावा लागतो. उत्पादन घटकाच्या मोबदल्यावर केला गेलेला खर्च हा प्रत्यक्ष खर्च होय. तर अप्रत्यक्ष खर्चात वाहतुक खर्च, जाहिरात खर्च, विक्री खर्च, कर, इंधन विमा खर्च समाविष्ट होय.

**2) वास्तव उत्पादन खर्च (Real Cost of Production) :**

उत्पादन खर्चाचा दुसरा प्रकार वास्तव उत्पादन खर्च होय. डॉ. मार्शलच्या मते वस्तु उत्पादनासाठी समाजाकडून त्रास, त्याग, कष्ट सहन करावे लागतात. थोडक्यात उत्पादन घटक उत्पादन प्रक्रियेत सहभागी होताना त्रास सहन करतात. भूमीचा मालक आपल्या भूमीच्या उपयोगाचा त्याग करतो. कामगाराला त्रास, त्याग सहन करावा लागतो तर भांडवलदारास भांडवल गुंतवणूक करून मोबदला मिळेपर्यंत वाट पाहावी लागते.

वास्तव खर्चाची संकल्पनाही सापेक्ष आहे. मात्र ती प्रत्यक्षात उपयोगी ठरत नाही. प्रत्येक श्रमिकाचा वास्तव खर्च काढणे अवघड आहे. श्रमिकाला वस्तु उत्पादन करताना कष्ट किती लागले किंवा किती त्रास झाला हे समजणे अवघड आहे. वास्तव उत्पादन खर्च मोजता येत नाही. श्रमाची तुलना करता येत नाही. उच्च दर्जाचे श्रम व कमी दर्जाचे श्रम याची तुलना करता येत नाही. थोडक्यात वास्तविक उत्पादन खर्च मोजणे अवघड आहे.

**3) वैकल्पिक उत्पादन खर्च (Opportonity Production Cost) :**

उत्पादन खर्चाचा तिसरा प्रकार म्हणजे वेकल्पिक उत्पादन खर्च होय. उत्पादन घटक अनेक ठिकाणी उपयोगात आणता येतात. पण एकादा उत्पादनाचा घटक एका विशिष्ट ठिकाणी वापरात असेल तर त्याला दुसरीकडे वापरात



येणार नाही. इतर उपयोगाचा त्याला त्याग करावा लागतो. हा त्याग म्हणजे वैकल्पिक उत्पादन खर्च होय.

**व्याख्या :**

''एखादा उत्पादनाचा घटक एका विशिष्ट उपयोगात टिकून राहावा म्हणून त्या उत्पादन घटकाला इतर उपयोगाचा त्याग करावा लागतो हा त्याग म्हणजे वैकल्पिक उत्पादन खर्च होय.''

**उदा.:** 5 हेक्टर जमिनीवर जर गव्हाची लागवड केली तर 10 क्विंटल गहु उत्पादन होईल. या 5 हेक्टर जमिनीवर गव्हाऐवजी ज्वारीची लागवड केली तर 10 क्विंटल ज्वारी होईल पण गहु पेरला तर ज्वारी पेरता येणार नाही. जमीन गव्हाच्या लागवडीसाठी उपयोगात आहे. ज्वारीच्या उत्पादनासाठी वापरता नाही येणार म्हणून 10 क्विंटल गहु मिळविण्यासाठी 10 क्विंटल ज्वारीच्या उत्पादनाचा त्याग करावा लागेल हा त्याग म्हणजे वैकल्पिक खर्च होय.

**काळानुसार उत्पादन खर्चाचे विश्लेषण :**

काळानुसार उत्पादन खर्चाचे वर्गीकरण प्रामुख्याने दोन भागात केले जाते.

1) अल्पकाळ

2) दीर्घकाळ

**1) अल्पकाळ :**

उत्पादन घटकाचे वर्गीकरण प्रामुख्याने दोन भागात केले जाते.

1) उत्पादनाचे स्थिर घटक 2) उत्पादनाचे बदलते घटक

अल्पकाळात उत्पादनाच्या केवळ बदलत्या घटकात बदल करता येतो. स्थिर घटकात अल्पकाळात बदल करता येत नाही. अल्पकाळात उत्पादकाला उत्पादनात वाढ करण्यासाठी केवळ बदलत्या घटकात वाढ करता येते व उत्पादनात वाढ करता येते त्यामुळे उत्पादनात एका विशिष्ट मर्यादेपर्यंत वाढ होते.

**स्थिर घटक :**

जे घटक अल्पकाळात बदलता येत नाहीत त्या घटकाला स्थिर घटक

म्हणतात. यात प्रामुख्याने कारखान्याची इमारत अवजड यंत्रसामुग्री इत्यादी घटक समाविष्ट होतात.

**बदलते घटक :**

जे घटक अल्पकाळात बदलता येतात. त्याला बदलते घटक असे म्हणतात. त्यात कच्चामाल, बदलत्या कामगाराचा वर्ग समाविष्ट होतो.

**2) दीर्घकाळ :**

दीर्घकाळ हा इतका मोठा काळ असतो की दीर्घकाळात कोणतेही घटक स्थिर नसतात सर्वच घटक बदलते असतात त्यामुळे दीर्घकाळात उत्पादन घटकाचे वर्गीकरण उत्पादनाचे स्थिर घटक व बदलते घटक असे केले जात नाही. त्यामुळे दीर्घकाळात उत्पादकाला उत्पादनात अपेक्षेप्रमाणे वाढ ही करता येते व अपेक्षेप्रमाणे घट सुद्धा करता येते.

**स्थिर खर्च (Fixed Cost) :**

अल्पकाळातील खर्चाचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात एकूण स्थिर खर्च व एकूण बदलता खर्च होय. अल्पकाळात स्थिर घटकावर जो खर्च केला जातो. त्याला स्थिर खर्च असे म्हणतात. वाढत्या उत्पादनाबरोबर या खर्चात वाढ होत नाही व घटत्या उत्पादनाबरोबर हा खर्च कमी होत नाही. उत्पादनाचा एक नग उत्पादन करण्यासाठी हा खर्च तेवढाच व त्यापेक्षा अधिकचे उत्पादन करण्यासाठी तो खर्च तेवढाच करावा लागतो.

स्थिर खर्चात प्रामुख्याने कारखान्यासाठी उभारलेली इमारत यंत्रसाम्रगी, कायम स्वरूपाचा नौकरवर्ग हा खर्च समाविष्ट होतो. स्थिर खर्चाचा वक्र OX अक्षाला समांतर असतो. डॉ. मार्शल स्थिर खर्चाला पुरक खर्च म्हणतात.






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उत्पादन तर OY अक्षावर स्थिर खर्च दर्शविलेला आहे. आकृतीत $CC_1$ हा स्थिर खर्चाचा वक्र OX अक्षाला समांतर आहे. OM एवढे उत्पादन करण्यासाठी OC एवढा खर्च येतो. M पासुन $M_1$ पर्यंत उत्पादन वाढले तर OC एवढा खर्च स्थिर आहे. एवढा खर्च उत्पादकाला करावा लागतो. एवढेच नाही तर उत्पादन शुन्य झाले तरी OC एवढा खर्च स्थिर आहे.

**सरासरी स्थिर खर्च :**

एकूण स्थिर खर्चाला उत्पादीत नगसंख्येने भाग दिला असता सरासरी स्थिर खर्च प्राप्त होतो.

$$\text{सरासरी स्थिर खर्च} = \frac{\text{एकुण स्थिर खर्च}}{\text{एकूण उत्पादनाची नगसंख्या}}$$

सरासरी स्थिर खर्चाचा वक्र OX अक्षाकडे जाणारा असतो. तो मागणी वक्राप्रमाणे डावीकडून उजवीकडे उताराचा असतो. सरासरी स्थिर खर्च वाढत्या उत्पादनाबरोबर वाढतो तर घटत्या उत्पादनाबरोबर कमी होतो. हा वक्र खालील आकृतीत दाखविल्याप्रमाणे असतो.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उत्पादन तर OY अक्षावर सरासरी स्थिर खर्च दाखविलेला आहे. आकृतीत $FF_1$ हा सरासरी स्थिर खर्चाचा वक्र दाखविलेला आहे. आकृतीत ABCD हे $FF_1$ या वक्रावरील बिंदु हे दाखवितात की M $M_1$ $M_2$ $M_3$ अशा वाढत्या उत्पादनाबरोबर सरासरी स्थिर घटत जाते.

**बदलता खर्च :**

अल्पकाळात बदलत्या घटकावर उत्पादकाला जो खर्च करावा लागतो. त्याला बदलता खर्च असे म्हणतात. हा खर्च उत्पादनाच्या आकारमानानुसार बदलतो. उत्पादन वाढले तर हा खर्च वाढतो. उत्पादन कमी झाले तर खर्च कमी होतो. हा खर्च उत्पादन बंद झाले तर शुन्यावर सुद्धा येतो.

बदलत्या खर्चात कच्चामाल, इंधन, वाहतुक हंगामी नौकरवर्ग यावर केला जाणारा खर्च समाविष्ट असतो. हा खर्च वक्र खालील आकृतीत दाखविल्याप्रमाणे असतो.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उत्पादन तर OY अक्षावर स्थिर खर्च व बदलता खर्च वक्र दर्शविलेला आहे. आकृतीत TFC हा स्थिर खर्चाचा तर TVC हा बदलत्या खर्चाचा वक्र आहे. TVC या वक्रावरील विविध बिंदु आपणास हे दाखवितात की वाढत्या उत्पादनाबरोबर हा खर्च वाढतो.

**सरासरी बदलता खर्च :**

एकूण बदलत्या खर्चाला उत्पादनाच्या नगसंख्येने भाग दिला असता सरासरी बदलता खर्च प्राप्त होतो.



$$\text{सरासरी बदलता खर्च} = \frac{\text{एकुण बदलता खर्च}}{\text{उत्पादनाची नगसंख्या}}$$

हे विश्लेषण खालील आकृतीत दाखविले आहे.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उत्पादन तर OY अक्षावर बदलता खर्च दर्शविलेला आहे. आकृतीत AVC हा सरासरी बदलता वक्र दाखविलेला आहे. हा खर्च अर्धाचंद्राकृती आहे. हा खर्च सुरुवातीला कमी कमी होतो त्यानंतर B बिंदुपाशी तो कमीत कमी आहे. त्यानंतर त्यात वाढ होते.

**अल्पकालीन सीमांत खर्च :**

उत्पादनाच्या एका नगात वाढ केली तर एकूण उत्पादन खर्चाच्या राशीत जो बदल होतो त्याला सीमांत खर्च असे म्हणतात. एकूण उत्पादन खर्चात होणाऱ्या बदलाला उत्पादनाच्या राशीने भाग दिला असता अल्पकालीन सीमांत खर्च प्राप्त होतो.

$$\textbf{अल्पकालीन सीमांत खर्च} = \frac{\textbf{उत्पादन खर्चात झालेला बदल}}{\textbf{उत्पादन राशीत झालेला बदल}}$$

समजा चार नग उत्पादन करण्यासाठी 48 रुपये खर्च येतो व पाचवा नगर उत्पादन केल्यास एकूण खर्च 62 रुपये होत असेल तर 48-62=14

रुपये हा सीमांत खर्च होय.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उत्पादन तर OY अक्षावर सीमांत खर्च व सरासरी खर्च दाखवलेला आहे. आकृतीत MC हा सीमांत खर्चाचा तर AC हा सरासरी खर्चाचा वक्र आहे. या दोन्ही वक्रातील संबंध पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

1) सीमांत खर्च व सरासरी खर्च सुरुवातीस कमी कमी होत जातात. सीमांत खर्चात सरासरी खर्चापेक्षा जास्त वेगाने घट होते.
2) आकृतीत T बिंदुच्या ठिकाणी सीमांत खर्च व सरासरी खर्च एक दुसऱ्या बरोबर आहेत.
3) आकृतीत T बिंदुनंतर सीमांत उत्पादन खर्चात वाढ होते. परंतु सीमांत उत्पादन खर्च हा सरासरी उत्पादन खर्चापेक्षा जास्त प्रमाणात वाढत आहे.

**दीर्घकालीन उत्पादन खर्च विश्लेषण :**

दीर्घकाळात उत्पादनाचे सर्वच घटक बदलणारे असतात. दीर्घकाळात कोणतेही घटक स्थिर नसतात कोणते ही सर्व घटक बदलणारे असतात. अनेक अल्पकाळाचा समुह म्हणजे दीर्घकाळ होय. त्यामुळे दीर्घकालीन उत्पादन खर्चाचे विश्लेषण करताना दीर्घकालीन सरासरी खर्च व दीर्घकालीन सीमांत खर्च असे विश्लेषण करावे लागेल.



**दीर्घकालीन सरासरी खर्च (Long run Average Cost) :**

दीर्घकालीन एकूण खर्चाला उत्पादीत नग संख्येने भागिले असता दीर्घकालीन सरासरी खर्च येतो. अल्पकाळातील सरासरी खर्च वक्राना जोडणारी एकादी रेषा काढली तर दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र तयार होतो. दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र हा देखिल अल्पकालीन सरासरी खर्च वक्रापेक्षा अधिक पसरट असतो. दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र हा इंग्रजी 'U' अक्षरासारखा असतो.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उत्पादन तर OY अक्षावर दीर्घकालीन सरासरी खर्च मोजला आहे. $SAC_1$, $SAC_2$ व $SAC_3$ हे अल्पकालीन सरासरी खर्च दाखविलेला आहे. या अल्पकालीन वक्राला T, $T_1$ $T_2$ बिंदुना जोडणारी एखादी रेषा काढली तर LAC हा दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र तयार होतो. दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र हा इंग्रजी 'यु' U अक्षरासारखा असतो. बशीच्या आकाराचा असतो.

दीर्घकालीन सरासरी खर्च सुरुवातीला कमी कमी होत जातो. एका विशिष्ट ठिकाणी तो किमान बनतो त्यानंतर त्यात वाढ होते. आकृतीत $T_1$ बिंदुच्या ठिकाणी दीर्घकालीन सरासरी खर्च कमीत कमी आहे. त्यानंतर त्यात

वाढ होते. दीर्घकालीन सरासरी खर्च इंग्रजी 'U' अक्षरासारखा का असतो त्याची कारणे पुढीलप्रमाणे–

**दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र इंग्रजी 'U' अक्षरासारखा असण्याची कारणे:**

1) **उत्पादनप्रमाण फलाचा नियम :** दीर्घकाळात उत्पादन प्रक्रियेत उत्पादन प्रमाण फलाचा नियम कार्यान्वित असतो. या नियमात पुढील तीन अवस्था अनुभवाला येतात. नियमाच्या पहिल्या अवस्थेत वाढत्या उत्पादन फलाचा नियम कार्यान्वित असतो. त्यावेळी खर्च घटतो. नियमाच्या दुसऱ्या अवस्थेत स्थिर उत्पादन फलाचा नियम कार्यान्वित होतो यावेळी खर्च स्थिर राहतो. नियमाच्या तिसऱ्या अवस्थेत वाढत्या उत्पादन फलाचा नियम कार्यान्वित होतो. त्यावेळी खर्च वाढतो. यामुळे दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र इंग्रजी 'U' अक्षरासारखा असतो.

2) **उत्पादन घटकाची अविभाज्यता :** काही उत्पादनाचे घटक अविभाज्य असतात. त्याचा विभागुन वापरता येत नाही. उत्पादन घटकाचा वापर जसजसा वाढू लागतो तसतसी उत्पादनात वाढ व खर्च घटतो. पण एका विशिष्ट मर्यादेनंतर उत्पादन घटकावर ताण पडतो. त्यामुळे खर्च वाढतो. त्यामुळे दीर्घकालीन सरासरीखर्च सुरुवातीला घटतो नंतर वाढतो.

3) **व्यवस्थापन पद्धती :** चेंबरलीन यांच्या मते, दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र इंग्रजी 'U' अक्षरासारखा असण्याचे कारण म्हणजे व्यवस्थापन पद्धती होते. उत्पादनाच्या सुरुवातीच्या अवस्थेत श्रमविभागणी व विशेषीकरणाचे फायदे प्राप्त होतात. पण वाढत्या उत्पादनाबरोबर व्यवस्थापकीय वर्गास निरनिराळ्या वर्गावर देखरेख ठेवणे अवघड जाते.

4) **संयोजकाचा मर्यादित पुरवठा :** उत्पादनाचा संयोजक हा घटक मर्यादित आहे त्याच्या पुरवठ्यात वाढ करता येत नाही. त्यामुळे दीर्घकाळात संयोजकाच्या मर्यादित पुरवठ्यामुळे उत्पादनाचे विश्लेषण हे बदलत्या प्रमाणाच्या सिद्धाताचे एक रूप मानले जाते.

5) **सर्वच खर्च बदलणारे :** दीर्घकाळात सर्वच खर्च बदलणारे असतात. उपलब्ध असलेल्या उत्पादन घटकाचा वापर दीर्घकाळात होत असल्याने सरासरी स्थिर खर्च आणि सरासरी बदलता खर्च अल्पकाळापेक्षा कमी असतो.



**दीर्घकालीन सीमांत खर्च वक्र (Long Ron Marginal cost Corves):**

दीर्घकालीन सीमांत खर्च वक्र हा अल्पकाळातील सीमांत खर्च वक्राप्रमाणेच इंग्रजी 'यु' अक्षराचा असतो. दीर्घकालीन सीमांत खर्च हा दीर्घकालीन सरासरी खर्चात होणाऱ्या बदलास वस्तुच्या उत्पादनात होणाऱ्या बदलाने भागून मिळू शकतो.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उत्पादन तर OY अक्षावर उत्पादन खर्च स्पष्ट केला आहे. आकृतीत LAC हा दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र आहे. $SAC_1$, $SAC_2$ व $SAC_3$ या अल्पकालीन सरासरी खर्च वक्राना T $T_1$ $T_2$ या बिंदुना जोडुन दीर्घकालीन सरासरी खर्च काढला आहे.

आकृतीत $SMC_1$ $SMC_2$ व $SMC_3$ हे अल्पकाळातील सीमांत खर्च वक्र काढलेले आहेत. या वक्रावरील K व $T_1$ व $T_2$ या बिंदुना जोडणारा दीर्घकालीन सीमांत खर्च वक्र काढला आहे. दीर्घकालीन सीमांत खर्च वक्र हा U (यु) आकाराचा आहे.

**दीर्घकालीन सीमांत खर्च वक्र आणि दीर्घकालीन सरासरी खर्च वक्रांचा संबंध :**

1) दीर्घकालीन सरासरी खर्च कमी होत असताना दीर्घकालीन सीमांत खर्च त्याच्यापेक्षा कमी असतो.

2) दीर्घकालीन सरासरी खर्च कमीत कमी असताना दीर्घकालीन सीमांत खर्च त्याच्याबरोबर असतो.

3) दीर्घकालीन सरासरी खर्च वाढत असता सीमांत खर्च त्याच्यापेक्षा जास्त असतो.

## उत्पन्नाची संकल्पना आणि उत्पन्न वक्र
## (Concept of Revenue and Revenue Curves)

उत्पादन खर्चाप्रमाणे उत्पन्न या संकल्पनेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण उत्पादन खर्च आणि उत्पन्न या दोन्हीचा अभ्यास करूनच उत्पादन संस्थेच्या संतूलनाचा अभ्यास केला जातो. महत्तम नफा प्राप्त करणे हे प्रत्येक उत्पादन संस्थेचे उद्दिष्ट्ये असते. प्रत्येक उत्पादन संस्थेचे मुख्य उद्दिष्ट्ये निव्वळ उत्पन्न मिळवणे हेच असते. आपल्या उत्पन्नात सातत्याने वाढ कशी करता येईल याचा विचार उत्पादन संस्था सतत करीत असतात.

**उत्पन्न :**

''विभिन्न किंमतीला विविध वस्तूच्या नगाची विक्री करुन संस्थेला जे उत्पन्न मिळते त्याला उत्पन्न (Revenue) म्हणतात.''

उत्पन्न म्हणजे ''वेगवेगळ्या किंमतीला निरनिराळ्या प्रकारच्या वस्तूच्या नगांची विक्री करून मिळालेली मिळकत होय.''

**उत्पन्नाचे प्रकार :**

**1) एकूण उत्पन्न (Total Revenue) :** वस्तूचे सर्व नग विकून मिळालेल्या उत्पन्नाचा एकूण उत्पन्न असे म्हणतात. किंवा एकूण विकलेल्या वस्तूच्या सर्व नगांना त्या वस्तूला असलेल्या किंमतीने गुणले असता येणारा गुणाकार हा एकूण उत्पन्न दर्शवितो.

एकूण उत्पन्न = वस्तूची किंमत $\times$ वस्तूची एकूण नगसंख्या 50 रु $\times$ 200
= 10,000 रुपये.



**2) सरासरी उत्पन्न (Average Revenue) :**

वस्तूचे नग विकून जे उत्पन्न मिळते त्याला विकलेल्या नगांच्या संख्येने भागल्यास सरासरी उत्पन्न मिळते.

एकूण उत्पन्नाला विकल्या गेलेल्या वस्तूच्या नगसंख्येने भागून मिळणारे उत्पन्न हेच सरासरी उत्पन्न असते.

$$\text{सरासरी उत्पन्न} = \frac{\text{एकूण उत्पन्न}}{\text{एकूण वस्तूची नगसंख्या}} = \frac{1000}{100} = 10 \text{ रु.}$$

संस्थेने आपल्या जवळील वस्तूचे सर्वच नग एकाच किंमतीला विकले तर सरासरी उत्पन्न आणि किंमत सारखीच असते. पण विविध नग वेगवेगळ्या किंमतीला विकले तर सरासरी उत्पन्न आणि किंमत सारखी राहत नाही.

**3) सिमांत उत्पन्न (Marginal Revenue) :**

एकूण उत्पन्नात वस्तूचा नग विकल्यामुळे जी भर पडते त्या भरीला सिमांत उत्पन्न असे म्हणतात. किंवा उत्पादित वस्तूच्या शेवटच्या नगापासून मिळणारे उत्पन्न म्हणजे सिमांत उत्पन्न होय.

उदा. समजा 100 वस्तू विकल्या तर एकूण 10,000 रुपये उत्पन्न मिळते. 101 वस्तू विकल्यामुळे एकूण उत्पन्न राहते. 10,100 रु. मिळत असेल तर सिमांत उत्पन्न 100 राहते. कारण एक वस्तू अधिक विकल्यामुळे एकूण उत्पन्नात 100 रुपयांची वाढ होते. म्हणून 100 रुपये सिमांत उत्पन्न होय.

## पूर्ण स्पर्धा आणि मक्तेदारीत उत्पन्न व उत्पन्न वक्र
## Revenue and Revenue Curves under Perfect Competition and Monopoly

**पूर्ण स्पर्धा आणि उत्पन्न (Perfect Competition & Rerenue) :**

पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत वस्तू ह्या एकजिन्सी असतात. पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत असंख्य ग्राहक आणि असंख्य विक्रेते असतात. एकूण मागणी आणि एकूण पुरवठा यांच्या संतुलनातून वस्तूची किंमत ठरते. ठरलेली किंमत ही प्रत्येक ग्राहकाला आणि प्रत्येक विक्रेत्याला स्विकारावी लागते. पूर्ण स्पर्धेत वस्तू ह्या एकसारख्या असतात. पूर्ण स्पर्धेत सरासरी आणि सिमांत

प्राप्ती कशा प्रकारे मिळते हे कोष्टकांच्या आधारे–

| किंमत (रु.) | विक्रीची नगसंख्या | एकूण प्राप्ती (रु) | सरासरी प्राप्ती (रु.) | सिमांत प्राप्ती (रु.) |
|---|---|---|---|---|
| 100 | 1 | 100 | 100 | 100 |
| 100 | 2 | 200 | 100 | 100 |
| 100 | 3 | 300 | 100 | 100 |
| 100 | 4 | 400 | 100 | 100 |

वरील कोष्टकावरून पूर्ण स्पर्धेमध्ये किंमत 100 रुपये प्रतिनग आहे. किंमत 100 रु. स्थिर असल्यामुळे विक्री केलेल्या नगाची संख्या 1 वरून 4 नगापर्यंत वाढवत गेली तर एकूण प्राप्ती वाढते. ती 100 रुपयावरून 400 रुपयापर्यंत होते. पण किंमत बदल होत नसल्यामुळे सरासरी प्राप्ती आणि सिमांत प्राप्ती 100 रुपये इतकी होते.

खालील आकृतीच्या सहाय्याने सिमांत प्राप्ती (उत्पन्न) आणि सरासरी प्राप्ती (उत्पन्न) वक्र काढता येतात.




आकृतीत SS हा OX अक्षाला समांत्तर असलेला सरासरी प्राप्ती वक्र आणि सिमांत प्राप्ती वक्र आहे. पूर्ण स्पर्धेमध्ये हे वक्र एकरूप झालेले आहेत. OP या किंमतीला उत्पादक कितीही नग विकत आहे. एकूण सरासरी



उत्पन्न ही किंमत OP एवढीच आहे. तेथे सरासरी प्राप्ती/उत्पन्न स्थिर आहे. त्यामुळे सिमांत उत्पन्न सुद्धा स्थिर आहे.

म्हणून पूर्णस्पर्धेत सिमांत प्राप्ती वक्र आणि सरासरी प्राप्ती वक्र एकच असतो. आणि तो OX अक्षालाच समांत्तर असतो.

**मक्तेदारी आणि उत्पन्न वक्र**

**(Monopoly Competition and Revenue) :**

मक्तेदारी स्पर्धेच्या बाजारात एकच विक्रेता आणि असंख्य ग्राहक असतात. मक्तेदाराचे वस्तूच्या उत्पादनावर आणि वस्तूच्या किंमतीवर पूर्ण नियंत्रण असते. मक्तेदार वस्तूची किंमती वाढवतो आणि विक्रीची नगसंख्या कमी करतो. आणि तो नफा मिळवतो. एका बाजूला तो वस्तूच्या किंमती कमी करून नगसंख्या वाढवतो. अशा दोन्ही मार्गाचा अवलंब करून नफ्याचे उद्दिष्ट्ये पूर्ण करतो. अपूर्ण स्पर्धेमध्ये सुद्धा विक्रेत्याचे किंमतीवर नगसंख्येवर नियंत्रण असते.

पुढील कोष्टकाच्या आधारे मक्तेदारी बाजारपेठेत सिमांत प्राप्ती व सरासरी प्राप्ती स्पष्ट केलेले आहे.

| किंमत (रु.) | विक्रीची नगसंख्या | एकूण प्राप्ती (रु) | सरासरी प्राप्ती (रु.) | सिमांत प्राप्ती (रु.) |
|---|---|---|---|---|
| 6 | 1 | 7 | 6 | 7 |
| 5 | 2 | 12 | 5 | 5 |
| 4 | 3 | 14 | 4 | 3 |
| 3 | 4 | 16 | 3 | 1 |
| 2 | 5 | 14 | 2 | –1 |

वरील कोष्टकाद्वारे 6 रु. किंमतीवरून 2 रु. पर्यंत किंमत कमी केली तर मक्तेदार वस्तूची विक्री 1 नगावरून 5 नगापर्यंत वाढ करतो. पण वस्तू वाढ करताना सरासरी प्राप्ती आणि सिमांत प्राप्ती घटते. सरासरी प्राप्तीपेक्षा सिमांत प्राप्तीमधील घट अधिक आहे. सरासरी प्राप्ती 6 रु वरून 2 रु. पर्यंत कमी झाली तर सिमांत प्राप्ती 7 रु वरून –1 पर्यंत घटली.

आकृतीद्वारे स्पष्टीकरण –




आकृतीत OX अक्षांवर विक्री होणाऱ्या वस्तूची नगसंख्या विचारांत घेतलेली आहे तर OY अक्षावर किंमत, सरासरी प्राप्ती सिमांत प्राप्ती दर्शविलेली आहे. वस्तूची किंमत अधिक करण्यासाठी उत्पादक कमी किंमत आकारतो. किंमतीमधील घटीबरोबर सरासरी उत्पन्न/प्राप्ती व सिमांत प्राणी यातही घट होते. सिमांत प्राप्ती उणे होते. कारण सिमांत प्राप्तीचा वक्र OX अक्षाला छेदून खाली जाते. पण सरासरी प्राप्तीचा वक्र OX अक्षाला केव्हाही छेदत नाही. जर समजा छेदलाच तर वस्तूची किंमत शून्य होते. थोडक्यात किंमत कधीही शून्य होत नाही. वस्तूची विक्री फुगट/मोफत होत नाही.

■ ■ ■



# 8

# बाजारपेठाचे स्वरूप

## (Stucture of Markets)

साधारपणे बोली भाषेत बाजारपेठ म्हणजे वस्तुची खरेदी विक्री केली जाते. असे ठिकाण असा बाजारपेठेचा अर्थ लक्षात घेतला जातो पण एवढा संकुचित अर्थशास्त्रात बाजारपेठेचा अभिप्रेत नाही. जेव्हान्सच्या मताप्रमाणे बाजारपेठ म्हणजे शहरातील अशी सार्वजनिक जागा जेथे वस्तु आणि सोयी विक्रीसाठी खुल्या केला जातात. तर कुर्नो या फेंच अर्थशास्त्रज्ञाने बाजारपेठेची पुढीलप्रमाणे व्याख्या केलेली आहे. ‘‘बाजारपेठ ही वस्तुची खरेदी किंवा विक्री होत असलेली जागा नसुन हा एक असा भुप्रदेश आहे की, ज्या भुप्रदेशात खरेदीदार आणि विक्रेते याचा परस्परांशी इतका निकटचा संबंध असतो की, एकाच वस्तुची किंमत सहज आणि शीघ्रपणे सर्वत्र समान होण्याची प्रवृत्ती असते.

वरील व्याख्येवरून बाजारपेठेची खालील वैशिष्टे लक्षात येतात.

1) बाजारपेठ म्हणजे बाजार ओळीची जागा नाही. हा एक विशाल भुप्रदेश आहे. हा प्रदेश एखाद्या विभागापुरता एखाद्या प्रांताएवढा किंवा देशाएवढा किंवा जगाएवढा असतो.
2) बाजारपेठेत ज्या वस्तुची खरेदी विक्री केली जाते अशी वस्तु बाजारात उपलब्ध असते.
3) वस्तुची विक्री करणारे विक्रेते आणि वस्तुची खरेदी करणारे ग्राहक याचा बाजारपेठेत परस्परांशी निकटचा संबंध येतो. खरेदीदाराच्या आणि विक्रेत्याच्या निकटच्या संबंधामुळे किंमत सहज व जलद गतीने समान होण्याची शक्यता असते.

**पूर्ण स्पर्धा :**

बाजारपेठेचे जे वेगवेगळे प्रकार आहेत. त्यातील एक प्रकार म्हणजे पूर्ण स्पर्धा होय. प्रो. नाईट याच्या मते, ज्या बाजारपेठेत असंख्य ग्राहक असंख्य विक्रेते असतात. वस्तुला असलेली मागणी संपूर्ण लवचिक असते. उत्पादन घटकाची संपूर्ण गतीक्षमता आढळते त्या बाजारपेठेला पूर्ण स्पर्धा म्हणतात. तर श्रीमती जोन रॉबिन्स ज्या मते. जेव्हा प्रत्येक उत्पादकाच्या उत्पादित वस्तुसाठी असलेली मागणी पूर्ण लवचिक असते. विक्रेत्यांची संख्या जास्त असते. तसेच एकूण उत्पादनात एका विक्रेत्याचे परिमाण नगण्यच असते. ग्राहकांची संख्या जास्त असुनही वस्तु खरेदी करण्यासाठी त्यांच्यात स्पर्धा आढळते अशा बाजारपेठेला पूर्ण स्पर्धा असे म्हणतात.

**वैशिष्टे :** पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेची पुढील वैशिष्टे आहेत.

**1) असंख्य ग्राहक आणि असंख्य विक्रेते :**

पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत असंख्य ग्राहक आणि असंख्य विक्रेते असतात. एखाद्या विक्रेत्याचा किंवा ग्राहकाचा बाजारपेठेतील सहभाग अल्प असतो. एखाद्या विक्रेत्याने वस्तुचा पुरवठा बंद केला तर किंमतीवर प्रभाव पडत नाही. तसेच एखाद्या ग्राहकाने मागणी कमी तरी वस्तुच्या किंमतीवर परिणाम पडत नाही.

**2) ग्राहक व विक्रेत्यांना बाजार पेठेचे संपूर्ण ज्ञान :**

ग्राहक व विक्रेत्यांना बाजार पेठेतील परिस्थितीचे पूर्ण आकलन होते. एखाद्या विशिष्ट वस्तूची किंमत ग्राहकांना माहित असावे. ग्राहकाला मिळणारी उपयोगिता आणि द्यावी लागणारी किंमत या दोन्हीची सांगड घालून वस्तूची खरेदी करतो. पूर्ण स्पर्धेच्या बाजारेपेठेत वस्तूंची किंमत समान असते त्यामुळे बाजार पेठेतील किंमती बद्दल पूर्ण ज्ञान असते.

**3) एकजीन्सी वस्तू :**

पूर्ण स्पर्धेच्या बाजार पेठेत वस्तू या एकजीन्सी स्वरूपाच्या असतात वस्तूचा आकार, रंग, रूप, धव, वजन, वेस्टन, पँकीग, गुण, इत्यादी गुणवैशिष्ट्ये समान असतात ती वस्तू एकजीन्सी वस्तू असते.



**4) मुक्त प्रवेश :**

या बाजारपेठेमध्ये उद्योग पेढी या एकच असल्यामुळे बाजारात कधीही प्रवेश करता येतो. उद्योगातील पूर्ण उत्पादित वस्तू बाजार पेठेत विक्रीसाठी केव्हाही आणता येते आणि बाजारातून केव्हाही निघून जाण्याचे स्वातंत्र्य अशा पेढ्यांना असते. बाजार पेठेत ठरलेली किंमत एखाद्या पेढीला स्वीकारणे शक्य नसल्यास ती पेढी उद्योग सोडून बाहेर जाऊ शकते त्याना कोणतेही निर्बंध नसतात.

**5) सुज्ञ ग्राहक :**

पूर्ण स्पर्धेच्या बाजार पेठेतील ग्राहक सुज्ञ असतात त्यांना बाजार पेठेचे पूर्ण ज्ञान असते वस्तूच्या किंमतीच्या बदलाचा अंदान येतो आणि ग्राहकांची फसवणूक होत नाही.

**6) उत्पादन घटकांची गतीशिलता :**

उत्पादन घटक पूर्ण गतीशील असल्यामुळे एका पेढीतून दुसऱ्या पेढीत सहज प्रवेश करता येतो. ज्या ठिकाणी ज्या व्यवसायात कमी मोबदला मिळतो त्या व्यवसायातून दुसऱ्या प्रकारच्या व्यवसायाकडे उत्पादन घटक गतीशील होतात. म्हणून पूर्ण स्पर्धेच्या बाजार पेठेत उत्पादन घटकामध्ये पूर्ण गतीशीलता असते.

**7) वाहतूक खर्चाचा आभाव :**

पूर्ण स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे या स्पर्धेत वाहतूक खर्चाचा आभाव असतो एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वस्तूचे हस्तांतरण करताना वाहतूक खर्च लावला जात नाही.

**8) जाहिरातीचा आभाव :**

पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत विकल्या जाणाऱ्या वस्तू या एकजीन्सी असल्यामुळे व त्यांची किंमत समान असल्यामुळे जाहीरात केली जात नाही त्यामुळे या स्पर्धेत जाहिरातीचा आभाव असतो.

**9) विक्री खर्चाचा आभाव :**

पूर्ण स्पर्धेच्या बाजार पेठेत आपल्या वस्तूची जाहिरात प्रचारासाठी खर्च करावा लागत नाही कारण सर्व पेढ्यांचे उत्पादन एकसारखेच असते.

**10) समान किंमत :**

पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत वस्तूची किंमत समान असते तर एखाद्या विक्रेत्याने वस्तूच्या मागणीत घट होऊन मागणी शून्यापर्यंत येऊ शकते.

**11) नियंत्रणाचा आभाव :**

पूर्ण स्पर्धेच्या बाजार पेठेत ग्राहक व विक्रेते यांच्यावर शासनाचे किंवा कुठल्याही निमशासकीय संस्थेचे नियंत्रण नसते.

**12) महत्तम नफा :**

या स्पर्धेमध्ये नफा मिळवणे हा महत्त्वाचा उद्देश असतो आणि जास्तीत जास्त विक्री करते उत्पादन वाढीचा दर कायम राखणे व नफ्याच्या प्रमाणात सातत्याने वाढ करणे.

**पुर्ण स्पर्धेत किंमत निर्धारण :**

पूर्ण स्पर्धेच्या बाजारात मूल्य निश्चितीचा विचार करत असताना जागतिक अर्थशास्त्रीय विचार प्रवाहातून दोन मत प्रवाह आढळून येतात त्यात प्रा. डेव्हिल रिकार्डो यांनी किंमत निश्चितीमध्ये वस्तूचा पुरवठा या घटकाला महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे. तर जेव्हान्स या अर्थतज्ञाने किंमत निश्चितीमध्ये मागणी या घटकाला महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे.

डॉ. मार्शल यांच्या मते, वरील दोन्हीही प्रवाह एकांगी स्वरूपाचे वाहतात तर मार्शलच्या मते, वस्तूच्या किंमत निश्चितीमध्ये वस्तूची मागणी व वस्तूच्या पुरवठा या दोन्हीही आवश्यकता असते या दोन्ही घटकांच्या साह्याने पुर्ण स्पर्धेच्या बाजार पेठेत वस्तूची किमत ठरत असते.

उदा. कापड कापण्यासाठी कातरीच्या दोन्ही पात्यांची आवश्यकता असते.

**वस्तूची मागणी :**

वस्तूची मागणी ही वस्तूच्या किंमतीवर आणि ग्राहकाच्या अभीरूचीवर अवलंबून असते. वस्तूच्या किंमतीपेक्षा मिळणारी उपयोगिता जास्त असल्यास वस्तूच्या मागणीत वाढ होते याउलट उपयोगीता कमी असल्यास मागणीत घट होते.

**वस्तूचा पुरवठा :**

वस्तूचा पुरवठा हा वस्तूच्या किंमतीवर अवलंबून असतो किंमत जास्त असल्यास पुरवठा जास्त असतो तर किंमत कमी असल्यास उत्पादक कमी वस्तूचा पुरवठा करतो.



**मागणी पुरवठ्याच्या साह्याने किंमत निश्चिती :**

पूर्ण स्पर्धेच्या बाजारात वस्तूची किमत ही वस्तूची मागणी व पुरवठा या दोन्ही घटकाच्या साह्याने ठरत असते या दोन्ही घटकांचे खालील तक्त्याच्या साह्याने स्पष्टीकरण.

| किंमत | मागणी (नगात) | पुरवठा (नगात) |
|---|---|---|
| 5 | 20 | 100 |
| 4 | 40 | 80 |
| 3 | 60 | 60 |
| 2 | 80 | 40 |
| 1 | 100 | 20 |




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर मागणी व पुरवठा तर OY अक्षावर किंमत दाखविलेली आहे. DD हा मागणी तर SS हा पुरवठा वक्र आहे. हे दोन्ही वक्र परस्पराना E बिंदूत स्पर्श करतात. त्यावेळी वस्तुची किंमत निश्चित होते. यापेक्षा किमत वाढली तर पुरवठा वाढतो मागणी कमी होते. उलट संतुलन बिंदुपेक्षा किंमत कमी खाली तर मागणी वाढते. पुरवठा कमी होतो.

## पूर्ण स्पर्धेत उद्योगसंस्था आणि उद्योगाचे अल्पकालीन संतुलन (Equilibriun of Firm and Industry in short Period) :

पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत मागणी आणि पुरवठा याच्या संघर्षशक्तीतुन वस्तुची किंमत निश्चित होते. डॉ. मार्शलच्या मते कधी कोणती तर कधी कोणती बाजू महत्वाची असते अती अल्पकाळात उत्पादकाला पुरवठ्यात वाढ करता येत नसल्यामुळे मागणी बाजू महत्त्वाची असते. अती अल्पकाळात मागणी वाढली तर किंमत वाढते व मागणी कमी झाली तर किंमत कमी होते. अल्पकाळात उत्पादकाला पुरवठ्यात वाढ करता येत नसल्यामुळे मागणीच बाजू महत्त्वाची असते. दीर्घकाळात मागणी व पुरवठा सारख्याच महत्त्वाच्या असतात. अती दीर्घकाळात पुरवठ्यात वाढ करता येत असल्यामुळे पुरवठा बाजु महत्त्वाची ठरते.

अल्पकाळात उत्पादक स्थिर घटकात वाढ अगर घट करू शकत नाही. मात्र बदलत्या घटकात बदल करून उत्पादनात वाढ अगर घट करू शकतो. अल्पकाळात मागणी वाढली तर ते मागणीची पूर्तता करण्यासाठी बदलत्या घटकाच्या नगसंख्येत वाढ करून उत्पादनात वाढ करता येते असे असले तरी एका विशिष्ट मर्यादेपर्यंत उत्पादन वाढविता येते.

**संतुलनाची अट :**

1) उद्योग संस्थेचे संतुलन घडून येण्यासाठी उद्योग संस्थेचा सीमांत खर्च (MC) = सीमांत उत्पन्न (MR) असला पाहिजे.

2) उद्योगाचे संतुलन घडून येण्यासाठी उद्योगसंस्थेचा सीमांत खर्च (MC) = सीमांत उत्पन्न (MR) = सरासरी उत्पन्न (AR) = सरासरी खर्च (AC) असला पाहिजे. उद्योगसंस्था म्हणजे एकाद्या वस्तुचे उत्पादन करणारी एखादी संस्था म्हणजे पेढी किंवा उद्योगसंस्था होय. अशा अनेक उद्योगसंस्थाचा मिळून उद्योग तयार होतो.

**गृहीतके :**

1) अल्पकाळात कोणतीही उद्योगसंस्था बाजारात प्रवेश करत नाही.

2) अल्पकाळात उद्योगातून कोणतीही उद्योगसंस्था बाहेर पडत नाही.

3) सर्व उद्योगसंस्थाचा उत्पादन खर्च सारखाच असतो.

4) सर्व उत्पादन घटकाची कार्य क्षमता सारखी आहे. हे विश्लेषण खालील आकृतीत दाखविले आहे.






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर मागणी व पुरवठा तर OY अक्षावर किंमत दाखविलेली आहे. आकृतीत पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत अल्पकाळात उद्योगसंस्था आणि उद्योगाचे अल्पकालीन संतुलन कसे होते हे स्पष्ट केलेले आहे. आकृतीत MC हा सीमांत तर AC हा सरासरी खर्च वक्र काढला आहे. तर $AR_1$, AR, $AR_2$ व MR, $MR_1$ व $MR_2$ हे सरासरी उत्पन्न व सीमांत उत्पन्न वक्र काढलेले आहेत.

**T बिंदु (OP) किंमत :**

आकृतीत T बिंदुच्या ठिकाणी MC = MR आहे व AC = AR सुद्धा त्यामुळे उद्योगसंस्था व उद्योगाचे संतुलन घडुन येते. यावेळी पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत OM एवढे उत्पादन (मागणी पुरवठा) आहे OP किंमत निश्चित होते. यावेळी □ OMTP उत्पन्न व □OMTP किंमत व □OMTP खर्च आहे. यावेळी पूर्ण स्पर्धेत उद्योग संस्थाना उत्पन्न = खर्च असल्यामुळे सामान्य नफा मिळतो.

**$T_2$ बिंदु ($OP_2$) किंमत :**

आकृतीत $T_2$ बिंदुच्या ठिकाणी MC=MR असल्यामुळे उद्योग संस्थेचे संतुलन घडुन येते. पण AC=AR नसल्यामुळे उद्योगाचे संतुलन घडून येत नाही. यावेळी उद्योगसंस्था $OM_2$ उत्पादन करून ते $OP_2$ किंमतीप्रमाणे विकतात.

यावेळी □ $OM_2T_2P_2$ एवढे उत्पादन (उत्पन्न) तर □$OMN_1N$ उद्योग संस्थाना खर्च येतो. उत्पन्नातून खर्च वजा केला तर □$NN_1T_2P_2$ एवढे नुकसान (तोटा) सहन करावा लागतो. म्हणून $T_2$ बिंदुच्या ठिकाणी उद्योगसंस्थेच्या संतुलन घडून येते उद्योगाचे नाही.

**$T_1$ बिंदु ($OP_1$) किंमत :**

$T_1$ बिंदुच्या ठिकाणी MC=MR असल्याने उद्योग संस्थेचे संतुलन घडुन येते. उद्योगाचे नाही. कारण AR=AC एक दुसऱ्या बरोबर नाहीत. यावेळी उद्योग संस्था $OM_1$ एवढे उत्पादन करतात. ते $OP_1$ किंमतीने विकले जाते. □$OM_1T_1P_1$ एवढे उत्पन्न □$OM_1N_2N$ एवढा खर्च येतो. उत्पन्नातून खर्च वजा केला तर □ $N_2T_1P_1N$ इतका नफा प्राप्त होतो.

अशा रितीने पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत अल्पकाळात किंमत व उत्पादन निश्चिती घडून येते.

**दिर्घकाळात किंमत निश्चिती :**

दीर्घकाळात पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत उद्योग संस्थाना नेहमी सामान्य नफा प्राप्त होतो. दीर्घकाळात उद्योग संस्थेचे व उद्योगाचे संतुलन घडुन येण्यासाठी सीमांत खर्च = सरासरी खर्च = सरासरी उत्पन्न = सीमांत उत्पन्न असले पाहिजे. MC=AC=AR=MC असला पाहिजे हे विश्लेषण खालील आकृतीत दाखवले आहे.






सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उत्पादन तर OY अक्षावर किंमत/खर्च/उत्पन्न दाखविलेले आहे. आकृतीत पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत T बिंदुच्या ठिकाणी संतुलन घडुन येते यावेळी सर्व उद्योगासंस्था OM एवढे उत्पादन करतात OP एवढ्या किंमतीने विकतात. AR=MR=AC=MC या अटीची देखील पूर्तता होते. उत्पन्न=खर्च असल्यामुळे उद्योगसंस्थाना सामान्य नफा प्राप्त होतो. अशा रीतीने पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत उद्योगसंस्था व उद्योगाचे संतुलन घडुन येते.

**मक्तेदारी बाजारपेठ (Monopoly Market) :**

मक्तेदारी बाजारपेठेलाच एकाधिकार बाजारपेठ असे म्हणतात. मक्तेदारी हा शब्द इंग्रजीतील शब्दापासून तयार झाला आहे. यातील Mono - Single म्हणजेच एकटा व Poly-Producer (उत्पादक) होय. मक्तेदारीचा सर्व साधारण अर्थ एकच उत्पादक असा होतो या बाजारेपठेमध्ये एकच उत्पादक किंवा एकच विक्रेता असतो. या प्रकारच्या बाजारपेठेत वस्तूला जवळचा पर्याय नसतो त्यामुळे विक्रेत्याचे वस्तूच्या किंमतीवर पूर्ण नियंत्रण असते. त्यामुळे उत्पादक हाच किंमत कर्ता बनतो. मक्तेदारीयुक्त बाजारपेठेमध्ये उद्योग व उद्योग संस्था असा भेद केला जात नाही मक्तेदार हा जास्तीत जास्त नफा कमवण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे किंमत भेद ही संकल्पना मक्तेदारी बाजारपेठेमध्ये अस्तित्वात असते.

**व्याख्या :**

- **प्रा. मेहता :** ''एकाधिकार त्यालाच म्हटले जाते की ज्याचे किंमतीवर पूर्ण नियंत्रण असते.''
- **ट्रीफन :** ''जर एखाद्या विक्रेत्यावर आपला उत्पादीत वस्तू व्यतिरिक्त इतर उत्पादित वस्तूच्या किंमतीतील बदलाचा प्रभाव होत नसेल तर तो एकाधिकार होय.''
- **प्रा. चेंबरलीन :** ''मक्तेदारी म्हणजे अशी उत्पादन संस्था होय, की ज्याचे पुरवठ्यावर पूर्ण नियंत्रण असते आणि ज्या वस्तूला जवळचा पर्याय अस्तित्वात असतो.''
- **प्रा. लर्नर :** ''एकाधिकार म्हणजे असा विक्रेता की ज्याचा उत्पादनाचा मागणी वक्र खाली येणारा असतो.''






**मक्तेदारीची वैशिष्ट्ये :**

**1) एकच विक्रेता :**

या बाजारपेठेचे उत्पादन करणाऱ्या एकच उत्पादक असतो. एकच उद्योगसंस्था असल्यामुळे उत्पादनावर पुर्ण नियंत्रित असते. यात उद्योग व संस्था असा भेद केला जात नाही.

**2) पेढी/उद्योग एकच :**

एकाच उद्योगात अनेक पेढया कार्य करित असतात. परंतु मक्तेदारी उद्योगात एकच पेढी अस्तित्वात असते. त्यामुळे उक्तेदारीचा स्थितीत पिढी व उद्योग असा भेद केला जात नाही. पेढीचे संतुलन म्हणजे उद्योगसंस्थेचे संतुलन होय.

**3) पर्यायी वस्तुचा अभाव :**

या बाजारात वस्तुला जवळचा पर्याय नसतो. वस्तुसारखीच दुसरी नसते. त्यामुळे वस्तुची मागणीची तिरकस शून्य लवचिकता असते.

**4) मुक्त प्रवेशाचा अभाव :**

मक्तेदारीच्या बाजारपेठेत इतर उद्योग किंवा पेढ्या किंवा उद्योग संस्था बाजारपेठेत प्रवेश करत नाहीत प्रवेश अवघड असतो अशक्य असतो.

**5) मुल्यभेद/किंमतभेद :**

मक्तेदाराचे पुरवठा व किंमती पूर्ण नियंत्रण असल्याने अधिक नफा मिळतो. एकच वस्तू वेगवेगळ्या बाजारात वेगवेगळ्या ग्राहकांना किंमतीत बदल करून विकली जाते. यालाच किंमतभेद म्हणतात. किंमत भेदाच्या आधारे मक्तेदार जास्तीत जास्त नफा प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो.

**6) पुरवठा व नियंत्रण :**

मक्तेदारीच्या बाजारात वस्तूचा पुरवठा करणारा एकच विक्रेता असतो. त्यामुळे पुरवठ्यावर नियंत्रण असते. गरजेनुसार मक्तेदार पुरवठ्यात वाढ/घट करू शकतात.

**7) महत्तम नफा :**

मक्तेदार हा नेहमी जास्तीत जास्त नफा प्राप्त करण्याचे बघतो. मक्तेदार केवळ उत्पादन खर्च भरून निघेल/मागणी पुरवठा संतुलन होईल या दृष्टिने किंमत आकारत नाही.

**8) जाहिरात खर्चाचा अभाव असतो :**

मक्तेदाराचा बाजारपेठेमध्ये एकच वस्तू अस्तित्वात असल्यामुळे ग्राहकांना जी वस्तू खरेदी केल्याशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे जाहिरात करण्याचा प्रश्न उदभवत नाही. त्यामुळे जाहिरात खर्च लावला जात नाही.

**9) स्वतंत्र्य किंमत धोरण :**

मक्तेदार आपल्या वस्तू व सेवेची किंमत गरजेनुसार बदल करण्याचे स्वातंत्र्य मक्तेदारास असतो.

**मक्तेदारीच्या बाजारपेठेचे प्रकार :**

**1) नैसर्गिक एकाधिकार :**

निसर्गाच्या कृपेमुळे काही नैसर्गिक कारणामुळे मक्तेदारी निर्माण होते. त्याला नैसर्गिक एकाधिकार असे म्हणतात.

उदा. कोकणात हापुस आंब्याची संपुर्ण भारतावर मक्तेदारी आहे. तर काश्मिर मधल्या केसरची मक्तेदारी आहे. अरब राष्ट्राकडे डिझेल आणि पेट्रोलचा एकधिकार आहे. थोडक्यात अशी मक्तेदारी निर्माण होण्याचे कारण म्हणजे नैसर्गिक एकाधिकार होय.

**2) सार्वजनिक एकाधिकार :**

समाजाच्या हितासाठी काही वेळेस सरकार काही वस्तुचे उत्पादन करते याला सार्वजनिक एकाधिकार असे म्हणतात.

**3) सामाजिक एकाधिकार :**

सामाजिक हीतासाठी सरकार सामाजिक मक्तेदारी निर्माण करते.

उदा. पाणी पुरवठ्याचा एकाधिकार नगरपालिकेकडे असतो. रेल्वे, बस, वाहतुक यासारख्या सेवा सुविधा सरकार पुरविते.

**4) कायदेशीर एकाधिकार :**

काही वेळेस कायद्याने एकाधिकार निर्माण केलेला असतो. तेव्हा अशा मक्तेदारीला कायदेशीर एकाधिकार असे म्हणतात. प्रत्येक व्यक्तीला आपल्या ज्ञानाचा, कौशल्याचा, श्रमाचा फायदा घेण्यासाठी अशी मक्तेदारी निर्माण केली जाते.



उदा. लेखकाला कॉफी राईटचा अधिकार उत्पादकाला व्यापार चिन्हे दिली जातात.

थोडक्यात जी मक्तेदारी कायद्याने निर्माण केली जाते. अशा मक्तेदाराला कायदेशीर मक्तेदार असे म्हणतात.

**5) संयोगाद्वारे निर्माण होणारी मक्तेदारी :**

बाजारपेठेतील तीव्र स्पर्धेला सामोरे जाता यावे म्हणून उद्योजक एकत्र येवून संयोगाद्वारे मक्तेदारी निर्माण करतात. या मक्तेदाराला ऐच्छिक मक्तेदार म्हणतात.

**6) तांत्रिक मक्तेदारी :**

उत्पादन तंत्रात झालेल्या बदलामुळे उत्पादन खर्च कमी होवून मोठ्या उत्पादन संस्था उत्पादनात वाढ घडवून आणु शकतात. लहान उद्योग संस्था नवीन उत्पादन तंत्राचा वापर करू शकत नाही. त्यामुळे मोठ्या उद्योग संस्थाची मक्तेदारी निर्माण होते.

**मक्तेदारीच्या बाजारपेठेतील किंमत निश्चिती :**

**मक्तेदारीच्या बाजारपेठेत अल्पकाळात किंमत निश्चिती :**

अल्पकाळ म्हणजे काही महिन्यांचा काळ असतो. अल्पकाळात मक्तेदार एका विशिष्ट मर्यादेपर्यंत उत्पादनात वाढ करू शकतो. अल्पकाळात उत्पादनात वाढ करण्यासाठी तो बदलत्या घटकांच्या साधनात वाढ करून उत्पादनात एका विशिष्ट मर्यादेपर्यंत वाढ करू शकतो. अल्पकाळात मक्तेदाराला अतिरिक्त नफा प्राप्त होतो. याच बरोबर अल्पकाळात सामान्य नफा प्राप्त होऊन शकतो. याचबरोबर मक्तेदाराला तोटा देखिल होऊ शकतो. अल्पकाळात तोटा होत असेल तर उत्पादक उत्पादन प्रक्रिया सुरू ठेवेल आणि हा तोटा तो दिर्घकाळात भरून काढेल.

**संतुलनाची अट :**

मक्तेदारीच्या बाजारपेठेत वस्तुची किंमत संतुलीत होण्यासाठी पुढील अटीची पुर्तता झाली पाहिजे.

1) सिमांत खर्च हा सिमांत उत्पन्नाबरोबर असावा.

2) किंमत ही सरासरी बदलत्या खर्च इतकी असली पाहिजे (P=AVC)

3) MC चा वक्र MR च्या वक्राला खालुन घेऊन वर गेला पाहिजे.

या तीन अटीची पुर्तता होत असेल तर मक्तेदारीच्या बाजारपेठेत वस्तुची किंमत आणि उत्पादन निश्चिती घडून येते.

**1) मक्तेदाराला अतिरिक्त नफा प्राप्त होणारी स्थिती :**

मक्तेदारीच्या बाजारपेठेत अल्काळात मक्तेदाराला अतिरिक्त नफा देखील प्राप्त होवू शकतो. जर खर्चा पेक्षा उत्पन्न जास्त असेल तर मक्तेदाराला अल्पकाळात अतिरिक्त लाभ प्राप्त होत असतो.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उत्पादन OY अक्षावर किंमत खर्च उत्पन्न दर्शविले आहे. आकृतीत AR हा सरासरी उत्पन्न आणि MR हा सिमांत उत्पन्न AC हा सरासरी खर्च आणि MC हा सिमांत खर्च वक्र दर्शविला आहे. आकृतीत संतुलनाच्या सर्वच अटीची पुर्तता होते. मक्तेदार OM एवढे उत्पादन करतो. मक्तेदाराला येणारा सरासरी खर्च $OP_1$ एवढा आहे. तर OM एवढ्या उत्पादानापासून OP एवढे उत्पन्न प्राप्त होते. उत्पन्नातून खर्च वजा केला असत. □ $PTNP_1$ हा भाग मक्तेदाराला प्राप्त झालेला अतिरिक्त नफा असेल अशा रितीने मक्तेदारीच्या बाजारपेठेत मक्तेदाराला अतिरिक्त नफा देखिल प्राप्त होतो किंवा होवू शकतो.



**2) अल्पकाळात मक्तेदाराला सामान्य नफा मिळतो तेव्हा :**

मक्तेदारीच्या बाजारपेठेत मक्तेदाराला अतिरिक्त नफा प्राप्त होतो. याच बरोबर सामान्य नफा प्राप्त होतो. सामान्य नफा म्हणजे खर्च आणि उत्पन्न एक दुसऱ्याच्या बरोबर असतात. मक्तेदारीच्या बाजारपेठेत मक्तेदाराला सामान्य नफा मिळत असेल तर मक्तेदार उत्पादन प्रक्रिया चालुच ठेवतो कारण दिर्घकाळात मक्तेदाराला अतिरिक्त नफा मिळेल हा त्याचा उद्देश असतो. हे विश्लेषण खालील आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट केले आहे.




सोबतच्या आकृतीत मक्तेदार OM एवढे उत्पादन करतो. OM एवढ्या उत्पादनासाठी OP एवढा खर्च येतो. तर OM एवढ्या उत्पादनापासून मक्तेदाराला OT एवढे सरासरी उत्पन्न प्राप्त होते. उत्पन्नाबरोबर खर्च असल्याने उत्पादकाला सामान्य नफा प्राप्त होतो.

**3) अल्पकाळात मक्तेदाराला तोटा होत असेल तर :**

अल्पकाळात मक्तेदाराला तोटा होत असेल तर मक्तेदार उत्पादन प्रक्रिया बंद करत नाही तर हा तोटा दिर्घकाळात वसुल करता येईल या उद्देशाने मक्तेदार उत्पादन प्रक्रिया सुरू ठेवतो हे विश्लेषण खालील आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट केले आहे.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उत्पादन तर OY अक्षावर किंमत खर्च आणि उत्पन्न दर्शविलेले आहे. मक्तेदार OM एवढे उत्पादन करतो व या उत्पादनाला येणारा सरासरी खर्च OP एवढा आहे. या उत्पादनाच्या उत्पादकाला $OP_1$ एवढे उत्पन्न प्राप्त होते. उत्पन्नातून खर्च वजा केला असता □ $PTNP_1$ हा भाग म्हणजे मक्तेदाराला झालेले नुकसान होय. असे असले तरी मक्तेदार दिर्घकाळात हा तोटा भरून काढता येईल म्हणून उत्पादन प्रक्रिया सुरू ठेवतो.

अशा रितीने अल्पकाळात मक्तेदाराला अतिरिक्त नफा, सामान्य नफा आणि तोटा होत असताना वस्तुची किंमत निश्चित होते.

**दीर्घकाळात मक्तेदारीच्या बाजारपेठेत किंमत आणि उत्पादन निश्चिती :**

दिर्घकाळात उत्पादनाच्या स्थिर घटकात व बदलत्या घटकात कितीही वाढ अगर घट करता येते. यामुळे मक्तेदार मागणी पुरवठ्यात बदल करू शकतो. अल्पकाळात मक्तेदाराला तोटा होत असताना देखिल उत्पादन करत असतो. परंतु दिर्घकाळात मक्तेदार नेहमी अतिरिक्त नफा प्राप्त करतो. मक्तेदारीच्या बाजारपेठेत मक्तेदाराला दिर्घकाळात तोटा होत असेल तर मक्तेदार उत्पादन प्रक्रिया बंद करण्याचा निर्णय घेतो. दिर्घकाळात एकाधिकाराच्या



बाजारपेठेत संतुलन घडुन येण्याची मुख्य अट म्हणजे सिमांत उत्पन्न = सिमांत खर्च असायला लागते. दिर्घकाळात मक्तेदारीच्या बाजार पेठेत वस्तुची किंमत अशी निश्चित होते याचे विश्लेषण खालील आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट केले आहे.




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उत्पादन तर OY अक्षावर किंमत, उत्पन्न, खर्च दर्शविलेला आहे. आकृतीत S बिंदुच्या ठिकाणी MC चा वक्र MR वक्राला खालुन छेदुत वर जातो, यावेळी मक्तेदार OM एवढे उत्पादन करतो या उत्पादनासाठी उत्पादकाला $OP_1$ एवढा सरासरी खर्च येतो. तर OM उत्पादनापासून OP एवढे उत्पन्न प्राप्त होते. उत्पन्नातून खर्च वजा केला असता □$PTSP_1$ हा भाग म्हणजे मक्तेदाराला प्राप्त झालेला अतिरिक्त नफा होय.

**एकाधिकारातील/मक्तेदारीतील मुल्यभेद :**

मक्तेदारीच्या बाजारपेठेचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे मक्तेदारीत मक्तेदार मुल्यभेद करतो ''मुल्यभेद म्हणजे किंमतीत भेद करणे होय.'' एकाच प्रकारच्या वस्तू वेगवेगळ्या ग्राहकांना विभिन्न किंमतीला एकाधिकार विक्री करत असेल तर त्याला मुल्यभेद असे म्हणतात.

**श्रीमती जॉन रॉबिन्सन :** यांच्यामते, निरनिराळ्या किंमतीला मक्तेदार वस्तु विकत असेल तर त्याला मुल्यभेद असे म्हणतात.

**मूल्यभेदाचे प्रकार :**

1) **स्थानानुसार मुल्यभेद :**

जेव्हा एकाच प्रकारची वस्तु किंवा सेवासाठी मक्तेदार वेगवेगळ्या ठिकाणी निरनिराळ्या किंमती आकारते, तेव्हा स्थानानुसार मुल्यभेद म्हणतात.

उदा. पारले बिस्किट पुडा 4 रुपयाला मिळतो तर बस किंवा रेल्वेत 5 रुपयाला मिळतो.

2) **प्रादेशिक मुल्यभेद :**

जेव्हा प्रदेश व प्रांतानुसार एक सारख्या वस्तुंच्या किंमती मक्तेदार वेगवेगळ्या ग्राहकाना निरनिराळ्या किंमतीला आकारतो तेव्हा त्याला प्रादेशिक मुल्यभेद असे म्हणतात.

**उदा.** काश्मिरमध्ये सफरचंदाचे दर कमी तर महाराष्ट्रात ते दर जास्त असतात.

3) **व्यक्तीनुसार मुल्यभेद :**

ज्यावेळी मक्तेदार एकाच ग्राहकांना वेगवेगळ्या किंमती आकारतो. तेव्हा त्याला व्यक्तीनुसार मुल्यभेद असे म्हणतात.

उदा. डॉक्टर वकिल हे गरिब ग्राहकाकडुन कमी फिस तर श्रीमंत ग्राहकाकडून जास्त फी घेतात.

4) **वर्गानुसार मुल्यभेद :**

जेव्हा एकच सेवा वेगवेगळ्या वर्गाला वेगवेगळ्या किंमतीला पुरविल्या जातात. तेव्हा त्याला वर्गानुसार मुल्यभेद असे म्हणतात.

उदा. रेल्वेमधील तिकिटाचे दर firstclass, second class, third class असे असतात, तर सिनेमागृहात बाल्कणी, firstclass, Secondclass इत्यादी असे प्रेक्षकांसाठी वर्ग काढून श्रीमंत प्रेक्षकांकडून जास्त व गरिब प्रेक्षकाकडून कमी पैसा घेतला जातो.

5) **काळानुसार/वेळेनुसार मुल्यभेद :**

सोयीचे व गैरसोयीची वेळ विचारात घेवून जेव्हा वस्तु व सेवांच्या वेगवेगळ्या किंमती आकारल्या जातात.



**उदा.** दिवसापेक्षा रात्री STD च्या कॉल्सचे दर कमी असतात. याचबरोबर रातराणी बससेवेचे दर जास्त असतात. याला वेळेनुसार मुल्यभेद असे म्हणतात.

6) **उपयोगानुसार मुल्यभेद :**

उपयोगानुसार मुल्यभेद म्हणजे निरनिराळ्या उपयोगासाठी जेव्हा निरनिराळ्या किंमती आकारल्या जातात. तेव्हा त्याला उपयोगानुसार मुल्यभेद असे म्हणतात. उदा. विजेच्या घरगुती वापरासाठी कमी तर उद्योग वापरासाठी जास्त दर आकारले जातात.

**मक्तेदारीमुक्त स्पर्धा किंवा अपूर्ण स्पर्धा**

**(Mono Polistic Competition/in Perfect Competition) :**

आधुनिक काळात प्रत्यक्ष व्यवहारातमध्ये पूर्ण स्पर्धा ही काल्पनीक बाजारपेठ म्हणून ओळखाली जाते व मक्तेदारीची बाजारपेठ जी मर्यादित बाजारपेठ म्हणून ओळखली जाते. प्रत्यक्षात अर्थव्यवस्थेत मक्तेदारी मुक्त स्पर्धा किंवा एकाधिकार मुक्त स्पर्धा ही बाजारपेठ आढळून येते. मक्तेदारी युक्त स्पर्धा एकाधिकार व पूर्णस्पर्धा या दोन्हीचे सह अस्तित्व आहे. प्रत्येक वस्तूमध्ये वस्तूशी संबंधित इत्यादी घटकात विभिन्न बदल आढळून येतात. उदा. कापड, मोटार इत्यादी

प्रत्येक देशामध्ये एखाद्या विशिष्ट वस्तूच्या उत्पादनाची नकल टाळण्यासाठी प्रत्येक देशामध्ये ट्रेड मार्केट वापरला जातो. ज्याला आपण पेंट्ट असे म्हणतो या ट्रेड मार्केटमुळे वस्तूच्या उत्पादनाची नक्कल टाळता येते. म्हणून मक्तेदारी युक्त बाजारपेठेत वस्तू भिन्नता आढळून येते.

**मक्तेदारी युक्त स्पर्धेचा विकास :**

प्रा. चेंबरलिन या अमेरिकन शास्त्रज्ञाने मक्तेदारी युक्त सिद्धांत मांडणी केली. इ. स. 1933 मध्ये "The Theory of Mono Polistic competition" हा आपला ग्रंथ प्रकाशित केला तसेच ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ श्रीमती जॉन रॉबीन्सन यांनी ''The theory of inperfect competition'' हा ग्रंथ प्रकाशित केला आहे त्यात त्यांनी अपूर्ण स्पर्धेची मांडणी केली आहे. या दोन्ही अर्थतज्ञांनी मांडलेली मते जवळपाससारखी आहे म्हणून मक्तेदारीयुक्त स्पर्धेला अपूर्ण स्पर्धा म्हणून ओळखले जाते.

**व्याख्या :**

**प्रा. चेंबरलिन :** ''मक्तेदारीयुक्त स्पर्धा हा बाजार व्यवस्थेचा असा प्रकार आहे की ज्यामध्ये अनेक उत्पादक एकमेकांस जवळच्या पर्यायी असणाऱ्या परंतु भेदजन्य वस्तूचे उत्पादन करीत असतो.''

''एकाधिकार युक्त स्पर्धा म्हणजे त्या बाजारात अगदी जवळचा पर्याय असलेल्या पण पूर्ण पर्याय नसलेल्या असंख्य विक्रेत्यास स्पर्धा असते.''




**I) मर्यादित विक्रेते :**

मक्तेदारीयुक्त स्पर्धेमध्ये विक्रेत्यांची संख्या मर्यादित असते. बाजारातील एखाद्या वस्तूच्या पुरवठ्यात प्रत्येक विक्रेत्याच्या पुरवठ्याचा समावेश असतो तसेच विक्री संदर्भात किंमत धोरण वेगवेगळे आकारले जाते. पुरवठ्यातील वाढ/घटीचा परिणाम बाजारातील एकूण मागणी/पुरवठ्यावर होत नाही.

**II) मुक्त प्रवेश :**

या स्पर्धेत विक्रेत्यांना मुक्त प्रवेश असतो पण तो पूर्ण स्पर्धेसारख्या नसतो त्यात काही अडथळे व बंधने असतात. उदा. एखाद्या उद्योजकाला एखाद्या विशिष्ट वस्तूचे उत्पादन घ्यायचे असल्यास शासनाची परवानगी घ्यावी लागते.

**III) वस्तू भेद :**

वस्तूभेद हा मक्तेदारी युक्त स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्ये आहे सर्व उत्पादकाच्या



उत्पादीत वस्तू सारख्याच नसतात त्यात पूर्णतः अंशतः बदल केलेला असतो अशा वस्तूंना जवळचा पर्याय असतो पण पूर्ण पर्याय नसतो.

**IV) जाहिरातीचा अभाव :**

मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजारात विक्रेत्यांकडून आपल्या वस्तूचे जास्तीत जास्त विक्री करण्यासाठी जाहिरातीचा वापर केला जातो. जाहिरातीच्या उद्देश आपल्या वस्तूची लोकप्रियता टिकून राहणे व नवीन ग्राहक उपलब्ध व्हावेत हा असतो त्यामुळे वस्तूच्या विक्रीत वाढ होऊन किंमत भेद केला जातो.

**V) ट्रेड मार्क वापर :**

प्रत्येक उत्पादक आपली वस्तू इतरांपेखा वेगळी आहे हे दर्शवण्यासाठी ट्रेड मार्क वापरत असतो यामुळे वस्तूमधील गुण भिन्नतेची ओळख ग्राहकांना होते व दुसऱ्या विक्रेत्याला त्या वस्तूचे जशेच्या तशे चिन्हा वापरता येत नाही.

**VI) विशिष्ट नावाचा वापर :**

या स्पर्धेत विक्रेत्यांला आपली वस्तू विकण्यासाठी विशिष्ट नावाचा ऐतिहासिक ठिकाणाचा इत्यादीचा वापर करावा लागतो.

**VII) विक्री खर्च :**

या स्पर्धेत उत्पादक जास्तीत जास्त नफा कमवण्यासाठी विक्री खर्चाचा आधार घेतो. विक्री खर्च म्हणजे वस्तू विकण्यासाठी लागणारा जो एकूण खर्च असतो त्यास विक्री खर्च असे म्हणतात. उदा. जाहिरातील वरील खर्च, वस्तूचे प्रदर्शन, वस्तूंची गॅरेंटी, दुरुस्तीची सेवा.

**VIII) वस्तूची रचना :**

या स्पर्धेतील उत्पादीत केलेल्या वस्तू या वेगवेगळ्या स्वरूपाच्या असतात वस्तूच्या एकूण गुणधर्मात बदल केला जातो. उदा. रंग, वजन, सुगंध, आकार, चव, पॅकिंग इत्यादी.

**IX) वाहतूक खर्च असतो :**

मक्तेदारीयुक्त स्पर्धेत वाहतूक खर्च हे गृहीत धरले जाते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वस्तूचे हस्तांतरण करण्यासाठी वाहतूक खर्च लावला जातो. या वाहतूक खर्चाचा समावेश विक्री खर्चामध्ये केला जातो.

**X) बाजाराचे ज्ञान :**

विक्रेत्यांना व ग्राहकांना बाजार पेठेचे पूर्ण ज्ञान असते त्यामुळे विक्रेते वस्तूची किंमत ठरवत असताना इतर वस्तूच्या उत्पादनाच्या किंमतीच्या विचार करून स्वतःच्या वस्तूची किंमत निश्चिती करत असतात त्याचबरोबर बाजारपेठेतील विक्री वाढवण्यासाठी वेगवेगळ्या तंत्राचा अवलंब केला जातो. उदा. जाहिरात.

**मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजारपेठेत अल्पकाळात वस्तुची किंमत निश्चिती:**

अल्पकाळात मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजारपेठेत एकसारख्या उत्पादन करणाऱ्या अनेक उद्योग संख्या असतात. प्रत्येक उद्योग संख्येचा उत्पादन खर्च भिन्न असतो काही उद्योग संस्थांनी बाजारपेठेत नाव लौकिक मिळवलेला असतो ख्याती मिळवलेली असते उपभोक्ते ज्या उद्योग संस्थेला बाजार पेठेत ख्याती मिळालेली आहे किंवा जी उद्योग संस्था बाजारपेठेत नावरूपाला आली आहे अशा उद्योग संस्थेकडून वस्तु खरेदी करतात अशा उद्योग संस्थानी वस्तुची किंमत जास्त आकारली तरी अशा उद्योगसंस्था वस्तुला असलेली मागणी कायम राहते या उद्योग संस्थाना अतिरिक्त नफा प्राप्त होतो. पण मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजारपेठेत काही उद्योगसंस्था नवीन बाजारपेठेत आलेल्या असतात. त्या नावारूपाला आलेल्या नसतात. अशा उद्योग संस्थाना मात्र सामान्य नफा किंवा तोटा देखिल होवू शकतो. मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजार पेठेत काही वेळेस उद्योग संस्थाना अतिरिक्त नफा तर काही वेळेस सामान्य नफा तर काही वेळेस तोटादेखिल प्राप्त होवू शकतो.

**गृहीतके :**

1) अल्पकाळात कोणतीही उद्योगसंस्था समुहात प्रवेश करत नाही.

2) प्रत्येक संस्थेची वस्तू इतर संस्थपेक्षा वेगळी असते.

3) ग्राहक जास्त असले तरी ते मक्तेदार असतात.

4) प्रत्येक संस्थेचे अल्पकालीन खर्चाचे वक्र इतर संस्थेपेक्षा वेगळे असतात.

5) उद्योग संस्थेचा अल्पकालीन मागणी वक्र लवचिक स्वरूपाचा असतो.



**संतुनलनाच्या अटी :**

1) सिमांत खर्च हा सिमांत (प्राप्ती) उत्पन्नाएवढा असा (MC=MR)

2) किंमत ही अल्पकालीन सिमांत खर्चापेक्षा जास्त असावा. (P>SMC)

3) किंमत ही अल्पकालीन बदलत्या खर्चापेक्षा जास्त असावी. (P>AVC)

**1) अतिरिक्त नफा असणारी स्थिती :**




सोबतच्या आकृतीत OX अक्षावर उत्पादन तर OY अक्षावर वस्तुची किंमत खर्च आणि उत्पन्न दर्शविले आहे. आकृती AR हा सरासरी उत्पन्न आणि MR हा सिमांत उत्पन्न AC हा सरासरी खर्च वक्र आणि MC हा सिमांत खर्च वक्र दर्शविला आहे. आकृती संतुलनाच्या सर्वच अटीची पुर्तता होते. विक्रेता M एवढे उत्पादन करतो. (विक्रेत्याला) उत्पादकाना येणारा सरासरी खर्च $OP_1$ एवढा आहे तर OM एवढा उत्पादनापासून OP सरासरी उत्पन्न प्राप्त होते उत्पन्नातून खर्च वजा केला असता □$PP_1TN$ हा भाग उत्पादकाला प्राप्त झालेला अतिरिक्त नफा असेल.

अशा रितीने मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजारपेठेत उत्पादकाला अतिरिक्त नफा देखिल प्राप्त होवू शकतो.

**2) मक्तेदारी युक्त स्पर्धेच्या बाजारपेठेत सामान्य नफा प्राप्त होत असेल तेव्हा :**

मक्तेदारी युक्त स्पर्धेच्या बाजारपेठेत विक्रेत्याला अतिरिक्त नफा प्राप्त होतो. त्याचप्रमाणे सामान्य नफादेखील प्राप्त होतो. सामान्य नफा म्हणजे खर्च आणि उत्पन्न एक दुसऱ्याच्या बरोबर असतात मक्तेदारी युक्त स्पर्धेचा वक्र बाजारपेठेत विक्रेत्याला सामान्य नफा मिळत असेल तर विक्रेता उत्पादन प्रक्रिया चालुच ठेवतो कारण दिर्घकाळात विक्रेत्याला अतिरिक्त नफा मिळेल हा त्याचा उद्देश असतो.




वरील आकृती विक्रेता OM एवढे उत्पादन करतो. OM एवढ्या उत्पादनासाठी OP एवढा खर्च येतो तर OM एवढ्या उत्पादनापासुन विक्रेत्याला OP एवढे सरासरी उत्पन्न प्राप्त होते. उत्पन्नाबरोबर खर्च असल्याने उत्पादकाला सामान्य नफा प्राप्त होतो.

**3) मक्तेदारी युक्त स्पर्धेच्या बाजारपेठेत तोटा होत असेल तर :**

मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजारपेठेत तोटा होत असेल तर विक्रेता उत्पादन प्रक्रिया बंद करत नाही हा तोटा दिर्घकाळात वसुल करता येईल या उद्देशाने विक्रेता उत्पादन प्रक्रिया बंद करत नाही तर ती सुरूच ठेवतो हे विश्लेषण खालील आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करता येते.






सोबतच्या आकृतीच्या OX अक्षावर उत्पादन आणि OY अक्षावर किंमत खर्च, उत्पन्न दर्शविलेले आहे. विक्रेता OM एवढे उत्पादन करतो. या उत्पन्नासाठी त्याला येणारा सरासरी खर्च OP एवढा आहे. या उत्पादनाला उत्पादकाला $OP_1$ एवढे उत्पन्न मिळते. उत्पन्नातून खर्च वजा केला असता □ $PTNP_1$ हा भाग म्हणजे विक्रेत्याला झालेले नुकसान होय. असे असले तरी विक्रेता दिर्घकाळात हा तोटा भरून काढता येईल म्हणून उत्पादक प्रक्रिया सुरू ठेवतो.

अशा रितीने अल्पकाळात विक्रेत्यांला अतिरिक्त नफा, सामान्य नफा आणि तोटा होत असताना वस्तुची किंमत निश्चित होते.

**मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजारपेठेत दिर्घकाळात किंमत निश्चिती :**

मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजारपेठेत दिर्घकाळात सिमांत खर्च = सिमांत उत्पन्न असताना किंमत निश्चिती होते. दिर्घकाळात कोणतीही उद्योग संस्था नुकसानीमध्ये उत्पादन करत नाही साधारण नफा प्राप्त करते. दिर्घकाळात वस्तुला मागणी वाढली तर जुन्या उद्योग संस्था उत्पादनात वाढ करून वाढलेल्या मागणीची पुर्तता करतात. याच बरोबर दिर्घकाळात नवीन उद्योग संस्था बाजारपेठेत प्रवेश करत असल्याने त्या उद्योग संस्था उत्पादनामध्ये वाढ करून वाढलेल्या मागणीची पुर्तता करतात.

मक्तेदारी युक्त स्पर्धेत दिर्घकाळात नविन उद्योग संस्थानी बाजारात प्रवेश केल्यामुळे उत्पादन घटकांना मागणी वाढेल यांच्या किंमतीत वाढ होईल यातुन उत्पादन खर्च वाढेल व उद्योग संस्थाना पूर्व प्राप्त होणारा नफा होईल. काहींना सामान्य नफा प्राप्त होईल तर काहींना तोटा होईल तोटा उद्भवलेल्या उद्योग संस्था बाजार पेठेतून बाहेर पडतील काही संस्था उत्पादनात घट करतील त्यातून उत्पादन घटकाची मागणी कमी होईल. त्यांच्या किमती कमी होतील यामुळे उत्पादनात घट होऊन पेढीला (उद्योग संस्थाला) प्राप्त होवून तोटा कमी होवून सामान्य नफा प्राप्त होईल. दिर्घकाळात मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजारपेठेत उद्योग संस्थाना नेहमी सामान्य नफा प्राप्त होतो याचे विश्लेषण खालील आकृतीच्या सहाय्याने केले आहे.




सोबतच्या आकृती OX अक्षावर उत्पादन व OY अक्षावर किंमत, खर्च उत्पन्न दर्शविलेले आहे. आकृती AR हा सरासरी उत्पन्न वक्र आणि MR हा सिमांत उत्पन्न वक्र तर AC हा सरासरी खर्च वक्र व MC हा सिमांत खर्च वक्र दर्शविलेला आहे.



आकृती संतुलनाच्या सर्वच अटीची पुर्तता होते. सोबतच्या आकृतीत उद्योग संस्था OM एवढे उत्पादन करते. OM एवढ्या उत्पादनासाठी OP एवढा खर्च येतो. तर OM एवढ्या उत्पादनापासुन उद्योग संस्थेला OP एवढेच सरासरी उत्पन्न प्राप्त होते. उत्पन्नाबरोबर खर्च असल्याने उद्योग संस्थेला सामान्य नफा प्राप्त होते.

थोडक्यात अशा रितीने दिर्घकाळात मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजारपेठेत उद्योग संस्थात नेहमी सामान्य नफा प्राप्त होतो.

**विक्री खर्च :**

मक्तेदारीयुक्त स्पर्धेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे या बाजारपेठेत वस्तू विक्री करण्यासाठी खर्च केला जातो. स्पर्धेत टिकुन राहण्यासाठी विक्री खर्च केला जातो. वस्तूची विक्री वाढवण्यासाठी विक्री खर्च केला जातो. ज्या खर्चामुळे मागणी वक्राची ठेवण बढते यालाच विक्री खर्च असे म्हणतात. जाहिरात घरपोच सेवा, एजंट नेमणुक पॅकिंग इत्यादी बाबींचा समावेश होतो व खर्च करण्याचा नेमका उद्देश ग्राहकांना आकर्षित करणे हा असतो.

**विक्री खर्च आणि उत्पादन खर्च यातील फरक :**

वस्तु उत्पादन करण्यासाठी जो खर्च केला जातो. याला उत्पादन खर्च असे म्हणतात. केवळ वस्तुची विक्री वाढवण्यासाठी खर्च केला जातो. त्याला विक्री खर्च असे म्हणतात. या दोन्ही खर्चात फरक करणे अवघड आहे हे खर्च एकमेकांत मिसळलेले असतात विक्री खर्च केल्यामुळे वस्तुला मागणी वाढते हा विक्री खर्च खालील प्रमाणे केला जातो.

1) वस्तु घरपोच पोहचवणे.
2) वस्तूचे जाहिरातीकरण.
3) वस्तु खरेदीत अनेक सवलती देणे.
4) वस्तूवर आकर्षित मोफत वस्तु देणे. उदा. आसाम चहापुड्यावर वही
5) वस्तु उदारीत विकणे.

इत्यादी बाबींच्या माध्यमातून मक्तेदारी युक्त स्पर्धेच्या बाजारपेठेत विक्रेता, उद्योगसंस्था विक्री खर्च करतात.

**विक्री खर्चाचा वस्तुच्या मागणीवर होणार परिणाम :**

एखाद्या उद्योगसंस्थेने जर विक्री खर्च केला तर त्या वस्तुला मागणी वाढते. किंवा वाढत नाही हा एक वादाचा विषय आहे. एखाद्या उद्योग संस्थेच्या वस्तुला इतर उद्योग संस्थेच्या मागणीत झालेल्या घटीमुळे सुद्धा वस्तुला मागणी वाढू शकेल.

1) स्पर्धक उद्योगसंस्था विक्री खर्च करत असेल तर विक्री खर्च करणाऱ्या उद्योग संस्थेवर विक्रीखर्च करून वस्तुच्या मागणीवर फारसा प्रभाव पडत नाही.
2) सवयीच्या वस्तुंना मागणी कायम असते. अशावेळी विक्री खर्चाचा प्रभाव पडत नाही.
3) एका विशिष्ट मर्यादेनंतर उपभोक्ता वस्तुला मागणी करत नाही.
4) एका उद्योग संस्थेने जाहिरात केली तर दुसऱ्या उद्योग संस्थेच्या मागणीवर कधी कधी परिणाम होतो. उदा. विमबार, पितांबरी.

उपभोक्ता विमबारची जाहिरात पाहून पिंताबरी विकत घेतो. थोडक्यात विक्री खर्चाचा मागणीवर काय परिणाम होतो हे निश्चित सांगता येत नाही. पण जाहिरातीच्या माध्यमातून वस्तुला मागणी वाढते.

**4) अल्पाधिकाराची बाजारपेठ :**

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत एखाद्या वस्तुचे विक्रेते अल्प असतात. अल्पाधिकार हा एक अपुर्ण स्पर्धेचा प्रकार मानता जातो. पण ज्या बाजारात उद्योग संस्थाची संख्या अल्प असते या बाजार पेठेला अल्पाधिकाराची बाजारपेठ असे म्हणतात अल्पाधिकारात वस्तु एकजिन्शी असते. किंवा वस्तुला जवळचा पर्याय उपलब्ध असतो. पूर्ण स्पर्धेत विक्रेत्यांची संख्या अमर्यादित असते. तर एकाधिकाराच्या बाजारपेठेत विक्रेत्यांची संख्या एक असते. एकापेक्षा जास्त विक्रेते असतील तर ते संगनमताने एकत्र येतात. मक्तेदारी युक्त स्पर्धेत विक्रेत्याची संख्या असंख्य असते.

अल्प अधिकाराच्या बाजारपेठेत विक्रेत्यांची संख्या अल्प असते.

उदा. लोह व पोलाद उद्योग, टायर उद्योग इत्यादी.



**अल्पाधिकाराच्या बाजारपेठेची वैशिष्ट्ये :**

**१) परस्परावलंबन :**

पूर्ण स्पर्धेत मागणी व पुरवठ्यातून वस्तुची किंमत निश्चित होते. एकाधिकाराच्या बाजारपेठेत एकाधिकारी किंमत ठरवितो मक्तेदारीच्या बाजारपेठेत एकविक्रेत्याच्या निर्णयाचा दुसऱ्या विक्रेत्यावर परिणाम होतो. थोडक्यात अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत उद्योग संस्था परस्परावर अवलंबून असतात.

**2) विभिन्न संस्थाजनक व्यवस्था :**

अल्पाधिकारात संस्था अंतर्गत बदलाचा व्यवस्थांचे निरनिराळे प्रकार आढळतात. अल्पधिकाराच्या बाजारपेठेत संगनमताने किंमत ठरवितात तर काही वेळेस स्वतंत्र किंमत धोरण तर काही वेळेस एखादी उद्योग संस्था किंमत ठरविते व इतर उद्योग संस्था या ठरलेल्या किंमतीचे अनुकरण करतात. थोडक्यात अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत विभिन्न संस्था जनक व्यवस्था आढळुन येते.

**3) अल्पाधिकारातील अनिश्चितता :**

अल्पाधिकारात उद्योग संस्था परस्परावर अवलंबून असतात. त्यामुळे किंमत आणि उत्पादन या संदर्भात अनिश्चितता आढळुन येते कारण उद्योग संस्थेचे धोरण किंवा निर्णय हे एकमेकांवर अवलंबून असतात.

**4) मुल्य परिदृढता व गैर किंमत स्पर्धा टाळणे :**

''अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत उद्योग संस्था वस्तुची किंमत कायम ठेवून स्पर्धा टाळतात याला मुख्य परिदृढता असे म्हणतात.'' उद्योगसंस्था किमती व्यतिरिक्त इतर मार्गाने उदा. वस्तुभेद करणे इत्यादीचा स्विकार करतात.

**5) गैरनफा हेतू अस्तित्व :**

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत गैरनफा हेतुचे अस्तित्व असते. हे निर्णय नफा सुरक्षित ठेवणे विक्री वाढवणे असे असु शकतात.

**6) पेढयामध्ये किवा उद्योग संस्थेमध्ये संगनमत असणे :**

उद्योगसंस्था स्पर्धा टाळण्यासाठी व महत्तम नफा प्राप्त करण्यासाठी काही वेळेस संगनमताने एकत्र येतात व स्पर्धा टाळली जाते.

**7) संस्थाची विसंगत वागणुक :**

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत उद्योग संस्था बाजारातील मागणी आकर्षित करण्यासाठी व जास्त नफा मिळवण्यासाठी एकमेकाच्याविरुद्ध वर्तन करतात. थोडक्यात अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत संस्थाची विसंगत वागणुक देखील असते.

**अल्पाधिकार निर्माण होण्याच कारणे :**

अल्पाधिकार निर्माण होण्याची प्रामुख्याने दोन कारणे आहेत पहिल्या प्रकारानुसार जेव्हा उद्योगात अनेक संस्था असतात. तेव्हा पुर्ण स्पर्धेची बाजार पेठ असते. पण कालांतराने उद्योगात काही संस्थानी वाढ होते बलाढ्य उद्योगसंस्था कमकुवत उद्योग संस्थाशी संघर्ष करतात. किंवा त्याना नष्ट करतात व शिल्लक राहिलेल्या उद्योग संस्थांचा अल्पाधिकार निर्माण होतो.

**1) संस्थाना प्राप्त होणाऱ्या बचती :**

विशिष्ट उद्योग संस्थाना जर काही तांत्रिक कारणामुळे बचती प्राप्त होत असतील त्यामध्ये सातत्याने वाढ होत असेल तर यामुळे उद्योग संस्था आकाराने विस्तृत बनतात. अशा उद्योग संस्थाशी इतर उद्योग संस्था स्पर्धा करू शकत नाहीत यामुळे इतर उद्योग संस्था नष्ट होतात व शिल्लक राहिलेल्या उद्योग संस्थांचा अल्पाधिकार निर्माण होते.

**2) श्रेष्ठ संयोजक :**

काही उद्योग संस्थाचे (मालक) सुरवातीपासून श्रेष्ठ असतात. अशा उद्योग संस्थाची सुरवातीपासूनच वाढ होते या उद्योग संस्था इतर उद्योग संस्थेपेक्षा वस्तु कमी किंमतीत विकतात यामुळे इतर उद्योग संस्थाना नुकसान होते. यामुळे या उद्योग संस्था उत्पादन बंद करतात. व शिल्लक राहिलेल्या उद्योग संस्थांचा अल्पाधिकार निर्माण होतो.

**3) कायद्याने दिलेला अल्पाधिकार :**

काही वेळेस कायद्यामुळे देखिल अल्पाधिकार निर्माण केला जातो. इतर उद्योग संस्था अशा वस्तुचे उत्पादन करू शकत नाहीत यामुळे अल्पाधिकार निर्माण होतो.



**4) अत्यावश्यक कच्चामालावर नियंत्रण :**

आवश्यक त्या कच्चामालावर उद्योग संस्थेचे नियंत्रण असेल तर इतर उद्योग संस्थाना अशा कच्चा मालाची प्राप्ती होत नाही यामुळे अशा उद्योग संस्थाचा अल्पाधिकार निर्माण होतो.

**5) भांडवलाची अतिजास्त गरज :**

काही वेळेस उद्योगांना भांडवल लागत असते. यामुळे अशा वस्तुच्या उत्पादनात सुरवातीपासूनच उत्पादकांची संख्या अल्प राहते यामुळे सुद्धा अल्पाधिकार निर्माण होतो.

उदा. लोखंड, पोलाद उद्योग, थोडक्यात वरिल वेगवेगळ्या कारणामुळे अल्पाधिकार निर्माण होतो.

**अल्पाधिकाराचे वर्गीकरण :**

**1) शुद्ध किंवा भेददर्शित अल्पाधिकार :**

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत विक्रेते एकजिनशी वस्तु विकत असतील तर त्याला शुद्ध अल्पाधिकार असे म्हणतात.

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत विक्रेते वस्तुमध्ये भेद करून जर वस्तू विकत असतील तर त्याला भेददर्शित अल्पाधिकार असे म्हणतात.

**2) खुला किंवा बंद अल्पाधिकार :**

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत इतर विक्रेत्यांना प्रवेश करता येत असेल तर त्याला रकुला अल्पाधिकार असे म्हणतात.

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत इतर विक्रेत्यांना प्रवेश करता येत नसेल तर त्याला बंद अल्पाधिकार असे म्हणतात.

**3) संगनमत असलेला व संगनमत नसलेला अल्पाधिकार :**

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत किंमत ठरवण्यासाठी विक्रेत्यामध्ये संगनमत असेल तर त्याला संगनमत असलेला अल्पाधिकार असे म्हणतात. याउलट अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत विक्रेत्यामध्ये किंमत ठरविण्याबाबतीत संगनमत नसेल तर त्याला असंगनमत असलेला अल्पाधिकार असे म्हणतात.

**4) अंशात्मक अल्पाधिकार व पुर्णात्मक अल्पाधिकार :**

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत एखादी उद्योगसंस्था विक्रेता एखाद्या वस्तुची

किंमत ठरवत असेल आणि इतर विक्रेते ती किंमत स्विकारीत असतील तर त्याला अंशात्मक अल्पाधिकार व पुर्णात्मक अल्पाधिकार असे म्हणतात.

**अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत किंमत निश्चिती :**

**1) संगनमत असताना :**

जेव्हा विक्रेते आपआपसात एकत्र येवून किंमत आणि उत्पादन या संबंधी संगनमत करतात आणि किंमत निश्चिती करतात. तेव्हा संगनमत असताना वस्तुची किंमत निश्चिती होते. या उलट अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत विक्रेते कधी कधी संगनमत करीत असतील तर संपुर्ण संगनमत असताना ही किंमत निश्चिती होवू शकते. अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत वस्तुची किंमत ठरवण्यासंदर्भात विक्रेत्यामध्ये संगनमत नसेल तर त्याला असंगनमत असताना वस्तुची किंमत निश्चित होते.

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत वस्तुची किंमत ठरवण्यासंदर्भात एकत्र येवून आपआपसात संगनमत करतात अशा संगनमतातून वस्तुची किंमत निश्चित होते. अशा वेळी ठरलेली किंमत ही एकाधिकाराच्या बाजारपेठ एवढीच असते.

विक्रेते वस्तुची किंमत ठरवण्यासंदर्भात एकत्र येवून आपआपसात संगनमत करतात. जेव्हा सर्व विक्रेत्यांचा उत्पादन खर्च एकसारखा असेल तर अशावेळी प्रत्येक विक्रेत्यांला समान बाजार वाटा प्राप्त होतो व समान नफा प्राप्त होतो. या उलट प्रत्येक विक्रेत्याचा खर्च वेगवेगळा असेल तर अशा विक्रेत्याचा खर्च जास्त असेल त्याला कमी नफा मिळतो. या उलट ज्या विक्रेत्याचा खर्च कमी असेल त्याला जास्त नफा मिळतो. थोडक्यात अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत एकाधिकाराच्या बाजारपेठेप्रमाणे वस्तुची किंमत निश्चित होते.

**2) अपूर्ण संगनमत असताना :**

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत विक्रेत्यामध्ये अपुर्ण संगनमत असेल तर नेतृत्व पद्धती आधारे वस्तुची किंमत निश्चित होते. या पद्धतीत कधी ज्या विक्रेत्याचा खर्च कमी असतो. तो किंमत ठरवतो. बाकीचे विक्रेते या ठरलेल्या किंमतीचे अनुकरण करतात. तर कधी मोठा विक्रेता वस्तुची किंमत ठरवितो. बाकीचे विक्रेते म्हणजेच किरकोळ विक्रेते त्या ठरलेल्या किमतीचे अनुकरण करतात.



कधी-कधी निर्देशक पेढीद्वारे किंमत नेतृत्व होत असेल तर बाजारपेठेत जी पेढी जुनी व अनुभवी असेल ती पेढी किंमत ठरवण्याचे काम करतात बाकीच्या पेढया ठरलेल्या किंमतीचे अनुकरण करतात.

**3) संगनमत नसताना :**

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत वस्तुची किंमत ठरविण्यासंदर्भात संगनमत नसेल तर दोन प्रकारे किंमत निश्चिती होते.

1) किंमत युद्ध 2) मुल्य परिदृढता

**1) किंमत युद्ध :**

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत संगनमत नसताना दोन विक्रेत्यामध्ये वस्तुची किंमत निश्चित करण्यासाठी किंमत युद्ध सुरू होते.

समजा A व B हे दोन विक्रेते असतील आणि हे विक्रेते अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत वस्तु विकत असतील तर A विक्रेत्याने वस्तुची किंमत कमी केली म्हणून B विक्रेता सुद्धा वस्तुची किंमत कमी करतो आणि स्वतःकडे ग्राहक आकर्षित करण्याचा प्रयत्न करतो. परत B विक्रेत्याने वस्तुची किंमत कमी केली म्हणून A विक्रेता वस्तुची किंमत कमी करतो व स्वतःकडे ग्राहक आकर्षित करण्याचा प्रयत्न करतो. परत A ने किंमत कमी केली म्हणून B सुद्धा किंमत कमी करतो. अशा रितीने या दोन्ही विक्रेत्यामध्ये वस्तुची किंमत ठरवण्यासाठी किंमत स्पर्धा किंवा किंमत युद्ध सुरू होते हे युद्ध जेव्हा एखाद्या विक्रेत्याला नुकसान सहन होत नाही तेव्हा त्याला बाजारपेठेतून बाहेर जावे लागते व शिल्लक राहिलेल्या विक्रेत्याची मक्तेदारी निर्माण होते.

**2) मुल्य परिदृढता (दिर्घकाळात किंमत ताठर राहणे) :**

अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत वस्तुची किंमत ठरवण्यासंदर्भात दोन विक्रेत्यामध्ये संगनमत नसेल तर मुल्यपरिदृढतेची स्थिती दिसुन येते. मुल्यपरिदृढता म्हणजे ठरलेली किंमत ताठर राहणे होय. विक्रेते नुकसान होऊ नये म्हणून एकदा ठरलेली किंमत वारंवार बदलत नाहीत किंवा कोणताही विक्रेता वस्तुची किंमत कमी जास्त करत नाही अशा रितीने अल्पाधिकाराच्या बाजारपेठेत संगनमत असताना अपूर्ण संगनमत असताना व संगनमत नसताना वस्तुची किंमत निश्चित होते.

**5) द्वयाधिकार :**

बाजारपेठेचे जे वेगवेगळे प्रकार आहेत. द्वयाधिकार बाजारपेठ होय. या बाजारपेठेत केवळ दोनच विक्रेते असतात. त्या बाजारपेठेला द्वयाधिकार असे म्हणतात. द्वयाधिकार हा अल्पाधिकाराचाच एक प्रकार आहे. अशा प्रकारच्या बाजारपेठेचे स्वतंत्र विश्लेषण 1838 मध्ये प्रो. कुर्नो यांनी केले.

**द्वयाधिकाराच्या व्याख्या :**

ज्या बाजारपेठेत एखाद्या वस्तुचे केवळ दोनच विक्रेते असतील तर त्याला द्वयाधिकार असे म्हणतात.

**वैशिष्ट्ये (द्वयाधिकाराची वैशिष्ट्ये) :**

**1) दोन विक्रेते :**

द्वयाधिकाराच्या बाजारपेठेत केवळ दोनच विक्रेते असतात. पूर्ण स्पर्धेत विक्रेत्यांची संख्या ही अमर्याद असते मक्तेदारीमध्ये विक्रेत्यांची संख्या ही एक असते, एकापेक्षा जास्त विक्रेते असतील तर ते संगनमताने निश्चित करतात. मक्तेदारीयुक्त स्पर्धेत विक्रेत्यांची संख्याही असंख्य असते. अल्पाधिकारात विक्रेत्यांची संख्या ही अल्प असते. द्वयाधिकारात विक्रेत्यांची संख्या दोन एवढी असते.

**2) असंख्य ग्राहक :**

द्वयाधिकाराच्या बाजारपेठेत ग्राहकांची संख्या ही असंख्य असते.

**3) वस्तुभेद किंवा एकजिनशी वस्तू :**

द्वयाधिकारात विक्रेते कधी एकजिनशी वस्तूची विक्री करतात, तर कधी-कधी एखाद्या विक्रेत्याच्या वेगळी वस्तू दुसरा विक्रेता विक्री करतो म्हणजेच वस्तुभेद आढळतो.

**4) एका उत्पादकाचा दुसऱ्या उत्पादकावर परिणाम होतो :**

एका उत्पादकाच्या निर्णयाचा दुसऱ्या उत्पादकाच्या निर्णयावर परिणाम होत असतो.

थोडक्यात वरिल वैशिष्ट्ये ज्या बाजारपेठेत आढळुन येतात त्या बाजारपेठेला द्वयाधिकाराची बाजारपेठ असे म्हणतात.



**द्वयाधिकाराच्या बाजारपेठेत किंमत निश्चिती :**

**A) वस्तू एकरूप असताना वस्तुची किंमत निश्चिती :**

द्वयाधिकाराच्या बाजारपेठेत जर दोन विक्रेत्यामध्ये वस्तुची किंमत ठरवण्यासंदर्भात संगनमत झालेले असेल तर एकाधिकाराच्या बाजारपेठ एवढी वस्तुची किंमत निश्चित होते. प्रत्येक उत्पादक एकाधिकारी उत्पादनाच्या निम्मे उत्पादन करतो. दोन्ही उत्पादक मिळुन एकाधिकाराच्या उत्पादनाएवढे उत्पादन करतात. दोघांना प्राप्त होणारा वैयक्तिक नफा देखील महत्तम असतो व संयुक्त नफा देखिल महत्तम असतो.

द्वयाधिकाराच्या बाजारपेठेत वस्तु एकजिनशी असताना दोन विक्रेत्यांमध्ये किंमत ठरवण्यासंदर्भात किंमत युद्ध सुरू होते प्रत्येक जण स्वतःच्या निर्णयाप्रमाणे किंमत ठरवतो एका उत्पादकाने वस्तुची किंमत कमी केली की दुसरा उत्पादक देखील किमत कमी करतो. द्वयाधिकाराच्या बाजारपेठेत वस्तु एकरूप असतात व किंमत युद्ध असताना (संगनमत नसताना) वस्तुची किंमत कशी निश्चित होते या संदर्भात पुढील अर्थशास्त्रज्ञांनी वेगवेगळी मते मांडली आहेत.

**1) प्रो. कुर्नो यांचे मत :**

द्वयाधिकाराच्या बाजारपेठेत कुर्नोच्या मते प्रत्येक उत्पादक उत्पादनाच्या राशीत समायोजन करण्याचा प्रयत्न करतो. असे करत असताना तो असे करतो की आपल्या प्रतीस्पर्धी उत्पादनाच्या राशीत बदल करत नाही. या गृहीतकाच्या आधारावर दोघेही उत्पादक उत्पादनाच्या राशीत बदल करत नेतात. एकवेळ अशी येते की, कोणत्याही उत्पादकाला उत्पादनाच्या राशीत बदल करण्याची गरज पडत नाही यावेळी वस्तुची किंमत निश्चित होते.

**2) प्रो. बर्ट्रन्ड यांचे मत :**

द्वयाधिकाराच्या बाजारपेठेत प्रत्येक उत्पादक वस्तूच्या किंमतीत समायोजन करण्याचा प्रयत्न करतो किंमतीत समायोजन साधत असताना असे गृहीत धरतो की आपला प्रतिस्पर्धी वस्तुच्या किंमतीत बदल करत नाही. या गृहीतकावर दोघेही उत्पादक वस्तूच्या किंमतीत बदल करतात. एकवेळ अशी येते की, कुठल्याही उत्पादकाला वस्तूच्या किंमतीत बदल करता येत नाही.

**3) प्रो. एजवर्थ यांचे मत :**

यांच्या मताप्रमाणे द्वयाधिकाराच्या बाजारपेठेत किंमत नेहमी हेलकावे खाते, एजवर्थ यांच्या मते पुर्ण स्पर्धेशी किंमत आणि एकाधिकाराची किंमत त्यात हेलकावे खाते. द्वयाधिकारात कमीत कमी किंमत पुर्ण स्पर्धेच्या बाजारपेठे एवढी असते तर जास्तीत जास्त एकाधिकाराच्या बाजारपेठे एवढी असते.

**4) प्रो. चेंबरलीन :**

यांच्यामते त्यांनी परस्परावलंबन गृहीत केले आहे. म्हणजे द्वयाधिकाराच्या बाजारात उद्योगसंस्था परस्परावर अवलंबुन असतात.

**B) वस्तूभेद असताना किंमत निश्चिती :**

द्वयाधिकाराच्या बाजारपेठेत वस्तू भेद असेल तर प्रत्येक विक्रेता स्वतंत्रपणे किंमत धोरण राबवतो. द्वयाधिकारात वस्तूभेद असताना मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या बाजार पेठेप्रमाणे वस्तूची किंमती निश्चित होते. ग्राहक ज्या विक्रेत्याची वस्तू आवडेल त्या विक्रेत्याच्या वस्तुला मागणी करतात.

**C) वस्तु उत्पादन खर्चात फरक असताना किंमत निश्चिती :**

द्वयाधिकारात वस्तू उत्पादन खर्चात फरक असेल व एका उत्पादकाचा खर्च जास्त व एका विक्रेत्याचा उत्पादन खर्च कमी असेल तर कमी उत्पादन खर्च असणारा विक्रेता मुद्दाम कमी किंमतीला वस्तू विक्री करतो. यामुळे जास्त खर्च असणारा विक्रेता कमी किंमतीला वस्तुची विक्री करू शकत नाही. यामुळे त्याला नुकसान होते. तो बाजार पेठेतुन बाहेर ढकलला जातो व एकट्या राहणाऱ्याची मक्तेदारी निर्माण होते.

■ ■ ■



# 9

# विभाजन/वितरण
## (Distribution)

वितरण या शब्दाचा अर्थ दैनंदिन व्यवहारात वाटप किंवा विभाजन असा केला जातो. डॉ. मार्शल यांनी अर्थशास्त्राची शास्त्रशुद्ध मांडणी करत असताना त्याची चार भागात वाटणी केलेली आहे. ते चार भाग म्हणजे उत्पादन, उपभोग, विनिमय व वितरण होय. तर वितरण म्हणजे काय? ते वितरण कशासाठी येते. अर्थशास्त्रामध्ये उपभोगाला व उत्पादनाला जेवढे महत्त्व आहे. तेवढेच महत्त्व वितरणाला आहे.

वस्तू व सेवांचे उत्पादन अर्थव्यवस्थेमध्ये चालू असते. हे उत्पादन घटकांमार्फत म्हणजे भूमी, श्रम, भांडवल व संयोजक याद्वारे होत असते. या उत्पादन घटकांचे मालक, जमीनदार, श्रमिक, भांडवलदार व संयोजक एकत्रित येऊन परस्परांना सहकार्य करून उत्पादन करतात. भूमी, श्रम, भांडवल, संयोजक हे चार उत्पादनाचे घटक आहेत. या उत्पादन घटकाला त्यांच्या कार्यात काम केल्याबद्दल त्या चारही घटकाला मोबदले दिले जातात. श्रमाला मजूरी दिली जाते. भूमीला खंड मिळतो, भांडवलाला व्याज मिळते आणि संयोजकाला नफा प्राप्ती या स्वरूपात मोबदले मिळतात.

प्रत्येक उत्पादन घटकाला मोबदले वाटले जातात. या क्रियेला विभाजन Distruibution असे म्हणतात.

या मोबदल्याची बेरीज ही एकूण उत्पादन खर्चाबरोबर येते आणि ही देशातील राष्ट्रीय उत्पन्नाएवढी असते.

अर्थशास्त्रामध्ये विभाजन दोन प्रकारे

1) वैयक्तिक विभाजन

2) कार्यात्मक विभाजन

''देशातील अनेक व्यक्तीमध्ये उत्पन्न व संपत्तीचे वितरण म्हणजे वैयक्तिक वितरण होय.''

राष्ट्रीय उत्पन्नाचे अनेक व्यक्तिमध्ये विषम वितरण झालेले दिसून येते. वैयक्तिक वितरणांमध्ये आपण उत्पन्न व संपत्तीच्या विषमतेची कारणे त्याचे परिणाम व ही विषमता कमी करण्यासाठी उपाययोजना इत्यादीचे अध्ययन करतो.

कार्यात्मक वितरणाचा संबंध एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील प्रत्येक उत्पादक घटकांच्या वाट्याशी येतो. उत्पादक घटकांना त्याच्या सेवेचा मोबदला दिला जातो. त्याच्याशी कार्यात्मक वितरणाचा संबंध येतो.

वैयक्तिक वितरण आणि कार्यात्मक वितरण याचा जवळचा संबंध आहे. वैयक्तिक वितरणावर कार्यात्मक वितरणाचा परिणाम घडून येतो. सर्व उत्पादक घटकांना समान मोबदला दिला तर वैयक्तिक उत्पन्न जास्त राहिल. त्यामुळे जीवनमानाचा दर्जा उंचावतो.

जर कार्यात्मक वितरण विषम स्वरूपाचे झाले तर सामाजिक व आर्थिक कल्याणात घट होईल. श्रीमंत व गरीब यांतील विषमतेची दरी अधिकच रुंदावेल.

त्याचबरोबर उत्पादन घटकांना देण्यात येणारे मोबदले कोणत्या तत्वाने दिली जातात म्हणजे उत्पादन घटकांची किंमत कशी ठरते. याबाबत काही सिद्धांत मांडण्यात आलेले आहेत.

**वितरणाचा सिमांत उत्पादकतेचा सिद्धांत**

**(Marginal Productivity Theory of Distribution) :**

अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ जॉन बेटस क्लार्क यांनी विभाजनाचा सिमांत उत्पादकतेचा सिद्धात मांडला पूर्वी विभाजनाविषयी विचार मांडणारे रिकार्डो यांनी भूमिला मिळणाऱ्या मोबदल्याविषयी आपले मत मांडले. कार्लमार्क्स यांनी श्रम या उत्पादन घटकांच्या मोबदल्याविषयी आपले विचार मांडले. तर क्लार्क यांनी 19 व्या शतकात विभाजनाचा सिमांत उत्पादकतेचा सिद्धांत मांडला हा सिद्धांत त्यानी आपल्या The Distribution of Wealth 'संपत्तीचे



विभाजन' या 1899 मध्ये लिहिलेल्या ग्रंथामध्ये मांडला. या सिद्धांतानुसार प्रत्येक उत्पादन घटकाला मिळणारा मोबदला हा त्या घटकांच्या सिमांत उत्पादकतेवरुन ठरतो. ज्या उत्पादन घटकांची सिमांत उत्पादकता कमी त्या घटकाला मिळणारा मोबदला सुद्धा कमी मिळतो.

**सिमांत उत्पादकतेचा अर्थ :**

1) ''सिमांत उत्पादकता म्हणजे उत्पादनाच्या शेवटच्या घटकांपासून मिळणारी उत्पादकता होय.''

2) ''उत्पादनाचे इतर सर्व घटक स्थिर ठेवून एका घटकांच्या परिमाणात एका मात्रेने वाढ केल्यामुळे एकूण उत्पादनात होणारी शुद्ध वाढ म्हणजे त्या घटकांची सिमांत उत्पादकता होय.''

3) ''उत्पादनाच्या विशिष्ट परिस्थितीत प्रत्येक उत्पादक घटकांचा मोबदला हा त्या-त्या घटकांच्या सिमांत उत्पादकतेबरोबर असतो.''

4) ''उत्पादनाचे इतर घटक कायम ठेवले आणि एका उत्पादन घटकांमध्ये एका नगाने वाढ केल्याने एकूण उत्पादनात जी निव्वळ वाढ होते. त्या वाढीला सिमांत उत्पादकता असे म्हणतात.''

भूमी, श्रम, भांडवल, संयोजक या उत्पादन घटकांना त्यांच्या सिमांत उत्पादकतेच्या मूल्याएवढा मोबदला दिला जातो. असे वितरणाच्या सिमांत उत्पादकता सिद्धांतात स्पष्ट होते.

**सिद्धांताची गृहिते :**

1) उत्पादनाचे सर्व घटक एकजिन्सी असतात.

2) उत्पादन घटकांना पूर्ण रोजगार उपलब्ध असतो.

3) उत्पादनाचे घटक विभाजनशिल असतात.

4) उत्पादनाचे घटक गतीशिल असतात.

5) संघटकाचा उद्देश नफा मिळवणे हा असतो.

6) सिमांत उत्पादकता मोजता येते.

7) उत्पादनाचे घटक परस्परांना मर्यायी असतात.

8) पूर्ण स्पर्धेची बाजारपेठ अस्तित्वात असते.

9) हा सिद्धांत दिर्घकाळात कार्यान्वित होतो.

वरील गृहितांच्या सहाय्याने खालील कोष्टकांच्या आधारे वितरणाचा सिद्धांत स्पष्ट होतो.

| मजूर संख्या | एकूण उत्पादन (रुपयांत) | सिमांत उत्पादन (रुपयांत) | मोबदला (रुपयांत) |
|---|---|---|---|
| 1 | 12 | 12 | 8 |
| 2 | 22 | 10 | 8 |
| 3 | 30 | 8 | 8 |
| 4 | 35 | 6 | 8 |
| 5 | 40 | 4 | 8 |
| 6 | 42 | 2 | 8 |

वरील कोष्टकावरून असे स्पष्ट होते की, मजूरांची संख्या 1 असताना एकूण उत्पादन 12 रु. चे आहे. सिमांत उत्पादन सुद्धा 12 रुपये आहे. मोबदला 8 रुपयांचा आहे. त्यामुळे संघटक घटकाची दुसरी मात्रा म्हणजे दुसरा मजूर उपयोगात आणतो. दुसऱ्या मजूरांचे सिमांत उत्पादन 10 रुपयाचे आहे. चौथ्या मजूरांचे सिमांत उत्पादन 6 रुपयाचे आहे. 5 व्या मजूरांचे सिमांत उत्पादन 4 आहे. उत्पादक तिसऱ्या श्रमिकांपर्यंत श्रमाची मागणी करेल कारण तिसऱ्या श्रमिकांचे सिमांत उत्पादन व मोबदला सारखाच आहे. पहिल्या तीन श्रमिकांपासून उत्पादकता फायदा होतो. कारण त्यांचे सिमांत उत्पादन जास्त आहे व त्यांना मिळणारा मोबदला कमी आहे. त्यानंतर 5 वा मजूर वापरात आणला याचे सिमांत उत्पादन कमी म्हणजे 4 रुपये आहे. पाचव्या श्रमिकांपासून 4 रु. तोटा होत आहे. उत्पादक चौथ्या श्रमिकांपर्यंत श्रमिकांची मागणी करतो.



**आकृतीद्वारे स्पष्टीकरण**




वरील आकृतीत OX अक्षावर मजूर संख्या आणि OY अक्षांवर उत्पादन घटकाचा मोबदला दशविलेला आहे. आकृतीमध्ये SS हा सिमांत उत्पादकतेचा वक्र दाखवलेला आहे. पहिल्या उत्पादक घटकांची सिमांत उत्पादकता 12 आहे दुसऱ्या उत्पादक घटकांची 10 तर तिसऱ्या उत्पादक घटकांची सिमांत उत्पादकता 8 रुपये आहे. ज्या ठिकाणी सिमांत उत्पादकता आणि मोबदला समान होईल तेवढ्या मात्रेची मागणी म्हणजे मजूर संख्येची मागणी संघटक करतो. सिमांत उत्पादकता वक्रावर 8 रुपये आहे. व मिळणारा मोबदला 8 रुपये म्हणजे समान आहे. या स्थितीत उत्पादक उत्पादन घटकांच्या 3 मात्रा संघटक उपयोगात आणतो.

**सिद्धांतावरील टिका :**

**1) सिद्धांत अल्पकाळात लागू होत नाही :**

वितरणाचा सिमांत उत्पादकतेचा सिद्धांत अल्पकाळात लागू होतो. पण दिर्घकाळ विचारात घेतला जातो. केन्सनंतर दीर्घकाळाच्या विवेचनास पूर्णपणे फाटा दिलेला आहे असे दिसून येते. अल्पकाळ हाच विचारात घेतला जातो,

अल्पकाळाबाबतीत या सिद्धांताने विचार केलेला नाही त्यामुळे हे विवेचन वास्तविक होत नाही.

**2) उत्पादनाचे घटक एकजिन्सी असतात, हे चुकीचे :**

उत्पादनाचे घटक एकजिन्सी समजून उत्पादन घटकांची सिमांत उत्पादकता मोजली जाते. पण उत्पादन घटक एकजिन्सी असू शकत नाहीत.

**3) तांत्रिक प्रगतीकडे दुर्लक्ष :**

तांत्रिक प्रगतीचा उत्पादकतेवर होणारा परिणाम या सिद्धांतात विचारात घेतला नाही. तांत्रिक प्रगतीमुळे श्रमाची सिमांत उत्पादकता वाढू शकते.

**४) उत्पादक घटकांना पूर्ण रोजगार नसतो :**

पूर्ण रोजगारीच्या गृहितामुळे हा सिद्धांत स्थैतिक बनतो. केन्सच्या मते, अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगाराऐवजी अपूर्ण रोजगार आढळून येतो. प्रत्येक देशात कोणत्या ना कोणत्या प्रकारची बेकारी अस्तित्वात येते.

**5) उत्पादन घटकांचा पुरवठा स्थिर नसतो :**

उत्पादक घटकांचा पुरवठा अल्पकाळात जरी स्थिर असला तरी तो दीर्घकाळात स्थिर नसतो.

**6) नफा हा मुख्य उद्देश नसतो :**

नफा मिळविण्यासाठी संघटक हा उत्पादक घटकाच्या अधिक मात्रा लावतो असे म्हणणे योग्य नाही. संघटक बाजारातील वस्तूंची मागणी जास्त असली तर उत्पादनात वाढ करतो. तो नफा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून उत्पादन करीत नाही.

**7) उत्पादनाचे सर्वच घटक सारखे हे गृहित चूकीचे :**

या सिद्धांताने उत्पादनाचे सर्व घटक सारखेच असतात असे गृहित धरले. पण हे चूकीचे आहे. प्रत्यक्षात उत्पादनाच्या घटकांत भिन्नता आढळते. उत्पादनाचे घटक हे कार्यक्षमतेच्या दृष्टीने सारखेच असतात. हे म्हणने योग्य नाही.

**8) घटक पूर्णपणे गतीक्षम नसतात :**

घटक हे एका उद्योग धंद्यातून दुसऱ्या उद्योगधंद्यात सहजासहजी जात नाहीत. म्हणून घटकाची पूर्ण गतिक्षमता गृहित धरणे हे बरोबर नाही.



**9) एकांगी सिद्धांत :**

या सिद्धांतात मागणी बाजूचाच विचार करण्यात आला असून उत्पादन साधनांचा पूरवठा गृहित धरला आहे. म्हणून हा सिद्धांत एकांगी स्वरूपाचा आहे. अशी टिका फ्रीडमन, सॅम्युएलसन इत्यादींनी केली आहे.

**खंडाचे सिद्धांत (Theories of Rent) :**

अर्थशास्त्रामध्ये खंड किंवा भाटक हा शब्द विशिष्ट अर्थाने वापरला जातो. व्यवहारात खंड शब्द जमीन इमारत व खाण इत्यादीच्या उपयोगाबद्दल त्याच्या मालकाला दिला जाणारा मोबदला होय. व्यवहारात भाटक हा शब्द भाडे या अर्थाने वापरला जातो. उदा. जागेचे भाडे, घराचे भाडे इत्यादी पण अर्थशास्त्रामध्ये भाटक हा शब्द भूमीच्या संदर्भातच वापरण्यात येतो. भूमी या घटकांचा वापर केल्याबद्दल भूमीच्या मालकाला दिला जाणारा मोबदला म्हणजे खंड होय. रिकार्डो या सनातनपंथीय अर्थशास्त्रज्ञाने खंड केवळ भूमी या घटकालाच मिळतो असे सांगितले.

भूमी या घटकाला देण्यात येणारा खंड हा कोणत्या तत्वाने ठरला जातो. या संदर्भात अनेक सिद्धांत विकसित झाले आहेत.

**रिकार्डोचा खंड सिद्धांत (Recardien Theory of Rent) :**

रिकार्डो यांनी खंडाचा सिद्धांत मांडला. रिकार्डो हा सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ आहे. रिकार्डोपूर्वी निसर्गवाद्यानी अर्थशास्त्रज्ञ व ॲडम स्मिथ व माल्थस यांनी खंडाचा विचार मांडला. परंतु रिकार्डो यांनी 19 व्या शतकात सर्वप्रथम विस्तृत पणे खंड सिद्धांत मांडला. 19 व्या शतकाच्या सुरुवातीला इंग्लंडमध्ये धान्याच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. किंमती का वाढल्या याबाबत अनेक विचारवंतानी विचार मंथन केल्यानंतर काहींनी खंड वाढल्यामुळे किंमती वाढल्या असे म्हटले तर रिकार्डो यांनी त्याविरुद्ध मत मांडताना म्हटले की, किंमती वाढल्यामुळे खंड वाढला आहे. आपला हा विचार स्पष्ट करण्यासाठी रिकार्डो यांनी सन 1817 मध्ये ''Principles of Political Economy'' 'राजकीय अर्थशास्त्राची मुलतत्वे व कर' हा ग्रंथ लिहिला व आपला खंड सिद्धांत मांडला. रिकार्डोच्या मते, वस्तूच्या किंमती ज्याप्रमाणे त्या वस्तूंच्या उत्पादन खर्चावरून ठरतात. त्याचप्रमाणे उत्पादन घटकांच्या किंमती त्याच्या

खर्चावरून ठरतात. तरी पण भूमी या घटकाला हा नियम लागू पडत नाही. कारण भूमी हा घटक मानवाला निसर्गाकडून विनामूल्य मिळालेला आहे. निसर्गाकडून मानवाला मिळालेली देणगी आहे. त्यामुळे भूमीचा उत्पादन खर्च शून्य आहे. रिकार्डोच्या मते, भूमीचा पुरवठा स्थिर असून खंड केवळ भूमी या उत्पादन घटकालाच मिळातो.

**सिद्धांत :**

**रिकार्डोच्या मते,** ''खंड म्हणजे जमिनीच्या मुलभूत आणि कधीही नष्ट न होणाऱ्या शक्तीचा उपयोग केल्याबद्दल जमिन मालकाला दिला जाणारा जमिनीच्या उत्पादनाचा एक भाग होय.''

**खंडाची व्याख्या :**

रिकार्डो यांनी खंडाची व्याख्या केली ती म्हणजे, ''भूमीच्या उपजत व अविनासी गुणाच्या वापराबद्दल जमीन मालकाला जमिनीच्या उत्पादनापैकी जो भाग द्यावा लागतो त्याला खंड असे म्हणतात.''

**खंडाची वैशिष्ट्ये :**

1) खंड भूमी मालकाला भूमीच्या उपयोगाबद्दल द्यावा लागतो.

2) जमिनीतील उपजत गुणांच्या वापराबद्दल खंड दिला जातो.

3) खंड जमिनीपासून उत्पन्न होणाऱ्या उत्पादनाचाच एक भाग होय.

4) खंड भूमी घटकालाच मिळतो.

5) भूमी घटकांत उपजत व अविनाशी गुणधर्म असतात.

**सिद्धांताची गृहिते :**

1) सुरुवातीला सुपीक जमिन लागवडीखाली आणली जाते.

2) दीर्घकाळाचा विचार केला जातो.

3) जमिनीमध्ये उपजत आणि अविनाशी गुण असतात.

4) भूमी केवळ शेतीसाठी वापरात आणली जाते.

5) माल्थसच्या लोकसंख्या सिद्धांताचा आधार.

6) सिमांत जमिनीला खंड मिळत नाही.



7) केवळ भूमी या उत्पादन घटकालाच खंड मिळतो.

8) भूमीचा पुरवठा अलवचिक असतो.

9) पूर्ण बाजारपेठेचे अस्तित्व आहे.

10) घटत्या फलाच्या नियमावर आधारित या सिद्धांताचे विश्लेषण आहे.

**कोष्टकांच्या आधारे सिद्धांताचे स्पष्टीकरण :**

| **जमिनीचा प्रकार** | **उत्पादन खर्च रु.** | **ज्वारीचे उत्पादन (क्विंटल)** | **किंमत रु. प्रतिक्विंटल** | **उत्पन्न (रुपये)** | **खंड रुपये (उत्पादन खर्च)** |
|---|---|---|---|---|---|
| अ | 1000 | 20 | 200 | 4000 | 3000 |
| ब | 1000 | 10 | 200 | 2000 | 1000 |
| क | 1000 | 05 | 200 | 1000 | 0000 |

वरील कोष्टकांवरून असे स्पष्ट होते की, लोकसंख्या वाढल्यामुळे अ-ब-क या तीन प्रकारची जमिन 'अ' प्रकारची जमीन सुपीक म्हणजे चांगल्या दर्जाची आहे. 'ब' प्रकारची जमीन कमी सुपीक म्हणजे मध्यम आहे. 'क' प्रकारची जमीन सिमांत आहे. या सर्व प्रकारच्या जमिनीचा उत्पादन खर्च 1000 रु. आहे. 'अ' प्रकारच्या जमिनीत 20 क्विंटल ज्वारीचे उत्पादन निघते. तर 'ब' प्रकारच्या जमिनीत 10 क्विंटल उत्पादन निघते. तर 'क' प्रकारच्या जमिनीत 5 क्विंटल उत्पादन निघते. या जमिनीचा उत्पादन खर्च भरून काढण्यासाठी बाजारात 200 रु. प्रतिक्विंटल ज्वारीची किंमत येते. तेव्हा 'क' प्रकारच्या जमिनीचे उत्पन्न व उत्पादन खर्च सारखाच होतो. त्यामुळे त्या जमिनीला खंड मिळत नाही. 'ब' जमिनीतून 10 क्विंटल ज्वारीचे उत्पादन होते. या जमिनीचे उत्पादन 2000 रु. आहे. उत्पादन खर्च 1000 रु. आहे. म्हणजे 'ब' जमिनीला खंड मिळतो आणि सुपीक जमिन 'अ' प्रकारच्या जमिनीतून 20 क्विंटल ज्वारीचे उत्पादन निघते. या जमिनीचे उत्पन्न 4000 रु आहे. व उत्पादन खर्च 1000 रु. आहे. म्हणजे 'अ' जमिनीला 3000 रुपये खंड मिळतो.

वरील स्पष्टीकरणावरून लोकसंख्या वाढल्यामुळे सिमांत जमन लागवडीखाली आणता येते.

**आकृतीद्वारे स्पष्टीकरण :**




वरील आकृतीत OX अक्षांवर जमिनीचे प्रकार आणि OY अक्षांवर उत्पन्न, उत्पादन, खर्च व खंड दर्शविलेला आहे. 'A' जमिनीवर करण्यात येणारा खर्च 1000 रुपये आहे. त्या जमिनीचे एकूण उत्पन्न 4000 रु. आहे. तेव्हा 'A' जमिनीला 3000 रु. खंड मिळतो. 'ब' प्रकारच्या जमिनीचे उत्पन्न 2000 रु. आहे आणि उत्पादन खर्च 1000 रु. खंड मिळतो आणि 'क' जमिन सिमांत जमिन आहे. 'क' प्रकारच्या जमिनीचा उत्पादन खर्च व उत्पन्न दोन्ही 1000 रु. आहे. म्हणजे त्या जमिनीला खंड मिळत नाही 'अ' व 'ब' जमिनीला सिमांत पूर्व जमिन म्हणतात. सिमांत जमिन लागवडीखाली आणल्यामुळे सिमांत पूर्व जमिनीला खंड मिळतो.

**रिकार्डोच्या खंड सिद्धांतावरील टिका :**

**1) खंडाची अयोग्य व्याख्या :**

रिकार्डोच्या सिद्धांतावरील महत्त्वाचा दोष म्हणजे त्याने खंडाची व्याख्या करताना जी रचना केली ती अयोग्य आहे. जमिनीत अविनाशी स्वरूपाचे गुणधर्म असतात. हा विचार चुकीचा आहे. वर्षानुवर्षे जमीन लागवडीखाली आणल्याने त्यातील गुणधर्म नष्ट होतात. जमिनीचा कस वाढावा यासाठी आधुनिक तंत्राचा अवलंब करावा लागतो.



**2) चुकीच्या गृहितावर आधारित सिद्धांत :**

रिकार्डोचा सिद्धांत सदोष गृहितांवर आधारित आहे. बाजारात पूर्ण स्पर्धा असते. असे गृहित धरले आहे परंतु प्रा. चेंबरलिन, रॉबिन्सच्या मते, बाजारात पूर्ण स्पर्धा नसते. अपूर्ण स्पर्धेचीही बाजारपेठ असते. त्यामुळे चुकीच्या गृहितांवर आधारलेला सिद्धांत आहे.

**3) भूमिचा पुरवठा लवचिक आहे :**

भूमीच्या पुरवठ्यात वाढ करता येत नाही. कारण भूमिची पुरवठा अलवचिक आहे.

**4) अल्पकाळातही खंड मिळतो :**

रिकार्डोने दिर्घकाळात खंड निर्माण होतो. असे विवेचन केले पण टिकाकाराच्या मते, अल्पकाळातही खंड उत्पादनाच्या कोणत्याही घटकांला मिळू शकतो. अल्पकाळात जर धान्याची टंचाई निर्माण झाली तर धान्य महाग होईल व परिणाम स्वरूपात भूमीला खंड प्राप्त होतो असे मत मार्शलने मांडले.

**5) पूर्ण स्पर्धा नसते :**

प्रत्यक्षात पूर्ण स्पर्धा आढळून येत नाही. शेतीमध्ये पूर्ण स्पर्धा नसते भूमी मालक जे खंड आकारतात. तो आर्थिक खंडापेक्षा बऱ्याच प्रमाणात जास्त असतो.

**6) प्रथम सुपीक जमीनीवर लागवड केली जात नाही :**

अमेरिकेतील एका सर्वेक्षणात आढळून आले की, प्रथम सुपीक जमिनीवर लागवड करण्यात आली नाही. कारण ज्या जमिनीवर लागवड करणे सोईचे असते. त्या जमीनीवर प्रत्यक्ष लागवड केली जाते.

**7) बिना खंड मिळणारी भूमी अस्तित्वातच नसते :**

टिकाकारांच्या मते, प्रत्यक्षात सीमांत भूमी आढळून येत नाही. कारण बिनाखंड जमिनी एखाद्या उपयोगासाठी कमी प्राप्ती असली तरी ती जमीन इतर उपयोगाखाली अधिक खंड देणारी असते.

**8) खंड फक्त भूमिलाच मिळत नाही :**

रिकार्डोच्या मते, खंड फक्त भूमिलाच मिळतो. ज्या घटकांचा पुरवठा दुर्मिळ असतो आणि मागणी जास्त असते. अशा सर्व घटकांना खंड मिळता असे मत आधुनिक अर्थशास्त्रज्ञाचे आहे.

**9) खंडाचा किंमतीवर परिणाम होतो :**

खंडाचा किंमतीवर प्रभाव पडत नाही. असे मत रिकार्डोने मांडले. आधुनिक अर्थशास्त्रज्ञाच्या मते, खंड हा उत्पादन खर्चाचा घटक असल्यामुळे खंडाचा किंमतीवर परिणाम होतो.

**10) भूमिचा वापर अनेक उपयोगासाठी होतो :**

रिकार्डो यांनी भूमीचा वापर शेतीसाठीच होतो. असे म्हटले पण आधुनिक काळात भूमीचा वापर उद्योगधंदे इमारत कारखाने इत्यादी कार्यासाठी होतो याचा विचार रिकार्डोने केलेला नाही.

**आधुनिक खंड सिद्धांत (Modern Theory of Rent) :**

रिकार्डोच्या खंड विषयक सिद्धांतावर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी टिका केल्या रिकार्डोच्या सिद्धांतातील उणिवा दूर करून खंडाची कल्पना अधिक वस्तुनिष्ठ व्यापक व अधिक तर्कसंगत पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न आधुनिक विचारवंतानी खंडाचा आधुनिक सिद्धांत मांडला. आधुनिक खंड सिद्धांताची मांडणी प्रा. मार्शल, प्रा. वॉकर, जॉन रॉबिन्सन यांनी केली. या अर्थशास्त्रज्ञांनी आपल्या सिद्धांतात असे दाखवून दिले की, खंड हा भूमीमध्ये असणाऱ्या गुणभिन्नतेमुळे मिळत नाही तर तो दुर्मिळतेमुळे मिळतो. त्याचप्रमाणे खंड फक्त भूमिलाच मिळतो असे नाही तर श्रम, भांडवल, संयोजक या घटकालाही मिळतो.

**जे. एस मिलच्या मते :**

''एखाद्या उत्पादकाला आणि विक्रेत्याला योग्य व्यापारविषयक कौशल्य किंवा व्यापारविषयक प्रबंधनामुळे जे अतिरिक्त उत्पन्न मिळते त्याला खंड असे म्हणतात.



**वॉकरच्या मते :**

''ज्या प्रमाणे भूमीमध्ये सुपीकतेच्या बाबतीत भिन्नता आढळून येते. त्याचप्रमाणे संघटकाच्या योग्यतेत भिन्नता आढळून येते.''

**रॉबिन्सच्या मते :**

''चारही उत्पादन घटकाला खंड प्राप्त होतो. त्यांना मिळणारा खंड त्या उत्पादन घटकांच्या दुर्मिळतेमुळे प्राप्त होतो. दुर्मिळतेमुळे उत्पादन घटकांचा पुरवठा अलवचिक होतो. पण भूमिचा पुरवठा हा इतर उत्पादन घटकांपेक्षा जास्त अलवचिक असतो. म्हणून भूमिला मिळणारा खंड हा कायमस्वरूपी असतो.

आधुनिक खंडाची संकल्पना स्पष्ट करताना रॉबिन्स यांनी सांगितलेली बदली उत्पन्नाची संकल्पना अभ्यासने महत्त्वाचे आहे.

**बदली उत्पन्न (Transfer Earnings) :**

खंड म्हणजे उत्पादक घटकांच्या प्रत्यक्ष उत्पन्नाचे त्याच्या बदली उत्पन्नावरील अधिक्य होय.

**जॉन रॉबिन्सच्या मते,** ''एखादा उत्पन्नाचा घटक एखाद्या विशिष्ट व्यवसायात विशेष उपयुक्त कामावर ठेवण्यासाठी जी किंमत द्यावी लागते. त्याला बदली/वैयक्तिक व्यय म्हणतात.

**उदा.** एखाद्या कारकुणाला एखाद्या कार्यालयात 6500 रुपये महिना पगार मिळतो. त्याला दुसऱ्या कार्यालयात काम करण्याचे ठरविले तर त्याला 6000 रुपये पगार मिळतो. हे त्याचे न्यूनतम उत्पन्न आहे. वर्तमान काळात व्यवसायात त्याला इतके उत्पन्न मिळणे आवश्यक आहे. 6000 रुपये त्या कारकुणाची न्यूनतम पुरवठा किंमत आहे. प्रत्यक्षात वास्तविक उत्पन्न हे बदली उत्पन्नापेक्षा अधिक आहे.

खंड = प्रत्यक्ष उत्पन्न – बदली उत्पन्न

6500 – 600

खंड = 500

**खंडाचे स्पष्टीकरण आकृतीद्वारे :**




आकृतीत OX अक्षावर उत्पादन घटक (श्रम) तर OY अक्षांवर खंड/मोबदला दर्शविलेला आहे. $DD_1$ व $SS_1$ हे उत्पादन घटकांचे मागणीवक्र व पुरवठा वक्र आहेत. उत्पादन घटकांचा मोबदला 05 आहे, तर एकही उत्पादन घटक कामावर राहत नाही. मोबदला वाढून OP एवढा केला तर OM उत्पादन घटक काम करण्यास तयार होतात. 'E' या बिंदूत मागणी वक्र व पुरवठा वक्र छेदतात म्हणून E हा संतूलन बिंदू आहे. येथे मोबदला OT एवढा होतो. PT एवढी मोबदल्यात वाढ होते. त्यालाच खंड म्हणता येईल. $MM_1$ एवढे श्रमाच्या मात्रेत वाढ होते. 05 एवढा मोबदला मिळणारा असेल तर कोणताही उत्पादनाचा घटक काम करण्यास तयार होत नाही.

**आधुनिक खंड सिद्धांताचे निष्कर्ष**

1) उत्पादनाच्या चारही घटकांना खंड मिळतो.

2) खंड या घटकांचा समावेश उत्पादन खर्चात होतो.

3) उत्पादन घटकांना मिळणारा मोबदला त्याच्या दुर्मिळतेमुळे प्राप्त होतो.

**आभासी खंड (Quasi Rent) :**

सर्वप्रथम अर्थशास्त्रात आभासी खंडाची संकल्पना मांडण्याचे श्रेय डॉ. मार्शल यांना दिले जाते. मार्शलच्या मते, ज्या घटकांचा पुरवठा अल्पकाळात



स्थिर असतो. त्या घटकाला आभासी खंड मिळतो.

भूमी या घटकाला मिळणारा खंड आणि उत्पादनाच्या इतर घटकांना मिळणारा मोबदला यातील फरक दाखवण्यासाठी मार्शलने आभास खंडाची कल्पना मांडली.

मार्शल जरी रिकार्डोच्या खंड सिद्धांताचे पुरस्कर्ते असले तरी त्यांनी असे म्हटले की, भूमीशिवाय संयंत्र, यंत्रसामग्री, इमारत इत्यादीचा पुरवठा अल्पकाळात वाढविता येत नाही. या घटकांना दुर्मिळतेमुळे जे अधिक्य स्वरूपाचे उत्पन्न मिळते त्याला आभास खंड म्हणतात.

**डॉ. मार्शलच्या मते :**

''मानवनिर्मित दुर्मिळ घटकांचा पुरवठा अल्पकाळात स्थिर असतो. तेव्हा त्यांना जे उत्पन्न मिळते त्याला आभास खंड असे म्हणतात.''

**सिलव्हरमनच्या मते :**

आभास खंड म्हणजे तांत्रिकदृष्ट्या उत्पादनाच्या घटकांना प्राप्त होणारे अधिक्य उत्पन्न होय की, ज्या घटकांचा पुरवठा अल्पकाळात स्थिर व दीर्घकाळात परिवर्तनशिल असतो.''

आभासी खंड याचा शब्दशः अर्थ असा होतो की, खंड मिळतो असा भास होणे होय. खंडाचा आभास होतो तो काही काळापुरताच असतो. नंतर तो आभास नष्ट होतो.

उत्पादनाचे घटक काही काळासाठी मर्यादित राहतात. त्याचा पुरवठा वाढत नाही. तेव्हा त्या घटकांना खंड मिळत असतो. उत्पादन घटकाचा पुरवठा मर्यादित होणे ही बाब सर्वच उत्पादन घटकांना लागू होतो. हा मर्यादित पुरवठा अल्पकाळासाठी राहतो. नंतर तो संपुष्टात येतो. उदा. विशिष्ट प्रकारची यंत्रे ही अल्पकाळात उपलब्ध होत नाहीत, त्याचा पुरवठा दुर्मिळ किंवा मर्यादित स्वरूपाचा बनतो. काही विशिष्ट विषयातील तज्ञ व्यक्ती विशिष्ट परिस्थितीमध्ये उपलब्ध होत नसतील तर त्यांना प्रत्यक्ष वेतनापेक्षा जास्त वेतन द्यावे लागते. त्या जास्तीच्या वेतनालाच खंड म्हणतात. हा खंड दिर्घकाळात मिळत नाही कारण दीर्घकाळात त्या घटकाचा पुरवठा वाढतो. अल्पकाळात खंड रुपाने मिळणारा वाढावा हा दीर्घकाळात नष्ट होतो. म्हणून

अल्पकाळात मिळणाऱ्या परंतु दीर्घकाळात नष्ट होणाऱ्या वाढाव्यालाच आभासी खंड म्हणतात. हा अनुभव भूमीशिवाय अन्य उत्पादन घटकांच्या बाबतीत येतो. कारण भूमी घटकांचा पुरवठा दीर्घकाळातही मर्यादितच राहतो.

भूमी या उत्पादन घटकाला मिळणारा खंड हा अल्प व दीर्घकाळासाठी सुद्धा असतो. कारण भूमीचा पुरवठा दीर्घकाळात मर्यादित राहतो. घटकाचा मर्यादित पुरवठा आणि त्या घटकांची दुर्मिळता या दोन बाबींमुळे आभासी खंड उद्‌भवत असतो. असे मार्शलचे मत आहे.

**मजूरीचे सिद्धांत (Theories of Wages) :**

उत्पादनाच्या श्रम या घटकाला मिळणारा मोबदला म्हणजे मजूरी किंवा वेतन होय. मजूरी किंवा वेतन हे पैशाच्या वस्तूच्या स्वरूपात दिले जाते. श्रमिकांना त्यांच्या सेवेबद्दल दिला जाणारा मोबदला म्हणजे वेतन होय. मोबदला मिळविण्यासाठी श्रमिक शारीरिक व मानसिक कार्ये करत असतो.

बेनहेमच्या मते, ''मजूरी म्हणजे करारानुसार मालकाने श्रमिकांला दिलेला त्याच्या सेवेचा मोबदला होय.''

मजूरी म्हणजे शारीरिक व मानसिक कार्याबद्दल किंवा समयानुसार किंवा कार्यानुसार श्रमिकांला मिळणारा मोबदला होय. व्याख्येत पुढील मुद्दे स्पष्ट होतात.

1) वकिल डॉक्टर्स इत्यादीची फी.

2) कारखान्यातील काम करण्याच्या सर्व प्रकारच्या श्रमिकांची मजूरी.

3) व्यवस्थापक, अधिकारी, कारकून, चपराशी इत्यादीचा पगार.

श्रमाला देण्यात येणारे वेतन कोणत्या तत्वानुसार दिले जाते. याबाबत अर्थशास्त्रामध्ये विविध सिद्धांत विकसित झाले. या सिद्धातांला मजूरीचे सिद्धांत म्हणतात.

**मजुरीचा आधुनिक सिद्धांत (Modern Theory of Wages) :**

अर्थव्यवस्थेत श्रम ह्या उत्पादन घटकाचा मोबदला कसा निश्चित होतो. याचा अभ्यास अनेक अर्थशास्त्रज्ञानी केला. मजूरीचा आधुनिक सिद्धांत हा मजूराची मागणी व मजूराचा पुरवठा या दोन्हीचा विचार करणारा सिद्धांत आहे. वेतनाच्या आधुनिक सिद्धांतानुसार अर्थव्यवस्थेतील वेतनदर श्रमाची



मागणी व श्रमाचा पुरवठा यांच्या संतुलनातून निर्धारित होतो. संतुलनाचा विचार करण्यापूर्वी श्रमाची मागणी आणि श्रमाचा पुरवठा यांचा स्वतंत्र विचार करणे आवश्यक आहे.

**श्रमाची मागणी (Labour of Demand) :**

उत्पादकाकडून श्रमाला केली जाणारी मागणी पुढील बाबींमुळे प्रभावीत होते.

1) श्रमाची मागणी अप्रत्यक्ष मागणी असल्यामुळे वस्तूच्या मागणीवर अवलंबून असते. वस्तुच्या मागणीतील चढ उतारानुसार श्रमाची मागणी वाढते किंवा घटते.

2) श्रमाच्या मागणीवर परिणाम करणारा दुसरा घटक वस्तूच्या मागणीची लवचिकता होय. उत्पादक ज्या वस्तूची निर्मिती करतो. त्या वस्तूला असलेली मागणी जर लवचिक असेल तर उत्पादक त्या वस्तूच्या किंमतीत अल्पसा बदल करून त्या वस्तूच्या मागणीत अधिक प्रमाणात बदल करू शकतो.

3) श्रमिकांची मागणी ही भूमी, भांडवल, संयोजक या उत्पादन घटकांच्या किंमती व पुरवठा यावर अवलंबून राहिल. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात श्रम हा घटक भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. त्या तुलनेत भांडवल कमी आहे. त्यामुळे श्रम स्वस्त दरात उपलब्ध होत असल्याने त्यांची मागणी अधिक असते.

4) श्रमिकांची मागणी ही केवळ अप्रत्यक्ष स्वरूपाचीच नसते तर ती संयुक्त स्वरूपाची मागणी असते. वस्तूचे उत्पादन करताना केवळ श्रमिक आवश्यक असतात असे नाही तर इतर उत्पादन घटकही आवश्यक असतात.

5) श्रमाची मागणी ही श्रमाच्या उत्पादनक्षमतेवर अवलंबून असते. जेव्हा श्रमाच्या उत्पादनक्षमतेत वाढ होते. तेव्हा त्याच्या मागणीत वाढ होते किंवा त्याचा मागणी वक्र उजवीकडे वर जातो. याउलट त्याची उत्पादन क्षमता कमी झाली तर त्याची मागणी घटते.

**श्रमाचा पुरवठा (Supply of Labour) :**

श्रमाचा पुरवठा हा पुढील घटकांने प्रभावित होतो.

1) श्रमाचा पुरवठा हा एकूण लोकसंख्या व लोकसंख्येतील उत्पादक लोकसंख्येच्या प्रमाणावर अवलंबून असतो. त्यात लोकसंख्येची घनता,

स्त्री-पुरुष प्रमाण, स्त्रीयांच्या नोकरी करण्याचा दृष्टीकोन, नौकरी करण्यायोग्य वय इत्यादीवर श्रम पुरवठा अवलंबून असतो.

2) मजूरीच्या दराने श्रमपुरवठा हा प्रभावित होतो. जास्त मजूरीला श्रमाचा पुरवठा जास्त होतो. तर मजूरीचा दर कमी झाला तर श्रमाचा पुरवठा सुद्धा कमी होतो.

3) श्रमाची गतिक्षमता ही श्रमाच्या पुरवठ्याची लवचिकता निश्चित करते आणि त्यामुळे श्रम गतिक्षम असतील तर श्रमाचा पुरवठाही लवचिक असतो असे दिसते.

4) श्रमिकांच्या सौदाशक्तीवरही श्रमिकांचा पुरवठा अवलंबून असतो. आजच्या जगात कामगार संघटना अधिक बलवान झालेल्या दिसतात. कामगार संघटना सामुहिक सौदाशक्तींच्या बळावर श्रमपुरवठा नियंत्रित करून मालकाकडून जास्त वेतन मिळवतात. एकंदरीत कामगार संघटनेद्वारे श्रमपुरवठा प्रभावित होतो.

**आकृतीद्वारे मागणी पुरवठा संतुलन :**

मागणी व पुरवठ्याचे घटक परस्परावर परिणाम करतात व त्यातून अर्थव्यवस्थेत श्रमिकांची मागणी व श्रमिकांचा पुरवठा समान होवून तेथे वेतनदर निश्चित होतो.




**श्रमाची मागणी व पुरवठा**



आकृतीमध्ये OX अक्षावर मजूराची मागणी व पुरवठा दशविलेला आहे. OY अक्षांवर वेतनाचे/मजूरीचे दर दर्शविलेले आहेत. DD हा मागणी वक्र आहे. SS पुरवठा वक्र आहे. मागणी वक्र व पुरवठा वक्र एकमेकांना R बिंदूत छेदतात. R हा संतुलन बिंदू आहे. येथे OP एवढी संतुलीत मजूरी ठरली. श्रमाची मागणी व श्रमाचा पुरवठा ON होतो. R ह्या बिंदू व्यतिरिक्त इतर कोणत्याही बिंदूला मजूरांची मागणी व पुरवठा संतुलित होत नाहीत. म्हणून दुसरीकडे कोठेही वेतनदर निश्चित होत नाही. जर OP पेक्षा कमी मजूरी झाली तर पुरवठ्यापेक्षा श्रमाची मागणी वाढते आणि उत्पादकांमध्ये श्रम मिळविण्याची स्पर्धा निर्माण होते व त्यातून पुन्हा मजूरीचा दर वाढून OP एवढाच होतो. म्हणून OP एवढाच वेतन दर निश्चित होतो.

**व्याजाचे सिद्धांत (Theories of Interest) :**

भांडवल हा उत्पादनाचा मानवनिर्मित घटक आहे. श्रम व भूमीच्या सहाय्याने वस्तूचे उत्पादन जरी केले जात असले तरी उत्पादनाचा वेग बराच कमी आहे. म्हणून उत्पादन प्रक्रियेला गती देण्यासाठी भांडवलाची गरज असते. अर्थशास्त्रात पैसा म्हणजे भांडवल आहेत. पण औजारे, कच्चामाल, यंत्रसामग्री इत्यादीला देखील भांडवल म्हणतात.

घेतलेल्या पैशाचा वापर केल्याबद्दल पैशाच्या मालकाला उत्पादक, उत्पादन संस्था जो मोबदला देते त्यालाच व्याज म्हणतात. व्याज म्हणजे भांडवलाच्या वापराबद्दल दिलेली किंमत होय.

व्याजाच्या सिद्धांताचा अभ्यास करताना व्याज का दिले जाते व व्याजाचा दर कसा ठरतो. या आधारावर व्याजाच्या सिद्धांताचे वर्गीकरण केले जाते. सुरुवातीच्या काळात अर्थशास्त्रज्ञांनी व्याज का दिले जाते. यावर भर दिला जातो. परंतु सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ व आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी व्याजाचा दर कसा ठरतो. याला महत्त्व दिले. यासाठी व्याजाचा कर्जाऊ निधी सिद्धांत पहाता येतो.

**व्याजाचा कर्जाऊ निधी सिद्धांत**

**(Loanable Funds Theory of Interest) :**

व्याजाचा कर्जाऊ निधी सिद्धांत नट विकसेल यांनी मांडला यात सुधारणा करण्याचे कार्ये ओहलिन, रॉबर्टसन, मिर्नाल, गुन्नार या अर्थशास्त्रज्ञाने केले. हा सिद्धांत व्याजाचा नवसनातनवादी सिद्धांत या नावाने ओळखला जातो.

या सिद्धांतानुसार व्याजाचा दर कर्जाच्या रकमेची मागणी व पुरवठ्याच्या संघर्षातून ठरतो. ज्या ठिकाणी मागणी व पुरवठा यांचे संतूलन होते. त्या ठिकाणी व्याजाचा निश्‍चित होतो. नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी देखील मागणी पुरवठा या दोन घटकांचा विचार व्याजाचा दर निश्‍चित करण्यासाठी केला जातो. यानंतर आपण कर्जाऊ रकमेला मागणी का केली जाते व कर्जाऊ रकमेचा पुरवठा कोणत्या घटकांवर अवलंबून आहे. हे पाहू.

**कर्जाऊ रकमेची मागणी :**

कर्जाऊ रकमेची मागणी खालील घटकांवर अवलंबून आहे.

1) **गुंतवणूक :**

यंत्रसामग्री, इमारत, इत्यादीसाठी व्यवसायिकाकडून कर्जाऊ निधीची गुंतवणूकीसाठी मागणी केली जाते. व्याजदर जास्त असेल तर कर्जाऊ निधीची गुंतवणूकीसाठी मागणी कमी केली जाते. व्याजदर कमी असेल तर कर्जाऊ निधीची गुंतवणूकीसाठी होणारी मागणी जास्त राहिल.

2) **संग्रहन :**

व्यक्ती हा बचतीचा उपयोगी कर्जासाठी करतात. तर काही बचत स्वतःजवळ ठेवतात. या बचतीला संग्रहन म्हणतात. थोडक्यात, संग्रहन म्हणजे स्वतःजवळ असलेली रोख रक्कम होय, व्याजदर जास्त असेल तर संग्रहनासाठी असलेली मागणी कमी राहिल. व्याजदर कमी असेल तर संग्रहणासाठी असलेली मागणी जास्त राहिल.

3) **उपभोग :**

कर्जाऊ रकमेची मागणी उपभोगासाठी केली जाते. व्यक्ती, उत्पादक व सरकार या तिन्ही घटकापासून अशी कर्जे काढली जातात. एखाद्या व्यक्तींकडून टिकावू व चैनीच्या वस्तूच्या खरेदीसाठी अशी कर्जे काढली जातात. दैनंदिन



गरजा भागविण्यासाठी कर्जाऊ रकमेला जी लोकांची मागणी असते. ही बहुतेक करून स्थिर असते. पण टिकावू वस्तूसाठी लोकांची जी मागणी असते. ती कर्जाऊ रकमेची मागणी ठरते.

**कर्जाऊ रकमेचा पुरवठा :**

1) **बचत :**

बचत हा कर्जाऊ रकमेच्या पुरवठ्याचा महत्त्वाचा घटक आहे. बचत म्हणजे ठरविक राष्ट्राच्या उत्पन्नातून खर्च वजा जाता शिल्लक राहिलेली रक्कम होय. व्याजाचे दर जास्त असतील तर बचत जास्त केली जाते आणि व्याजदर कमी असेल तर बचत कमी केली जाते. म्हणून बचत वक्र हा धनात्मक उताराचा असतो.

2) **पतनिर्मिती :**

व्याजदर जेवढा जास्त तेवढा बँकेचा पतपैशा पुरवठा अधिक राहिल. या उलट परिस्थिती व्याजदर जेवढा कमी तेवढा पतपैशाचा पुरवठा कमी राहिल. म्हणजेच व्याजाचे दर जास्त असताना कर्जाऊ रकमेचा पुरवठा जास्त असतो. तर व्याजदर कमी असताना कर्जाऊ रकमेचा पुरवठा कमी असतो.

3) **विसंग्रहण (साठवलेला पैसा खुला करणे) :**

विसंग्रहण म्हणजे संग्रहणाच्या विरुद्ध क्रिया आहे. व्यक्तीद्वारे पूर्वी संग्रहित केलेली राशी संग्रहणातून काढून घेवून कर्जाऊ देण्यासाठी उपलब्ध करून देणे म्हणजे अपसंग्रहण/विसंग्रहण होय. व्याजाचे दर कमी असतील तर अपसंग्रहण कमी असते. व्याजदर जास्त असल्यास विसंग्रहणाची मात्रा वाढते. त्यामुळे पैशाचा पुरवठाही जास्त असतो. व्याजाचे दर कमी असतील तर साठवून ठेवलेला पैसा बाहेर काढला जाणार नाही त्यामुळे पैशाचा पुरवठा कमी राहिल.

4) **अपगुंतवणूक :**

अपगुंतवणूक म्हणजे एखाद्या उद्योगांत गुंतवलेले भांडवल काढून घेणे होय. अर्थव्यवस्थेत निरनिराळे रचनात्मक बदल घडून येतात की, ज्यामुळे उद्योगात वापरली जाणारी यंत्रसामग्री कालबाह्य होते. नवीन यंत्रसामग्री घेता यावी यासाठी काही रक्कम बाजूला काढली जाते. तिला घसारा म्हणतात.

घसारा म्हणून बाजूला काढलेली रक्कम नवीन यंत्रे खरेदीसाठी न वापरता इतरांना कर्जे देण्यासाठी वापरली जाते. त्यास अपगुंतवणूक असे म्हणतात.

**आकृतीद्वारे कर्जाऊ रकमेची मागणी व पुरवठा यांचे संतुलन/व्याजदराचे संतुलन :**



कर्जाऊ रकमेची मागणी पुरवठा

वरील आकृतीमध्ये OX अक्षांवर कर्जाऊ रकमेचा मागणी पुरवठा दर्शविला आहे. तर OY अक्षांवर व्याजाचे दर दर्शविलेला आहे. आकृतीत ABCD हे कर्जाऊ रकमेचा पुरवठा दर्शविणारा वक्र आहे. तर EFG हे कर्जाऊ रकमेचा मागणी दर्शविणारे वक्र आहेत. SS हा कर्जाऊ रकमेचा पुरवठा वक्र आहे. DD हा कर्जाऊ रकमेची मागणी वक्र आहे. दोन्ही वक्र एकमेकांना E बिंदूत छेदतात. E याच बिंदूत एकूण कर्जाऊ रकमेची मागणी व कर्जाऊ रकमेचा पुरवठा समान होतो. येथे OP एवढा व्याजाचा दर निश्चित होतो. व्याजाचे दर OP असताना आणि रकमेची मागणी व पुरवठा OM एवढा राहिल. अशा प्रकारे कर्जाऊ रकमेला असलेली मागणी व कर्जाऊ रकमेचा पुरवठा या दोंन्हीच्या संतुलनाने व्याजदर ठरतो.

**टिकात्मक परिक्षण :**

**1) पूर्ण रोजगारीचे गृहित चुकीचे :**

अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार असतो. ह्या गृहितांवर हा सिद्धांत आधारित आहे. टिकाकांराच्या मते, अर्थव्यवस्थेत कधीच पूर्ण रोजगार नसतो, तर अपूर्ण रोजगार असतो.



**2) या सिद्धांतात नवीन असे काहीच नाही :**

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी व्याजाचा सिद्धांत मांडला. कर्जाऊ रकमेचा सिद्धांत फारसा वेगळा नाही. या सिद्धांताने बचत व कर्जाऊ रक्कम यात फरक करण्याचा प्रयत्न केला. असा प्रयत्न करून सांगितलेला कर्जाऊ रकमेचा सिद्धांत म्हणजे सनातनवदी सिद्धांत होय.

**3) संग्रहण भ्रामक कल्पना :**

प्रा. केन्सच्या मते, संग्रहण ही भ्रामक कल्पना आहे. संग्रहण व अपसंग्रहामुळे मुद्रेच्या पुरवठ्यात बदल होवू शकत नाही. असे केन्सचे म्हणणे आहे.

**4) बचत व्याजदराने प्रभावित होते हे चुकीचे :**

बचत ही व्याजदराने प्रभावित होत नाही. कारण बचत ही अनेक उद्देशाने केली जाते. मूलांचे शिक्षण, आजारपण, मूलींचे लग्न, भविष्यकालीन तरतूद इत्यादी अनेक उद्देशासाठी बचत केली जाते. याकडे नवसनातनवादी दुर्लक्ष करतात.

**5) अनिर्धारित सिद्धांत :**

प्रा. हॅन्सनच्या मते, परंपरागत व्याजदर सिद्धांताप्रमाणे हा सिद्धांत अनिर्धारित आहे. कर्जाऊ निधीचा पुरवठा हा उत्पन्न पातळीवर अवलंबून असतो. जो पर्यंत उत्पन्नाची पातळी किती हे माहित नसते. तोपर्यंत व्याजदराचे निर्धारण करता येत नाही. उत्पन्नाच्या पातळीचे स्पष्टीकरण सिद्धांतात केलेले नाही.

**व्याजाचा रोखता पसंती (तरलता) सिद्धांत**

**(Liquidity Preference Theory of Interest) :**

जगप्रसिद्ध इंग्रज अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड केन्स यांनी 1936 मध्ये ''The general Theory of employment Interest of Money'' 'उत्पन्न रोजगार व व्याजदर विषयक सिद्धांत' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. या ग्रंथात केन्सने व्याजाचा रोकड प्राधान्य सिद्धांत मांडला केन्सनी अर्थव्यवस्थेतील तत्कालीन बेकारीच्या कारणाचे विवेचन करण्यासाठी Jeneral Theory (जनरल थेअरी) हा ग्रंथ लिहिला. त्यात त्यांनी बेकारी निवारण करण्यासाठी उपभोग व गुंतवणूक ह्याचे महत्त्व विशद केले. हे स्पष्ट करताना गुंतवणूक ही व्याजदरावर

कशी अवलंबून असते. हे सांगितले. कर्जाऊ रकमेसाठी द्यावा लागणारा मोबदला म्हणजे व्याज होय. केन्सच्या मते, प्रत्येक व्यक्ती आपल्या उत्पन्नाचा बराच भाग रोख स्वरूपात आपल्या जवळ बाळगतात. त्यामुळे प्रत्येक व्यक्तींकडून रोखतेला मागणी असते, तर अर्थव्यवस्थेमध्ये काही घटकांकडून रोख रकमेचा पुरवठा केला जातो.

**सिद्धांत :**

रोख रकमेची मागणी व रोख रकमेचा पुरवठा यांच्या संतुलनातून व्याजदर ठरला जातो. पण अल्पकाळात रोख पैशाचा पुरवठा कायम असतो. त्यामुळे अल्पकाळात व्याज निर्धारणात रोख पैशाची मागणी महत्त्वाची ठरते. व्याज म्हणजे काय? रोखतेच्या त्यागाबद्दल देण्यात येणारे बक्षीस म्हणजे व्याज होय. केन्सच्या मते, रोख रकमेची मागणी व रोख रकमेचा पुरवठा याचा अभ्यास पुढीलप्रमाणे.

**रोख रकमेची मागणी :**

**1) दैनंदिन व्यवहार हेतू :**

प्रत्येक व्यक्तीला व उत्पादन संस्थेला रोजच्या चालू व्यवहाराकरिता रोख रकमेची गरज असते. व्यक्तींची रोख रकमेची मागणी ही व्यक्तींच्या उत्पन्नावर अवलंबून असते. उत्पन्न जास्त असल्यास रोखतेकरिता मागणी जास्त राहिल. उलट उत्पन्न कमी असल्यास मागणी कमी राहिल. उत्पादन संस्थाची मागणी ही त्याच्या व्यवसायावर अवलंबून राहिल. व्यवसाय जेवढा मोठा तेवढी त्यांची रोख रकमेकरिता असणारी मागणी जास्त व्यवसाय लहान असल्यास रोख रकमेकरिता मागणी कमी राहिल. अशा प्रकारे व्यवहार हेतूची मागणी उत्पन्न हेतूवर व व्यवसाय हेतूवर अवलंबून असते.

**2) दक्षतेचा हेतू :**

व्यक्तींच्या दृष्टीने दक्षता हेतू महत्त्वाचा असतो. भविष्याबद्दलची दक्षता किंवा काळजी प्रत्येक व्यक्ती घेत असते. भविष्यात येणाऱ्या संकटाला तोंड देण्यासाठी व्यक्ती पैशाची मागणी करते आणि स्वतः जवळ पैसा बाळगण्याचा प्रयत्न करते. व्यक्तीप्रमाणेच विविध सामाजिक संस्था व उद्योग संस्था देखील दक्षता म्हणून पैशाची मागणी करत असतात.

XZ$XZ hÀ`yd Xj VmhÀ`yhoŒËnÞnMb' $c A rhV.



**3) सट्टेबाजीचा हेतू :**

रोखतेस असणाऱ्या मागणीचा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे सट्टेबाजीचा हेतू होय. अर्थव्यवस्थेत किंवा बाजारात पुष्कळसे बदल वारंवार घडतात. जसे वस्तूच्या किंमतीतील बदल, कंपन्याच्या शेअर्सच्या किंमतीत होणारे बदल इत्यादी किंमतीत होणाऱ्या बदलाचा फायदा घेण्यासाठी व्यक्तींला स्वतःजवळ रोख पैसा बाळगावा असे वाटते. यालाच सट्टेबाजीचा हेतू म्हणतात. जसे एखाद्या कंपनीच्या शेअर्समध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली आणि भविष्यकाळात तिचे दर वाढण्याची शक्यता असेल तर आज त्या कंपनीचे शेअर्स खरेदी करावयाचे आणि भविष्यकाळात तिचे दर वाढल्यावर विकून टाकावयाचे म्हणून भरपूर नफा मिळतो. हा जो नफा मिळाला तो किंमतीत झालेल्या बदलाचा फायदा घेतल्यामुळेच आहे.

व्याजाचे दर आणि सट्टेबाजीचा हेतू याचा जवळचा संबंध असतो. शेअर्सच्या किंमती आणि व्याजदर यातील संबंध हे व्यस्त आहेत याचा अर्थ व्याजदर कमी होतो. तेव्हा शेअर्सच्या किंमती, रोख्याच्या किंमती वाढतात. याउलट व्याजदर जास्त असतो, तेंव्हा रोख्याच्या शेअर्सच्या किंमती कमी असल्याने लोक शेअर्स खरेदी करतात. त्यामुळे पैशाची मागणी कमी होते. याउलट व्याजदर कमी असतो. तेंव्हा कर्जरोखे/शेअर्स खरेदी किंमती जास्त असतात. अशावेळी लोक आपल्याजवळील शेअर्स बाजारात विकून रोख पैसे बाळगतात. कमी किंमतीला रोखे खरेदी करावयाचे व जास्त किंमतीला विकून नफा मिळविणे हाच सट्टेबाजीच हेतू असतो. पैशाच्या मागणीला केन्सने $M_2$ असे म्हणतो.

**रोख रकमेचा पुरवठा :**

अर्थव्यवस्थेत सरकारने निर्माण केलेला कायदेशीर पैसा आणि व्यापारी बँकानी निर्माण केलेला मतपैसा यांच्याकडून रोख रकमेचा पुरवठा होता. पैशाचा पुरवठा हा शासन व बँकाचे धोरण यावर अवंलबून असते. अल्पकाळात सरकारचे चलनविषयक धोरण आणि बँकाचे पतविषयक धोरण स्थिर राहावे म्हणून अल्पकाळात एकूण रोख रकमेचा पुरवठा स्थिर राहतो. त्यात बदल होत नाही.

**आकृतीद्वारे व्याजदर निश्चिती :**




**रोख रकमेची मागणी पुरवठा**

आकृती क्र.

वरील आकृतीत OX अक्षांवर रोख रकमेचा मागणी पुरवठा तर OY अक्षांवर व्याजदर दर्शविलेला आहे. MR हा रोख रकमेचा पुरवठा वक्र दर्शविलेला आहे. आणि तो OY अक्षांला समांन्तर आहे. DD हा रोख रकमेचा मागणी वक्र आहे. तो MR या पुरवठा वक्राला E बिंदूत छेदतो. E हा संतुलन बिंदू आहे. E या बिंदूत रोख रकमेची मागणी = पुरवठा OM एवढा आहे. याठिकाणी OP इतका संतूलित व्याजदर ठरतो. समजा जर अल्पकाळात रोख रकमेची मागणी वाढली तेंव्हा $D_1D_1$ हा नविन रोख रकमेचा मागणी वक्र हा पूर्वीच्याच पुरवठा वक्राला $E_1$ या बिंदूत छेदतो. $E_1$ हा संतुलन बिंदू आहे. येथे संतुलीत व्याजदर $OP_1$ होतो. यावरून असे स्पष्टपणे सांगतो येते की, अल्पकाळात व्याज निर्धारणात रोख रकमेच्या मागणीचा प्रभाव पडतो.

**व्याजाच्या रोखता पसंती सिद्धांतावरील टिका :**

**1) अल्पकाळाचा विचार :**

केन्सने केवळ अल्पकाळात व्याजदर कसा ठरतो याचा विचार केला. पण दीर्घकाळात व्याजाचा दर कसा ठरतो. यासंबंधी स्पष्टीकरण नाही. असे टिकाकार म्हणतात.



**2) या सिद्धांतात नवे असे काहीही नाही :**

टिकाकाराच्या मते, केन्सने व्याजाच्या विवेचनात कोणतीच नवी भर टाकली नाही. किन्सने जे प्रतिपादन केले ते इतरांनी अगोदरच केले होते.

**3) व्याजाची व्याख्या चुकीची :**

टिकाकाराच्या मते, रोखतेचा त्याग करण्याबद्दलचे बक्षीस म्हणजे व्याज हा किन्सचा युक्तीवाद बरोबर नाही. कारण उत्पादक बक्षीस देण्याच्या उद्देशाने भांडवल उभा करीत नाही, तर भांडवल गुंतवणूकीमुळे जास्त उत्पन्न मिळते. म्हणून गुंतवणूक केली जाते.

**4) चलनविषयक घटकांचाच विचार केला :**

टिकाकाराच्या मते केन्स केवळ चलनविषयक घटकांचाच विचार केला. उत्पादकता बचत यासारख्या इतर घटकांचा विचार केलेला नाही. असे टिकाकार म्हणतात.

**5) वास्तवतेचा अभाव :**

रोकड प्राधान्य प्रवृत्ती सिद्धांत वास्तव परिस्थितीमध्ये लागू होत नाही. किन्सच्या मते, रोखड प्राधान्य प्रवृत्ती जास्त असेल तर व्याजदरही अधिक राहिल. पण मंदीच्यास काळात रोकड प्राधान्य प्रवृत्ती अधिक असूनही व्याजदर वाढला नाही. त्याचबरोबर तेजीच्या काळात रोकड प्रवृत्ती कमी असूनही व्याजदर अधिक राहतो. 1929-30 च्या मंदीच्या काळात किन्सची ही विचारसरणी अपयशी ठरलेली दिसून येते.

**6) एकांगी सिद्धांत :**

ह्या सिद्धांतात रोखतेच्या मागणीवर बराच जास्त भर देण्यात आला. हिक्सच्या मते, केन्सने मुद्रेच्या पुरवठ्याला एक स्वतंत्र परिवर्तनशिल घटक मानला आहे. त्यामुळे हा सिद्धांत एकांगी ठरतो.

**7) अपूर्ण सिद्धांत :**

रोख रक्कम बाळगण्याकरिता बचत आवश्यक व बचतीकरिता उपभोगाचा त्याग आवश्यक असतो, पण उपभोगाचा त्याग का व कसा केला जातो. ह्याचे स्पष्टीकरण ह्या सिद्धांतात नाही. म्हणून तो अपूर्ण आहे.

**नफ्याचे सिद्धांत (Theories of Profit) :**

अलिकडच्या काळात उत्पादन प्रक्रियेमध्ये संयोजक या उत्पादन घटकाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले. ॲडम स्मिथपासून जे. ए. मिलपर्यंत उत्पादनाचा घटक म्हणून भांडवलालाच मानले जात होते. त्यामुळे नफा व व्याज याचा वेगळा विचार झालेला नाही. अलिकडच्या काळात परिस्थितीत फार बदल झालेला आहे. अर्थशास्त्रज्ञानी संयोजकाला मिळणारा मोबदला कसा ठरतो. याविषयी विवेचन केले. दिवसेंदिवस संयोजकाचे महत्त्व वाढत आहे. औद्योगिक क्रांती उच्च दर्जाचे राहणीमान, चंगळवादी संस्कृती, लोकसंख्येचा विस्फोट, यामुळे उद्योगधंद्याची संख्या वाढली, त्याचा आकार वाढला. त्यामुळे संयोजक या घटकांचे महत्त्व वाढले.

विविध अर्थशास्त्रज्ञांनी संयोजकाचा नफा (मोबदला) कसा ठरतो. याविषयी आपले मत मांडले. त्या मतानाच नफ्याचे विविध सिद्धांत म्हणतात. काही अर्थशास्त्रज्ञांनी संयोजकाने असे म्हटले तर काही विचारवंतानी नफा हा व्यवसायातील अनिश्चितेचा मोबदला आहे असे म्हटलेले आहे.

नफ्याचे विविध सिद्धांत खालीलप्रमाणे मांडलेले आहेत.

**नफ्याचा जोखीम किंवा धोका पत्करण्याचा सिद्धांत**

**(Risk Bearing Theory of Profit) :**

नफ्याचा धोका पत्करण्याचा सिद्धांत अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ प्रा एफ. बी. हॉले यांनी सन 1907 मध्ये प्रकाशित केलेल्या ''Enterprise and Productive Process'' या ग्रंथात मांडला आहे. त्याच्या नफ्याच्या सिद्धांताचे समर्थन डॉ. मार्शल यांनी केले.

* **प्रा. हॉलेच्या मते :** ''धोका स्विकारल्याबद्दल किंवा पत्करल्याबद्दल संयोजकाला देण्यात येणारा मोबदला म्हणजे नफा होय.''

* **प्रा. हॉले यांच्या मते :** ''एकूण उत्पन्नातून भूमी, श्रम, भांडवल, यांना मोबदला दिल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहते. ती रक्कम म्हणजे संयोजकाचा नफा होय.''

जेवढा धोका/जोखीम जास्त तेवढा मिळणारा नफा सुद्धा जास्त असतो.



**प्रा. हॉलेच्या मते–** उत्पादन प्रक्रियेत पुढील धोके स्विकारावे लागतात.

1) यंत्रसामुग्रीची झीज होते.

2) उत्पादन पद्धतीत बदल होणे.

3) नवनवीन शोध लागणे.

4) उद्योगाला आग लागणे.

5) मजूरांचा अपघात होणे.

6) अनिश्चितता.

वरील धोके टाळणे संयोजकाचे कार्य आहे. वेगवेगळ्या व्यवसायात जोखीम/धोके कमी जास्त असल्यामुळे मिळणारा नफा सुद्धा कमी जास्त प्रमाणात आढळून येतो. एकाच उद्योगातील अनेक संस्थामध्ये / पेढ्यामध्ये संघटकाला मिळणारा नफा भिन्न असतो. कारण सर्व पेढ्यांमध्ये/संस्थामध्ये जोखीम सारखीच असत नाही.

**सिद्धांतातील टिका :**

1) जोखमेचा अर्थ स्पष्ट केलेला नाही–प्रा. नाईट यांच्या मते, जोखीमेचे दोन प्रकार पडतात. 1) विमा योग्य जोखीम, 2) विमा न काढता येणारी जोखीम. ही विमा काढून टाकता येते. नाईटच्या मते, विमा न काढता येणाऱ्या जोखीमेचा मोबदला होय. म्हणजेच नफा हा अनिश्चिततेचा मोबदला आहे.

2) जोखीम अधिक असेल तर नफा सुद्धा अधिक असतो. हे म्हणजे बरोबर नाही. भरमसाठ नफा प्राप्ती होणाऱ्या उत्पादन प्रक्रियेत जोखीम अधिक असते. असे मुळीच नाही. जी जोखीम दुसऱ्यांकडे हस्तांतरीत होत नाही ती फक्त उत्पादक पत्करत असतो. त्याबद्दल त्याला नफा प्राप्त होत असतो.

3) काही व्यक्तींना स्वतंत्र व्यवसायाची आवड असते. त्यांना जोखीमीचे विशेष महत्त्व वाटत नाही. अशा बाबतीत मिळणाऱ्या नफ्याचे स्पष्टीकरण या सिद्धांताच्या सहाय्याने करता येत नाही.

4) संघटकाला मिळणारा नफा हा जोखीमेशी संबंधित असतो असे नाही. आकस्मित लाभ व जोखीम यांचा बऱ्याच वेळा काहीही संबंध नसतो. ज्या उद्योगामध्ये जोखीम बरीच जास्त असते. त्या उद्योगामध्ये नफाही अधिक असतो असे नाही.

5) प्रा. कार्व्हरच्या मते, नफा हा जोखीम स्विकारण्याचा मोबदला नसून जोखीम टाळण्याचा मोबदला आहे. जो संघटक जोखीम टाळतो. त्याला नफा मिळतो. मोठ्या प्रमाणात जोखीम टाळली तर जास्त नफा मिळतो.

6) अपूर्ण सिद्धांत प्रा. हॉले यांचा जोखीमेचा सिद्धांत अपूर्ण आहे. कारण या सिद्धांतात नफ्याच्या फक्त एकाच घटकाचा विचार केला. इतर घटकांमुळे सुद्धा नफा मिळतो. त्या घटकांकडे या सिद्धांतात पुर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले.

7) अचानक मिळणाऱ्या लाभाचा अभ्यास या सिद्धांतात केला नाही. तर काहीवेळा उत्पादकाला अनपेक्षित फायदा होता उदाः तेजीमध्ये किंमत वाढते. त्यामुळे उत्पादकास जास्त मोबदला मिळतो. याचा विचार या सिद्धांतात केलेला नाही.

**नफ्याचा अनिश्चिततेचा सिद्धांत (Uncertainty Theory of Profit) :**

प्रा. नाईट या अमेरिकन अर्थशास्त्रज्ञाने सन 1933 मध्ये Risk uncertainty of Profit हा ग्रंथ लिहिला. नफ्याचा उगम जोखीमेतून होतो. हे हॉले याचे विचार आपण पाहिले. त्याच्या विचारांत सुधारणा करून हा सिद्धांत मांडण्याचे कार्य नाईट यांनी केले. संघटकाचे कार्य जोखीम पत्करणे हे नसून अनिश्चितता पत्करणे हे खरे कार्य आहे. जे जे अनपेक्षित व पूर्वसूचना न देता आकस्मित निर्माण होते आणि ज्याचे पुर्वानुमान लावता येत नाही ते ते अनिश्चितता म्हणून समजले जाते. प्रा. नाईट यांच्या मते, ''अनिश्चितता स्विकारण्यासाठी संघटकाला मिळणारा मोबदला म्हणजे नफा होय.''

प्रा. नाईटच्या मते, उत्पादन कार्यातील धोके दोन प्रकारचे असतात.

1) अपेक्षित जोखिम / धोके

2) अनपेक्षित जोखित/धोके

अपेक्षित जोखिम ही विमायोग्य असते, तर अनपेक्षित जोखमीचा वीमा काढता येत नाही.

**3) अपेक्षित जोखीम :**

या जोखीमेविषयी आपणास अंदाज बांधता येतात. तसेच या जोखिमेचे संस्थात्मक मापन करता येते. या जोखिमेपासून जे नुकसान होते. ते भरून



काढण्यासाठी त्याचा विमा काढता येतो. म्हणून या जोखिमेचा विमायोग्य जोखीम म्हणतात.

**अपेक्षित जोखीम दोन प्रकारची :**

**A) निसर्गनिमित जोखीम :**

भूकंप, पूर, सुनामी, अपघात, आग इत्यादीमुळे निसर्गनिमित जोखीम निर्माण होते. या जोखीमेमुळे उद्योगाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. ते नुकसान होवू नये म्हणून अपेक्षित निसर्गनिर्मित जोखीमेचा विमा काढला जातो.

**B) मानवनिर्मित जोखीम :**

चोरी, लुटमार, दरोडा, अफरातफर इत्यादीचा समावेश या मानवनिर्मित जोखिमेत होतो. मानवनिर्मित जोखीमेचा विमा काढता येतो.

**2) अनपेक्षित जोखीम :**

काही जोखीम अशा असतात की, ज्या विमा काढता येत नाही. अशा जोखीम संयोजकाला सहन करावे लागतात. अशा प्रकारच्या धोक्यात वस्तूच्या किंमतीत होणारे बदल, जाहिरातीवरील खर्च, उत्पादन घटकांच्या किंमतीतील बदल, इत्यादी जोखीम येतात. अशा धोक्याची जबाबदारी पत्करण्यास विमा कंपनी तयार नसतात.

थोडक्यात, अशा विमा अयोग्य धोक्यामध्येच अनिश्चितता असते. अशा अनिश्चिततेचा मोबदला म्हणजे नफा होय.

**सिद्धांतावरील टिका :**

1) अनिश्चिततेमुळे संघटकाचा पुरवठा मर्यादित असतो असे नाईट यांचे मत आहे. पण संघटकांची संख्या मर्यादित राहण्यासाठी इतर कारणेही महत्त्वाची आहेत.

2) बाजारपेठेतील संघटकांची मक्तेदारी, अपूर्ण स्पर्धा इत्यादीमुळे होणाऱ्या नफ्याचे स्पष्टीकरण या सिद्धांतात नाही.

3) संघटकांच्या अपेक्षांची भूमिका या सिद्धांतात स्पष्ट केलेली नाही. संघटक आपल्या अपेक्षेनुसार उत्पादनाची निवड करतो. त्यांच्या अपेक्षा अल्पकालीन व दीर्घकालीन असतात. या दोन्ही अपेक्षांचा नफ्यावर

परिणाम होतो.

4) अनिश्चिततेचे मापन होत नाही. अनिश्चितेचे कोणत्याही भौतिक स्वरूपात मापन करता येत नाही. या सिद्धांतानुसार नफा किती मिळाला हे निश्चितपणे समजत नाही.

5) नफा अनेक कारणाने मिळतो. त्याचा या सिद्धांतात उल्लेख नाही, अपूर्ण स्पर्धा, नवीन पेढ्यांच्या प्रवेशाला बंदी इत्यादी नफ्याची कारणे आहेत. अनिश्चितता हे नफ्याचे मुख्य कारण नाही.

6) भूमी, श्रम व भांडवलाप्रमाणे अनिश्चितता हा स्वतंत्र घटक होत नाही. अनिश्चिततेचा मोबदला म्हणजे नफा होय. असे म्हटले तर अनिश्चिततेला उत्पादनाचा घटक मानावे लागेल. पण ते योग्य नाही.

7) अनिश्चिततेमुळे संघटकांचा पुरवठा मर्यादीत असतो. हे म्हणणे बरोबर नाही. ज्ञानाचा, कुशलतेचा अभाव कमी भांडवल इत्यादीमुळे संघटकांचा पुरवठा मर्यादित राहतो.

**नफ्याचा नवप्रवर्तनाचा सिद्धांत (Innovation Theary of Profit) :**

नफ्याचा नवप्रवर्तनाचा सिद्धांत प्रा. जोसेफ ए. शुंपीटर यांनी मांडला हा सिद्धांत बऱ्याच प्रमाणात प्रा. क्लर्राक यांच्या सिद्धांताशी मिळता-जुळता आहे.

प्रा. क्लार्क यांनी अर्थव्यवस्थेत गतिमान बदल होत असतात व ह्या गतिमान बदलामुळे नफा प्राप्त होतो असे त्यांनी आपल्या सिद्धांतात मांडले, तर प्रा. शुंपीटरच्या मते, संयोजकाने उत्पादन पद्धतीत बदल केल्यामुळे नफा मिळतो. त्याचबरोबर उत्पादन पद्धतीत होणाऱ्या नवप्रवर्तनामुळे नफा निर्माण होतो. नफा नवप्रवर्तनाचे पारितोषिक होय. म्हणून नवप्रवर्तन म्हणजे काय? ते पुढीलप्रमाणे सांगता येते.

**नवप्रवर्तनाचा अर्थ :**

''नवप्रवर्तन म्हणजे ते बदल की जे वस्तूच्या उत्पादनाच्या पद्धतीत किंवा विपवान पद्धतीत केलेले असतात. ज्यामुळे उत्पादन व्यय कमी होतो. किंवा विक्रय प्राप्तीत वाढ होते. परिणाम स्वरूप उत्पादन व्यय आणि विक्री किंमत यातील अंतर वाढून नफा प्राप्त होत असतो.



नवीन उत्पादन तंत्राचा विकास नवीन यंत्राचा शोध, कच्चा माल वेगळ्या पद्धतीने उपलब्ध करणे, नवीन प्रकारच्या शक्तींचा व इंधनाचा शोध, उत्पादनाकरिता नवीन बाजारपेठाची उपलब्धता, उत्पादनाच्या दर्जात सुधारणा करणे आणि विक्री कलाचा वापर इत्यादींमुळे नवप्रवर्तने होतात.

नफा प्राप्त व्हावा म्हणून नवप्रवर्तन प्रत्यक्षात आणले जाते. म्हणजेच नवप्रवर्तन हे नफ्याचे कारण होय. नवप्रवर्तन यशस्वी झाल्यास नफ्याची निर्मिती होते. म्हणजे नफा हा नवप्रवर्तनाचा परिणाम होय. नवप्रवर्तनामुळे मिळणारा नफा हा अस्थायी स्वरूपाचा किंवा काही काळापुरता असतो. त्यामुळे सतत नफा मिळावा म्हणून संघटकाला सतत नवनीकरणाचे प्रयोग करावे लागतात. नफ्याचा प्रवाह हा सतत सुरू राहतो. ह्यावरून असे स्पष्ट होते की, नफा भांडवलामुळे प्राप्त होत नाही तर संघटकाच्या क्रांतीमुळे प्राप्त होतो.

प्रा. शुंपीटरच्या मते, संयोजकांचे कार्यच असे असते की, उद्योगात सुधारणा घडवून आणणे, उत्पादन खर्च कमी करणे, की ज्यामुळे नफ्याचा प्रवाह सातत्याने चालू राहिल. नवीन प्रयोग काही काळाने जूने होतात. म्हणून मिळणारा नफा हा तात्पुरता असतो. अशावेळी संयोजक पहिले तंत्र जुने होईपर्यंत नव्या उत्पादन तंत्राचा शोध लावण्याचा प्रयत्न करित असतात. अशा प्रकारे नवीन शोधाची मालिका चालू ठेवून त्याचा फायदा होत असतात. त्यालाच नफा म्हणतात.

थोडक्यात, शुंपीटर यांनी आधुनिक अर्थव्यवस्थेत संयोजकाला अनन्य साधारण महत्त्व दिले आणि स्पष्ट केले की नफा हा संयोजकाच्या कौशल्याचा मोबदला आहे.

**टिकात्मक परिक्षण :**

1) प्रा. हॉलेच्या मते, जास्त जोखीम स्विकारल्याबद्दल जास्त नफा मिळत असतो. असा विचार शुंपीटरने मांडलेला नाही.

2) केवळ संयोजकांने कार्य करीत असतात. बदल घडवून आणणे एवढेच मर्यादित नसून त्या-त्या नवीन तंत्राला सामोरे जावे लागते. त्यानुसार आपल्या व्यवसायात बदल घडवून आणणे त्याचबरोबर उत्पादन निर्मितीच्या

प्रक्रियेपासून ते वस्तू विक्रीपर्यंत अनेक कामात संयोजकाचा सहभाग राहतो. त्या सर्व कार्याचा मोबदला म्हणून नफा मिळतो. म्हणून केवळ उत्पादन तंत्रात बदल घडवून आणून नफा मिळवला असे नाही. असे टिकाकार म्हणतात.

3) नवप्रवर्तनामुळे नफा निर्माण होतो. हे खरे असले तरी इतरही घटकांमुळे नफा निर्माण होतो. परंतु शुंपीटरने इतर घटकांकडे दुर्लक्ष करून केवळ नवप्रवर्तनाकडे लक्ष केंद्रित केले असी टिका केली जाते.

4) संघटक हा घटकांचे एकत्रिकरण करित असतो. तसेच तो साहसी असतो. त्यामुळे त्याला नफा मिळत असतो. याचा विचार या सिद्धांतात झालेला नाही.

5) उत्पादन कार्यात संघटकाला विविध प्रकारची कार्ये पार पाडावी लागतात, परंतु संघटक केवळ नवप्रवर्तन निर्माण करतो असे हा सिद्धांत मानतो. म्हणजेच हा सिद्धांत संघटकाच्या कार्याचा संकुचित दृष्टिने विचार करतो.

**सामुहिक सौदाशक्ती (Collective Bargaining) :**

सामुहिक सौदाशक्ती ही संकल्पना 18 व्या शतकांमध्ये इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतिनंतर रूढ झाली. औद्योगिक क्षेत्रात शांतता कायम स्वरूपी ठेवण्यासाठी हरताळ, संप, मोर्चे, टाळेबंदी, सावकास काम इत्यादीमार्गाचा अवलंब करण्याऐवजी सामुहिक सौदाशक्ती सर्वात चांगला मार्ग समजला जातो. याचाच अर्थ या मार्गाने औद्योगिक तंटे बंद होतात. हाच सामुहिक सौदाशक्तीचा मुख्य गुण आहे.

कामगारांच्या हिताच्या दृष्टिने सामुहिक सौदाशक्ती महत्त्वाची असते. भांडवलदार व कामगार यांच्यातील तंटा मिटविण्याकरिता हा मार्ग महत्त्वाचा मानला जातो.

**व्याख्या :**

1) ''बाहेरच्या कुणाही शक्तीची मदत न घेता औद्योगिक तंटे अंतर्गत वाटाघाटींनी सोडविण्याची कामगार व भांडवलदार दोघांनाही सोईस्कर वाटणारी पद्धत म्हणजेच सामुहिक सौदाशक्ती होय.''



2) ''सामुहिक सौदा म्हणजे दोन व्यक्तीगटात (मालक आणि मजूर) गटांत चर्चेच्या, वाटाघाटीच्या व वादविवादाच्या मार्गाने समझोता घडवून आणण्याची प्रक्रिया होय.''

3) ''सामुहिक सौदाशक्ती म्हणजे दोन व्यक्ती समुहात चर्चा (मालक व मजूर) व वादविवादाच्या माध्यमातून समझोता घडवून आणण्याची प्रक्रिया होय.''

सौदा किंवा करार मुख्यत: वेतन, सुट्ट्या, कामाचे तास, काम करण्याची जागा व इतर सवलती याबाबतीत केला जातो. हा करार दोन्ही गटाने पाळणे बंधनकारक असते.

**सामुहिक सौदाशक्तीची उद्दिष्ट्ये :**

**1) कारगाराच्या हिताचे रक्षण करणे :**

कामगार हा दुर्बल घटक आहे. तो एकटा औद्योगिक जगात आपले स्वत:चे रक्षण करू शकत नाही. अशावेळी मालक वर्गातर्फे त्याची पिळवणूक होवू शकते. ती होवू नये म्हणून ''United we stand'' या मंत्राचा उपयोग कामगार करतो व संघटना बांधतो. संघटनेची शक्ती मोठी असते. या मोठ्या कामगार संघटनेमुळे मालक वर्गाला नमते घ्यावे लागते. संघटना आपल्या सभासदांच्या वेतनात वाढ, राहणीमानात सुधारणा, कामाची स्थिती याबाबत मालक वर्गाशी करार करते. सामुहिक सौदा या मार्गाचा अवलंब करून कामगारांच्या हिताचे रक्षण करते.

**2) कामगारांची उत्पादकता वाढविणे :**

कामगारांची उत्पादन क्षमता ही मालक व मजूर यातील संबंध आणि कारखान्याचे आधुनिकीकरण, कामाचे तास आणि वेतन पातळी यावर कामगारांची उत्पादकता अवलंबून असते.

**3) कामगारावरील होणारे अन्याय दूर करणे :**

कामगारांचे शोषण, त्याच्यावर होणारे अन्याय आणि मानवी हक्काची पायमल्ली होणार नाही. म्हणून सामुहिक सौदाशक्तींचा वापर केला जातो आणि कामगारावरील होणारे अन्याय दूर करून औद्योगिक न्याय प्रस्तावित केला जातो.

**4) मजूरीचे योग्य दर ठरविणे :**

सामुहिक सौदाशक्तींच्या सहाय्याने कामगार संघटना ही श्रमाला कमाल वेतन मिळवून देण्याचा प्रयत्न करते. मजूरांनी केलेल्या कामाचा मोबदला त्यांना योग्य प्रमाणात मिळणे आवश्यक आहे. एकटा कामगार वेतनात वाढ घडवून आणू शकत नाही. मालक वर्गाची भूमीका ही कामगारांचे शोषण करण्याचीच असल्यामुळे सामुहिक सौदाशक्तीचा वापर करणे आवश्यक ठरते. या पद्धतीचा अवलंब करून मजूरीचे दर ठरवता येतात.

**5) कामगारांना बोनसची मागणी :**

कामगार एकटा मालकांकडे बोनसची मागणी करणार नाही. सामुहिक सौदा शक्तीद्वारे उद्योगसंस्थेला जो नफा होईल तो नफ्याचा भाग बोनसरूपाने कामगारांना प्राप्त करून घेता येईल.

थोडक्यात, कामगारांना सुयोग्य निवारा, आरोग्य, शिक्षण इत्यादी संबंधी सवलती उपलब्ध झाल्यास त्याची शारीरिक व मानसिक स्थिती चांगली राहते. त्याचा परिणाम म्हणून कामगारांची उत्पादन क्षमता वाढीस लागते. वरील सर्व उद्दिष्ट्ये प्राप्त करण्यासाठी सामुहिक सौदाशक्तींचा वापर करणे आवश्यक आहे.

**सामुदायिक सौदाशक्तीवर येणाऱ्या मर्यादा :**

**1) कामगार संघटनेचा शक्ती :**

कामगार संघटना कमकुवत असतील तर श्रमिकाला फायदा होणार नाही. म्हणून संघटनेची ताकद हीच श्रमिकांची सौदाशक्ती ठरविते.

**2) कामाचे स्वरूप :**

विमान, एस.टी., रेल्वे, टेलिफोन, जहाज महानगरपालिकेतील कर्मचारी, सरकारी कर्मचारी इत्यादी क्षेत्रांतील काम कुशलतेचे तांत्रिक व सामाजिकदृष्ट्या अत्यंत आवश्यकतेचे असतात. त्यामुळे तेथील कामगार कर्मचाऱ्याची सौदाशक्ती जास्त असते.

**3) कामगारांची गतिशिलता :**

कामगार गतिशिल नसेल तर कामगारांचा पुरवठा कमी लवचिक असतो. अशावेळी संघटनेची सौदाशक्ती कमकुवत बनते.



**4) कामगारांची संख्या :**

कामगार संघटनाच्या सभासदांची संख्या मोठी असेल तर संघटनेची शक्ती जास्त असते. त्या शक्तींचा जोरावर मालकाला व शासनाला वटणीवर आणण्याची ताकद त्यांच्यात असू शकते. छोट्या संस्थेच्या संघटना प्रभावी परिणाम करू शकत नाहीत.

**5) पर्यायी रोजगाराची शक्यता :**

इतरत्र काम मिळण्याची शक्यता असेल तर कामगारांची सौदाशक्ती अधिक राहतो. नाहीतर ती कमी राहिल.

**6) अपूर्ण श्रमबाजार :**

श्रमिकांच्या गतिशिलतेवर श्रम बाजार पूर्णतः अवलंबून राहतो. जेंव्हा कामगार गतिहिन असेल त्यामुळे पुरवठा कमी लवचिक बनतो. तर त्यांची सौदाशक्ती दुर्बल बनते.

■ ■ ■

# MCQ B.A. I Semester

1) संपत्ती हे मानवी कल्याणाचे साधन आहे.
A) **मार्शल** B) रॉबिन्स C) रिकार्डो D) केन्स

2) सुक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासात खालील बाबी येतात.
A) एकूण उत्पादन B) एकूण बचत
C) राष्ट्रीय उत्पन्न D) **वैयक्तिक खर्च**

3) मार्शल याने अर्थशास्त्राची मुलतत्त्वे हा ग्रंथ कोणत्या वर्षी.
A) 1776 B) **1890** C) 1892 D) 1992

4) मार्शल यांनी हा ग्रंथ लिहिला.
A) राष्ट्राची संपत्ती B) उत्पन्न आणि रोजगार
C) अर्थशास्त्राचे स्वरूप आणि महत्त्व D) **अर्थशास्त्राची मुलतत्त्वे**

5) खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे.
A) ॲडम स्मीथ याने राष्ट्राची संपत्ती हा ग्रंथ लिहिला नाही.
B) मार्शल याने अर्थशास्त्राचे स्वरूप आणि महत्त्व हा ग्रंथ लिहिला.
C) **रॉबिन्स यांने अर्थशास्त्राने स्वरूप व महत्त्व हा ग्रंथ लिहिला.**
D) ॲडम स्मिथ यांनी अर्थशास्त्राची मुलतत्त्वे हा ग्रंथ लिहिला.

6) **जोड्या लावा.**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| A) राष्ट्राची संपत्ती | I) कौटिल्य |
| B) अर्थशास्त्राची मुलतत्त्वे | II) रॉबिन्स |
| C) अर्थशास्त्राचे स्वरूप व महत्त्व | III) ॲडम स्मिथ |
| D) अर्थशास्त्र | IV) मार्शल |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | **III** | **IV** | **II** | **I** |
| B) | IV | III | I | II |
| C) | IV | I | II | III |
| D) | IV | II | I | III |



7) **जोड्या लावा.**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| A) संपत्ती | I) केन्स |
| B) मानवी कल्याण | II) रॉबिन्स |
| C) दुर्मिळता | III) ॲडम स्मिथ |
| D) स्थूल विश्लेषण | IV) मार्शल |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | I | II | III | IV |
| B) | **III** | **IV** | **II** | **I** |
| C) | IV | III | II | I |
| D) | III | I | IV | II |

8) अर्थशास्त्र हे ............ आहे.
A) नैसर्गिकशास्त्र B) **सामाजिक शास्त्र**
C) शारिरीक शास्त्र D) नितीशास्त्र

9) ............. हे अर्थशास्त्राचे जनक आहेत.
A) रॉबिन्स B) मार्शल
C) **ॲडमस्मिथ** D) रिकार्डो

10) रॉबिन्सच्या अर्थशास्त्राची व्याख्या ही ........ आहे.
A) **दुर्मिळ प्रधान** B) संपत्ती प्रधान
C) कल्याणकारी D) वरील सर्व

11) ......... म्हणजे उपयोगितेची निर्मिती होय.
A) उत्पन्न B) उपभोग C) **उत्पादन** D) उपयोग

12) संपत्तीच्या आधारावर कोणत्या अर्थशास्त्रज्ञानी व्याख्या आहे?
A) पिगू B) मार्शल C) रॉबिन्स D) **ॲडम स्मिथ**

13) उपभोक्ता म्हणजे काय?
A) वस्तूची निर्मिती करणारा B) वस्तूची विक्री करणारा
C) **वस्तूचा उपभोग घेणारा** D) वस्तूची वाहतूक करणारा

14) खालीलपैकी कोणता घटक दुर्मिळ नाही.
A) जमिन B) जंगल
C) खाणी D) **सुर्य प्रकाश**

15) अर्थशास्त्रात कोणत्या घटकाचा अभ्यास केला जात नाही.
A) उत्पादन B) **शरीर रचना** C) विभाजन D) उपभोग

16) ………… हा ग्रंथ कौटिल्याने लिहिला आहे.
A) **अर्थशास्त्र** B) राष्ट्रांची संपत्ती
C) अर्थशास्त्राची मुलतत्त्वे D) पैसा व रोजगार

17) ॲडमस्मिथच्या मते, अर्थशास्त्र हे …………. अभ्यास करणारे शास्त्र आहे.
A) दुर्मिळतेचा B) कल्याणाचा
C) **संपत्तीचा** D) विपूलतेचा

18) मानवी गरजा ………….. असतात.
A) **अमर्यादित** B) मर्यादित
C) अमर्यादित व मर्यादित D) पर्याप्त

19) अर्थशास्त्राची दुर्मिळतावादी व्याख्या कोणी मांडली?
A) ॲडम स्मिथ B) मार्शल C) **रॉबिन्स** D) कौटिल्य

20) अर्थशास्त्राचे स्वरूप कसे आहे.
A) राजकीय B) भौगोलिक C) **सामाजिक** D) नैसर्गिक

21) खालीलपैकी कोणत्या घटकांचा अभ्यास अर्थशास्त्रांत केला जात नाही.
A) मानवी कल्याण B) उत्पन्न आणि खर्च
C) आंतरराष्ट्रीय व्यापार D) **रासायनिक प्रक्रिया**

22) मानवासमोर आर्थिक प्रश्न कधी निर्माण होत नाही.
A) गरजांपेक्षा साधने जास्त असतात.
B) गरजांपेक्षा साधने कमी असतात.
C) **जेव्हा गरजा आणि साधने जास्त असतात.**
D) जेंव्हा गरजा आणि साधने कमी असतात.



23) कोणत्या अर्थशास्त्रज्ञाच्या मते कल्याणाचा अभ्यास अर्थशास्त्र करतो.
A) रॉबिन्स B) ॲडमस्मिथ
C) **मार्शल** D) रिकार्डो

24) राष्ट्रीय उत्पन्नांचा अभ्यास करण्यासाठी कोणत्या विश्लेषण पद्धतीचा वापर केला जातो?
A) सुक्ष्म B) भौमितीक
C) **स्थूल** D) सुक्ष्म व स्थूल

25) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| A) गिफेनचा विरोधाभास | I) कल्याणकारी अर्थशास्त्र |
| B) रॉबिन्स | II) मागणीचा अपवाद नियम |
| C) ॲडम स्मिथ | III) दुर्मिळता |
| D) मार्शल | IV) संपत्ती |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | II | I | III | IV |
| B) | **II** | **III** | **IV** | **I** |
| C) | III | II | I | IV |
| D) | II | III | I | IV |

26) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| A) अर्थशास्त्राची मुलतत्त्वे | I) 1929 |
| B) अर्थशास्त्राचे स्वरूप व महत्त्व | II) 1776 |
| C) राष्ट्राची संपत्ती | III) 1890 |
| D) जागतिक मंदी | IV) 1932 |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | II | IV | I | III |
| B) | III | II | IV | I |
| C) | IV | III | II | I |
| D) | **III** | **IV** | **II** | **I** |

27) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| A) गणनात्मक उपयोगिता दृष्टिकोन | I) हिक्स व ऐलन |
| B) समवृत्ती वक्र विश्लेषण | II) रॉबिन्स |
| C) संपत्तीचे विश्लेषण | III) ॲडम स्मिथ |
| D) दुर्मिळता | IV) डॉ. मार्शल |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | IV | III | I | II |
| **B)** | **IV** | **I** | **III** | **II** |
| C) | I | IV | III | II |
| D) | III | II | I | IV |

28) एखाद्या वस्तूमध्ये मानवी गरज पूर्ण करण्याची जी शक्ती असते. त्यास ........... असे म्हणतात.

A) उपभोग B) विनिमय C) वितरण D) **उपयोगिता**

29) उत्पादकाने तयार केलेली वस्तू उपभोक्त्यापर्यंत (बाजारपेठेपर्यंत) पाठवण्याची क्रिया म्हणजे ............ होय.

A) उत्पादन B) उत्पन्न C) **विनिमय** D) बचत

30) स्थुल अर्थशास्त्र विश्लेषण पद्धतीचा प्रभावीपणे वापर करण्याचे श्रेय ............. यांना दिले जाते.

A) **जे.एम.किन्स** B) मार्शल C) माल्थस D) पिगू

31) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| A) कल्याणकारी विचार | I) रॉबिन्स |
| B) संपत्तीविषयक विचार | II) गिफेन |
| C) दुर्मिळतावादी विचार | III) ॲडम स्मिथ |
| D) मागणी नियमाचे अपवाद | IV) मार्शल |



| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | IV | II | III | I |
| B) | **IV** | **III** | **I** | **II** |
| C) | II | III | I | IV |
| D) | IV | II | III | I |

32) खालीलपैकी कोणती वस्तू दुर्मिळ नाही?

A) पैसा B) सोने C) सिमेंट D) **सुर्यप्रकाश**

33) खालीलपैकी कोणत्या वस्तूमध्ये उपयोगिता आहे?

A) पाणी B) फळांचा रस C) दुध D) **वरीलसर्व**

34) मार्शल यांनी अर्थशास्त्रात.......... संकल्पनेचा उपयोग केला आहे.

A) **संख्यादर्शी** B) अनुभवदर्शी
C) क्रमदर्शी D) A व B दोन्ही

35) ........... हा अर्थशास्त्राचा जनक आहे.

A) रॉबिन्स B) **ॲडम स्मिथ** C) मार्शल D) पिगू

36) 'अर्थशास्त्राची मुलतत्त्वे' हा ग्रंथ ............. यांनी लिहिला.

A) **मार्शल** B) रॉबिन्स C) ॲडम स्मिथ D) जे.बी.से.

37) सुक्ष्म विश्लेषण पद्धती कोणी मांडली?

A) केन्स B) फिशर C) **रेग्नर फिश** D) रिकार्डो

38) उपयोगितेची निर्मिती करणे म्हणजे ............ होय.

A) उत्पन्न B) उपभोग C) **उत्पादन** D) उपयोग

39) ॲडम स्मिथ यांनी राष्ट्राची संपत्ती हा ग्रंथ.............यावर्षी लिहिला.

A) 1676 B) 1876 C) **1776** D) 1976

40) गिफेनचा विरोधाभास हा कोणत्या वस्तूच्या संबंधित आहे.

A) **हलक्या** B) महाग C) चैनिच्या D) वरीलपैकी नाही

41) अर्थशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे. कारण ...........

A) शारीरिक घटकांचा अभ्यास करते.

B) **मानवी वर्तनाचा अभ्यास करते.**

C) रासायनिक घटकाचा अभ्यास करते.

D) आर्थिक घटकाचा अभ्यास करत नाही

42) खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे.

A) मार्शल यांनी 'अर्थशास्त्राचे स्वरूप व महत्त्व' हा ग्रंथ लिहिला.

B) **ॲडम स्मिथ यांनी Wealth of Nation हा ग्रंथ लिहिला.**

C) रॉबिन्स यानी 'अर्थशास्त्राचे मुलतत्त्वे' हा ग्रंथ लिहिला.

D) वरीलपैकी नाही.

43) सुक्ष्म अर्थशास्त्रात खालील घटकाचा समावेश होत नाही.

A) वैयक्तिक पुरवठा B) वैयक्तिक मागणी

C) **राष्ट्रीय उत्पन्न** D) वैयक्तिक उपभोग

44) एकूण उत्पन्न खर्च पद्धत खालील मोजमापाची पद्धत आहे.

A) **मागणीची लवचिकता** B) समवृत्ती वक्र

C) पुरवठ्याची लवचिकता D) उपयोगिता

45) D = f (P) हे फलन आहे.

A) पुरवठा B) **मागणी** C) उपयोगिता D) उत्पन्न

46) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| A) गरजा | I) मर्यादित |
| B) साधने | II) खरेदी शक्ती |
| C) मागणी | III) अमर्याद |
| D) पुरवठा | IV) वस्तूचा साठा |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | IV | II | I | III |
| B) | III | IV | I | IV |
| C) | III | IV | I | II |
| **D)** | **III** | **I** | **II** | **IV** |



47) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| A) शून्य लवचिक मागणी | I) मागणीची लवचिकता एकपेक्षा कमी |
| B) एकक लवचिक मागणी | II) मागणीची लवचिकता एकपेक्षा जास्त |
| C) जास्त लवचिक मागणी | III) संपूर्ण अलवचिक मागणी |
| D) कमी लवचिक मागणी | IV) मागणीची लवचिकता एक |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | I | II | IV | III |
| B) | IV | II | III | I |
| **C)** | **III** | **IV** | **II** | **I** |
| D) | III | I | IV | I |

48) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| A) गॉसन | I) मागणीचा सिद्धांत |
| B) लार्ड केन्स | II) समवृत्ती वक्र |
| C) हिक्स व ऐलन | III) स्थूल अर्थशास्त्र पद्धती |
| D) मार्शल | IV) सिमांत उपयोगिता सिद्धांत |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | I | II | III | IV |
| B) | IV | III | II | I |
| C) | III | II | I | IV |
| **D)** | **IV** | **III** | **II** | **I** |

49) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| A) किंमत लवचिकता | I) खर्चातील बदलामुळे मागणीतील बदल |
| B) उत्पन्न लवचिकता | II) उत्पन्नातील बदलामुळे मागणीतील बदल |
| C) तिरकस लवचिकता | III) किंमतीतील बदलामुळे मागणीतील बदल |
| D) खर्च पद्धत | IV) X वस्तूच्या किंमतातील बदलामुळे Y वस्तूच्या मागणीतील बदल |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | IV | II | III | I |
| B) | II | I | III | IV |
| C) | III | II | I | IV |
| D) | **III** | **II** | **IV** | **I** |

50) मागणीचा सिद्धांत यांनी मांडला.
A) **मार्शल** B) रॉबिन्स C) ॲडमस्मिथ D) पिगू

51) पुरवठा वक्राचा आकार .......... असतो.
A) ऋण B) X - अक्षांस समांत्तर
C) **धन** D) ऋण-धन

52) जर मागणीवक्र Y अक्षाला समांत्तर असेल तर मागणीचा लवचिकता........ असते.
A) संपूर्ण लवचिक B) **संपूर्ण अलवचिक (ताठर)**
C) जास्त लवचिक D) कमी लवचिक

53) पुरवठा हा .......... यावर अवलंबून असतो.
A) **किंमत** B) मागणी C) उत्पादन D) बाजार



54) ........... वस्तूसंदर्भात गिफेनचा विरोधाभास आहे.
A) महाग B) **हलक्या** C) चैनिच्या D) हलक्या व महाग

55) मागणी वक्राचा आकार कसा असतो.
A) धनात्मक
B) **ऋणात्मक**
C) Y-अक्षास समात्तर
D) X-अक्षास समात्तर (वरूण खाली येणारा)

56) वस्तूची मागणी करताना उपभोक्ता कोणत्या गोष्टीचा विचार करतो.
A) **किंमत व उपयोगिता** B) किमत व मागणी
C) किंमत व पुरवठा D) वरील नाही

57) जीवनावश्यक वस्तूची मागणी कशी असते.
A) लवचिक B) जास्त लवचिक
C) **ताठर** D) पूर्ण लवचिक

58) खालीलपैकी कोणते वाक्य चुकीचे आहे.
A) मागणी व किंमत यांचा व्यक्त संबंध आहे.
B) किंमत व पुरवठा यांचा समाज संबंध आहे.
C) **किंमत व मागणी यांचा समान संबंध आहे.**
D) मागणी किंमतीवर अवलंबून असते.

59) मागणी वक्राचा आकार ............ असतो.
A) **डावीकडून उजवीकडेखाली येणारा**
B) उभ्या अक्षास समांत्तर
C) आडव्या अक्षास समांत्तर
D) डावीकडून उजवीकडे वर जाणारा

60) मागणी वक्राचा उतार ऋण स्वरूपाचा असतो, कारण......
A) मागणी व किंमत एकाच दिशेने बदलतात.
B) **मागणी व किंमत परस्पर विरोधी बदलतात.**
C) मागणी व किंमत स्थिर असते.
D) मागणी व किंमत वाढ होते.

61) खालीलपैकी कोणत्या सुत्राने मागणीची लवचिकता मोजली जाते.

A) $\frac{\textbf{मागणीतील शेकडा बदल}}{\textbf{किंमतीतील शेकडा बदल}}$

B) $\frac{\text{किंमतीतील शेकडा बदल}}{\text{मागणीतील शेकडा बदल}}$

C) $\frac{\text{किंमतीतील बदल}}{\text{मागणीतील बदल}}$

D) वरीलपैकी नाही.

62) पुरवठा वक्राचा आकार ............. असतो.

A) **डावीकडून उजवीकडे वर जाणारा (धनात्मक)**

B) डावीकडून उजवीकडे खाली येणारा

C) उभ्या अक्षांस समांत्तर

D) आडव्या अक्षांस समांत्तर

63) पुरवठा आणि किंमत यांच्यात कोणत्या स्वरूपाचा संबंध असते.

A) व्यस्त B) **सम** C) व्यस्त व सम D) संबंध नाही

64) किंमत व पुरवठा यांच्यात कोणत्या स्वरूपाचा संबंध

A) व्यस्त B) **सम** C) व्यस्त व सम D) संबंध नाही

65) जर मागणीवक्र 'क्ष' अक्षाला समांत्तर असेल तर मागणीची लवचिक ............ असते.

A) **संपूर्ण लवचिक** B) संपूर्ण अलवचिक

C) जास्त लवचिक D) कमी लवचिक

66) वस्तूच्या मागणीतील बदल व किंमतीतील बदलाचे प्रमाण जर सारखे असेल तर मागणीतील लवचिकता ............. असते.

A) **एकक** B) एकपेक्षा कमी

C) एकपेक्षा जास्त D) वरीलपैकी नाही

67) कोणत्या वस्तूची मागणी ताठर (अलवचिक) असते?

A) चैनिच्या B) **जीवनावश्यक** C) पर्यायी D) पूरक



68) वस्तूची किंमत वाढत असतांना मागणी .........

A) वाढते B) **घटते**

C) वाढ आणि घट D) स्थिर राहते.

69) हलक्या प्रतिच्या वस्तूच्या बाबतीत मागणीची उत्पन्न लवचिकता कशी असते.

A) धनात्मक B) शून्य C) **ऋणात्मक** D) अनंत

70) मागणी केव्हा पूर्ण होते?

A) वस्तू खरेदीची इच्छा असणे.

B) वस्तू खरेदी करण्यासाठी लागणारा पैसा जवळ असणे.

C) पैसा खर्च करण्याची तयारी असणे.

D) **वरीलपैकी सर्व**

71) जर मागणीतील बदलाचे प्रमाण 50% व किंमतीतील बदलाचे प्रमाण 50% असेल तर मागणीची किंमत लवचिकता........ असते.

A) एकपेक्षा जास्त B) एकपेक्षा कमी

C) **एकक** D) वरीलपैकी नाही.

72) पुरवठा वक्र म्हणजे दोन घटकांचा संबंध

A) पुरवठा व मागणी B) **पुरवठा व किंमत**

C) पुरवठा व उत्पादन D) पुरवठा व बाजारपेठ

73) खालीलपैकी मागणीचे फलन कोणते आहे?

A) D=f(P.Y) B) D=f(Y)

C) **D=f(P)** D) D=f(P.Y.C)

74) अलवचिक मागणी काय आहे?

A) बदलणारी मागणी B) **स्थिर राहणारी मागणी**

C) A व B दोन्ही D) A व B दोन्ही नाही

75) गिफेनचा विरोधाभास हा ............. शी संबंधीत आहे.

A) **हलक्या प्रतिच्या वस्तू** B) चैनीच्या वस्तू

C) दुर्मिळ वस्तू D) उच्च प्रतिच्या वस्तू

76) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| A) मागणीचा नियम | I) किंमत व पुरवठा सम संबंध |
| B) पुरवठ्याचा नियम | II) किंमत रेषा |
| C) मागणीची लवचिकता | III) मागणी व किंमत यांचा व्यस्त संबंध |
| D) उत्पन्न रेषा | IV) मागणी व किमतीतील शेकडा बदल |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | IV | I | II | III |
| B) | III | II | I | IV |
| **C)** | **III** | **II** | **II** | **IV** |
| D) | III | I | IV | II |

77) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| A) सुक्ष्म अर्थशास्त्र | I) राष्ट्रीय उत्पन्न |
| B) स्थूल विश्लेषण | II) मागणी व किंमत व्यस्त संबंध |
| C) मागणीचा नियम | III) दरडोई उत्पन्न |
| D) समवृत्ती वक्र | IV) उपभोक्त्याचे संतुलन |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| **A)** | **III** | **I** | **II** | **IV** |
| B) | III | I | IV | II |
| C) | I | III | IV | II |
| D) | III | II | I | IV |

78) किंमत परिणाम = उत्पन्न परिणाम + ...........

A) उपभोग परिणाम  B) खर्च परिणाम

C) **पर्यायता परिणाम**  D) उत्पादन परिणाम



79) उपभोक्त्याचे संतुलन कोणत्या बिंदूला होते.

A) किंमत रेषा आणि समवृत्ती वक्र छेदन बिंदू

B) **किंमत रेषा आणि समवृत्ती वक्र स्पर्श बिंदू**

C) किंमत रेषेच्या आत  D) किंमत रेषेच्या बाहेर

80) उपभोक्त्याच्या उत्पन्नात वाढ झाल्यास ..........

A) **किंमत रेषा वरच्या बाजूस सरकते.**

B) किंमत रेषा खालच्या बाजूस सरकते.

C) किंमत रेषा बदल होत नाही.

D) वरीलपैकी नाही.

81) किंमत परिणाम म्हणजे ......... चा एकत्रिम परिणाम होय.

A) **उत्पन्न परिणाम आणि पर्यायता परिणाम**

B) मौद्रीक उत्पन्न आणि पर्यायता परिणाम

C) उत्पन्नातील वाढ आणि पर्यायता परिणाम

D) वरीलपैकी नाही

82) खालील घटकामुळे आर्थिक प्रश्न निर्माण होत नाही.

A) मर्यादित साधने  B) **अमर्याद साधने**

C) अमर्याद गरजा  D) पर्यायी उपयोगाची साधने

83) किंमत लवचिकतेचा खालीलपैकी कोणता प्रकार नाही?

A) **पर्यायता लवचिकता**  B) एकक लवचिकता

C) संपूर्ण लवचिकता  D) संपूर्ण लवचिकता

84) खालीलपैकी कोणता प्रकार मागणीच्या लवचिंतेचा नाही?

A) किंमत लवचिकता  B) उत्पन्न लवचिकता

C) **बदलती लवचिकता**  D) छेदक लवचिकता

85) उपभोक्त्याची मागणी मुख्यत्त्वे............ घटकावर अवलंबून आहे.

A) **किंमत आणि उपयोगिता**  B) किंमत व पुरवठा

C) किंमत आणि मागणी  D) वरील सर्व

86) किंमत व पुरवठा यांच्यात ........... संबंध आहे.

A) **सम** B) विरुद्ध

C) सम व विरुद्ध D) वरीलपैकी नाही.

87) मागणी ............. वर अवलंबून आहे.

A) **किंमत** B) पुरवठा C) उत्पादन D) बाजारपेठ

88) किंमत लवचिकता म्हणजे ..........

A) उत्पन्नामुळे मागणीत होणारा बदल.

B) **किंमतीमुळे मागणीत होणारा बदल.**

C) पर्यायी वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या बदलामुळे मागणीत होणारा बदल.

D) वस्तूच्या आवडीमुळे मागणीत होणारा बदल

89) पुरवठा वक्राचा आकार .......... असतो.

A) ऋण B) X-अक्षास समांत्तर

C) **धन** D) ऋण व धन

90) मागणीचा नियम ............ यांनी मांडला.

A) **मार्शल** B) रॉबर्टसन C) रॉबिन्स D) पिगू

91) मागणीच्या लवचिकता मोजण्याची कोणती पद्धत नाही.

A) प्रमाण पद्धत B) भौमितीक पद्धत

C) **उपभोग पद्धत** D) खर्चपद्धत

92) लवचिकता निर्धारित करणारा कोणता घटक आहे?

A) किमत पातळी B) सवयी व प्रथा

C) वस्तूचा टिकावूपणा D) **वरील सर्व**

93) उपभोक्त्याचे संतोषाधिक्य ही संकल्पना..........यांनी विकसित केली.

A) ॲडमस्मिथ B) माल्थस C) **मार्शल** D) पिगू

94) उपभोक्त्यांचे संतोषाधिक्य ही संकल्पना कशावर आधारित आहे.

A) **मागणी सिद्धांत** B) पुरवठा

C) किंमत D) वरीलसर्व



95) कोणते वैशिष्ट्ये समवृत्ती वक्राचे नाही?

A) O बिंदूशी बहिर्गोल

B) परस्परांना छेदत नाहीत.

C) भिन्न बिंदूपासून मिळणारे समाधान सारखे असते.

D) **परस्परांना छेदतात.**

96) एकूण उपयोगिता सर्वात जास्त असते तेव्हा सिमांत उपयोगिता खालील असते.

A) **शुन्य** B) ऋणात्मक

C) जास्त D)एकूण उपयोगिता

97) रेग्नर फ्रिश यांनी खालील पद्धती मांडली.

A) **स्थूल** B) गणितीय C) भौमितिक D) सुक्ष्म

98) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| A) गासेन | I) मागणीचा सिद्धांत |
| B) लार्ड केन्स | II) समवृत्ती वक्र |
| C) हिक्स व अैलन | III) स्थूल अर्थशास्त्रीय पद्धत |
| D) मार्शल | IV) सिमांत उपयोगिता सिद्धांत |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | I | II | III | I |
| B) | IV | III | II | I |
| C) | III | II | I | IV |
| D) | **IV** | **III** | **II** | **I** |

99) घटती सिमांत उपयोगिता म्हणजे ................

A) पहिल्या नगापासून मिळणारी उपयोगिता.

B) मधल्या नगापासून मिळणारी उपयोगिता

C) सर्व नगापासून मिळणारी उपयोगिता

D) **शेवटच्या नगापासून मिळणारी उपयोगिता.**

100) समवृत्ती वक्र 'O' बिंदूशी कसा असतो?

A) अंतर्गोल B) **बहिर्गोल**

C) OY अक्षास समात्तर D) OY अक्षास समांत्तर

101) एका उद्योग संस्थेचा अभ्यास ही .......... विश्लेषण पद्धती आहे.

A) स्थूल B) गणितीय C) **सुक्ष्म** D) भूमितीय

102) मागणी वक्राचा उतार ऋण असतो कारण ...........

A) मागणी व किंमत एकाच दिशेने बदलतात.

B) **मागणी व किंमत परस्पर विरोधी बदलतात.**

C) मागणी व किंमत स्थिर असते.

D) मागणी व किंमत वाढ होते.

103) समवृत्ती वक्रावरील संतुलन बिंदु .......... दर्शवितो.

A) समान खर्च B) समान संख्या

C) महत्तम समाधान D) **वरीलपैकी नाही.**

104) समवृत्ती वक्राचा उतार ........... असतो.

A) ऋणात्मक B) **आरंभ बिंदुशी बहिर्गोल**

C) 'अ' अक्षांसी समांत्तर D) 'य' अक्षांशी समांत्तर

105) सिमांत उपयोगिता जेव्हा शून्य असते. तेव्हा एकूण उपयोगिता कशी असते.

A) सर्वात कमी B) शून्य C) ऋण D) **सर्वात जास्त**

106) समवृत्ती वक्रावर उपभोक्त्याचे संतुलन कोणत्या बिंदूवर होते

A) किंमत रेषा आणि समवृत्ती वक्र एकमेकांना ज्या ठिकाणी छेदतात.

B) **ज्या ठिकाणी किंमतरेषा व समवृत्ती वक्र एकमेकांना स्पर्श करतात.**

C) समवृत्ती वक्र 'अ' अक्षाला ज्याठिकाणी स्पर्श करतो.

D) वरीलपैकी नाही.

107) उत्पन्नात वाढ झाल्यामुळे किंमत रेषेमध्ये कोणता बदल होतो.

A) दोन्ही अक्षाकडील टोक पुढे सरकते

B) केवळ 'अ' अक्षाकडील टोक पुढे सरकते.

C) **केवळ 'य' अक्षाकडील टोक पुढे सरकते.**

D) किंमत रेषेत बदल होत नाही.

108) दोन समवृत्ती वक्र परस्परांना छेदतात काय?

A) होय B) **नाही** C) कधी-कधी D) वरीलपैकी नाही

109) ज्या बिंदुला उपभोक्त्याचे संतुलन होते तेथे उपभोक्त्याला ............ समाधान होते.

A) सर्वात कमी B) साधारण

C) **महत्तम** D) वरील नाही

110) उपभोक्त्याच्या नगसंख्येबरोबर घटत जाणारी उपयोगिता म्हणजे .........

A) **सिमांत उपयोगिता** B) एकूण उपयोगिता

C) सरासरी उपयोगिता D) ऋणात्मक उपयोगिता

111) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| A) गणनात्मक उपयोगिता | I) हिक्स व अॅलन |
| B) समवृत्ती वक्र विश्लेषण | II) रॉबिन्स |
| C) संपत्तीचे विश्लेषण | III) अॅडमस्मिथ |
| D) दुर्मिळता | IV) डॉ. मार्शल |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | IV | III | I | II |
| **B)** | **IV** | **I** | **III** | **II** |
| C) | I | IV | III | II |
| D) | III | II | I | IV |

112) समवृत्ती वक्राचे विश्लेषण .......... वर आधारित आहे.

A) **क्रमदर्शी** B) संख्यात्मक

C) उपयोगदर्शी D) वरीलपैकी नाही

113) किंमत परिणाम = उत्पन्न परिणाम + .............

A) उत्पन्न परिणाम B) मागणी परिणाम

C) **पर्यायता परिणाम** D) वरीलपैकी नाही

114) समवर्ती वक्राची सर्वप्रथम मांडणी ............ याने केली.

A) **एजवर्थ** B) फिशर C) केन्स D) गिफेन्स

115) समवृत्ती वक्र 'O' बिंदूसी कसा असतो?

A) आंतरगोल B) **बहिर्गोल**

C) OX - अक्षास समांत्तर D) OY समांत्तर

116) खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?

A) **समवृत्ती वक्राचा आकार ऋण असतो.**

B) समवृत्ती वक्राचा आकार धन असते.

C) समवृत्ती वक्राचा आकार OX अक्षाला समांत्तर असतो.

D) समवृत्ती वक्राचा आकार OY अक्षाला समांत्तर असतो.

117) उत्पन्न परिणाम विश्लेषण करतो.

A) उत्पन्नात बदल झाल्यामुळे मागणीत होणारा बदल

B) उत्पन्नातील बदलामुळे पुरवठ्यात होणारा बदल.

C) मागणीत बदल झाल्यामुळे पुरवठ्यात होणाऱ्या बदल.

D) **उत्पन्नात बदल झाल्यामुळे उपभोक्त्याच्या संतुलनात होणारा बदल.**

118) खालीलपैकी कोणते विधान समवृत्ती वक्राचे योग्य नाही?

A) 'ओ' बिंदूशी अंतरगोल असतो.

B) परस्परांना छेदत नाही.

C) एकाच समवृत्ती वक्रावरील भिन्न बिंदू वरील समाधान सारखे असते.

D) **'ओ' बिंदूशी वक्र जसजसा दूर जातो तसे समाधान कमी होते.**

119) मागणीत नियमाचे खालीलपैकी कोणते गृहित नाही.

A) उपभोक्त्याच्या आवडी-निवडी स्थिर असतात.

B) उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर असते.

C) पर्यायी वस्तूच्या किंमती स्थिर असतात.

D) **गिफेन वस्तू**



120) वस्तूमध्ये मानवी गरज पूर्ण करण्याची जी शक्ती असते. त्यास ........ म्हणतात.

A) उत्पादकता B) **उपयोगिता** C) विनिमय D) वरील सर्व

121) दोन भिन्न वस्तू पासून मिळणारे समाधान कोणत्या वक्रावर दर्शविले जाते.

A) घटता उपयोगिता वक्र B) **समवृत्ती वक्र**

C) मागणी वक्र D) पुरवठा वक्र

122) एकूण उपयोगिता सर्वात जास्त असते तेंव्हा सिमांत उपयोगिता ....... असते.

A) धन B) ऋण C) **शून्य** D) स्थिर

123) डॉ. मार्शल यांचा दृष्टिकोन खालील घटकांवर आधारित आहे.

A) सिमांत B) गुणवाचक

C) **संख्यात्मक** D) क्रमवाचक

124) समवृत्ती वक्र ही संकल्पना कोणत्या अर्थशास्त्रज्ञांनी मांडली.

A) डॉ. मार्शल B) ॲडमस्मिथ C) प्रा.रॉबिन्स D) **प्रा.हिक्स**

125) कोणत्या घटकाच्या वाढीबरोबर उपयोगिता सतत वाढत जाते.

A) उत्पादन B) किंमत C) **उपभोग** D) पुरवठा

126) एकूण उपयोगिता म्हणजे ...........

A) एका नगाची बेरीज B) **सर्व नगांची बेरीज**

C) सिमांत नगाची बेरीज D) वरील सर्व

127) उपभोक्त्याचे संतूलन खालीलपैकी कोणत्या बिंदूला होते?

A) ज्या ठिकाणी किंमत रेषा समवृत्ती वक्राला छेदते.

B) **ज्या ठिकाणी किंमत रेषा समवृत्ती वक्राला स्पर्श करते.**

C) 'X' अक्षाला समवृत्ती वक्र छेदतो.

D) 'Y' अक्षाला समवृत्ती वक्र छेदतो.

128) समवृत्ती वक्र आरंभ बिंदूला बहिर्गोल असतो, कारण ..........

A) सिमांत पर्यायता दर वाढत जातो.

B) **सिमांत पर्यायता वर घटत जातो.**

C) सिमांत पर्यायता दर स्थिर राहतो.

D) यापैकी नाही

129) उपयोगिता हे माप उपयोगिता मोजण्यासाठी कोणत्या अर्थशास्त्रज्ञाने मांडले.

A) ॲडमस्मिथ B) प्रा.हिक्स

C) **मार्शल** D) लॉर्ड केन्स

130) शून्य उपयोगिता असताना नगसंख्येत वाढ केली असता उपयोगिता वक्र ............ होतो.

A) धन B) **ऋण**

C) OX अक्षाला समांत्तर D) स्थिर

131) किंमत रेषा काय दर्शविते.

A) व्यक्तीची समाधानाची पातळी

B) **व्यक्तीची उपभोगाची पातळी**

C) व्यक्तीची उत्पादनाची पातळी

D) वस्तूची किंमत पातळी

132) उत्पन्नामध्ये वाढ झाल्यामुळे किंमत रेषेत कोणता बदल होतो.

A) X अक्षाकडील टोक पुढे सरकते

B)दोन्ही अक्षावरील टोक स्थिर राहते.

C) Y अक्षाकडील टोक पुढे सरकते.

D) **दोन्ही अक्षांवरील टोक पुढे सरकते.**

133) एकूण उपयोगिता ............ दराने वाढते.

A) वाढत्या B) **घटत्या** C) स्थिर D) प्रमाणशील

134) कोणत्या परिणामामुळे उपभोगता एकाच समवृत्ती वक्रावर स्थिर राहतो.

A) उत्पन्न परिणाम B) किंमत परिणाम

C) **पर्यायता परिणाम** D) उत्पादन परिणाम

135) नगसंख्येत वाढ झाली असता कोणत्या उपयोगितेमध्ये घट होत जाते.

A) सिमांत उपयोगिता B) एकूण उपयोगिता

C) **सरासरी उपयोगिता** D) यापैकी नाही.



136) खालीलपैकी कोणते समवृत्ती वक्राचे वैशिष्ट्ये नाही.

A) समवृत्ती वक्र एकमेकांना स्पर्श करत नाहीत.

B) **तटस्थता वक्र आरंभ बिंदूला आंतरगोल असतो.**

C) समवृत्ती वक्रावरील प्रत्येक बिंदू समान समाधान दर्शवितो.

D) समवृत्ती वक्र अक्षाला छेदत नाही.

137) तटस्थता वक्राला आकार कसा असतो.

A) धनात्मक B) **ऋणात्मक**

C) जद अक्षांला समात्तर D) जध अक्षाला समांत्तर

138) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| A) संख्यात्मक उपयोगिता | I) शेवटच्या नगाची बेरीज |
| B) एकूण उपयोगिता | II) अंकातील बेरीज |
| C) गुणवाचक उपयोगिता | III) सर्वनगाची बेरीज |
| D) सिमांत उपयोगिता | IV) क्रमानुरुप उपयोगिता |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| A) | I | IV | III | II |
| **B)** | **II** | **III** | **IV** | **I** |
| C) | II | IV | III | II |
| D) | I | III | IV | II |

139) आरंभ बिंदूशी समवृत्ती वक्र कसा असतो.

A) आंतरगोल B) **बहिर्गोल** C) ऋण D) धन

140) उत्पन्न परिणामात संतुलनाच्या वेगवेगळ्या बिंदूला जोडणाऱ्या रेषेला काय म्हणतात.

A) किंमत उपभोग वक्र B) उत्पादन उपभोग वक्र

C) **उत्पन्न उपभोग वक्र** D) खर्च उपभोग वक्र

141) तटस्थता वक्राची संकल्पना सर्वप्रथम कोणी मांडली?

A) प्रा.हिक्स B) **प्रा.एजवर्थ** C) डॉ.मार्शल D) डॉ. सेन

142) समवृत्ती वक्रावरील प्रत्येक बिंदू काय दर्शवतो.
A) वेगवेगळे समाधान B) स्थिर समाधान
C) **समान समाधान** D) कमी समाधान

143) पहिल्या नगापासून मिळणारी उपयोगिता ...............
A) सर्वात कमी असते. B) **सर्वात जास्त असते.**
C) समान असते. D) घटत जाते.

144) तटस्थता वक्र ............. आहे.
A) क्रमवाचक B) गुणवाचक
C) उपभोक्त्याशी संबंधीत D) **वरील सर्व**

145) उपयोगिता .............. असते.
A) **व्यक्तीनिष्ठ** B) वस्तूनिष्ठ
C) किंमतधिष्ठीत D) मूल्यधिष्ठीत

146) किंमत परिणामामध्ये संतूलनाच्या वेगवेगळ्या बिंदूला जोडणाऱ्या रेषेला काय म्हणतात.
A) किंमत उत्पादन वक्र B) **किंमत उपभोग वक्र**
C) किंमत खर्च वक्र D) वरील सर्व

147) वस्तूच्या शेवटच्या नगापासून मिळणारी उपयोगिता .........
A) **सिमांत उपयोगिता** B) सरासरी उपयोगिता
C) एकूण उपयोगिता D) स्थिर उपयोगिता

148) समवृत्ती वक्र कोणाशी संबंधीत आहे.
A) उत्पादक B) **उपभोक्ते** C) विक्रेते D) वरील सर्व

149) खालीलपैकी कोणते घटत्या उपयोगितेच्या सिद्धांताचे गृहित नाही.
A) सुज्ञ ग्राहक B) एकजिन्सी वस्तू
C) **भिन्नकिंमत** D) बाजारपेठेचे ज्ञान

150) खालील अभ्यास विषय सुक्ष्म विश्लेषणात येत नाही.
A) **राष्ट्रीय उत्पन्न** B) उद्योग संस्था
C) मूल्य सिद्धांत D) भाववाढ



पर्याय : A) अ आणि क B) **अ आणि ड**
C) क आणि ड D) ब आणि ड

151) सरकारच्या खर्च व महसूल या बाबीचा अभ्यास कशामध्ये होतो?
A) राष्ट्रीय उत्पन्न B) **सार्वजनिक आय-व्यय**
C) कल्याणकारी अर्थशास्त्र D) राज्यशास्त्र

152) मानवी कल्याणाच्या संबंधित अर्थशास्त्राची व्याख्या कोणी केली.
A) केन्स B) मेहता C) **पिगू** D) ॲडमस्मिथ

153) सुक्ष्म व स्थूल विश्लेषण अशी विभागणी करणारा पहिला अर्थतज्ञ
A) प्रो. फिशर B) प्रो. पिगू
C) **रेगनर फिश** D) मार्शल

154) तिरकस लवचिकता -
A) **चहा-कॉफी** B) पेन-शाई C) दुध=चहा D) पॅन्ट-शर्ट

155) मागणीच्या लवचिकतेची संकल्पना यांनी मांडली.
A) फिशर B) केन्स C) रॉबिन्स D) **मार्शल**

156) वस्तूच्या किंमतीत अल्पशा बदलाने मागणीत मोठी वाढ होत असेल तर त्या वस्तूची मागणी ........... असते.
A) **संपूर्ण लवचिकत** B) संपूर्ण अलवचिक
C) कमी लवचिक D) अपूर्ण लवचिक

157) उपयोगितेचा सिद्धांत ........... नियमाचा आधार आहे.
A) **मागणी** B) पुरवठा C) दोन्ही D) उत्पादन

158) किंमत परिवर्तनामुळे जे नवीन संतूलन बिंदू मिळतात त्यांना जोडणाऱ्या रेषला ............ म्हणतात.
A) उत्पन्न उपभोग वक्र म्हणतात. B) किंमत खर्च वक्र
C) **किंमत उपभोग वक्र** D) किंमत व वक्ररेषा

159) भौतिक वस्तूची निर्मिती .............. होय.
A) **उत्पादन** B) उपभोग C) वितरण D) वरील नाही

160) उपयोगितेची निर्मिती म्हणजे ..............
A) उपभोग B) **उत्पादन** C) विनिमय D) वरीलपैकी नाही

161) वस्तू व सेवांच्या विनिमयार्थ केलेली क्रिया म्हणजे -

A) **उत्पादन** B) वितरण C) विनिमय D) वरील नाही

162) ज्या वस्तूत ........... मूल्य आणि ........... मूल्य आहे त्या सर्व वस्तूच्या निर्मितीला उत्पादन म्हणतात.

A) उत्पादन आणि विनिमय B) विनिमय आणि वितरण

C) **उपयोगिता आणि विनिमय** D) वरीलपैकी नाही

163) भांडवल आणि संयोजक हे घटक ......... निर्मित आहेत.

A) **मानवनिर्मित** B) निसर्गनिर्मित

C) अनुभवनिर्मित D) वरीलपैकी नाही

164) उत्पादनाचे घटक किती आहेत

A) दोन B) तीन C) **चार** D) अनंत

165) कार्लमार्क्सचा सिद्धांत ...............

A) **अतिरिक्त मूल्य सिद्धांत** B) उत्पादन सिद्धांत

C) सिमांत उत्पादकतेचा सिद्धांत D) वरीलपैकी नाही

166) उत्पादन घटकांच्या मात्रा आणि उत्पादनाच्या मात्रा यातील फलनात्मक संबंधाला ............ म्हणतात.

A) फलन B) उत्पादन C) **उत्पादन फलन** D) सर्व

167) उत्पादन फलाचे सुत्र ...............

**A) P = f (a, b, c, d...n)** B) P = f (D)

C) D = f (Y) D) P = f (D)

168) उत्पादन फलन = $\frac{\text{एकूण उत्पादित वस्तूंची राशी}}{\text{एकूण उत्पादन घटकाची राशी}}$

169) स्थिर घटकांत ............. चा समावेश होतो.

A) **इमारत** B) हंगामी कामगार C) कच्चामाल D) सर्व

170) बदलत्या घटकांत ........... चा समावेश होतो.

A) हंगामी कामगार B) कच्चामाल

C) इंधन D) **वरील सर्व**



171) बदलत्या प्रमाणाच्या नियमाचे गृहित ...........

A) सर्व नगाची कार्यक्षमता सारखीच असते.

B) पूर्ण स्पर्धेच्या गृहितावर आधारित

C) सर्व बदलते घटक एकजिन्सी आहेत

D) **वरील सर्व**

172) ........... काळाचा विचार करून बदलत्या प्रमाणाच्या नियमाचे स्पष्टीकरण करण्यात आले.

A) **अल्पकाळ** B) दिर्घकाळ

C) अतिअल्पकाळ D) वरील नाही

173) बदलत्या प्रमाणाचा नियम अनुभवास येणाऱ्यासाठी उत्पादन घटकाचा पुरवठा ............ असतो.

A) लवचिक B) **ताठर** C) अति लवचिक D) नाही

174) उत्पादनाचा प्रमाण फलाचा नियम..........काळात लागू केला जातो.

A) **दिर्घकाळ** B) अल्पकाळ

C) अतिअल्प D) वरील नाही

175) दीर्घकाळात उत्पादनाचे सर्वच घटक .......... असतात.

A) **बदलणारे** B) स्थिर C) चल D) वरीलपैकी नाही

176) अंतर्गत बचतीचे प्रकार

A) वित्तिय काटकसर B) तांत्रिक काटकसर

C) व्यवस्थापकीय काटकसर D) **वरील सर्व**

177) बाह्य बचतीचे फायदे ...........

A) विशेषीकरणाचे फायदे B) संशोधनाचे फायदे

C) दळणवळण सोयीत वाढ D) **वरील सर्व**

178) मार्शलच्या मते - एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठी समाजातील व्यक्तीना जो त्याज जे प्रयत्न करावे लागतात त्याला ............ खर्च म्हणतात.

A) उत्पादन खर्च B) **वास्तविक खर्च**

C) वैकल्पित खर्च D) वरील नाही

179) उत्पादन संस्थेला एखाद्या वस्तूचे उत्पादन करावयाचे झाल्यास पैशाच्या स्वरूपात जो खर्च येतो या खर्चाला ........... खर्च म्हणतात.

A) वास्तविक खर्च B) **पैशातील खर्च**

C) वयक्तिक खर्च D) वरील नाही

180) उत्पादनात जस-जसी वाढ होते तस-तसा सरासरी स्थिर खर्च ....... होत जातो.

A) **कमी** B) जास्त C) अति अल्प D) वरीलपैकी नाही

181) .......... म्हणजे वेगवेगळ्या किंमतीचा निरनिराळ्या प्रकारच्या वस्तूच्या नगाची विक्री करून मिळालेली मिळकत होय.

A) उत्पादन B) **उत्पन्न** C) बचत D) गुंतवणूक

182) एकूण उत्पन्न = ...............द वस्तूची एकूण नगसंख्या

A) वस्तूचा पुरवठा B) **वस्तूची किंमत**

C) वस्तूची मागणी D) वरीलपैकी नाही

183) उत्पादित वस्तूच्या शेवटच्या नगापासून मिळणारे उत्पन्न म्हणजे ........ उत्पन्न होय.

A) **सिमांत** B) सरासरी C) एकूण D) वरील नाही

184) एकूण उत्पन्नाला विकल्या गेलेल्या वस्तूच्या नगसंख्येने भागून मिळणारे उत्पन्न म्हणजे ........... उत्पन्न होय.

A) एकूण उत्पन्न B) **सरासरी उत्पन्न**

C) सिमांत उत्पन्न D)वरील नाही

185) पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत वस्तू ............. असतात.

A) **एकजिन्सी** B) वेगवेगळ्या

C) भिन्न प्रकारच्या D) वरीलसर्व

186) पूर्ण स्पर्धेच्या बाजारात ............. ग्राहक व विक्रेते असतात.

A) **असंख्य** B) कमी C) अती कमी D) वरील नाही

187) कोणत्या बाजारात एकच विक्रेता आणि असंख्य ग्राहक असतात.

A) पूर्ण स्पर्धा B) अपूर्ण स्पर्धा C) **मक्तेदारी** D) सर्व



188) अपूर्ण स्पर्धेमध्ये विक्रेत्याचे .......... नियंत्रण असते.

A) **किंमतीवर** B) पुरवठ्यावर

C) मागणीवर D) वरील नाही

189) मक्तेदाराचे वस्तूच्या.........आणि .........वर पूर्ण नियंत्रण असते.

A) उत्पादन व किंमतीवर B) **पुरवठा व किंमत**

C) उत्पादन व किंमतीवर D) पुरवठा व किंमत

190) किंमत परिणामात उपभोक्त्याचे उत्पन्न.........

A) **स्थिर** B) बदलते C) घटते D) वाढते

191) किंमतीतील बदलामुळे वस्तूच्या खरेदीत जो परिणाम होतो त्यास......

A) उत्पन्न परिणाम B) **किंमत परिणाम**

C) पर्यायता परिणाम D) लवचिकता परिणाम

192) घटती सिमांत उपयोगिता म्हणजे

A) पहिल्या नगापासून मिळणारी उपयोगिता

B) दुसऱ्या नगापासून मिळणारी उपयोगिता

C) **शेवटच्या नगापासून मिळणारी उपयोगिता**

D) सर्व नगापासून मिळणारी उपयोगिता

193) उपयोगितेची निर्मिती करणे .............. होय.

A) उत्पन्न B) उपभोग C) **उत्पादन** D) उपयोग

194) समवृत्ती वक्र एकमेकांस छेदतात का?

A) होय B) **नाही** C) कधी-कधी D) नेहमी

195) खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?

A) **एकूण उपयोगिता सर्वात जास्त असते, तेव्हा सिमांत उपयोगिता शून्य असते.**

B) एकूण उपयोगिता सर्वात जास्त असते, तेव्हा सिमांत उपयोगिता ऋणात्मक असते.

C) एकूण उपयोगिता सर्वात जास्त असते, तेंव्हा सिमांत उपयोगिता महत्तम असते.

D) एकूण उपयोगिता सर्वात जास्त असते तेव्हा सिमांत उपयोगिता बरोबर असते.

A) III B) II C) IV D) I

196) खालीलपैकी बरोबर विधान कोणते?

A) अती अल्पकाळात उत्पादनाचे सर्व घटक बदलते असतात.

B) अल्पकाळात उत्पादनाचे सर्व घटक बदलते असतात.

C) मध्यकाळात उत्पादनाचे सर्व घटक बदलते असतात.

D) **दीर्घकाळात उत्पादनाचे सर्व घटक बदलते असतात.**

197) चूकीचे विधान ओळखा.

A) मक्तेदारीत सिमांत उत्पन्न वक्र सरासरी उत्पन्न वक्राच्या खालच्या बाजूस असतो.

B) मक्तेदारीत सिमांत उत्पन्नात होणारी घट सरासरी उत्पन्नात होणाऱ्या घटीपेक्षा जास्त असते.

C) **मक्तेदारीत सिमांत उत्पन्न वक्र सरासरी उत्पन्न वक्राच्या वरच्या बाजूस असतो.**

D) मक्तेदारीत सरासरी उत्पन्न वक्र हा मागणी वक्र असतो.

198) पुढीलपैकी कोणती बहिर्गत अमीतव्ययता आहे?

A) संयोजकाचे उत्पादन यंत्रणेवरील नियंत्रण नाहिसे होते.

B) प्रशासन कार्यात अडचणी निर्माण होतात.

C) व्यवस्थापन कार्यात अडचणी निर्माण होतात.

D) **जमिनीच्या किंमती प्रचंड वाढतात.**

199) ॲडमस्मिथच्या मते, संपत्ती म्हणजे ............

A) सोने B) चांदी C) पैसा D) **वरील सर्व**

200) मार्शल याने Principals of Economics हा ग्रंथ कोणत्या वर्षी लिहिला?

A) 1776 B) **1890** C) 1892 D) 1992

201) खालील घटकामुळे आर्थिक प्रश्न निर्माण होत नाही?

A) अमर्यादित गरजा B) **अमर्यादित साधने**

C) साधनांचा पर्यायी उपयोग D) वरील सर्व



202) मागणीची व्याख्या कोणी मांडली?

A) बेनहॅम B) **मार्शल** C) बोल्डिंग D) नर्क्स

203) खालीलपैकी मागणीचे फलन कोणते आहे?

**A) D = f (P)** B) D = f (S)

C) D = f (M) D) D = f (C)

204) पुरवठा नियमात ............. घटक स्वतंत्र असतो.

A) मागणी B) साठा C) **किंमत** D) उत्पादन

205) किंमत परिणाम म्हणजे ........... चा एकत्रित परिणाम होय.

A) उत्पन्न आणि पर्यायता परिणाम

B) मौद्रीक उत्पन्न आणि पर्यायता परिणाम

C) **उत्पन्नातील वाढ आणि पर्यायता परिणाम**

D) वरीलपैकी नाही

206) मार्शल यांनी अर्थशास्त्रात...........संकल्पनेचा उपयोग केला आहे.

A) **संख्यादर्शी** B) अनुभवदर्शी

C) क्रमदर्शी D) वरीलपैकी नाही

207) ज्या बिंदुना उपभोक्त्याचे संतुलन होते तेथे उपभोक्त्याचे समाधान.

A) न्यूनतम B) साधारण

C) **महत्तम** D)वरीलपैकी नाही.

208) समवृत्ती वक्रावरील संतुलन बिंदु ............ दर्शवितो.

A) समान खर्च B) समान संख्या

C) **महत्तम समाधान** D) वरीलपैकी नाही

209) जेंव्हा एकूण उत्पादन सर्वाधिक असते, तेंव्हा सिमांत उत्पादन ......... असते.

A) ऋण B) **शुन्य** C) धन D) वरीलपैकी नाही

210) एकूण उत्पन्न = ----------

A) **किंमत × नगसंख्या** B) किंमत + नगसंख्या

C) किंमत ÷ नगसंख्या D) किंमत - नगसंख्या

211) सिमांत खर्च म्हणजे ---------

A) = एकूण खर्च ÷ उत्पादन

B) **एका घटकातील बदलामुळे एकूण उत्पादनात होणारा बदल.**

C) = एकूण उत्पादन ÷ नगसंख्या

D) एकूण उत्पादन घटकातील बदलामुळे एकूण खर्चात होणारा बदल.

212) उत्पादन फलन पुढीलप्रमाणे दर्शवितात.

A) $x$ = a, b, c, d B) $x$ = f (a, b, c)

C) $x$ = (a, b, c, d) D) **$x$ = f (a, b, c, d,....n)**

213) पूर्ण स्पर्धेतील सरासरी व सिमांत उत्पन्न वक्र ............ असतो.

A) **वरून खाली येणारा** B) खालून वर जाणारा

C) 'क्ष' अक्षास समांत्तर D) 'य' अक्षास समात्तर

214) उत्पादन प्रमाण फलाच्या .......... अवस्था आहेत.

A) दोन B) **तीन** C) चार D) पाच

215) स्थूल विश्लेषण पद्धती कोणी मांडली.

A) **केन्स** B) रेगनर फिश C) रिकार्डो D) फिशर

216) सुक्ष्म अर्थशास्त्रात खालीलपैकी कोणत्या घटकाचा अभ्यास होत नाही?

A) वैयक्तिक पुरवठा B) वैयक्तिक मागणी

C) **राष्ट्रीय उत्पन्न** D) वैयक्तिक उपभोग

217) खालीलपैकी कोणता घटक दुर्मिळ नाही?

A) जंगल B) जमीन C) **सुर्यप्रकाश** D) खाणी

218) वस्तूच्या अंगी गरज पूर्ण करण्याची शक्ती म्हणजे ............

A) उपभोग B) उत्पादन C) **उपयोगिता** D) उत्पन्न

219) खालीलपैकी कोणत्या वस्तूमध्ये उपयोगिता आहे?

A) पाणी B) फळांचा रस C) दूध D) **वरील सर्व**

220) खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

A) अर्थशास्त्रात मानवाच्या आर्थिक व्यवहाराचा अभ्यास केला जात नाही.



B) अर्थशास्त्रात मानवाच्या राजकीय व्यवहाराचा अभ्यास केला जात नाही.

C) **अर्थशास्त्रात मानवाच्या सामाजिक व्यवहाराचा अभ्यास केला जात नाही.**

D) अर्थशास्त्रात मानवाच्या सांस्कृतिक व्यवहाराचा अभ्यास केला जात नाही.

221) ............ विश्लेषण पद्धतीच्या सहाय्याने संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करता येतो.

A) सुक्ष्म B) **स्थूल** C) सुक्ष्म D) वरीलपैकी सर्व

222) ........... म्हणजे उत्पादकाने तयार केलेली वस्तू उपभोक्त्यापर्यंत पोहोचण्याची क्रिया होय.

A) उत्पादन B) वितरण C) उपभोग D) **विनिमय**

223) मंदीच्या काळात वस्तूची मागणी ............

A) वाढते B) **घटते** C) स्थिर राहते D) वरील सर्व

224) पुरवठा ......... घटक आहे.

A) स्वतंत्र B) **परावलंबी** C) स्थिर D) वरील नाही

225) मागणीच्या लवचिकतेचे एकूण ............. प्रकार आहेत.

A) दोन B) **तीन** C) चार D) पाच

226) '$x$' अक्षांस समांत्तर जाणाऱ्या मागणी वक्रास......मागणी व्रक असे म्हणतात.

A) **पूर्ण लवचिक मागणी वक्र**

B) पूर्ण अलवचिक मागणी वक्र

C) लवचिक मागणी वक्र

D) अलवचिक मागणी वक्र

227) किंमत देण्याची तयारी प्रत्यक्षात दिलेली किंमत = ------

A) **उपभोक्त्याचे लाभाधिक्य**

B) उत्पादकाचे लाभाधिक्य

C) विक्रेत्याचे लाभाधिक्य

D) जाहिरातदाराचे लाभाधिक्य

1) बाजारात १० ते १५ विक्रेते असतील तर ते बाजाराच्या ........... प्रकारात मोडतात.

A) मक्तेदारी B) **अल्पविक्रेताधिकार**

C) द्विविक्रेताधिकार D) यापैकी नाही

2) सर्व साधारण किंमत ........... ठरते.

A) मागणी पुरवठ्याचा अल्पकालीन समतोल

B) **मागणी पुरवठा दीर्घकालीन समतोल**

C) अल्पकालीन एकूण मागणी व एकूण पुरवठा समतोल

D) यापैकी नाही.

3) बाजारामध्ये अनेक विक्रेते व एकच ग्राहक असेल तर त्यास ......... म्हणतात.

A) मक्तेदारी B) **एक ग्राहकाधिकार**

C) द्विग्राहकाधिकार D) यापैकी नाही

4) सर्वसाधारण किंमत सरासरी खर्चापेक्षा जास्त असेल तर..........

A) **नफा होईल** B) तोटा होईल

C) उत्पादन खर्च भरून निघेल D) सर्व

5) मागणी पुरवठा यांच्या संयोगाने ............ ठरते.

A) उत्पादन किती करणे B) **किंमत**

C) उत्पादन D) यापैकी नाही

6) पूर्ण स्पर्धेत वस्तू .............. असतात.

A) **एकजिन्सी** B) वेगवेगळी

C) लवचिक D) यापैकी नाही

7) बाजार किंमतीवर पुरवठ्यापेक्षा ........... चा प्रभाव अधिक पडतो.

A) **मागणी** B) उत्पादक घटक

C) ग्राहक D) यापैकी नाही

8) The Economics of Iperfect Competitions हा ग्रंथ ......... यांनी लिहिला.

A) चेंबरलिन B) **जॉन रॉबिन्सन** C) श्राफा D) मार्शल



9) एकाद्या वस्तूचा एकच उत्पादक व एकच विक्रेता बाजारात असणे याला ........... म्हणतात.

A) **मक्तेदार** B) बाजार C) खरेदी-विक्री D) यापैकी नाही

10) ........... हे पूर्ण स्पर्धेचे वैशिष्ट्ये आहे.

A) एकच विक्रेता

B)एकच ग्राहक

C) **असंख्य ग्राहक व असंख्य विक्रेते**

D) एकच ग्राहक व एकच विक्रेता

11) ........... हे मक्तेदारीचे वैशिष्ट्ये आहेत.

A) एकच विक्रेता B) असंख्य ग्राहक

C) जाहिरात नाही D) **वरील सर्व**

12) ............. हे मक्तेदारीयुक्त स्पर्धेचे वैशिष्ट्ये आहे.

A) **वस्तू भेद** B) एकच विक्रेता

C) एकच ग्राहक D) सर्वच

13) बाजारपेठेचे वर्गीकरण खालील प्रकाशने होते.

A) स्पर्धेनुसार वर्गीकरण B) स्थानानुसार वर्गीकरण

C) वस्तूनुसार वर्गीकरण D) **वरील सर्व**

14) मक्तेदारी बाजारपेठेत ........... चा अभाव असतो.

A) **स्पर्धेचा** B) खरेदीदाराचा

C) विक्रेत्याचा D) यापैकी नाही

15) ...........चे किंमत व पुरवठा या दोन्हींवर नियंत्रण ठेवू शकत नाही.

A) विक्रेता B) **मक्तेदारी** C) उत्पादक D) यापैकी नाही

16) सरासरी प्राप्ती म्हणजे बाजारात ठरणारी .......... होय.

A) **किंमत** B) स्पर्धा C) सिमांत प्राप्ती D) यापैकी नाही

17) ताग, चहा ही ............ मक्तेदारीची उदाहरणे आहे.

A) **नैसर्गिक** B) वैधानिक C) सामाजिक D) आर्थिक

18) लता मंगेशकरचा आवाज ............ मक्तेदारी आहे.

A) आर्थिक B) **नैसर्गिक** C) सामाजिक D) वरील सर्व

19) सिमांत प्राप्ती सरासरी प्राप्तीपेक्षा ............... कमी होत जाते.
A) जास्त B) **अधिक वेगाने**
C) अत्यंत D) यापैकी नाही

20) वस्तूभेद हे ........... स्पर्धेचे लक्षण आहे.
A) **मक्तेदारीयुक्त** B) पूर्ण
C) मक्तेदारी D) यापैकी नाही

21) ............. यांनी मक्तेदारीयुक्त स्पर्धेत उद्योगऐवजी समूह ही संज्ञा वापरली आहे.
A) **चेंबरलीन** B) प्रो. पिगू C) रॉबिन्स D) यापैकी नाही

22) मक्तेदारीत वस्तूची किंमतपातळी .......... वर अवलंबून असते.
A) मागणी B) **वस्तूचा पुरवठा**
C) मागणी पुरवठा D) यापैकी नाही

23) मक्तेदारीयुक्त स्पर्धेत दीर्घकाळात ............. नफा मिळतो.
A) असाधारण B) **साधारण** C) जास्त D) कमी

24) वस्तूच्या मागणी वक्राचा आकार अथवा स्थिती बदलण्यासाठी केलेला खर्च म्हणजे विक्री खर्च ही ............. ची व्याख्या.
A) **चेंबरलिन** B) पिगू C) लिप्से D) केन्स

25) विभाजनाचा सिमांत उत्पादकता सिद्धांत ........ वर आधारित आहे.
A) अपूर्ण स्पर्धा B) **पूर्ण स्पर्धा** C) मक्तेदारी D) सर्व

26) स्पर्धेनुसार बाजारपेठेत प्रकार ...........
A) पूर्ण स्पर्धा B) मक्तेदारी स्पर्धा
C) अपूर्ण स्पर्धा D) **वरील सर्व**

27) ............. बाजारेपठेत विक्रेत्याचे वर्चस्व असते.
A) **एकाधिकार** B) एकाधिकारशाहीयुक्त
C) अल्पाधिकार D) पूर्ण स्पर्धा

28) ज्या बाजारात मागणी-पुरवठ्याच्या सहाय्याने किंमती ठरतात. त्या बाजारपेठेला ........... म्हणतात.
A) **पूर्ण स्पर्धेची बाजारपेठ** B) अपूर्ण स्पर्धा
C) वास्तविक बाजार D) मक्तेदारी



